# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक २० एप्रिल १९९८ ते दिनांक ०५ नोव्हेंबर १९९८**

**रजिष्टर क्र. ०६**

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २०.०४.९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मा.महापौर, श्री. अब्दुल रशिद (मामु) यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि.२०.०४.१९९८ रोजी सर्वसाधारण सभा संपन्न झाली. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने ठीक ३.०० वाजता झाली.**

**सभेस खालील स.सदस्य तथा अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा.श्री. तरविंदरसिंग महेंद्रसिंग धिल्लन | - | उप-महापौर |
| ०२. | मा.श्री. सोनवणे सुदाम रामदास | - | स.सदस्य |
| ०३. | मा.श्री. फैय्यज अहेमद कुरेशी | - | -//- |
| ०४. | मा.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | - | -//- |
| ०५. | मा.सौ. लोखंडे रुख्मिणीबाई खंडेराव | - | -//- |
| ०६. | मा.श्री. अफसर खाँ यासिन खाँ | - | -//- |
| ०७. | मा.सौ. साजेदा बेगम | - | -//- |
| ०८. | मा.श्री. म.सलिम म.हनिफ कुरेशी | - | -//- |
| ०९. | मा.श्री. गौतम भागाजी खरात | - | -//- |
| १०. | मा.ॲड. गणेश किसनराव वानखेडे | - | -//- |
| ११. | मा.सौ. जोशी रजनी रमेश | - | -//- |
| १२. | मा.सौ. उषाबाई दिलीप गायकवाड | - | -//- |
| १३. | मा.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | - | -//- |
| १४. | मा.सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | - | -//- |
| १५. | मा.श्री. लांडगे गौतम लिंबाजी | - | -//- |
| १६. | मा.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | - | -//- |
| १७. | मा.श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ | - | -//- |
| १८. | मा.श्री. पाटील नरेंद्र यादवराव | - | -//- |
| १९. | मा.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | -//- |
| २०. | मा.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | - | -//- |
| २१. | मा.श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग | - | -//- |
| २२. | मा.सौ. शिंदे पद्मा बाबुराव | - | -//- |
| २३. | मा.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | - | -//- |
| २४. | मा.श्री. मालाणी प्रफुल्ल लालचंद | - | -//- |
| २५. | मा.श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ | - | -//- |
| २६. | मा.सौ. धनश्री अशोक विसपुते | - | -//- |
| २७. | मा.सौ. फरहद बानो भ्र.मोनवाज | - | -//- |
| २८. | मा.श्री. अजिज खाँ गणी खाँ | - | -//- |
| २९. | मा.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | - | -//- |
| ३०. | मा.श्रीमती नुरजहाँ बेगम अ.रहेमान खान | - | -//- |
| ३१. | मा.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | -//- |
| ३२. | मा.श्री. हाजी मोहसीन अ. हाजी बशिर अ. | - | -//- |
| ३३. | मा.श्री. मुजिब आलमशा मिर आलमशाह | - | -//- |
| ३४. | मा.सौ. मोहसिना बिल्कीस विरदारोद्दीन | - | -//- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५. | मा.श्री. अ.जावेद रज्जाक | - | -//- |
| ३६. | मा.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | - | -//- |
| ३७. | मा.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | - | -//- |
| ३८. | मा.सौ. वाडेकर यशोदा धनंजय | - | -//- |
| ३९. | मा.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | - | -//- |
| ४०. | मा.श्रीमती गंगवाल पुष्पा सुरेशचंद्र | - | -//- |
| ४१. | मा.श्री. हमिदउद्दीन ताबा फसियोद्दीन | - | -//- |
| ४२. | मा.श्री. म.अ.रऊफ म.अ.माबुद | - | -//- |
| ४३. | मा.श्री. स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबुद्दीन | - | -//- |
| ४४. | मा.श्री. खाखोरडीया धिरज शांतीलाल | - | -//- |
| ४५. | मा.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | - | -//- |
| ४६. | मा.श्री. सय्यद अली मिरा सलामी | - | -//- |
| ४७. | मा.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | -//- |
| ४८. | मा.श्री. संजय किशनराव केनेकर | - | -//- |
| ४९. | मा.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | - | -//- |
| ५०. | मा.सौ. दलाल लता श्रीनिवास | - | -//- |
| ५१. | मा.श्री. ओक जयवंत केशवराव | - | -//- |
| ५२. | मा.श्रीमती अलका रमेश पाटील | - | -//- |
| ५३. | मा.सौ. धांडे शकुंतला हरिदास | - | -//- |
| ५४. | मा.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण | - | -//- |
| ५५. | मा.कु. लाडवाणी माया लिंबाजी | - | -//- |
| ५६. | मा.श्री.डॉ. कराड भागवत किशनराव | - | -//- |
| ५७. | मा.सौ. आव्हाड सविता संजय | - | -//- |
| ५८. | मा.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | - | -//- |
| ५९. | मा.श्री. अ.रशिद अ.सत्तार | - | -//- |
| ६०. | मा.श्री. विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | - | -//- |
| ६१. | मा.श्री. जैन विकास रतनलाल | - | -//- |
| ६२. | मा.श्री. गाडे गंगाधर सुखदेव | - | -//- |
| ६३. | मा.श्री. बारवाल गजानन रामकिशन | - | -//- |
| ६४. | मा.श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग | - | -//- |
| ६५. | मा.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | - | -//- |
| ६६. | मा.श्री. जोशी संजय रामदास | - | -//- |
| ६७. | मा.श्री. हाळनोर गिरजाराम लक्ष्मणराव | - | -//- |
| ६८. | मा.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | - | -//- |
| ६९. | मा.सौ. जोत्सना हिवराळे | - | -//- |
| ७०. | मा.श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | - | -//- |
| ७१. | मा.सौ. राधाबाई तळेकर | - | -//- |
| ७२. | मा.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | - | -//- |
| ७३. | मा.श्री. जाधव विठ्ठल किसन | - | -//- |
| ७४. | मा.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | - | -//- |
| ७५. | मा.सौ. काळुसे मंदा धनंजय | - | -//- |
| ७६. | मा.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | - | -//- |

| | | | |
|---|---|---|---|
| ७७. | मा.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | - | -//- |
| ७८. | मा.श्री. घडामोडे भगवान देविदास | - | -//- |
| ७९. | मा.श्री. नवपुते कचरु चंद्रभान | - | -//- |
| ८०. | मा.श्री. मो.मुश्ताक अहेमद | - | -//- |

**विषय क्र.१ :-** मुंबई प्रांतिकमहानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (१) (१ अ) व महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर पदाचे आरक्षण) नियम १९९४ चे नियम ३ नुसार नागरिकांचा मागासवर्ग महिला प्रवर्गातील निवडून आलेल्या सदस्यांमधुन मा.महापौर म्हणून निवड करणे.

**संवाद :**

**सचिव :** मा.महापौर व मा.उप-महापौर या पदासाठी आज निवडणुक होत आहे. प्रथमतः मा.महापौर या पदासाठी ज्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केलेले आहेत त्यांची नावे वाचुन दाखविली.

**मा.महापौर :** स.सदस्यांना विनंती करण्यात येते की, ज्या उमेदवारांना महापौर पदासाठीच्या उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाचे आहे त्यांनी परत घ्यावे.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी किमान आणखी अर्धा तासाचा अवधी द्यावा.

**मा.महापौर :** ठिक आहे. महापौर पदासाठी ज्या उमेदवारांनी नामांकित अर्ज दाखल केलेले आहे व ज्यांना अमेदवारी मागे घ्यावयाची आहे. त्यांचे साठी अर्ध्या तासांचा अवधी देण्यात येतो. (वेळ अंदाजे ३.०५ वा) सभेला सुरुवात अंदाजे ३.४५ वा.) माजी नगरसेवक हफिजोद्दीन यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहात १.०० मिनीट श्रध्दांजली वाहण्यात यावी. (सभागृहात १.०० मिनीट स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.)

**सचिव :** मा.महापौर पदासाठीच्या उमेदवारी अर्ज ज्यांनी दाखल केली त्यापैकी स.सदस्या, श्रीमती मंदा काळुसे, यशोदा वाडेकर व सुनंदा कोल्हे यांनी आप-आपली उमेदवारी अर्ज परत घेतली आहेत. आता मा.महापौर पदासाठी खालील उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत.

१) स.सदस्या श्रीमती शिलाताई गुंजाळे
२) स.सदस्या श्रीमती साजेदा बेगम
३) स.सदस्या श्रीमती नुरजहाँ बेगम व
४) स.सदस्या श्रीमती जाहेदा बेगम

**महापौर :** बॅलेट पेपर तयार करावयाचे असून त्यासाठी अर्ध्या तासाचा अवधी देण्यात येतो. वेळ अंदाजे ३.४५ वाजता सभेला सुरुवात अंदाजे ४.५० वाजता.

**सचिव :** मा.महापौर पदाच्या निवडणुक प्रक्रियेसाठी नियम कसे आहेत या विषयी माहिती दिली ती खालीलप्रमाणे

१) एका उमेदवारास एकच मत देण्याचा अधिकार आहे.
२) कोणत्याही प्रकारची बॅलेट पेपरवर स्वाक्षरी करु नये व डाग पाडु नये.
३) कोणत्याही प्रकारची बॅलेट पेपरवर निशानी करु नये, लिहू नये अथवा पैसे ठेवू नये नसता संबंधित मत टाकणाऱ्या व्यक्तीचे मत बाद ठरविण्यात येईल.
४) मते पेटी रिकामी असल्याचे सभागृहात सर्वांना दाखविण्यात येईल.

५) मतदान अधिकारी जो पेन देतील त्याच पेनने मतदान करावे किंवा फुल्या माराव्यात.
(मतपेटी सभागृहात रिकामी असल्याचे यावेळी दाखविण्यात आले व मतदान पेटीला सिल लावण्यात आले.)

जनसंपर्क अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रिया सुरु होत असतांना वार्डनिहाय स.सदस्यांचे नांव पुकारावे.

**मा.महापौर :** आता निवडणुकीस सुरुवात होत आहे. जनसंपर्क अधिकारी यांनी नांवे पुकारावे. (वेळ अंदाजे ४.५५ वाजता)

**जनसंपर्क अधिकारी :** स.सदस्य, श्री.विकास जैन, वॉर्ड क्र.६४ यांनी सुरुवातीस मतदान केले. त्यानंतर वॉर्ड क्र.१ ते ४ यांनी मतदान केले. वॉर्ड क्र.५ च्या स.सदस्य यांनी मा.महापौरांच्या सुचनेनुसार श्री.एच.आर.बाहेती यांनी मतदानाच्या वेळी सहकार्य केले. नंतर वार्ड क्र.६ ते २२ पर्यंत मतदान पुर्ण झाले व वॉर्ड क्र.२३ च्या स.सदस्य यांना मा.महापौर यांच्या सुचनेनुसार श्री.एस.आर. जरारे यांनी मतदानाच्या वेळी सहकार्य केले. वॉर्ड क्र.२४ ते २५ च्या स.सदस्यांचे मतदान झाले. तसेच वॉर्ड क्र.२६ चे स.सदस्य श्री. फजलउल्ला खॉन अजमत उल्ला खॉन गैरहजर होते व वॉर्ड क्र.२७ ते ४६ चे स.सदस्यांनी मतदान केले व वॉर्ड क्र.४७ चे स.सदस्य यांना मा.महापौर यांचे सुचनेवरुन मुख्य लेखा परिक्षक, श्री.सोनार एम.एन. यांनी मतदानासाठी सहकार्य केले. वॉर्ड क्र.४८ व ४९ मतदान पुर्ण झाले व वॉर्ड क्र.५० च्या स.सदस्य यांना मा.महापौर यांचे सुचनेनुसार श्री.दिनकर देशपांडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सहकार्य केले. वॉर्ड क्र.५१ ते ५४ मतदान प्रक्रीया पुर्ण झाली. व वॉर्ड क्र.५५ च्या वेळेस मा.महापौर यांनी स्वत: डायस वरुन उठून, गाऊन काढला व मा.उप-महापौर कडे दिला व मतदान केले. वॉर्ड क्र.५७ ते ६१ मतदान पुर्ण झाले. वॉर्ड क्र.६२ चे नांव घेतले यावेळी मा.उप-महापौर यांनी महापौरांचा घातलेला गाऊन काढुन, मा.महापौरांकडे घालण्यास दिला व मतदानासाठी गेले. व मतदान केले व वॉर्ड क्र.६३ ते ६४ च्या स.सदस्यांनी मतदान केले व वॉर्ड क्र.६५ चे स.सदस्य श्री गंगाधर सुखदेव गाडे गैरहजर होते. वॉर्ड क्र.६६ ते ८२ च्या स.सदस्यांनी मतदान केले.

**मा.महापौर :** मतदान प्रक्रिया पुर्ण झालेली आहे. जे स.सदस्य गैरहजर आहेत व ज्यांनी मतदानात भाग घेतलेला नाही. त्यांची पुन्हा नावे पुकारावे (त्यानुसार वॉर्ड क्र.२६ व ६५ चे स.सदस्य दोघेही गैरहजर असल्याचे समजले.) (वेळ अंदाजे ५.४० वाजता)

**सचिव :** मतदान पेटी सिल असल्याचे सभागृहात दाखविण्यात आले व छानी अधिकाऱ्यासमोर मतपेटी उघडुन मा.महापौरांच्या मतपत्रिकेवर स्वाक्षऱ्या घेतल्या व मतमोजणीसाठी प्रत्येक उमेदवारांचे प्रतिनिधी म्हणून दोन-दोन सदस्यांनी मतमोजणी वेळी उपस्थित रहावे व तसे पत्र द्यावे असे सांगितले. छाननी अधिकाऱ्यांनी सर्व मतपत्रिकांची छाननी करुन मोजणी केली व मा.महापौरांसमोर आकडेवारी दाखविली.

**मा.महापौर :** महापौर पदासाठी निवडणूक झाली. मतमोजणी होऊन खालीलप्रमाणे निकाल मी जाहिर करीत आहे.

| **अ.क्र.** | **मा.महापौर पदासाठी उभे असलेल्यांची नांवे** | **एकूण पडलेली मते** |
|---|---|---|
| १. | स.सदस्य श्रीमती शिलाबाई गुंजाळे | ५३ |
| २. | स.सदस्य श्रीमती जाहेदा बेगम | ०१ |
| ३. | स.सदस्य श्रीमती साजेदा बेगम | २२ |
| ४. | स.सदस्य श्रीमती नुरजहाँ बेगम | ०१ |
| | | **७७ वैध मते** |
| | | **०३ अवैध मते** |
| | | **०२ गैरहजर मते** |
| | | **८२** |

अशाप्रकारे स.सदस्या, श्रीमती शिलाबाई सिताराम गुंजाळे यांना ५३ मते पडुन विजयी तर श्रीमती साजेदा बेगम यांना २२ मते पडुन पराभुत झाल्या व श्रीमती शिलाबाई गुंजाळे या मा.महापौर पदी निवडुन आल्याचे जाहिर करण्यात आले व अभिनंदन करुन त्यांना डायसवर गाऊन घालुन बसविण्यात आले.

**विषय क्र.२ :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९ (१) अन्वये मा.उप-महापौर यांची निवड करणे.

**संवाद :**

**मा.महापौर :** उप-महापौर पदासाठी ज्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहे व ज्यांनी आपली उमेदवारी अर्ज परत घ्यावयाची आहे त्यांचेसाठी फक्त पांच मिनीटांचा अवधी देण्यात येतो.

**सचिव :** मा.उप-महापौर पदासाठी एकूण दहा उमेदवारांनी आपली उमेदवारी अर्ज दाखल केलेले आहेत. त्यांची नावे वाचुन दाखविली पैकी फक्त दोनच उमेदवार निवडणुक रिंगणात असून इतर आठ उमेदवारांनी आपली उमेदवारी परत घेतलेली आहे. मा.उप-महापौर पदासाठी सर्वश्री डॉ.भागवत कराड व व श्री. अफसर खान हे उमेदवार आहेत.

**मा.महापौर:** मतपत्रिका तयार करणेसाठी पांच मिनीटांचा अवधी देण्यांत येतो. तोपर्यंत सभा तहकुब करण्यात येते. (वेळ अंदाजे ६.१५ वाजता.सभेला सुरुवात अंदाजे ६.३० वा.) आता मतदान प्रक्रियेला सुरुवात करणे पुर्वी सचिवांनी संपुर्ण माहिती द्यावी.

**सचिव :** मतदान पेटी पुर्ण रिकामी असल्याचे सभागृहात दाखविण्यांत आले व मतदान प्रक्रिये विषयी माहिती सभागृहात सांगितली आणि मतदान पेटीला सभागृहात सर्वां समोर सिल लावून मतदान प्रक्रियेसाठी जनसंपर्क अधिकारी यांना नांवे पुकारण्यास सुचना केली.

**जनसंपर्क अधिकारी :** सुरुवातीस उप-महापौर पदाच्या निवडणूकीसाठी वॉर्ड क्र.३५ चे स.सदस्य, श्री.जावेद रज्जाक व वॉर्ड क्र.२९ चे स.सदस्य, श्री.मुश्ताक अहमद यांचे नांव पुकारण्यात आले व त्यांनी मतदान केले. नंतर वॉर्ड क्र.१ ते ४ पर्यंत मतदान झाले व वॉर्ड क्र.५ च्या स.सदस्यांना मा.महापौर यांनी सुचना केल्यानुसार श्री.एच.आर. बाहेती यांना मदत करण्यास सांगितले. वॉर्ड क्र.६ ते ८ च्या स.सदस्यांनी मतदान केले. वॉर्ड क्र.९ च्या सदस्या यांनी मतदानासाठी भाग घेतला. त्यानंतर वॉर्ड क्र.४४ चे सदस्यांनी मतदान केले व वॉर्ड क्र.१० यांनी मतदान केले. व वॉर्ड क्र.११ च्या सदस्या मा.महापौर डायस वरुन उठून गाऊन काढला व मा.उप-महापौर यांचेकडे

सोपवुन मतदानात भाग घेतला. वॉर्ड क्र.१२ ते २२ चे सदस्यांनी मतदानात भाग घेतला व वॉर्ड क्र.२३ चे सदस्यांना मा.महापौरांनी सुचना केल्याप्रमाणे श्री.एच.आर.बाहेती यांनी मदत केली. वॉर्ड क्र.२४ स.सदस्या यांची गैरहजरी दिसली, याच वेळी मा.महापौरांनी मतदानात भाग घेऊन महापौरांच्या डायसवर बसल्या. वॉर्ड क्र.२५ च्या सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वॉर्ड क्र.२६ चे सदस्यांची गैरहजेरी दिसली. वॉर्ड क्र.२७ व २८ यांनी मतदान केले व वॉर्ड क्र.३० चे सदस्य यांची मतदानासाठी गैरहजेरी दिसली. वॉर्ड क्र.३१ ते ३४ मतदान केले. वॉर्ड क्र.३६ च्या स.सदस्या यांची गैरहजरेरी दिसली. वॉर्ड क्र. ३७ ते ४६ यांनी मतदान केले व वॉर्ड क्र.४७ चे स.सदस्य यांना मा.महापौरांनी सुचना केल्यानुसार श्री.एच.आर. बाहेती यांनी सहकार्य केले. वॉर्ड क्र.४८ व ४९ मतदान केले तर वॉर्ड क्र.५० च्या स.सदस्या यांना श्री.जरारे एस.आर. यांनी सहकार्य करावे असे मा.महापौरांनी सुचना केली. वॉर्ड क्र. ५१ ते ५६ च्या सदस्यांनी मतदान केले व वॉर्ड क्र. ५७ च्या स.सदस्या यांची गैरहजेरी दिसली. तसे वॉर्ड क्र. ५८ ते ६२ मतदान झाले तर वॉर्ड क्र.६३ चे स.सदस्य यांची गैरहजेरी दिसली. वॉर्ड क्र. ६४ ते ८२ च्या स.सदस्यांनी मतदानात भाग घेतला. (अशा प्रकारे मतदान प्रक्रीया ७.०० ला संपली.)

**मा.महापौर :** जे स.सदस्य मतदानासाठी गैरहजर आहेत. त्यांचे साठी पुन्हा नांवे पुकारण्यात यावे व यासाठी १५.०० मिनीटांचा अवधी देण्यात येतो. तोपर्यंत सभा तहकुब करण्यात येते. (वेळ ७.०५ वाजता तर सभेला सुरुवात ७.२० वाजता) वॉर्ड क्र.२४,२६,३०,३६,५७ व ६३ चे स.सदस्य मतदानासाठी उपस्थित नाहीत. आता वेळ संपलेली असून, छाननी अधिकारी यांनी पुढील प्रक्रियेला सुरुवात करावी.

**सचिव :** मतदान पेटी सिल केलेली होंती व ती सर्वांसमोर उघडण्यात येईल, यासाठी उमेदवारांचे प्रतिनिधी म्हणून दोन-दोन प्रतिनिधींनी हजर राहण्यासाठी पत्र द्यावे (त्यानुसार प्रतिनिधीं समोर मतदान पेटी सिल असलेली उघडण्यात आली व मतपत्रिकांवर मा.महापौरांच्या स्वाक्षऱ्या घेऊन छाननी अधिकाऱ्यांनी मतमोजणी केली.)

**मा.महापौर :** मा.उप-महापौर पदासाठीच्या झालेल्या निवडणुकीचा निकाल खालीलप्रमाणे जाहिर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) डॉ.भागवत कराड | - | ५५ मते |
| २) श्री.अफसर खान | - | २१ मते |
| **एकूण मते** | **-** | **७६** |
| | | **०६ गैरहजर सदस्य** |
| | | **८२** |

अशाप्रकारे स.सदस्य, श्री.डॉ.भागवत कराड हे उप-महापौर पदी निवडुन आले. त्यांचे अभिनंदन करुन उप-महापौरांच्या डायसवर बसविण्यांत आले. जण-गण-मन राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**सर्वसाधारण सभा**

**दि.१९.०५.१९९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंगळवार दि.१९.०५.१९९८ रोजी सकाळी ११.१५ वाजता मा.महापौर सौ.शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहामध्ये वंदेमातरम् या गिताने सभेला सुरुवात झाली.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री.कराड भागवत किसनराव | - | उप महापौर |
| २. | स.स.सौ.लोखंडे रूख्मणबाई खंडेराव | - | स.सदस्य |
| ३. | स.स.श्री.विधाते प्रभाकर सिताराम | - | स.सदस्य |
| ४. | स.स.सौ.रजनी रमेश जोशी | - | स.सदस्य |
| ५. | स.स.सौ.उषाबाई दिलीप गायकवाड | - | स.सदस्य |
| ६. | स.स.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलीक | - | स.सदस्य |
| ७. | स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | - | स.सदस्य |
| ८. | स.स.श्री.नरेंद्र दादाराव पाटील | - | स.सदस्य |
| ९. | स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | - | स.सदस्य |
| १०. | स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद | - | स.सदस्य |
| ११. | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | - | स.सदस्य |
| १२. | स.स.सौ.धनश्री अशोक विसपूते | - | स.सदस्य |
| १३. | स.स.श्री.फजलउल्लाखान अजमतउल्ला खान | - | स.सदस्य |
| १४. | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | - | स.सदस्य |
| १५. | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | - | स.सदस्य |
| १६. | स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | - | स.सदस्य |
| १७. | स.स.श्री.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | स.सदस्य |
| १८. | स.स.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण | - | स.सदस्य |
| १९. | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | - | स.सदस्य |
| २०. | स.स.सौ.धांडे शकुंतला हरिदास | - | स.सदस्य |
| २१. | स.स.श्री.अब्दुल रशिद खान (मामु) | - | स.सदस्य |
| २२. | स.स.सौ.निर्मला विठ्ठल कांबळे | - | स.सदस्य |
| २३. | स.स.श्री. विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | - | स.सदस्य |
| २४. | स.स.श्री.गंगाधर सुखदेव गाडे | - | स.सदस्य |
| २५. | स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन | - | स.सदस्य |
| २६. | स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | - | स.सदस्य |
| २७. | स.स.श्री.निकाळजे प्रकाश भावूराव | - | स.सदस्य |
| २८. | स.स.श्री.गिरजाराम नानाराव हळनोर | - | स.सदस्य |
| २९. | स.स.सौ.जोस्त्ना हिवराळे | - | स.सदस्य |
| ३०. | स.स.श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे | - | स.सदस्य |
| ३१. | स.स.सौ.राधाबाई तळेकर | - | स.सदस्य |
| ३२. | स.स.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम | - | स.सदस्य |
| ३३. | स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास | - | स.सदस्य |

**संवाद :**

**श्री.रशिद खॉन (मामु):** मागील आठवड्यामध्ये आपल्या देशामध्ये अनुस्फोट घडवुन आणल्याने हिन्दुस्थान देश आण्विक शक्तीशाली बनलेला आहे. या यशस्वी अनुस्फोटासाठी आपल्या देशाचे महान शास्त्रज्ञ ए.पी.जे.श्री.अब्दुल कलाम आझाद व श्री. चिदंबरम आणि इतर शास्त्रज्ञ यांचे अभिनंदन करण्यांत यावे. व पंतप्रधानाना पत्र पाठविण्यांत यावे.

**श्री.घडामोडे भगवान :** याबाबत बऱ्याच बातम्या प्रसिध्द झाल्या. सभागृहाने मा.पंतप्रधानांचे अभिनंदन करण्यांत यावे.

**सौ.रजनी जोशी :** अभिनंदन करण्यांत यावे.

**श्री.गंगाधर गाडे :** ठरावाला विरोध नाही. पण आर्थिक परिस्थितीची लक्षात घेता अणुस्फोट करण्याचा निर्णय योग्य वेळी घेतला नाही. निवडणुका झालेल्या आहेत. अणुस्फोटाचा खर्च देशास परवडणारा नाही. घाई गर्दीत निर्णय घेण्यात आला आहे. राजकीय हेतूने घडविण्यात आले. देशात एक संघ सरकार नाही. लोकांची पाठीशी राहावी या उद्देशाने घाई केली.

**श्री.अ.रशिदखॉन :** देशाला अणुचाचणीची आवश्यकता होती. फार दिवसापासुन फाईल पडुन होती. त्यामुळे ए.पी.जे.अब्दुल कलाम आझाद व श्री.चिदंबरम या शास्त्रज्ञांचे अभिनंदन करण्यांत यावे.

**श्री.विधाते प्रभाकर :** परदेशात अभिनंदन झालेले आहे.

**श्री.नरेंद्र पाटील :** गाडे साहेबांच्या मताशी मी सहमत आहे. हा राजकीय स्टंट आहे.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** सभागृहात कोरम नाही. सभा घेता येत नाही. मिटींगमध्ये चर्चा करणे चुकीचे आहे. कोणताही ठराव घेता येत नाही. (म्हणुन मा.महापौरांच्या डायस जवळ आले सभागृहात जोरजोरात एकाच वेळी अनेक स.सभासद बोलत असल्याने कोण काय बोलते ते समजत नव्हते.)

**मा.महापौर :** गणपुर्ती अभावी १० मिनीटांसाठी सभा तहकुब करण्यांत येते. वेळ अंदाजे ११.२५ वाजता सभा तहकुब करण्यांत आली. (यावेळी सभागृहात अंदाजे २१ स.सभासद उपस्थित होते.) नंतर अंदाजे ११.३५ वाजता पुन्हा सभेस सुरुवात झाली. त्यावेळी गणपुर्ती झालेली होती. व (यावेळी ३३ स.सभासद उपस्थित होते.)

**मा.महापौर :** मा.पंतप्रधान व शास्त्रज्ञांचे अभिनंदन, करण्यात येते (यावेळी बरेच स.सभासद जोरजोरात बोलत होते.)

जन-गण-मन या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित | स्वाक्षरित |
| नगर सचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**१२ जुन १९९८ रोजी भरलेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त शुक्रवार दिनांक १२ जुन १९९८ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेस मा.महापौर ,सौ.शिलाबाई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली प्रबोधनकार केशव सितराम ठाकरे सभागृहात बंदेमातरम् या गीताने सुरूवात झाली.**

**या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील सन्माननिय सभासद सभेस उपस्थित होते . सभासदांची उपस्थिती हजेरी रजिष्टर प्रमाणे.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.डॉ. कराड भागवत किशनराव | - | उप महापौर |
| २. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | स.सदस्य |
| ३. | स.स.श्री. सुदाम सोनवणे | - | स.सदस्य |
| ४. | स.स.श्री. फैय्याज अहेमद कुरैशी | - | स.सदस्य |
| ५. | स.स.सौ लोखंडे रूख्मणबाई खंडेराव | - | स.सदस्य |
| ६. | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | - | स.सदस्य |
| ७. | स.स.श्री. म.सलिम म.हनिफ | - | स.सदस्य |
| ८. | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | - | स.सदस्य |
| ९. | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | - | स.सदस्य |
| १०. | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | - | स.सदस्य |
| ११. | स.स.श्री. लांडगे गौतम लिंबाजी | - | स.सदस्य |
| १२. | स.स.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | - | स.सदस्य |
| १३. | स.स.श्री. भालेराव अभिमन्यु रामभावू | - | स.सदस्य |
| १४. | स.स.श्री. नरेंद्र यादवराव पाटील | - | स.सदस्य |
| १५. | स.स.श्री. कोकाटे काशीनाथ हरिभावू | - | स.सदस्य |
| १६. | स.स.सौ. पद्मा बाबुराव शिंदे | - | स.सदस्य |
| १७. | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | - | स.सदस्य |
| १८. | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल रामचंद्र | - | स.सदस्य |
| १९. | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | - | स.सदस्य |
| २०. | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | - | स.सदस्य |
| २१. | स.स.सौ. फरहद बानो म.मो नवाज | - | स.सदस्य |
| २२. | स.स.श्री. फजलउल्ला खॅान अजमत उल्लाखान | - | स.सदस्य |
| २३. | स.स.श्री. अजीज खॅा गणी खॅा | - | स.सदस्य |
| २४. | स.स.श्रीमती आबेदा बंगम मुस्तफा | - | स.सदस्य |
| २५. | स.स.श्री. महमद मुस्तफा अहमद | - | स.सदस्य |
| २६. | स.स.श्रीमती नुरजहॉं बेगम रहेमान खान | - | स.सदस्य |
| २७. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सदस्य |
| २८. | स.स.श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी | - | स.सदस्य |
| २९. | स.स.श्री. मुजीब आलमशाह मीर आलमशाह | - | स.सदस्य |
| ३०. | स.स.सौ. मोहसीना बिल्कीस विखारोद्दीन | - | स.सदस्य |
| ३१. | स.स.श्री. जावेद रज्जाक | - | स.सदस्य |
| ३२. | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | - | स.सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३. | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | - | स.सदस्य |
| ३४. | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | - | स.सदस्य |
| ३५. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | - | स.सदस्य |
| ३६. | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | - | स.सदस्य |
| ३७. | स.स.श्री. अ.अ.रऊफ म.अ.माबुद | - | स.सदस्य |
| ३८. | स.स.श्री. स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन | - | स.सदस्य |
| ३९. | स.स.श्री. सय्यद अली मीरा सलामी | - | स.सदस्य |
| ४०. | स.स.श्री. संजय किशनराव केनेकर | - | स.सदस्य |
| ४१. | स.स.सौ. लता दलाल | - | स.सदस्य |
| ४२. | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | - | स.सदस्य |
| ४३. | स.स.सौ. धांडे शकुंतला हरिदास | - | स.सदस्य |
| ४४. | स.स.श्री. अब्दुल रशिद खाँन (मामू) | - | स.सदस्य |
| ४५. | स.स.कु. माया लिंबाजी लाडवाणी | - | स.सदस्य |
| ४६. | स.स.सौ. आव्हाड सविता धनंजय | - | स.सदस्य |
| ४७. | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | - | स.सदस्य |
| ४८. | स.स.श्री. धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग | - | स.सदस्य |
| ४९. | स.स.श्री. विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | - | स.सदस्य |
| ५०. | स.स.श्री. गंगाधर सुखदेव गाडे | - | स.सदस्य |
| ५१. | स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन | - | स.सदस्य |
| ५२. | स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | - | स.सदस्य |
| ५३. | स.स.श्री. जोशी संजय रामदास | - | स.सदस्य |
| ५४. | स.स.श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत | - | स.सदस्य |
| ५५. | स.स.सौ. जोस्त्ना हिवराळे | - | स.सदस्य |
| ५६. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सदस्य |
| ५७. | स.स.श्री. विठ्ठल किशन जाधव | - | स.सदस्य |
| ५८. | स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | - | स.सदस्य |
| ५९. | स.स.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | - | स.सदस्य |
| ६०. | स.स.श्रीमती काळुसे मंदा धनंजय | - | स.सदस्य |
| ६१. | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | - | स.सदस्य |
| ६२. | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | - | स.सदस्य |

**संवाद :**

**श्री.नरेंद्र पाटील:** सुचनेनुसार सभेची वेळ ३.०० दर्शविण्यांत आली आहे. आता ३.२० झाले आहे. तरी अद्यापपर्यंत सभेस सुरुवात झाली नाही. ही बाब बरोबर नाही. नेहमीप्रमाणे सभेची वेळ ही सकाळी ११.०० किंवा ११.३० हीच ठेवण्यात यावी.

**डॉ.प्रफुल्ल मालाणी :** सभेची वेळ कोणतीही ठरवु शकता. तो मा.महापौरांचा अधिकार आहे.

**विषय क्र.२ अ :** ऐन वेळेला चर्चेद्वारे मांडलेला विषय. स.सदस्या कु.माया लाडवाणी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने विद्या वाचस्पति (डॉक्टरेट) पदवी दिली आहे. त्याबद्दल अभिनंदनाचा ठराव सभागृहाने मंजूर करावा. अशी (तोंडी) विनंती आहे.

सुचक : सौ.लता दलाल अनुमोदक : श्री.नरेंद्र पाटील

**सौ.लता दलाल :** स.सभासद कु.माया लाडवाणी यांनी शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्यावर पत्रकारिता या विषयावर सादर केलेला प्रबंध मान्य झाला असून त्याबद्दल कु.माया लाडवाणी यांना डॉक्टरेट ही पदवी मिळाली. कु.माया लाडवाणी यांनी मिळालेल्या डॉक्टरेट पदवीनिमित्त त्यांच्या अभिनंदनाच्या ठराव सभागृहाने मंजूर करावा.

**श्री.नरेंद्र पाटील :** स.सभासद सौ.लता दलाल यांनी मांडलेल्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**कु.माया लाडवाणी :** आज माझा आनंद गगनात मावत नाही. मा.श्री.बाळासाहेब ठाकरे यांची पत्रकरिता या सारख्या विषयावर मी दाखल केलेला प्रबंध मान्य व्हावा आणि त्यासाठी मला डॉक्टरेट ही पदवी संपादन करता आली या कामी आपणा सर्वांचे आर्शिवाद आणि सहकार्य मिळाले आहे. त्यामुळे मला सर्वात मोठे यश व बहुमान प्राप्त झाले हे मी माझे भाग्य समजते. हा प्रबंध तयार करतांना मला माझ्या शिक्षणाचा फायदा झाला. या कामी मा.पालकमंत्री सर्व सभागृह, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, प्रभागातील सन्माननीय नागरीक यांचे बहुमोल असे सहकार्य लाभले आहे. या सर्वांची मी अत्यंत आभारी आहे.

**मा.आयुक्त :** आपल्या सभागृहाच्या सन्माननीय सदस्या कु.माया लाडवाणी यांनी मा.श्री.बाळासाहेब ठाकरे आणि त्यांची पत्रकारिता या विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून विद्या वाचस्पति (पी.एच.डी.) ही पदवी मिळवली आहे. त्याबद्दल कु.माया लाडवाणी यांच्या अभिनंदनाचा ठराव सन्माननीय सदस्या सौ.लता दलाल यांनी मांडला आहे. व त्यास सन्माननीय सभासद श्री.नरेंद्र पाटील यांनी अनुमोदन दिले आहे. हा अभिनंदनाचा ठराव सभागृहाने पारित केला आहे. प्रबंध लिहिणे ही एक विशिष्ट बाब आहे. विद्या वाचस्पति (पी.एच.डी.) ही पदवी मिळाल्यामुळे सन्माननिय सदस्या या आजपासुन डॉ.कु.माया लाडवाणी म्हटल्या जातील. याचा या महापालिकेस अभिमान आहे. प्रशासकीय अधिकारी या अभिनंदनात सहभागी आहे. डॉ.कु.माया लाडवाणी यांच्या पत्रकारिता आणि समाजकारण या विषयावर मिळविलेल्या विद्या वाचस्पति (पी.एच.डी.) चा सर्वांना फार मोठ्या प्रमाणावर उपयोग होईल.

**मा.महापौर :** सन्माननीय सदस्या सौ.लता दलाल यांनी मांडलेला अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :-** औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन्माननीय सदस्या कु.माया लाडवाणी यांनी मा.श्री.बाळासाहेब ठाकरे आणि त्यांची पत्रकारिता या विषयावर दाखल केल्ल्या प्रबंधाबाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने त्यांना विद्या वाचस्पति (पी.एच.डी.) पदवी बहाल केली आहे. यांचा या सभागृहास अभिमान वाटतो. विद्या वाचस्पति (पी.एच.डी.) ही पदवी मिळाल्याबद्दल या सभागृहातर्फे सन्माननीय सदस्या डॉ.कु.माया लाडवाणी यांचे हार्दिक अभिनंदन करण्यांत येते. ठराव सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.३/१ :** औरंगाबाद शहर व सिडको भागातील पाणी पुरवठा बाबत विचार विनिमय होणे.

**संवाद :**

**मा.महापौर :** प्रभागनिहाय पाणी पुरवठ्या बाबत सन्माननीय सभासदांनी चर्चा करावी.

**श्री.मोहसिन अहेमद :** जे जे सन्माननिय सभासद पाणी पुरवठा बाबत चर्चा करु इच्छितात ते चर्चा करतील आणि ज्यांची इच्छा नसेल ते सभासद चर्चा करणार नाहीत.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** पाणी प्रश्नाबाबत सन्माननिय सभासदाकडून मागणी केलेल्या प्रश्न युध्द पातळीवर सोडविण्यात येतील अशी मंजूरी सभागृहात यापुर्वी दिली आहे. तेव्हा अशा किती संचिका आतापर्यंत मंजूर करण्यांत आल्या याची माहिती देण्यांत यावी.

**श्री.हमीदोद्दीन ताबा :** आजच्या सभेसाठी एका ओळीचा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे. या ठरावाचा उद्देश काय आहे ते कळवावे म्हणजे त्याप्रमाणे सभासदांना चर्चा करता येईल.

**श्री.नरेंद्र पाटील :** आजच्या सभेसाठी जो प्रस्ताव देण्यांत आला आहे. त्या शहर एक भाग आणि सिडको वेगळा भाग असा प्रस्ताव का देण्यांत आला याचा खुलासा व्हावा.

**मा.महापौर :** सिडको भागात पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहे.

**श्री.प्रफुल्ल मालानी :** सिडको भाग अद्याप शहरात सामावून घेतलेला नाही. म्हणून विषय पत्रिकेवर तसा विषय ठेवला आहे.

यावेळी मा.उप-महापौर सन्माननीय सभासदांच्या प्रश्नांना उत्तर देत असतांना मा.महापौर यांचे ऐवजी मा.उप-महापौर सभासदांच्या प्रश्नांना उत्तर देऊ शकत नाही. अशी मागणी सर्व विरोधी पक्षाच्या सदस्यांनी एकाच वेळी केली, असता मी या सभागृहाचा सदस्य आहे. आणि मा.महापौर यांनी मला परवानगी दिली आहे. म्हणून खुलासा केला अशी माहिती मा.उप-महापौर यांनी सभागृहास दिली.

**मा.महापौर :** सर्व सभासदांनी आपआपल्या जागेवर बसून घ्यावे व सभागृहात पाणी पुरवठ्याबाबत चर्चा करावी.

**मा.उपमहापौर :** एक महिन्यापासुन शहर आणि सिडको भागात पाणी पुरवठा व्यवस्थीत होत नसल्याच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द होत आहेत. पाण्याचा प्रश्न मोठा आहे. विशेषतः सिडको भागात गेल्या ८/१० दिवसापासुन पाणी नाही. महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व प्राधिकरण मंडळाकडुन शहरास पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी नुकतीच महापालिकेकडे हस्तांतरीत करुन घेण्यात आली आहे. पाणी पुरवठ्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ दोषी आहे काय यांचा विचार करण्यासाठी मा.महापौर यांचे दालनात एक बैठक झाली. त्यात जी चर्चा झाली. त्याबाबत विचार करण्यासाठी आजची बैठक बोलाविण्यात आली आहे. या बाबत मा.महापौरांचे अभिनंदन करतो.

यावेळी काही सदस्य सभागृहात गोंधळ करतात आपआपसात बोलतात. त्यावेळी सन्माननीय सभासदांचे विचार सर्व सभासदांनी ऐकून घ्यावेत. सर्व सभासदांनी आपआपल्या जागेवर बसून घ्यावे. अशी सूचना मा.महापौर करतात.

**श्री.स.अली मिरा सलामी :** प्रशासनाचे अधिकारी किंवा मा.महापौर यांच्याकडुन सभागृहास खुलासा हवा आहे. हा प्रश्न पावसाळा सुरु झाल्यानंतर का ठेवण्यात आला याचा खुलासा व्हावा.

**श्री.अब्दुल रशिद खॉंन (मामू) :** सभागृहात मा.महापौर उपस्थित असतांना मा.उप-महापौर खुलासा करतात याचा अर्थ सभागृहापुढे जो विषय आहे. त्याबाबत

मा.महापौर यांचा अभ्यास नाही. मा.उप-महापौरांनी खुलासा करणे हा मा.महापौर यांचा अपमान आहे. त्याऐवजी अधिकाऱ्यांनी खुलासा केला तरी चालेल.

**मा.महापौर :** प्रभागनिहाय सन्माननीय सभासदांनी आपले मत मांडावे. प्रथम वॉर्ड क्र.१ पासुन सुरुवात करण्यात येते.

**श्री.मुजीब आलमशाह :** विषय पत्रिकेवर फक्त चर्चा लिहिली आहे. याप्रमाणे शहराची, वॉर्डाची किंवा जनरल चर्चा करावयाची याचा बोध होत नाही.

**मा.महापौर :** सन्माननीय सभासदांनी त्यांच्या प्रभागाबाबतच्या अडचणी सभागृहात मांडल्यानंतर त्या ऐकून संबंधित अधिकारी चर्चा करतील. नगर सचिव यांनी सभागृहास विषयपत्रिका समजावून सांगावी.

**नगरसचिव :** शहर व सिडको भागातील पाणी पुरवठ्याबाबतचा विषय सभागृहापुढे ठेवला आहे. सिडको महापालिकेकडे अद्याप हस्तांतर झालेले नाही. या भागातील पाणी पुरवठा हस्तांतर झाला आहे. पाणी पुरवठ्याबाबत प्रभागनिहाय सन्माननीय सभासदांनी सभागृहात चर्चा करावी, अशी मा.महापौरांची विनंती आहे.

**श्री.प्रभाकर विधाते :** शहराला गेल्या काही दिवसापासुन पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही याचा खुलासा अधिकाऱ्यांनी करावा.

**मा.महापौर :** संबंधित वॉर्डाचे सन्माननीय सभासद यांनी आपल्या वॉर्डाच्या अडचणी मांडाव्यात.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** दोन महिन्यापुर्वी पाण्याकरिता ज्या संचिका असतील त्या युध्दपातळीवर सोडवू असा निर्णय झाला आहे. या निर्णयाप्रमाणे आतापर्यंत किती संचिका प्रशासनाकडे आल्या व त्यापैकी किती संचिका मंजूर झाल्या यांचा खुलासा करण्यात यावा.

**मा.महापौर :** प्रभागनिहाय चर्चा सभागृहात होईल. वॉर्ड क्र.३

**श्री.प्रभाकर विधाते :** वॉर्ड क्र.३ मध्ये दोन पाण्याच्या टाक्या आहेत. विद्यापीठ आणि हनुमान टेकडी येथे असलेल्या पाण्याच्या टाक्यांना ज्युब्लीपार्क येथील टाकीतून पाणी पुरवठा होतो. लाईनमन गैरहजर असेल तर कमी दाबाने पाणी येते. लाईनमनला पाणी पुरवठ्याच्या वेळेत राऊंड घेणेस सांगावे अशावेळी अधिकाऱ्यांनी तपासणी करावी.

**श्री.गौतम खरात :** गेल्या चार महिन्यापासून शहराला होणारा पाणी पुरवठा आणि नागरिकांना विना पाण्यापासुन किती दिवस रहावे लागेल यांची कल्पना सन्माननीय सभासद आणि अधिकारी यांना आहे. सभागृह नेता यांना घेरावा घालण्यात आला. श्री.नरेंद्र पाटील यांची स्थितीतीच आहे. हे फक्त उदा.देत नाही. जायकवाडी पासुन शहराला पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन महापालिकेने ताब्यात घेतली आहे. विद्युत पुरवठा किती वेळा खंडीत झाला आहे. हे सभासदांना माहिती आहे. आणि त्यामुळे कमी दाबाने पाणी येते, हे सुध्दा माहिती आहे. मग आजची सभा कशा करीता घेण्यात आली हे समजत नाही.

**मा.महापौर :** मध्यंतरी चालु असलेली आचार संहिता यामुळे मध्यंतरीच्या काळात सभा घेता आली नाही.

**सौ.रजनी जोशी :** पाणी हा नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. माझ्या वॉर्डात एक दिवसा आड पाणी येते. पाण्याची वेळ बरोबर नाही. काही ठिकाणी पाणी कमी दाबाने तर काही ठिकाणी जास्त दाबाने पाणी येते असे प्रकार होत आहे.

**सौ.शिलाबाई गुंजाळे :** वॉर्ड क्र.११ मध्ये पाण्याची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. वॉर्डाला टँकरने पाणी पुरवठा होत आहे.

**श्री.गौतम लांडगे :** माहे मार्च/एप्रिल मध्ये आजची सभा झाली असती तर पाण्याविषयी नियोजन करता आले असते. आता पाऊस भरपूर पडेल त्यामुळे पाण्याचा प्रश्न सुटेल. याचा विचार करता आजची बैठक होऊन काय साध्य होणार आहे. सिडको भागाला लोकसंख्येप्रमाणे पाणी देण्याबाबत मंजूरी दिलेली आहे. ३० एम.एल.डी. पाणी देण्यांत येत नाही. आज जुन महिना उजाडला क्रॉस कनेक्शनचे काम झाले नाही. मग आजच्या बैठकीला काय उपयोग, सिडको पोलिस कॉलनीत पाणी नाही. म्हणून माजी नगरसेवक श्री.बंडु प्रधान हे उपोषणास बसले होते. शहरात असलेला मोंढा स्थलांतरीत झाला आहे. त्याबाजुला मिसारवाडी, जाधववाडी, सुरेवाडी वसाहती आहेत. त्या ठिकाणी पाण्याची सोय नाही. आजच्या बैठकीतून पाणी पुरवठ्याबाबत काही तरी निर्णय निष्पन्न झाला पाहिजे, अशी इच्छा आहे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** वॉर्ड क्र.१३ मधील ब्रिजवाडी पाण्याची टाकी पाण्याने भरत नाही म्हणून पाणी पुरवठ्यात त्रास होत आहे. जळगांव रोडहून जाणाऱ्या मोठ्या लाईनवरुन या भागासाठी लाईन टाकण्याकरिता अंदाजे सहा लाखाचा खर्च येणार आहे. असे कळते. नारेगांव भागातही पाण्याची टंचाई आहे. जळगांव रोडवर असलेल्या पाईप लाईनवरुन २०० मी.व्यासाची लाईन टाकली तर हा प्रश्न सुटेल. एन-७ ते एन-१३ पर्यंत जी भाग आहे. त्यासाठी स्वतंत्र जलकुंभ देण्याचा प्रस्ताव आहे. सिडको भागासाठी सध्या फक्त ४० एम.एल.डी. पाणी घ्यावे. लोकसंख्येच्या प्रमाणात या भागासाठी प्रत्यक्षात ४० एम.एल.डी. पाणी मिळणे आवश्यक आहे. आणि आजच्या परिस्थिती तर सिडको भागासाठी फक्त १८ ते २० एम.एल.डी. पाणी मिळते. अशा प्रकारे कमी प्रमाणात पाणी मिळत असल्याने या भागातील नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागतो. सिडको भागासाठी ३० एम.एल.डी. पाणी पुरवठा करण्यात यावा, अशा सुचना पाणी पुरवठ्याबाबत झालेल्या सभेत संबंधितांना देण्यांत आल्या आहेत.

**श्री.नरेंद्र पाटील :** गेल्या दहा वर्षात जे जे महापौर होऊन गेले त्या सर्वांनी सिडको पाणी प्रश्न व सिडको हस्तांतर यावर चर्चा केली आहे. तथापि या चर्चेतून अद्यापपावेतो काही निष्पन्न झाले नाही. यापुर्वी ही पाणी पुरवठयाबाबत अशीच बैठक घेण्यात आली होती. त्यातुन एकही गोष्ट फायदयाची झाली नाही. जायकवाडी जलाशयातून जो पाणी पुरवठा होता त्याचे दोन टप्पे करण्यात यावेत. त्यापैकी पहिला टप्प्यात एकूण जे पाणी मिळते त्यात सिडको भागासाठी पाणीपुरवठा करण्यांत यावा व दुसऱ्या टप्प्यात शहरात पाणी पुरवठा करण्यात यावा. शहरात पाणी पुरवठा होत असतांना सिडको भागासाठी पाणी पुरवठा केल्यास पाण्याची लेव्हल त्यामुळे सिडको भागास पाणी मिळत नाही. सिडको भागातील ज्या पाण्याच्या टाक्या आहेत त्याच्यासाठी स्वतंत्र विद्युतलाईन असावी याच बरोबर विद्युत पुरवठा खंडीत झाला तर पाणी पुरवठयात व्यत्यय येवू नये म्हणून पाण्याच्या

टाकीवर जनरेटरची व्यवस्था असावी असा विचार आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विद्युत पुरवठा करणारे साहित्य जुने झाले आहे. त्यामुळे लाईन असुरक्षित आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे पाणी पुरवठ्यासाठी जो विद्युत पुरवठा केला जातो त्या लाईनवर महापालिकेचीही नियंत्रण असावे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने विद्युत बिलाची थकबाकी भरली नाही. तर विद्युत पुरवठा खंडीत करण्यांत येईल. अशी जी सुचना दिली आहे ती योग्य नाही. नक्षत्रवाडीहुन वेगळी पाईप लाईन झाली पाहिजे. अशी मागणी गेल्या ५/१० वर्षापासुनची आहे. ही पाईप लाईन स्वतंत्र झाली तर सिडको भागाचा पाण्याचा प्रश्न येणार नाही. त्यासाठी २० कोटी रुपयाचा निधी मंजूर झालेला आहे. तरी पण या कामासाठी वेळ का लागतो. शहरातील जनतेला २/२ तास पाणी मिळते उलट सिडको भागाला मात्र पाणी मिळत नाही. गेल्या महिन्याच्या काळात सिडको भागाला फक्त ३५ वेळा पाणी मिळाले आहे. सिडको पाणी पुरवठ्याबाबत दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे. सिडको भागात पाणी पुरवठ्याचे अधिकारी दिसत नाही. सिडको भागास पाणी पुरवठा करणारा वॉल हा कमी/जास्त केला जातो. सिडको भागाच्या पाणी पुरवठ्यासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या जलकुंभाच्या संख्येत वाढ झाली पाहिजे. तसेच सिडको भागासाठी टँकर वाढवावेत. एखाद्या पाईप लाईनवर लिकेज झाले तर ते ८/८ दिवस दुरुस्त होत नाही. ओव्हर फ्लो होऊन पाणी वाया जात आहे अशी माहिती दिल्यानंतरही अधिकारी त्याकडे लक्ष देत नाही. सिडको भागात हापस्याच्या संख्येत वाढ झाली पाहिजे. आजच्या सभेतून काही तरी ठोस निष्कर्ष निघेल असा निर्णय घेण्यात यावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** आजच्या सभेत पाणी प्रश्नावर चर्चा करण्यासाठी बैठक बोलावली आहे. पण अशा सभेत गांभीर्याने चर्चा होत नाही. जायकवाडी जलाशयातून किती एम.एल.डी. पाणी पुरवठा होतो. त्यातून शहर भागासाठी किती पुरविले जाते व सिडको भागासाठी किती पाणी पुरविले जाते. क्रांतीचौक येथील जलकुंभातून एन-५ जलकुंभात किती पाणी रोज पुरविले जाते. २४,००० अर्धा इंची कनेक्शन आहेत. त्यात व्यापारी कनेक्शन किती याचा खुलासा व्हावा. सिडको भागासाठी कमीत कमी २४ एम.एल.डी. पाणी हवे आहे. नारेगांव, मसनतपूर, ब्रिजवाडी ह्या भागातील वसाहत लक्षात घेता या कामासाठी दररोज १०/१२ एम.एल.डी. पाणी पुरवठा विभागाकडून जी माहिती देण्यांत आली आहे. ती दिशाभुल करणारी आहे. या माहितीमध्ये गॅप बाबत माहिती दिली आहे, पण किती वेळा पाणी दिले याची माहिती दिलेली नाही. गेल्या एक महिन्यापासून सिडको भागातील घरासमारे सडा टाकला गेला नाही. सिडको पाणी पुरवठ्याबाबत जी माहिती देण्यांत आली आहे. ती वरीष्ठांची मर्जी राखण्यासाठी दिली आहे. हे योग्य नाही. गेल्या दोन महिन्यापासून सिडको भागासाठी फक्त १० एम.एल.डी. पाणी मिळाले आहे. ही अत्यंत खेदाची बाब आहे. मा.उप-महापौर सिडको वासियांची दिशाभुल करण्याचा प्रयत्न करत आहे. याचा खुलासा झाला पाहिजे.

**संजय जोशी :** मा.उप-महापौरांवर आरोप करण्यापेक्षा पाणी प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेणे आवश्यक आहे.

**श्री.भगवान घडामोडे :** स.सभासदांनी वैयक्तीक हेवेदावे सभागृहात बरोबर करावेत.

**श्री.मुजीब आलमशाह :** सभची पध्दत नाही मध्ये बोलू नये.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** मी सभागृहात कोणत्याही भाषणात हस्तक्षेप करीत नाही. स.सभासद श्री.संजय जोशी वारंवार माझ्या भाषणात पुर्णपणे हस्तक्षेप करतात हे योग्य नाही. मला माझे विचार पुर्णपणे मांडु द्यावेत. त्या सभागृहाने त्यावर निर्णय घ्यावा. जायकवाडी पासुन शहराला होणाऱ्या पाईप लाईनमधुन कारखान्यालाही पाणी पुरवठा होतो. विद्युत पुरवठा नाही म्हणून पाणी पुरवठा होणार नाही. असा खुलासा केला जातो. मग अशावेळी शहराचा पाणी पुरवठा चालु आणि सिडको/हडकोला पाणी पुरवठा नाही असा भेदभाव का? आजपर्यंत एकही विहीरीचा गाळ काढला नाही. आंबेडकरनगर ही वसाहत पाण्याच्या टाकीला लागून वसलेली आहे. याठिकाणी क्रॉस कनेक्शन केले नाही हे काम का थांबले याचा खुलासा व्हावा. सिडको पाणी पुरवठ्याच्या कामासाठी प्रशासनाने जादा अधिकारी नेमले पण पाणी कमीच झाले, वाढले मात्र नाही. गुरु गणेश नगर भागात २० मिनीटापेक्षा जास्त वेळ पाणी दिले जात नाही. ३-३ दिवस व्यंकटेश नगरला पाणी नाही. मा.आयुक्त यांनी स्वत: पाहणी करावी. पाणी पुरवठ्याबाबत मिटींग घेऊन त्यातून काही तरी ठोस निर्णय झाला पाहिजे. यात सिडको पाणी पुरवठ्याबाबत स्वतंत्र खुलासा (निर्णय) झाला पाहिजे. पाणी पुरवठ्याची जबाबदारी ही सर्वांचीच आहे.

**श्री.सुदाम सोनवणे :** आजची बैठक ही महत्वाची बैठक आहे. त्याबद्दल मा.महापौरांचे अभिनंदन. या बैठकीतून मा.महापौर पाणी पुरवठ्याचा प्रश्न सुरळीत करतील अशी अपेक्षा करतो. ज्या सुचना करतो त्यावर अंमलबजावणी व्हावी. त्यासाठी नुसते आश्वासन नको. पाणी पुरवठा करण्यासाठी जे अंदाजपत्रक असतील ते सरळ माझ्याकडे घेऊन या विहीरी साफ करुन घ्या. अशी मंजूरी मा.आयुक्त यांना दिली आहे. पण पाणी पुरवठ्याच्या एखाद्या संचिके बाबत संबंधितांकडे विचारणा केली तर सदर संचिका मंजूरीसाठी मा.आयुक्त यांचेकडे आहे. अशी माहिती मिळते. मग मा.आयुक्त यांनी काय आदेश दिले. शहरात पाण्याचा प्रश्न कमी नाही. मग सिडको भागातच कमी का? रोज १०५ एम.एल.डी. पाणी शहरात येते. त्यातुन सिडको भागाला पाणी कमी मिळते. सिडको पोलिस कॉलनीत ११ दिवस पाणी नव्हते. मात्र पाणी पुरवठ्याच्या मिटींगमध्ये त्या ठिकाणी स्टोरेजची व्यवस्था नाही असा खुलासा अधिकारी करतात. मी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. या ठिकाणी ७३४ कुटूंब राहतात. व त्या ठिकाणी ४ लाख लिटर क्षमतेचे स्टोरेज आहे. या भागाला पाणी पुरवठा व्यवस्थत मिळत नसेल तर तो खंडीत करावा.

**श्री.मनमोहन सिंग ओबेरॉय :**सभागृह नेता यांनी पाणी पुरवठा खंडीत करावा अशी सुचना केली आहे. महापालिका तोटा सहन करुन पाणी पुरवठा करीत आहे. याचा विचार करावा.

**सौ.पद्मा शिंदे :** यापुर्वीही पाणी पुरवठ्याबाबत मिटींग झाली. त्यात आश्वासन दिले. त्याबाबत काय कार्यवाही झाली. पाण्याच्या टाकीजवळच माझा वार्ड आहे. पण या भागाला पाणी नाही. नागरिकांनी मला या बाबत घेराव घातला. अधिकारी काळजी घेत नाही. वार्डात साधे हापसे नाही. पाणी कमी आहे. झोन क्र.७ ला मा.महापौर, मा.उप-महापौर भेट देतील त्यावेळी वार्डाचे संबंधित नगरसेवक यांना विश्वासात घेऊन भेट द्यावी.

**श्री.सुभाष टाकळकर :** पाणी पुरवठ्याबाबत मिटींग बोलावल्याबद्दल मा.महापौर यांचे अभिनदन. पाणी पुरवठ्याबाबत आजपर्यंत अनेक मिटींग झाल्या. त्याप्रमाणे आजची मिटींग होऊ नये ही इच्छा महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचे काही दुखावलेले कर्मचारी पाणी पुरवठ्यात व्यत्यय आणतात असे मला वाटते. प्लंबर परवाना बंद करावा. नळ कनेक्शन देतांना हे प्लंबर अर्धा इंच कनेक्शन बाबत पैसे भरतात आणि प्रत्यक्षात नळ कनेक्शन देतांना मात्र दीड इंचाचे नळ कनेक्शन देतात असे माझे निदर्शनास आले आहे.

**श्री.प्रफुल्ल मालानी :** पाणी पुरवठ्याबाबत बैठक आयोजित केल्याबद्दल मा.महापौर यांचे प्रथम अभिनंदन. वॉर्ड क्र.२२ ला तीन ठिकाणाहुन पाणी पुरवठा केला जातो. तरी पण या वॉर्डासाठी पुर्णपणे पाणी मिळत नाही. खंडीत पाणी पुरवठ्याबाबत विचारणा केली तर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा प्लॅट आहे, असे उत्तर दिले जाते. या भागाला पाणी पुरवठा करणाऱ्या टाकीत १.२ मीटर अशी लेव्हल मिळते. गेल्या ३/४ महिन्यापुर्वी असा प्रश्न नव्हता. महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाकडुन पाईप लाईन हस्तांतर झाल्यानंतरच हा प्रश्न का विद्युत पुरवठा खंडीत झाल्याबद्दलचा अहवाल संबंधित अधिकाऱ्यांकडे आहे का? यातुन चर्चा करुन मार्ग काढावा. त्याकडे तांत्रिक चुका काय आहेत याचाही विचार व्हावा नक्षत्रवाडी फारोळा येथे लेव्हल मिळाली नाही तर काय व्यवस्था आहे. पाणी पुरवठ्याबाबत दुष्काळात इतका त्रास झाला नाही तो आज होत आहे.

**श्रीमती चंपाबाई पांचाळ :** काही ठिकाणी कमी तर काही ठिकाणी जास्त पाणी येते. आणि काही ठिकाणी तर पाणीच येत नाही.

**सौ.धनश्री विसपुते :** रहेमानिया कॉलनी येथे १ दिवस, २ दिवस आड पाणी येते.

**श्रीमती फरहत बानो :** पाणी पुरवठ्याची वेळ निश्चित नाही. कधी ४ वाजता तर कधी स.६ वाजता पाणी येते. रात्री अपरात्री केव्हाही पाणी येते. पाणी पुरवठ्याची वेळ निश्चित असावी. करीम कॉलनी ३००-४०० लोकवस्तीत पाईप लाईन नाही. काही भागात लाईन आहे. पण त्या लाईनला पाणी येत नाही. इली यारच मस्जीद जवळ पाईप लाईन आहे. पाणी नाही. विहीरीची कामे त्वरीत सुरु करण्यात यावी. शहागंजला टाकीवर फोन नाही. त्वरीत बसवावे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** स.सभासदांना त्यांच्या प्रभागातील पाण्याचा प्रश्न मांडण्याबाबत वेळ निश्चित करुन द्यावी. त्या वेळेतच सभासदांनी आपल्या अडचणी मांडाव्यात अशी सुचना आहे.

**मा.महापौर :** प्रभागातील पाणी पुरवठ्याबाबतच्या अडचणी मांडण्यासाठी सभासदांना ५.०० मिनीटांचा वेळ देण्यांत येतो.

**श्री.अजिज खान गणी खान :** या प्रभागात मोलमजूरी करणारे नागरीक राहतात. त्यांना पाण्याची ही वेळ सोईची नाही. सकाळी किंवा संध्याकाळी वेळ निश्चित करावी.

**श्रीमती आबेदा बेगम :** प्रभागात रात्रीच्या वेळी पाणी येते. ही वेळ नागरिकांना सोयीची नाही.

**श्री.मुश्ताक अहमद :** पाणी पुरवठ्याबाबत बैठक आयोजित केल्याबद्दल आभारी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडील विद्युत पुरवठ्याबाबत स्वतंत्र बैठक घेण्यात यावी. पाणी पुरवठ्याबाबत ज्या सुचना येतात त्यावर अहवाल तयार करावा. नुसत्या मिटींगा घेऊन काहीही उपयोग नाही. ७०० व १४०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी गळती झाल्यास पर्यायी जलवाहिनी असणे आवश्यक

आहे. पाणी पुरवठ्यासाठी विद्युत पुरवठा वेळेवर राहील. तर पाण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. पाणी पुरवठा करण्यासाठी लागणारा स्टाफ कमी असल्याने पाणी कमी येते. पाणी पुरवठा हस्तांतर झाल्याने त्या व्यवस्थेसाठी स्वतंत्र विभाग (डिव्हीजन) असावा.

**श्रीमती नुरजहाँ बेगम :** पाणी पुरवठ्याबाबत मिटींग बोलावल्याबद्दल अभिनंदन. पाणी पुरवठ्याबाबत सर्वांचे सहकार्य मिळते. संजयनगर बायजीपुरा कुरैशी ट्रेडर्स, गल्ली नं.१ पाईपलाईन मध्ये पाणी येते किंवा नाही हयाकडे लक्ष द्यावे. विहीर दुरुस्ती बाबतची संचिका मंजूर झाली आहे. बोरींग घेऊन त्यावर मोटार बसविण्यात यावी.

**श्री.व्ही.व्ही. देशमुख :** शहरास पाणी पुरवठा करणारी जायकवाडी पासुनची लाईन १४ ठिकाणी लिकेज आहे. शहागंजकडुन जो पाणी पुरवठा होतो. त्यावर विचार झाला पाहिजे. पाणी पुरवठ्याचे पंप जुनेच आहेत. राधामोहन कॉलनी, तेलंगवाडा, येथे पाण्याची समस्या आहे. तेथे व निजामगंज भागात भौगोलिकतेचा प्रश्न आहे. नियंत्रणासाठी झडपा बसवावे लागतील. कर्मचाऱ्यांना सुविधा द्या. पाणी पुरवठ्याच्या कामासाठी आवश्यक वाटल्यास स्वेच्छा निधीचा उपयोग करण्यांत यावा. पाणी साठवण व्यवस्थेत सुधारणा करुन त्याचे विस्तार करण्यांत यावे.

**श्रीमती मोहसीना बिल्कीस :** पाणी पुरवठयाबाबत सभेचे आयोजन केल्याबद्यल मा.महापौरांचे अभिनंदन वॉर्ड क्र.३४ मध्ये काल रात्री १०.०० वाजता पाणी पुरवठा करण्यात आला. पाणी पुरवठयाची वेळ निश्चित नाही. या वॉर्डास शहागंज जिन्सी या भागातील जलकुंभातुन पाणी पुरवठा केला जातो. जलकुंभावर दुरध्वनीची व्यवस्था नाही. त्यामुळे आवश्यक वेळी अडचण निर्माण होते. पाणी पुरवठ्याची वेळ निश्चित करण्यात यावी. लिकेजबाबतचे काम कसे होते याबाबत अधिकाऱ्यांनी पाहाणी करावी. विनापरवाना असलेले नळ कनेक्शन नियमित करण्यात यावेत. अशी मागणी करण्यात आली होती. त्याप्रमाणे कार्यवाही का झाली नाही याचा खुलासा व्हावा.

**श्री.जावेद रज्जाक :** पाणी पुरवठयाच्या कामासाठी गेल्या दहा वर्षापासून एकच कार्यकारी अभियंता काम करतात शहराचा विस्तार वाढलेला आहे . जलकुंभावर असलेले दुरध्वनी बंद आहेत. त्यामुळे आवश्यकतेच्या वेळी जलकुंभावर संपर्क करणे त्रासाचे होते. जिन्सी शहागंज भागातील सार्वजनिक स्टँडपोस्ट ला तोटया नाहीत. त्यामुळे पाणी वाया जाते. काही भागात ४/४ तास पाणी पुरवठा होत नाही अशी परिस्थिती आहे. बहुतांश शाळेत नळ कनेक्शन नाही. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना पाण्याचा त्रास होतो. पाणीपटट्‍ी बाबतची वसूली अत्यंत कमी आहे. या सर्व बाबींचा विचार करता आजच्या सभेस ठोस निर्णय आवश्यक आहे.

**श्रीमती जाहेदा बेगम :** पाणी पुरवठयावर चर्चा घडवून आणल्या बद्यल धन्यवाद माझ्या वॉर्डात या आठवडयात पाणी कमी आले. एरवी १ तास पाणी येते. माझ्या वॉर्डात विहिरीची सफाई होत आहे त्यावर मोटार बसविण्यात यावी.

**श्रीमती मुजीब आलमशहा खान :** पाणी वॉर्ड क्र.३३ ला हर्सूल येथून पाणी पूरवठा होतो. ३/४ दिवसापासून पाण्याचे शॉर्टेज होते हा प्रकार अधिकाऱ्यांकडून होतो. अशावेळी वरिष्ठांनी पहाणी केली तर दुसऱ्या दिवशी योग्य प्रमाणात पाणी पुरवठा होतो त्यानंतर मात्र पुन्हा तोच प्रकार चालू होतो. टप्प्या टप्प्याने

पाणी दिले जाते हा काय प्रकार आहे ते कळत नाही वॉर्ड क्र. ३३ मध्ये प्रत्येक ३/४ दिवसांनी नवीन लाईनमन कामासाठी येतो. तो एक वॉल उघडतो आणि दुसरा तसाच ठेवतो. त्यामुळे पाणी पुरवठयावर परिणाम होतो. झोन क्र.३ हा मोठा आहे. त्याचे दोन भाग करण्यात यावे. अधिकाऱ्यांनी मनपात आणले तर शहरास पाणी पुरवठा सुरळीत होवू शकतो.

**सौ.यशोदा वाडेकर :** कैलासनगर येथे पाण्याची तेवढी अडचण नाही. रोकडीया हनुमान कॉलनी ते क्रांतीचौक टाकीवर जलवाहिनीचे अंदाजपत्रक तयार आहे. हे काम सुरु करण्यात यावे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** वॉर्ड क्र.३९ मध्ये पाणी पुरवठा व जलनि:सारणची पाईप लाईन जवळ जवळ टाकलेली आहे. त्यामुळे पाणी (कांन्टेमनेशन) येते. पाणी पुरवठा सुरु झाल्यानंतर पिण्याची पाणी भरता येते. याबाबत अधिकाऱ्यांला सुचना केली तर उडवा उडवीची उत्तरे देतात. प्रथम घाण पाणी येत असल्याने या भागातील पाईप लाईन बदलणे आवश्यक आहे.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** वॉर्ड क्र.४३ मध्ये सन १९८८ पुर्वी दाबाने पाणी येत होते. अधिकारी व कर्मचारी यांनी प्रयत्न करुन भरपूर पाणी पुरवठा मध्ये सुधारणा केली पाण्याचा दाब आता बरा आहे त्याबद्दल धन्यवाद.

**श्री.स.अलमीरा सलामी :** वॉर्ड क्र.४६ भागास शहागंज व क्रांतीचौक जलकुंभातून पाणी पुरवठा होते. या दोन जलकुंभाच्या मध्ये हा प्रभाग फसला आहे. पाणी पुरवठ्यासाठी क्रॉस कनेक्शन करण्यात आले पण त्याचा काही उपयोग झाला नाही. २-३ दिवस पाणी येत नाही. जोपर्यंत पाण्याची टाकी होत नाही. तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. जलकुंभासाठी जागा उपलब्ध करणे ही प्रशासनाची बाब आहे. दलालवाडी भागात ३०/३५ वर्षापुर्वी फक्त लाईन टाकली आहे. ती जुनी झाली आहे. गुलमंडी भागात करण्यात येणारे क्रॉस कनेक्शनचे काम एका व्यक्तीने रोखले आहे अशी माहिती मिळाली आहे. पाणी पुरवठ्याबाबतच्या अडचणी त्वरीत दुर व्हाव्यात.

**सौ.लता दलाल :** पाणी पुरवठ्याबाबत माझे प्रश्न आहेत.

१) जायकवाडीची लाईन मनपाकडे हस्तांतर करुन घेताना महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाकडील या कामासाठी संपूर्ण कर्मचारी वर्ग महापालिकेकडे सामावून घेतला आहे का?

२) महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचे अधिकारी पाईप लाईन फोडतात अशी बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे. त्या तथ्य आहे काय? याचा खुलासा व्हावा.

३) एक तास विद्युत पुरवठा बंद झाला तर किमान अडीच तास पाणी पुरवठा बंद होतो. यासाठी विद्युत मंडळाने काही पर्यायी व्यवस्था केली आहे काय? त्याबाबत मंडळावर कार्यवाही करावी.

४) पाणी पुरवठ्याबाबतच्या अडचणी निमित्त जलकुंभावर दुरध्वनी केली तर तेथील फोन उचलले जात नाही. काही जलकुंभावर तर दुरध्वनीची व्यवस्थाच नाही.

५) पावसाळ्याच्या दिवसात काही मुद्दे उद्भवतील उदा.लिक्जचे पाणी नळात जाऊन रोग उद्भवेल त्यासाठी प्रत्येक झोनला एक पथक ठेवावे त्यामुळे दुषित पाणी इतर पसरणार नाही याची काळजी घेता येईल. श्रीमान श्रीमती पर्यंत लाईन घ्यावी. बौध्दवाडा, रिप्स हॉटेल

येथील जुनी जलवाहिनी बदलण्याचे अंदाजपत्रक तयार करावे या सर्व बाबची गांभीर्याने विचार व्हावा.

**श्री. जयवंत ओक :** आजच्या सभेत पाणी पुरवठ्याबाबत ठोस निर्णय झाला पाहिजेच. त्याचप्रमाणे अंमलबजावणी झाली पाहिजे. जायकवाडीची लाईन महापालिकेकडे हस्तांतर झाल्यापासून फारोळा/जायकवाडी अशा ठिकाणी किती भेटी दिल्या आहे. या ठिकाणचे किती पंप बद आहेत. एकूण किती पंप आहे. त्यापैकी किती पंप चालू आहेत. किती ठिकाणी लिकेज आहे व ते केव्हापासून आहे. त्यातून किती पाणी वाया जाते. वाया जाणाऱ्या पाण्याचे बिल मनपा भरते काय. पाणी पुरवठ्याची किती पंपाची आवश्यकता आहे. पाण्याच्या टाक्या किती आहेत. तसेच पाण्याचा साठा करण्यासाठी किती पंप आहेत. शहरास काही नहरी मधून पाणी पुरवठा होतो त्याची परिस्थिती काय आहे. त्यासाठी काही उपाययोजना आखली आहे काय? शहराचा विस्तार वाढला आहे. त्यासाठी पाणी पुरवठा विभाग स्वतंत्र करण्यात यावा. नाशिक/पुणे, ठाणे या ठिकाणी स्वतंत्र पाणी पुरवठा विभाग आहे. मी स्वतः पहाणी केली. अनेक पंप बंद असल्याचे दिसून आले. फक्त दोन पंप चालु होते. डोळेझाक करुन जायकवाडीची पाईप लाईन हस्तांतर करुन घेण्यात आली आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** मा.सभापती स्थायी समिती यांनी जे विचार सभागृहापुढे मांडले आहेत. त्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**श्रीमती अलका पाटील :** भडकलगेट भागात ५०% पाणी मिळते. नुर कॉलनी भागाला पाणी पुरवठा नाही. टाऊन हॉलच्या मागील भागातील जलवाहिनी टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात यावे. वॉर्डातील जुन्या लाईन काढुन नवीन लाईन टाकण्यात याव्यात.

**सौ.शकुंतला धांडे :** पाणी पुरवठ्याबाबत २/४ वर्षापासुन मिटींगा होतात. पण त्याचा काहीच उपयोग होत नाही. अशोक नगर प्रज्ञानगर येथे ४.०० वाजता पाणी येते. २० ते २५ मिनीटच पाणी येते. टँकरने पाणी पुरवठा केला जातो. पण हौदात ओतून घेतात, त्यामुळे काही नागरिकांना पाणी मिळत नाही. चोक-अप झालेल्या लाईनचे काम ४/५ दिवस पुर्ण होत नाही.

**श्री.संजय केनेकर :** शहरातील पाणी पुरवठ्यावर चर्चा होत राहील. अनेक ठिकाणी पती-पत्नी नौकरीत असतात. श्रीनिकेतन कॉलनी येथे ४०% जोडपे नौकरीला जातात. पाण्याची वेळ बरोबर नाही. दुपारी १.०० वाजता पाणी पुरवठा केला जातो ही वेळ योग्य नाही. आवश्यक त्या वेळी नागरिकांना पाणी मिळाले पाहिजे. तेथील पाणी पुरवठ्याच्या वेळेत बदल करुन पाणी पुरवठा करावा.

**श्री.अब्दुल रशिदखान (मामू)** : पांच महिन्यापुर्वी दिलेल्या पत्रानुसार आज काम सुरु झाले. तर कसे होणार. त्यासाठी रजिष्टर ठेवण्यात यावे. या रजिष्टर नुसार कोणत्या नगरसेवकांचे काम कधी झाले हे कळेल.

**डॉ.भागवत कराड :** पाणी प्रश्नाच्या सभेबद्दल काही स.सदस्यांनी आक्षेप घेतला. ही बाब योग्य वाटत नाही. सिडकोचा जास्त प्रश्न आहे. स.नगरसेवकांच्या सुचनाची गांभीर दखल घेऊन पाणी पुरवठा कसा सुरळीत करता येईल याची प्रशसनाने खबरदारी घ्यावी. पाण्याची साठवण क्षमता जेथे कमी आहे. त्याबद्दल उपाययोजा करणेत यावी.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** सिडको भागास पाण्याचा जास्त त्रास आहे. दोन संप आहेत. क्रांतीचौक जलकुंभ येथून पाणी संप करुन सिडको भागास पाणी पुरवठा होतो. सिडकोचे १ ते १२ सेक्टर असून गरजे प्रमाणे योग्य व्यासाची पाईप टाकलेली नाही. पाणी पुरवठ्यावर महापालिकेला १२ कोटी रुपयाचे नुकसान होत आहे. पाणी पुरवठ्याच्या बेसीक व्यवस्थेसाठी वॉटर मॅनेजमेंट कडुन कर्ज घेणे आवश्यक आहे. पाणी पुरवठ्याच्या लाईन जुन्या झाल्या आहेत. त्यासाठी पुर्ण कामाचे अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. शहराची मोठी वाढ मोठ्या प्रमाणावर होत आहे. या बाबींचा सर्व सभासदांनी सुज्ञपणे विचार करावा. राजकीय डावपेच न आणता एका विचाराने समस्या सोडवल्या पाहिजेत. पाणी पुरवठ्याबाबतची कामे ६७ (३) अंतर्गत करण्याचे अधिकार मा.आयुक्त देण्याबाबतचा ठराव सभागृहाने मंजूर करावा. त्याच बरोबर या कामासाठी लागणारा निधी कुठून उपलब्ध होईल. याचाही विचार होणे आवश्यक आहे. सिडको भागातील पाणी पुरवठ्यासाठी लागणारा निधी सिडको प्रशासनाकडुन वसुल करावा.

**श्री.जयवंत ओक :** शासनाकडुन जे १० कोटी रुपयाचे अनुदान आले आहे ते सर्व पाणी पुरवठ्याच्या कामासाठी खर्च करण्यात येईल, अशी मंजूरी या ठिकाणी देण्यांत यावी.

**श्री.गंगाधर गाडे :** यापुर्वीही पाणी पुरवठ्यावरील प्रश्नाबाबत बैठका झाल्या. त्यातुन काय निष्पन्न झाले. यापुर्वीच्या बैठकीला पाणी पुरवठ्याबाबत चांगल्या सुचना करण्यात आल्या होत्या. पण त्याबाबत काहीही झाले नाही. सुचनांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. याचा विचार करावा. स.सभासद श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी महत्वाच्या बाबी सभागृहापुढे मांडल्या आहेत. सिडको प्रशासनाने जनतेकडुन करोडो रुपये वसुल केले आहेत. आणि खापर मात्र महापालिकेवर फुटले जाते. पाणी पुरवठयाच्या व्यवस्थेसाठी शासनाकडे १००कोटी रूपयांची मागणी केली पाहिजे. औरंगाबाद शहर ऐतिहासिक शहर आहे. जायकवाडी जलाशयातून होणाऱ्या पुरवठयावर पर्याय म्हणून एखादा तलाव बांधता येईल काय हे पहावे. शहरात अनेक ठिकाणी चोरून नळ कनेक्शन घेण्यात आले आहेत. अशा नळ कनेक्शनला नियमित करण्यांत यावे. हॉटेलसाठी घेण्यात येणाऱ्या कनेक्शनसाठी १/२ इंच कनेक्शन मंजुर करण्यात येते मात्र प्रत्यक्षात कनेक्शन करतांना १इंच कनेक्शन घेतले जाते. तसे अनेक ठिकाणी नळाचे पाणी धो धो वहात असल्याचे दिसून येते. दुरूस्तीच्या कामासाठी ६/६महिन्यातून काम करावे लागते. म्हणजेच दुरूस्तीचे काम निकृष्ट होते . अनेक वसाहतींना अद्याप पाणी दिलेले नाही. मुलभुत सुविधा म्हणून पाणी हे दिले पाहिजे त्याचा विचार करता कायद्याच्या चौकटीत बसून हा प्रश्न सोडविला पाहिजे.

**श्री.गजानन बारवाल :** स.सभासद श्री.गंगाधर गाडे ,श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी चांगले विचार सभागृहापुढे मांडले आहे. पाणी पुरवठयासाठी आवश्यक असलेले जलकुंभ कमी आहेत. स्लम भागात पाणी कमी मिळते पोलिस स्टेशनला अनेक गुन्हे पाण्याबाबतचे आहेत. मालमत्ता कराच्या वसुलीसाठी पाणी पुरवठयाचे नळ कनेक्शन तोडले जाते पण अशा वेळी पाणी कसे येते हे पाहिले जात नाही. शहरात टाकण्यात आलेल्या पाईपलाईन बाबतचे अद्यावत नकाशे तयार नाहीत. त्यामुळे पाणी पुरवठयाची लाईन कोठे आहे हे

आज कनिष्ठ अभिंयता / उप अभियंता यांना माहिती नाहीत. याउलट काही लाईनमन मात्र पाणी पुरवठयाची किती व्यासाची लाईन कुठे टाकली आहे याची माहिती असलेले आहेत. अशा लाईनमनला विश्वासात घेण्यात यावे. उप लाईन वाढत आहेत. त्यामुळे पाण्याचे प्रेशर कमी होत आहे. पद्मपूरा लक्ष्मीवाडी भागात विकास खर्च भरलेला आहे. त्यांना पाणी पुरवठा लाईन दिलेली नाही. त्यासाठी व्यवस्था करावी. पुंडलिकनगरसाठी ३४ कोटी रूपये खर्च करण्याचा मा. पालकमंत्री यांचा प्रयत्न आहे. पहिला टप्पा म्हणून १० कोटी रूपये खर्च होणार आहेत. समन्वय समितीची बैठक लावली आहे. या बैठकीतून मा. मुख्यमंत्री जास्तीतजास्त अनुदान देतील अशी आशा आहे.

**श्री.संजय जोशी :** विकास निधीची रक्कम महापिालका कार्यालयात जमा करून ही काही वसाहतींना ३-४ वर्ष झाले पाणी मिळालेले नाही. त्यामुळे या भागातील नागरिकांनी हापशांची व्यवस्था केली आहे. सेप्टीक टँकचे पाणी हापश्याच्या पाण्यात जावून रोगराई वाढत आहे. जायकवाडीहून पाणी पुरवठा होणाऱ्या लाईनवर मंडळाचे जे कर्मचारी काम करतात.त्याचबरोबर महापालिकेचे लाईनमन या कामास देण्यात यावेत. पैठण औरंगाबाद पर्यंतच्या लाईनसाठी बरेच कनेक्शन देण्यात आलेले आहेत. त्यातून काही ग्रामपंचायतींना व काही कारखान्यांना पाणी देण्यात येत आहे. या ठिकाणी मंजूरी देण्यात आलेल्या कनेक्शन पेक्षा जास्त व्यासाचे कनेक्शन घेतले आहेत. याची प्रत्यक्ष पहाणी व्हावी. जायकवाडीपासून येणाऱ्या लाईनवर अनेक ठिकाणी तीन लिकेज आहे. पैठणहून निघाल्यानंतर लाईनवर पाणी जमिनीवर मुरते . एका विहिरीजवळ ही लाईन लिकेज २५% आहे. त्याचा फायदा घेवून या विहिरी वरून रूपये ४०प्रमाणे टँकर भरून दिले जातात. गळतीबंद करावी त्यामुळे २५%पाणी वाया जाणार नाही.

**श्री.विठ्ठल जाधव :** वॉर्ड क्र.७६ साठी टँकरने पाणी पुरवठा केला जातो. १० हजार लिटर क्षमतेचे २ टँकर खरेदी बाबतचा ठराव मंजुर झालेला आहे. पण या मंजुरीनुसार अद्याप टँकर खरेदी करण्यात आलेले नाही. पुंडलिकनगर, गजाननगर, हनुमाननगर, हुसैन कॉलनी या भागासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी रू.३.८२ कोटीची योजना आखली आहे. त्यासाठी लोकवर्गणी म्हणुन या भागातील नागरीकांनी रू. ९ लाख जमा केले आहेत. जलवाहिनीची काम झाले मग पाणी केव्हा व कधी मिळणार याचा खुलासा करावा. आज ही या भागात टँकरने पाणी रोज दिले जाते. शिवाजीनगर ११ वी योजनेत दिनांक ०६-०७-१९९७ ला सिडकोने मनपाकडे पैसे भरले आहे. अद्याप हस्तांतर करून घेतले नाही.

**श्री.अब्दुल रशिद खान :** सभागृहात कोरम पूर्ण नाही अशा परिस्थीतीत कामकाज करता येणार नाही.

कोरम अभावी आजची सभा ००.१० मिनीटांसाठी तहकुब करण्यात येत असल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले. (वेळ अंदाजे ६.५५)

तहकुब करण्यात आलेली सभा पुन्हा ७.०५ वाजता सुरू करण्यात आली.

**श्री.विठ्ठल जाधव :** मा.पालकमंत्री यांनी विशेष लक्ष देवून पुंडलीकनगर पाणी पुरवठा आराखडयास मंजुरी दिली आहे. त्याच बरोबर मा. खासदार यांनी या कामासाठी १० लाख रूपयाची निधी उपलब्ध करून दिला त्याबद्यल त्याचे अभिनंदन.

**श्री.विजयकुमार मेहेर :** वॉर्डाच्या समस्या समजून घ्यावयाच्या म्हणजे मलमपटट्ी करण्यासारखे आहे. जायकवाडीपासून जे पाणी शहरात येते त्यात काय अडचण आहे याचा विचार होणे आवश्यक आहे. सन्माननिय सभासदांनी मांडलेल्या समस्यांचा लेखी खुलासा प्रशसनाने करावा पाणी पुरवठयाच्या सुध्दा पातळीवर हाताळणीची मंजूरी दिली आहे.त्यानुसार किती संचिका मंजुर झाल्या आहेत अशा संचिका दाखल झाल्या नाही तर त्याचा दोष कोणाचा आहे. एप्रिल महिन्यात ११९ वेळा तर मे महिन्यात १३५ वेळा पाणी मिळाले नाही. हे का घडले याचा शोध घ्यावा. ३२ वेळा लाईन फोडली आहे. अशी बातमी वृत्तपत्रात आली आहे हे खरे आहे का ? त्याबाबत खुलासा व्हावा. स्टॅन्डपोस्टला तोटया नाहीत. पाणी वाया जाते. बेकायदेशिर नळ कनेक्शन धारकावर पोलीस कार्यवाही करण्यात यावी. पाणी पुरवठयाच्या कामासाठी कर्मचारी वर्ग अपुरा असेल तर तो वाढवून देण्यात यावा. शासनाकडून २० कोटी रूपयाचे अनुदान येणार आहे हे खरे आहे काय ? त्यातुन कोण कोणती कामे घेण्यात येणार आहेत. पाणी पुरवठयासाठी १४०० व ७०० मीमी व्यासाच्या दोन लाईन आहेत या दोन्ही लाईन २४ तास चालू असणे आवश्यक आहे. पण त्याप्रमाणे त्या राहात नाही म्हणून आणखी एक लाईन टाकणे आवश्यक आहे. शासनाकडून अनुदान मिळवावे.

**सौ.मंदा काळूसे :** वार्ड क्र.७८ मध्ये प्रबोधनकार ठाकरेनगर येथे कमी व्यासाची पाईप लाईन आहे. त्यामुळे पाण्याला दाब कमी आहे. ११ लाखाचे अंदाजपत्रक मंजूर झाले आहे.प्रबोधनकार ठाकरे नगर मध्ये हॉटेलमध्ये असलेल्या कनेक्शनला चांगले पाणी मिळते. या उलट घरांना नळ कनेक्शन आहे त्यांना कमी पाणी मिळते. हा काय प्रकार आहे याचा शोध घेण्यात यावा.

**सौ.सुनंदा कोल्हे :** पाणी पुरवठयाबाबत मिटींग बोलावल्या बद्दल मा.महापौरांचे अभिनंदन या बैठकीत निर्णयात्मक कार्यवाही करण्यात यावी. १६०० मी.मी. व्यासाच्या लाईनवर सिडको भागाला पाणी दिले तर या भागातील पाण्याचा प्रश्न सुटेल. शिवाजी कॉलनी, मुंकुंदवाडी येथे एक विहिर आहे . नागरिकांनी ना हरकत प्रमाणपत्र ही घेतले आहे. विहीरीची साफसफाई करून विहिरीतून पाणी पूरवठा करण्यात यावा.

**श्री.बन्सी गांगवे ं:** संघर्षनगर भागात २ व्यासाची लाईन सिडकोने टाकली आहे. पाईप लाईन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेली नाही. पाईप लाईन बदलणे बदलची रक्कम सिडको प्रशासनाकडून घेण्यात यावी. वार्ड क्र.८० मध्ये घेण्यात आलेले बोरींग निकामी झाल्या आहेत त्या दुरूस्त करण्यात याव्यात पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने आणखी तीन चार ठिकाणी नवी बोरिंग घेण्यात याव्यात. याशिवाय वॉर्ड क्र. ८० मध्ये असलेल्या विहीरीवर मोटार पंप बसविण्यात यावेत. म्हणजे पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

**श्री.भगवान घडामोडे :** पाणी पुरवठयाबाबत यापुर्वीही अनेक बैठका झाल्या आहेत. या बैठकीतील चर्चेतूनही काहीच निष्पन होणार नसल्यास या मिटींगचाही काही उपयोग नाही. विद्युत पुरवठा खंडीत झाल्याबाबत सभागृहात जी माहिती देण्यात आली आहे ती चुकीची आहे. महापालिका प्रशासन ठप्प झाले आहे. पाणी पुरवठा याबाबत कायम स्वरूपी काय उपययोजना करणार याचा खुलासा व्हावा. इतरांना दोष देवून काही उपयोग नाही. विद्युत पुरवठा

खंडीत झाला तर त्याबाबतची माहिती पदाधिकाऱ्यांना दिली पाहिजे पाणी पुरवठयाच्या कामासाठी महापालिकेचे कर्मचारी प्रशिक्षीत केले पाहिजेत. शहर व सिडको भागात पाण्याचा सारखाच गॅप मिळाला पाहिजे व सारखेच पाणी शहर व सिडको भागाला मिळाले पाहिजे . साठवण टाक्या बांधायला पाहिजे. पाणी पुरवठयाच्या वेळेत आवश्यक ती सुधारणा करावी.

**सौ.रूख्मणेबाई लोखंडे** : वॉर्ड क्र.१ मध्ये अनेक समस्या आहेत. त्याबाबत पत्र व्यवहारही केला आहे. पण काही उपयोग नाही. फक्त अर्धाभागास पाणी मिळते अर्ध्या भागास पाणी मिळत नाही. सन १९९५ पासून पाण्याची समस्या आहे. टँकरने पाणी पुरवठा करण्यास कळविले तर टॅकर चार्जेस भरण्याची सूचना केली जाते. या भागात एकच पाण्याची टाकी आहे. ती अपूरी पडते. या भागातील नागरिक मालमत्ता कर / पाणी पटट्ी भरतात या भागासाठी जादा पाण्याच्या टाकीची आवश्यक आहे . मिटमिटा , राणा पेट्रोल पंप, पडेगांव या भागात पाणी कमी येते. आप्पाची वाडी या भागात तर एक दिवस आड पाण्याचे टँकर देण्यात येते. या भागात रस्ते नाहीत.

**श्री.जयवंत बंडू ओक** : पाणी पुरवठा पाईप लाईनची माहिती दर्शविणरे नकाशे तयार असले पाहिजे महाराष्ट्र प्राधिकरण मंडळाने महापालिकेस फसविले आहे.

**मा.महापौर** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पापु)** : शहरास ११० एमएलडी पाणी लागते. त्यात कमी प्रमाण झाले आहे. विद्युत पुरवठा / पंप बिघाड या कारणामुळे गेल्या दोन महिन्यात पाणी पुरवठयात अडचणी आल्या आहेत. जायकवाडी पाणी पुरवठा केंद्रास चार वेळा भेटी दिल्या आहेत. या भेटीच्या वेळी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे उप अभियंता श्री. देशपांडे हे बरोबर होते. शहरास विद्युत पुरवठा होणाऱ्या बाभळेश्वर या विद्युत केंद्रातून विद्युत पुरवठा खंडीत झाला अशा वेळेस संपूर्ण शहराचा विद्युत पुरवठा खंडीत होतो. जायकवाडीच्या जुन्या योजनेला २५ वर्ष झाले आहे. पंपासाठी ६ सेट आहेत. .त्यापैकी दोन सेट ३ सेट चालू व चीन सेट स्टँडबाय आहेत काल दोन सेट वर्कीगमध्ये होते . आजच्या स्थितीला यापैकी एक सेट चालू आहे. व एक सेट बिघडला आहे. जायकवाडी, ढोरकीन ,फारोळा, नक्षत्रवाडी आणि क्रांतीचौक अशा ठिकाणाहून पाणी पुरवठा पंपीग करून घेण्यात येते. आताच खुलासा केल्याप्रमाणे जुन्या लाईनवर सहा सेट आहेत.

**श्री.स.अली मिरा सलामी** : पाणी पुरवठयाबाबत कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या खुलाश्यात चालू पंप आणि स्टँड बाय पंप असा उल्लेख केला आहे. म्हणजे काय हे पंप चालू आहेत का बंद आहेत याचा खुलासा होत नाही. तसेच दोन महिन्यापूर्वी पाणी पुरवठयाच्या कामासाठी खरेदी केलेल्या चेसीस वर अद्यापपावेतो पाण्याची टाकी बसविण्यात आली नाही. हे खरे आहे काय ?याचा खुलासा करावा. या कामाची अधिकारी /पदाधिकारी यांनी पाहणी करावी.

**मा. आयुक्त** : गेले पांच तास सभागृहात पाण्याच्या प्रश्नांवर चर्चा झाली आहे. पाण्यासाठी नागरीकांना जो त्रास सहन करावा लागला आणि ज्या सहनशिलतेने सर्व नगरसेवक व नागरीक यांनी प्रशासनास या काळात जे सहकार्य केले त्याबाबत ते धन्यवादास पात्र आहे. विजदाब नियंत्रण गळती इ. तीच ती कारण खुलासा करणे योग्य नाही. चुक कशामुळे झाली

प्रशासन अकार्यक्षम ठरले का? याचे आत्मपरिक्षण होणे आवश्यक आहे. शहरास ७० कि.मी. वरून पाणी येते. यात काही अडचणी आहेत काय याचा आपण गांभीर्याने विचार करणे व निर्णय घेणार आहोत किंवा नाही हा खरा प्रश्न आहे. कामासाठी शासन अधिक्षक अभियंता पद प्रतिनियुक्तीवर देण्यास तयार आहे. सिडको भागाचा पाणी पुरवठयाकरीता स्वतंत्र अभियंता असणे आवश्यक आहे काय ?

**श्री.विठ्ठल जाधव :** पुंडलिकनगर / हनुमाननगर या भागात दररोज ३५ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो. यासाठी महापालिकेला खर्च येतो. या भागास पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. ही लाईन टेस्ट ही करण्यात आली आहे. तेव्हा पुंडलिकनगर हनुमाननगर भागाला पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा केव्हा केला जाणार याचा खुलासा या ठिकाणी करण्यात यावा. हा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे.

**मा.आयुक्त :** पाणी पुरवठा व जलनिःसारण हे दोन वेगळे विभाग असावेत असे सभागृहाला वाटते काय आणि असे जर सभागृहाला वाटत असेल तर त्यावर सभागृहाने चर्चा करावी. नुसत्या मिटींगा होतात आणि त्यातून काहीच निष्पन्न होत नाही अशा भावना सभागृहात सभासदांनी व्यक्त केल्या आहेत. सिडको - हडको साठी ३० एमएलडी पर्यंतच पाणी आहे पण प्रत्यक्षात या भागासाठी फक्त २० एमएलडी पर्यंत पाणी पुरवठा केला जात आहे. या बाबतचा विचार करता ७०० मी मी व्यासाची पाईप लाईन पूर्णपणे सिडकोसाठी वळवावयाची की काय याचाही या ठिकाणी विचार झाला पाहिजे ही लाईन सिडको भागाच्या पाणी पुरवठयासाठी डायर्व्हट केल्या तर त्यातुन मिळणारे पाणी साठविण्यासाठी सिडको भागात टाक्या आहेत काय याचाही विचार होणे आवश्यक आहे. जायकवाडीची पाईपलाईन हस्तांतर करून एक महिन्याचा कालावधी झालेला आहे. ही पाईपलाईन हस्तांतर करून घेताना त्या ठिकाणी किती पंप आहेत किती लोक काम करतात किती पंप चालू आहेत किती पंप बंद आहेत या सर्व बाबींसाठी किती खर्च येणार आहे या सर्व बाबींचा विचार प्रशासनाने केला आहे. याबाबत ज्या अडचणी आहेत त्या सर्वांचे प्रश्न घेवून प्रशासन प्रथम स्थायी समिती समोर प्रस्ताव मांडणार आहे व या प्रस्तावानुसार स्थायी समिती सर्वसाधारण सभेस शिफारस करणार आहेत. सभासदांनी पाणी पुरवठयाबाबत ज्या सुचना मांडल्या आहेत त्याची प्रशासनाने दखल घेतली असून याबाबत खुलासा करतील स.नगरसेवकांच्या सुचनेनुसार विधंव विहिरी खोदणे, त्यावर पंप बसविणे, अस्तित्वात असलेल्या विहिरीचा गाळ काढणे, त्या स्वच्छ करणे, पाईप लाईन बदलणे या सर्व कामासाठी ६७ कोटीची योजना शासनाकडे पाठविली आहे. ती योजना शासनाने मंजूर केली आहे ही योजना येत्या दोन वर्षात कार्यान्वित होईल आणि त्यानंतर पाण्याचा प्रश्न सुटेल. ही योजना कार्यान्वित होईपर्यंत शहर सिडको भागाला पाणी पुरवठा कसा करता येईल. प्रस्ताव सादर करण्यात येईल. या प्रस्तावात महापालिकेची आर्थिक स्थिती, भांडवली खर्च, आवक यांचा संपर्ण आढावा घेऊन प्रशासन सभागृहापुढे येणार आहे. जायकवाडीची लाईन हस्तांतर करुन घेतल्यानंतर ही फस्त एकदाच फुटली आहे. मुदाम कोणीही लाईन फोडली नाही. याची खात्री देतो. एक तास वीज खंडीत झाली तरी पाणी पुरवठा पुर्ववत सुरु

होण्यासाठी सहा तास लागतात. गेल्या दीड दोन महिन्याच्या काळात सर्व अधिकाऱ्यांनी रात्रंदिवस काम करुन जेवढे पाणी मिळेल ते नागरिकांना पुरविण्याचा प्रयत्न केला आहे, यात शंका नाही. त्यातून नागरिकांची गैरसोय झाली याबाबत दुमत नाही. सिडको हडको बाबत स.नगरसेवकांनी ज्या सुचना केल्या आहेत. त्यात कशी सुधारणा करता येईल याचा जरुर प्रयत्न केला जाईल. एन-७ येथे संप बांधण्यासाठी रु.४३ लाखाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. ते ६६% अप पेक्षा जास्त दराने आले म्हणून चालू डी.एस.आर.प्रमाणे दुरुस्त करावे असे आदेशित केलेले आहे. एन-७ येथे एक ४३ लक्षाची योजना आहे. हर्सुल आणि जयविश्वभारती या ठिकाणचे इ.एस.आर. तयार आहेत. त्याची वितरण व्यवस्था या वर्षी सुरु होईल.

**श्री.गौतम खरात :** महाराष्ट्र पाणी पुरवठा प्राधिकरणाने शहरास पाणी पुरवठा होणाऱ्या पाईप लाईनवर खाजगी २५ कनेक्शन दिले आहेत. त्याच्याकडुन पाणी पट्टीची वसुली होते का या कनेक्शन मधून २४ पाणी पुरवठा होतो. तेव्हा यापुढे अशाप्रकारे खाजगी कनेक्शन देणार का? जे कनेक्शन दिले आहेत. त्याच्याकडुन थकबाकी असलेली रक्कम वसुल होते का? ती कशी वसुल करणार या सर्व बाबींवर आजच्या सभागृहात धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

**श्री.जयवंत ओक:** स.नगरसेवक श्री.गौतम खरात यांनी अतिशय चांगला मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला आहे. या २५ कनेक्शनमधुन फॅक्टरीवाले पाहिजे तेव्हा पाणी घेतात या कनेक्शनला पाणी पुरवठा करण्याची वेळ निश्चित केली पाहिजे. या कंपन्यांना होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या प्रमाणात त्याच्याकडुन वसुल होणारी पाणीपट्टी कमी आहे.

**मा.आयुक्त :** स.नगरसेवकांच्या सुचनाप्रमाणे नोंद प्रशासनाने घेतलेली असून त्या दृष्टीने जायकवाडी ते शहरापर्यंतच्या पाईप लाईनची पाहाणी करण्याचे काम घेण्यात येत आहे. विशेष महत्वाची बाब म्हणजे सध्याची पाणी पुरवठा पध्दत, पाणी पुरवठ्याबाबतचा नवीन योजना या कामाबाबात वैधानिक सल्ला देण्यासाठी या शहराचे नागरिक श्री.माधवराव चितळे, सेवानिवृत्त मुख्य अभियंता यांचा पाणी पुरवठ्याच्या कामासाठी सल्लागर म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** पाणी पुरवठ्यासाठी पर्याय म्हणून झाला या ठिकाणी तलाव बांधण्यासारखा निर्णय या पुर्वी घेण्यात आला आहे. त्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**का.अभियंता (पा.पु.) :** तेथे सेक्टेज ट्रीमेंट प्लान्टची योजना आहे.

**मा.महापौर :** सर्व स.नगरसेवकांची पाणी पुरवठ्याबाबत महत्वाच्या सुचना मांडल्या आहेत. त्याबाबत मा.आयुक्त यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सुचना दिल्या आहेत. २५% लोकवर्गणी घेऊन पुंडलिक नगर भागात जी जलवाहिनी टाकली आहे. ती त्वरीत सुरु करण्याचे आदेश देण्यात येतात. अनेक दिवसापासून पाण्याची बिकट परिस्थिती आहे. याबाबत येणाऱ्या अडचणी दुर करण्याबबात मा.आयुक्त यांनी कार्यवाही करावी. सिडको-हडको भागातील विहिरी साफ करण्यात याव्यात. यातून या भागातील पाण्याची समस्या सुटू शकेल. अधिकाऱ्यांनी या बाबत कार्यवाही

केली तर प्रशासनाने त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. जायकवाडी पाईप लाईनच्या दुरुस्ती देखरेखीचे काम महापालिकेकडे आले आहे. यापुर्वी शहराची लोकसंख्या ३.५ लक्ष होती त्या वाढ होऊन लोकसंख्या १९ लाखापेक्षा जास्त झाली आहे. एकाच कार्यकारी अभियंत्यांकडुन पाणी पुरवठा व जलनि:सारणाचे काम होणे शक्य नाही. याचा विचार करता पाणी पुरवठा व जलनि:सारण असे दोन स्वतंत्र दोन विभाग करुन आणखी एक कार्यकारी अभियंता नवीन पद निर्माण करावे त्यामुळे पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. एन-४ येथे कुकूटपालन केंद्र जवळ एन-७ व एन-११ या ठिकाणी ३० लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधण्यात यावे.

**ठराव :** पाणी पुरवठा बाबत विचार विनिमय होणेसाठी बोलावलेल्या सभेत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सर्वानुमते निर्णय घेण्यात येतो की, सिडको/हडको भागातील पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी एन-४, येथील कुकूटपालन केंद्राजवळच्या परिसरात व एन-७ आणि एन-११ या ठिकाणी ३० लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधण्यात यावेत. यासाठी प्रशासनाने आवश्यक ते अंदाजपत्रक त्वरीत तयार करण्याची कार्यवाही पुर्ण करावी. तसेच सिडको/हडको भागातील अस्तित्वात असलेल्या विहिरीचा गाळ काढणे, त्या स्वच्छ करणे आणि त्यातून जनतेला पाणी पुरवठा होईल अशी व्यवस्था करण्यात यावी. त्याच प्रमाणे सभागृहातून प्राप्त झालेल्या सुचनानुसार आणि सर्व स.नगरसेवकांच्या भावना लक्षात घेऊन औरंगाबाद शहराचा वाढता विस्तार, लोकसंख्येत झालेली लक्षणीय वाढ व सिडको/हडको भाग नजीकच्या काळात महापालिकेकडे हस्तांतरीत होणारे असल्याने पाणी पुरवठा व जलनि:सारणाची कामे प्रभावीपणे पार पाडणे शक्य व्हावे म्हणून पाणी पुरवठा व जलनि:सारण असे दोन स्वतंत्र विभाग निर्माण करण्यास आणि त्यासाठी कार्यकारी अभियंत्यांचे आणखी नवीन पद निर्माण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन-गण-मन" या राष्ट्रगीतानंतर आजची सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित | स्वाक्षरित |
| नगर सचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १७ जुन १९९८ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बुधवार दि.१७ जुन १९९८ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.महापौर सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे यांचे अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात "वंदेमातरम" या राष्ट्रगीताने सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.डॉ. कराड भागवत किशनराव | - | उप महापौर |
| २. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | स.सदस्य |
| ३. | स.स.श्री. सुदाम सोनवणे | - | स.सदस्य |
| ४. | स.स.श्री. फैय्याज अहेमद कुरैशी | - | स.सदस्य |
| ५. | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | - | स.सदस्य |
| ६. | स.स.सौ. साजेदा बेगम | - | स.सदस्य |
| ७. | स.स.श्री. म.सलिम म.हनिफ | - | स.सदस्य |
| ८. | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | - | स.सदस्य |
| ९. | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | - | स.सदस्य |
| १०. | स.स.सौ. उषाबाई दिलीप गायकवाड | - | स.सदस्य |
| ११. | स.स.श्री. लांडगे गौतम लिंबाजी | - | स.सदस्य |
| १२. | स.स.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | - | स.सदस्य |
| १३. | स.स.श्री. भालेराव अभिमन्यु रामभावू | - | स.सदस्य |
| १४. | स.स.श्री. नरेंद्र यादवराव पाटील | - | स.सदस्य |
| १५. | स.स.श्री. कोकाटे काशीनाथ हरिभावू | - | स.सदस्य |
| १६. | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | - | स.सदस्य |
| १७. | स.स.श्री. बैनाडे कवरसिंग किसनसिंग | - | स.सदस्य |
| १८. | स.स.सौ. पद्मा बाबुराव शिंदे | - | स.सदस्य |
| १९. | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | - | स.सदस्य |
| २०. | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल रामचंद्र | - | स.सदस्य |
| २१. | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | - | स.सदस्य |
| २२. | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | - | स.सदस्य |
| २३. | स.स.श्री. फजलउल्ला खॅान अजमत उल्लाखान | - | स.सदस्य |
| २४. | स.स.श्री. अजीज खॉ गणी खाँ | - | स.सदस्य |
| २५. | स.स.श्रीमती आबेदा बेगम मुस्तफा | - | स.सदस्य |
| २६. | स.स.श्री. महंमद मुस्तफा अहमद | - | स.सदस्य |
| २७. | स.स.श्रीमती नुरजहाँ बेगम रहेमान खान | - | स.सदस्य |
| २८. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सदस्य |
| २९. | स.स.श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी | - | स.सदस्य |
| ३०. | स.स.सौ. मोहसीना बिल्कीस विखारोद्दीन | - | स.सदस्य |
| ३१. | स.स.श्री. जावेद रज्जाक | - | स.सदस्य |
| ३२. | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | - | स.सदस्य |
| ३३. | स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | - | स.सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४. | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | - | स.सदस्य |
| ३५. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | - | स.सदस्य |
| ३६. | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | - | स.सदस्य |
| ३७. | स.स.श्री. अ.अ.रऊफ म.अ.माबुद | - | स.सदस्य |
| ३८. | स.स.श्री. स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन | - | स.सदस्य |
| ३९. | स.स.श्री. खाखोरडिया धिरज शांतीलाल | - | स.सदस्य |
| ४०. | स.स.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | - | स.सदस्य |
| ४१. | स.स.श्री. सय्यद अली मीरा सलामी | - | स.सदस्य |
| ४२. | स.स.श्री. संजय किशनराव केनेकर | - | स.सदस्य |
| ४३. | स.स.सौ. लता दलाल | - | स.सदस्य |
| ४४. | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | - | स.सदस्य |
| ४५. | स.स.सौ. धांडे शकुंतला हरिदास | - | स.सदस्य |
| ४६. | स.स.श्री. अब्दुल रशिद खाँन (मामू) | - | स.सदस्य |
| ४७. | स.स.सौ. आव्हाड सविता धनंजय | - | स.सदस्य |
| ४८. | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | - | स.सदस्य |
| ४९. | स.स.श्री. अब्दुल रशिद अ.सत्तार | - | स.सदस्य |
| ५०. | स.स.श्री. धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग | - | स.सदस्य |
| ५१. | स.स.श्री. विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | - | स.सदस्य |
| ५२. | स.स.श्री.जैन विकास रतनलाल | - | स.सदस्य |
| ५३. | स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन | - | स.सदस्य |
| ५४. | स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | - | स.सदस्य |
| ५५. | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | - | स.सदस्य |
| ५६. | स.स.श्री. जोशी संजय रामदास | - | स.सदस्य |
| ५७. | स.स.श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत | - | स.सदस्य |
| ५८. | स.स.सौ. जोस्त्ना हिवराळे | - | स.सदस्य |
| ५९. | स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | - | स.सदस्य |
| ६०. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सदस्य |
| ६१. | स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | - | स.सदस्य |
| ६२. | स.स.श्री. विठ्ठल किशन जाधव | - | स.सदस्य |
| ६३. | स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | - | स.सदस्य |
| ६४. | स.स.श्री. काळुसे मंदा धनंजय | - | स.सदस्य |
| ६५. | स.स.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | - | स.सदस्य |
| ६६. | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | - | स.सदस्य |
| ६७. | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | - | स.सदस्य |
| ६८. | स.स.श्री. नवपुते कचरु चंद्रभान | - | स.सदस्य |

सभेसाठी २२ सदस्य उपस्थित असल्याने गणपुर्ती अभावी आजची सभा ००.१५ मिनीटासाठी तहकूब करण्यात येत असल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले. (वेळ अंदाजे ११.२०)

तहकूब करण्यात आलेली सभा पुन्हा ११.३० वाजता सुरु झाली.

थोर साहित्यिक गोपाळ निळकंठ दांडेकर उर्फ गोविंदा सभागृहाचे माजी सदस्य अजिजउल्ला बेग आणि गुजरात येथील चक्रीवादळात मुत्यूमुखी पडलेले नागरिक यांच्या विधनाबद्दल सभागृहाचे ००.२० मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली.

**सुचक :** श्री. नरेंद्र पाटील
श्री. अविनाश कुमावत
श्री. गजानन बारवाल

**अनुमोदक :** श्री. हमीदोद्दीन ताबा
श्री.म.विकारोद्दीन

सन १९८८ च्या काळात स.नगरसेवक अजिजउल्ला बेग सदस्य होते. ते तडफदार कर्तत्ववान व्यक्तीमत्व होते. अजिजउल्ला बेग यांना कायद्याचा चांगला अभ्यास असल्याने सभागृह त्यांना कायदेमंत्री म्हणुन संबोधित. एखाद्या प्रश्नावर सभागृहास काही अडचण वाटली तर अशा वेळी सभागृह अजिजउल्ला बेग यांचे मत असे त्यावेळी क्षणाचाही विलंब न लावता अजिज उल्ला बेग हे त्या प्रश्नाविषयी कायद्याच्या चाकोरीत बसेल असा सल्ला सभागृहाला देत होते. अजिजउल्ला बेग यांना सामाजिक कार्याची आवड होती, ते टॅक्सी युनियन चालवत होते. अजिजउल्ला बेग हे सभागृहात एखाद्या विषयी जेव्हा बोलत असत तेव्हा त्या विषयाचा पुर्ण अभ्यास करुन नियमाच्या चाकोरीत आपले विचार सभागृहाकडे मांडत असत त्यांचा हा गुण सभागृहाने आत्मसाद करण्यासारखा असून त्याचे अनुकरण करावे. स.अजिजउल्ला बेग हे राखीव मतदार संघातून निवडून आले होते. सभागृहाचे सदस्य असतांना त्यांनी स्थायी समितीचे सभापती पद चांगल्याप्रमाणे भूषविले आहे. नगरसेवक या नात्याने शहर विकासाच्या कामात त्यांनी अत्यंत तळमळने काम केले आहे. अशा शब्दात स.सभासद सर्वश्री नरेंद्र पाटील, श्री.अविनाश कुमावत, श्री.गौतम खरात, सौ.लता दलाल, श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री.अब्दुल रशीदखॉन (मामू) , श्री. जावेद रज्जाक, श्री.राजकुमार बचाटे, श्री. प्रभाकर विधाते, व श्री.फय्याज कुरैशी, विरोधी पक्ष नेता यांनी श्रध्दांजली अर्पण केली.

**श्री.अ.रशीदखॉन :** सिडको हस्तांतराबाबत दि.०३.०९.१९९७ च्या सर्वसाधारण सभेतील मंजूरीनुसार उपसमिती तयार करण्यात आली आहे. या उपसमितीची बैठक होऊन त्या सिडको हस्तांतराबाबत चर्चा झाली. व त्या आधारे उपसमितीचा अहवाल तयार करण्यात आला आहे. आचार संहिता लागू असल्यामुळे हा अहवाल सादर करता आला नाही. तो अहवाल आज या सभागृहापुढे मा.महापौरांकडे सादर करत आहे. या अहवालानुसार ज्या दिवशी सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतर होईल त्या दिवसापासुन त्या भागातील नागरिकांना मालमत्ता कर लागू करण्यात यावा असा अहवाल दिला आहे.

**श्री.अविनाश कुमावत :** उपसमितीने दाखल केलेल्या सिडको हस्तांतरण अहवालाचे अभिनंदन सिडको हस्तांतरणापासून मालमत्ता कर लागु करण्याचा ठराव मंजूर करावा.

**श्री.डॉ.विजयकुमार मेहेर :** सिडको हस्तांतरणाबाबत बऱ्याच बैठका झाल्या ज्या ज्या वेळी सिडको हस्तांतरणाबाबत बैठका झाल्या. त्या त्यावेळी ज्या ज्या तारखेपासून मालमत्ता कराची आकारणी करावी ही आग्रही मागणी मांडण्यात आलेली आहे. आणि तसा ठरावही सभागृहात मंजूर झालेला आहे. या ठरावाची इतिवृत्तात नोंद आहे.

**श्री.नरेंद्र पाटील :**माजी महापौर श्री.अब्दुल रशीदखॉन (मामू) यांनी सिडको हस्तांतरण बाबतचा अहवाल सभागृहापुढे मांडला आहे. या अहवालास आजच या सभागृहात मंजूरी देऊन शासनाकडे पाठविण्यात यावा अशी सुचना करतो.

**श्री.काशिनाथ कोकाटे** : वेगवेगळ्या स्थानिक वृत्तपत्रातून काही पक्षाचे पदाधिकारी सिडको च्या मागणीबाबत उपोषणास बसणार अशी बातमी वाचली आहे. संपूर्ण सभागृहाने सिडको हस्तांतरणाबाबत गेली दोन वर्ष चर्चा केली आहे. दि.०३.०९.१९९७ ला जी सर्वसाधारण सभेची बैठक झाली. त्या बैठकीत ज्या दिवसापासून सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतर होईल. तेव्हापासुन मालमत्ता कराची आकारणी करण्यात यावी, असा ठराव मंजूर झाला आहे. पण राजकारणासाठी राजकारण असा प्रयत्न या ठिकाणी चालु आहे. पाणी पुरवठ्याबाबतच्या प्रश्नावर चर्चा करतांनाही सिडको भागाचा वेगळा प्रयत्न केला आहे.

**डॉ.मनमोहनसिंग ओबेरॉय :**सिडको भागात ६ वर्षापुर्वी मालमत्ता कर आकारणी करण्यात आली आहे. सिडकोतील / काही भागाच्या नागरिकांनी महापालिकेच्या नोटीसीप्रमाणे मालमत्ता कराचा भरणा केलेला आहे. आज सभागृहात ज्या दिवशी सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतरण होईल त्या दिवसापासुन मालमत्ता कराचा भरणा केलेला आहे. आज सभागृहात ज्या दिवशी सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतरण होईल त्या दिवसापासून मालमत्ता कराची आकारणी करण्याबाबतचा अहवाल उपसमितीने सभागृहपुढे दाखल केला आहे. तेव्हा ज्यांनी मालमत्ता कर भरला आहे. तो माफ करता येतो का याबाबत त्या रकमेचा परतावा कसा करणार याबाबत धोरण ठरवावे. कायदेशीर मत घेण्यात यावे. अहवालानुसार नवीन कराची आकारणी कशी करण्यात येणार? सिडको भागातील नागरिकांकडुन सिडको प्रशासन जो सेवा कर वसुल करतो तो निधी महापालिका प्रशासनास मिळाला पाहिजे. अशा प्रकारच्या सर्व बाबींवर विचार करण्यासाठी सभागृहातील ३/४ सदस्यांनी एकत्र बसुन त्यावर विचार केला पाहिजे. आणि त्यानंतर ठराव मंजूर करण्यात यावा.

**श्री.अब्दुल रशिदखॉन (मामू) :** सिडको हस्तांतरणाबाबत प्रथम पालकमंत्र्याकडे बैठक झाली. त्यानंतर मा.मुख्यमंत्र्यांकडे बैठक झाली. त्यानुसार सिडको हस्तांतरण बाबत निर्णय घेण्यात आला आहे. या अहवालाबाबत सभागृहात निर्णय घेऊन त्यावर शासनाचे आदेश घेण्यात यावेत.

**श्री.गजानन बारवाल, डॉ.विजयकुमार मेहेर :** माजी महापौर श्री.अब्दुल रशिद खॉन (मामू) यांनी सिडको हस्तांतर बाबतचा प्रस्ताव सभागृहापुढे मांडला त्याबाबत त्यांचे अभिनंदन. या अहवालाची सर्व सभासदांनी माहिती होण्यासाठी अहवालाची प्रत स.सभासदांना देण्यांत यावी. या नंतर त्यावर सर्व बाजुनी विचार करुन ठराव मंजूर करण्यात यावा व अहवाल शासनास पाठविण्यात यावा, अशी विनंती आहे.

मा.महापौर यांचेकडील सुचनेनुसार नगरसचिव यांनी सिडको हस्तांतरणा बाबतचा उप समितीकडील अहवाल सभागृहात वाचून दाखविला.

**श्री.अविनाश कुमावत :** सिडको हस्तांतरणाबाबत लेखी प्रस्ताव सभागृहापुढे मांडला आहे. त्यावर निर्णय व्हावा.

**विषय क्र. ४**

सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सिडको हस्तांतरणाबाबत बैठका झालेल्या आहेत. यावर एक उपसमितीही कायम झालेली असून उपसमितीचा अहवालही तयार झालेला आहे. सिडको हस्तांतरणाबाबत ज्या ज्या वेळी बैठका झाल्या त्या त्या वेळी ज्या तारखेपासून हस्तांतरण होईल त्या तारखे पासून मालमत्ता कर वसुलीची अंमलबजावणी करावी. ठराव मंजुरीस्तव सादर .

**सूचक** श्री.अविनाश लक्ष्मणराव कुमावत
श्री.कचरू नवपुते, श्री.सुभाष टाकळकर
श्री.रजीन जोशी

**अनुमोदक** श्री.जयवंत ओक
सौ.लता दलाल

**संवाद :**

**मा.महापौर :** ठराव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्या तारखेपासून सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण होईल त्या तारखेपासून सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण होईल त्या तारखेपासून मालमत्ता कर वसुलीची अंमलबजावणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५/१**

दिनांक १२-२-९८,४-३-९८,२७-३-९८,३०-३-९८,३१-३-९८,२०-४-९८ व दिनांक १९-५-९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**श्री.संजय केनेकर** दिनांक ३१-३-९८ ला जी बैठक झाली त्या पाणीपटट्टी बाबत चर्चा झाली या चर्चेत सभागृहातील स.सभासदांनी आपआपल्या सुचना मांडल्या त्या बाबतची इतिवृत्तातिल नोंद चुकीची घेतली गेली आहे. पाणीपटट्टी बाबतजी चर्चा झाली त्यात मी ही चर्चा केली आहे व जनतेचा प्रश्न सभागृहापुढे मांडला आहे. परंतू इतिवृत्तात नोंदवितांना मी केलेल्या चर्चेबाबत फक्त एक ओळ नोंदविण्यात आली आहे. बाकी चर्चेची नोंद घेण्यात आली नाही अशा प्रकारचा अन्याय आतापर्यंत दहावेळा झाला आहे. इतिवृत्ताची नोंद करतांना सन्माननिय सभासदांचे चेहरे पाहून नोंद घेतली जाते. याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी.

**श्री.नरेंद्र पाटील** सन्माननिय सभासदांच्या मताशी सहमत आहे. अर्थसंकल्पाच्या सभेत मी चर्चा केली पण त्याची नोंद इतिवृत्तात दिसत नाही. याबरोबर जे जे इतर सभाचे वृत्त जोडले आहेत त्यातही तीच पध्दत आहे. इतिवृत्त नोंदीची ही चुकीची पध्दत आहे.

**श्री.प्रकाश निकाळजे** मी सभागृहात जी चर्चा केली त्याची नोंद झाली नाही. पाणी पट्टीच्या विषयावर चर्चा होत असतांना कारखानदार पाण्याचा दुरूपयोग करतात. त्यामुळे शहरातील नागरिकांना पाणी कमी मिळते. अशी चर्चा केली होती पण त्याची नोंद इतिवृत्तात नाही.

**श्री.नरेंद्र पाटील** जी चर्चा होते ती एकाच ओळीत चार स. सदस्यांची नांवे एकत्र टाकून लिहली जाते. स.सभासद मत मांडले ते स्पष्ट यायला पाहीजे.

**श्री.सय्यद अली मिरा सलामी** स. सभासदांनी एकाधी सूचना केली / मांडली आहे त्याप्रमाणे सभागृहात जी चर्चा झाली तयातील शब्द न शब्द इतिवृत्तांत नोंदविला गेला पाहिजे. मागील सभेची कॅसेट सभागृहात मागवावी.

**सौ.पद्‌मा शिंदे** :अर्थसंकल्पीय सभेत पाणी प्रश्नावर चर्चा केली त्याची नोंद इतिवृत्तात नाही. काही ठराविक नगरसेवकांचीच नांवे इतिवृत्तात असतात. बाकीचे नगरसेवक सभागृहात चर्चा करत नाहीत का

**मा.महापौर :** संबंधितावर प्रशासनाने कार्यवाही करावी. व यापूढे इतिवृत्त नोंदीबाबत दक्षता घ्यावी विषय क्र२ चर्चेला घ्यावा.

**श्री.संजय जोशी** :दिनांक ३१.०३.९८ च्या सभेत अर्थसंकल्पावर चर्चा करत असतांना सिडको येथील एन-७ मधील पाण्याच्या टाकीवर पंप हाउस व संप यासाठी रू.४० लाखाची तरतुद करण्यांत यावी अशी सूचना मांडली होती. परंतु दिनांक ३१.०३.९८ च्या इतिवृत्तात त्याची नोंद घेतली नाही.त्यासाठी अशाी दुरस्ती करण्यांत यावी.

**श्री.हमीदोद्दीन ताबा** :सिल्कमिल कॉलनी भागत बांधण्यात येणाऱ्या दवाखान्याच्या कामाच्या निविदा कमी दराने मंजुर केली असताना त्यात बदल करून ती जास्त दराने आहे असे दाखवले गेले आहे. याबाबत सभागृहात चर्चा घडवून आणली असतांना चौकशी करण्याचा निर्णय झालेला आहे. या बाबत सभागृहात गेल्या एक वर्षापासून मागणी करत आहे त्या बाबत खुलासा करावा.

**मा.महापौर :** संबंधित अधिकाऱ्यांनी या बाबत खुलासा करावा.

**मा. उप आयुक्त (प्र)** :सदर बाबीचा अहवाल तयार आहे. येत्या सभेत त्याबद्यलचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**मा. महापौर** सन्माननिय सदस्यांच्या सूचनेप्रमाणे संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा केला आहे. पुढील बैठकीत त्यावर विचार करण्यात येईल. सर्व सभासंदांनी आपआपल्या जागेवर बसून घ्यावे. विषय क्र.२ चर्चेला घेण्यात यावा.

**श्री.जावेद रज्जाक** :गेल्या पाच महिन्यांपासून सर्वसाधारण सभा झालेली नाही १-१ टयुबसाठी भांडत आहे. सभासदांच्या सूचनाबाबत सभागृहात चर्चा होवू दया.

**मा.महापौर :** विषयपत्रिकेवरील विषयाबाबत चर्चा झाल्यानंतर स.सभासदांच्या सूचनाबाबत चर्चेसाठी वेळ दिला जाईल.

**श्री.हमीदोद्दीन ताबा :** माझा दुसरा प्रश्न शिक्षक भरती प्रश्नाबाबत आहे. चौकशी समिती नेमली होती या चौकशी समितीचा अहवाल दावून ठेवला आहे.

**मा.महापौर :** विषय पत्रिकेवरील विषयाबाबत चर्चा झाल्यांनतर सभासदांच्या सूचना बाबत चर्चा केली जाईल. सर्व सभासदांनी आपआपल्या जागेवर बसून घ्यावे . विषय क्र.२ चर्चेला घेण्यात यावा.

**टराव**

दिनांक १२-२-९८,४-३-९८,२७-३-९८,३०-३-९८,३१-३-९८,२०-४-९८ व १९-५-९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र.६/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, छावणी पुलाच्या पुर्व दिशेला मोळया जागेत औरंगाबाद मुंबई रस्त्यावर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती ब्रांझ धातुचा १० फुट उंचीचा पुतळा बसविणे व सभोवती सुमारे १०५ मी X १० मी आकाराचे वाहतुक बेट विकसीत करून त्यांचे सौंदयीकरण करण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रक रू.१६,७९,१५०/- चे दिनांक १९-१२-९७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. १७६/१४ अन्वये मंजुरी मिळालेली असून सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त झालेल्या रक्कम रू. १०.०० कोटीच्या अनुदानातुन हाती घेतलेल्या कामामधून जी बचत होणार आहे त्या बचतीमधून करण्यांत येईल.

सदरील ठिकाणी पुतळा बसविण्याकरीता मा. पोलिस आयुक्त औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा.क्र.विसा/औ.९७/२८०१ दिनांक ८-४-९७ अन्वये त्यांच्या कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र दिलेले होते.

तसेच छावणी पुलाच्या पुर्वेकडील मोकळया जागेत सदरहू पुतळा बसविण्याचे ठरल्याने व ही जागा सार्वजनिक बांधकाम खात्याची असावी असा महापालिकेचा समज असल्याने सार्वजनिक बांधकाम खात्याकडे या प्रकरणी पुतळयासाठी जागेची मागणी करण्यात आली त्यानुसार सार्वजनिक बांधकाम खात्याने त्यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र.प्रआ/पुतळा/४७३८/ दिनांक १६-१-९७ रोजीच्या पत्राद्वारे सदरील पुतळयासाठी महापालिकेकडे जागा हस्तांतरीत करण्याकरीता त्यांची काही हरकत नसल्याचे कळविले आहे. मात्र ही जागा महसूल व वने या विभागाची असल्याकारणाने ती मा.जिल्हाधि कारी ,औरंगाबाद यांचे मार्फत शासनाकडून महापालिकेस हस्तांतर व्हावे असे सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना कळविण्यात आले होते. व त्या पत्राची एक प्रत महानगरपालिकेस सार्वजनिक बांधकाम खात्यात माहितीस्तव पाठविली होती. त्यानुसार जागा प्राप्त करण्याकरीता मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पत्र व्यवहार करून जागेची मागणी करण्यांत आली या प्रकरणी माहिति घेतली असता मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे कार्यालयातर्फे शासनपातळीवर पत्र व्यवहार सुरू असून शासनाची मंजूरी मिळाल्यावर जमीन हस्तांतरीत करण्यात येईल. असे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळाले.

दरम्यानच्या काळात पुतळा बसविणे करीता मा.प्रधान सचिव यांचेकडे पत्र व्यवहार करून परवानगी मागवण्यात आली आहे. अद्याप शासनाकडून परवानगी मिळालेली नाही. मात्र पुतळा तयार करण्याचे काम पुणे येथील शिल्पकार श्री.संजय परदेशी यांचेकडे सोपविले असून पुतळयाचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे.

तसेच पुतळयाच्या नियोजित जागी जागेचे सपाटीकरण खोलगट भागाची भरती व जागेची इतर विकासाची कामे निविदा मागवून कंत्राटदारातर्फे सुरू करण्यात आली होती. त्यातील सुमारे २५% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर होते मात्र आता औरंगाबाद छावणी मंडळातर्फे सदरील पुतळा बसविण्याच्या कामास आक्षेप घेण्यात आला असून त्यांनी काम थांबविले आहे. पुतळयाची नियोजित जागा ही सार्वजनिक बांधकाम खात्याची नसून ती औरंगाबाद छावणी (मिलटरीच्या मालकीची) असल्याचे छावणीचे मुख्य अधिकारी यांना महापिलकेस पत्राद्वारे कळविले आहे. व काम बंद ठेवणे करीता सुचविले असून त्यानुसार तुर्त काम बंद ठेवण्यात आले आहे.

तसेच मा.पोलिस आयुक्त औरंगाबाद यांनी त्यांचे कार्यालयीन पत्रजा.क्र.विशा/औ/९८-२२१८ दि.१०-३-९८ चे पत्र देवून कळविले आहे की, पोलिस

खात्यातर्फे देण्यात आलेले ना हरकतीचे पत्र रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे सदरील ठिकाणी काम करता येणार नाही.

म्हणून पुन्हा सुधारित प्रस्ताव मांडण्यात येतो की, टि.व्ही.सेंटर सिडको भागात पोलिस चौकी समोर जे गोल वाहतुक बेट सिडकोतर्फे बांधण्यात आले आहे त्यात छत्रपती संभाजी मयहाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे करीता मा.मुख्य प्रशासक सिडको नविन औरंगाबाद यांना पत्राद्वारे सदरील जागेची मागणी करून त्यांचे कडून ना हरकत प्रमाणपत्र घेवून त्या ठिकाणी पुतळा बसविणे करीता विचार विनिमय घेवून जागेची निश्चिती करण्याकरीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री.विकारोद्यीन** : छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा औरंगाबाद मुंबई रस्त्यावरील छावणी भागात बसविण्यास यापूर्वी मंजूरी देण्यात आली होती. त्यानुसार छावणी पुलाजवळील जे काम करण्यात आले ते काम छावणी मंडळाने रोकलेले आहे. तेव्हा त्याचा जो खर्च झाला आहे त्याची भरपाई कोण करणार याचा खुलासा व्हावा.

सार्वजनिक बाधकाम विभाग व मा.जिल्हाधिकारी यांचेकडील ना हरकत प्रमाणपत्र मिळाले त्यानुसार पुतळा तयार करण्यात आला.

**मा.महापौर :** संबधीत अधिकाऱ्यांनी या बाबत खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** औरंगाबाद मुंबई रस्त्यावर छावणी भागात ज्या जागेवर पुतळा उभारण्याच्या कामावर अंदाजे तीन लाख खर्च झालेला आहे. या कामात रिटेनिंग वॉल, संरक्षित भिंत सपाटीकरण इत्यादी कामाचा समावेश आहे.

**श्री.अब्दुल रशिद खान (मामु) :** छावणी भागात पुतळा उभारण्यासाठी छावणी बोर्डाकडून आवश्यक ते ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही ना हरकत प्रमाणपत्र घेतले नाही तर खर्च का केला नागरिकांची एखादी संचिका असेल तर खर्च त्या कामाच्या मंजुरीसाठी संबंधित नागरीकांना २/२ महिने चकरा माराव्या लागतात.

**श्री.गजानन बारवाल** छत्रपती संभाजी महाराजाचा पुतळा बाबा पेट्रोल पंप जवळील मोकळया जागेत बसविण्याचे ठरले होते. परंतु सदर जागा खाजगी मालकीची असल्याने छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा छावणी भागातील पुलाजवळ बसविण्याचा निर्णय झाला आहे. या प्रकरणी छावणी बोर्डाचे सन्माननिय सदस्यांना विश्वासात घेवूनच पुतळा बसविण्याचे ठरले होते. त्या वेळी ना हरकत प्रमाणपत्र पत्र देण्यात येईल असे सदस्यांनी सूचित केल्यावरून पुतळयाच्या कामाला सुरूवात केली होती.

**श्री.स.अली.मिरा सलामी :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा आणि छावणी पुलाजवळ पुतळा उभारण्याची कामी झालेला खर्च संबंधित अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात यावा

**श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग**

**श्री.प्रकाश निकाळजे**

**सौ.मोहसिना बिल्कीस**

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी खुलासा करत आहेत सर्व स.सभासदांनी जागेवर बसून घ्यावे.

**सौ.पद्मा शिंदे :**संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**श्री.अ.रशिद खॉन :** महानगरपालिकेतर्फे शहरात जी कामे केली जातात त्या कामाच्या तपासणीसाठी मा. आयुक्त यांचे कार्यालयात तांत्रिक कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या तांत्रिक कक्षाने छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्याची संचिका तपासली नाही का? ही संचिका मंजुरीसाठी तांत्रिक कक्षाकडे न जाता सरळ कशी गेली? ना हरकत प्रमाणपत्र नव्हते तर खर्च का झाला याचा खुलासा व्हावा.

**श्री.जावेद रज्जाक :** छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभरण्यास आमचा विरोध नाही. पुतळा उभारण्यासाठी जो दोन लाखाचा खर्च झाला आहे त्यास जबाबदार कोण आहे तसेच प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे सिडको भागात पुतळा उभारण्यासाठी सिडकोकडून ना हरकत प्रमाणपत्र घेतले आहे का? याचा खुलासा व्हावा.

**अति.शहर अभियंता :** सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दोन रस्त्याला लागून पुलाजवळील असलेल्या / मोकळया जागेवर पुतळा उभारण्यांत येत असल्याने या विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले. पोलिस आयुक्तालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले त्यानंतर पुतळा उभारणीच्या कामास सुरुवात केली. राजमार्ग आहे अशी आमची धारणा होती.

**श्री.अ.रशिद खान (मामू):** अति.शहर अभियंता यांनी पुतळा उभारणीच्या जागेचा नकाशा पाहिला का? चूक झाली असेल तर कबुल करा, माफी मागा पण खोटा ,खुलासा करू नका .छावणी मंडळ व सार्वजनिक बांधकाम विभागावर कार्यवाही करा.

**श्री.जयवंत ओक:** हा प्रकार का झाला याचा खुलासा अति.शहर अभियंता यांनी सभागृहापुढे केला आहे. माजी महापौरांचे कारकिर्दित हे काम झाले आहे. जनतेचा पैसा आहे. पुतळा उभा करावयाच्या जागेबाबत छावणी बोर्ड आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा वाद होता म्हणून काम थांबविले आहे. दिशेला वळण देवू नका.

**श्री.अ.रशिद खान (मामू) :** स.सभासदांनी दिशाभूल करण्याची भाषा करू नये. माजी महापौर श्री.बारवाल यांचे काळात हा प्रश्न निघाला होता.

**श्री.भगवान घडामोडे :** सिडकोकडून ना हरकत प्रमाणपत्र घेवून नंतर पुतळयाचे काम करावे. पुतळा बसविणे यासाठी जालना रोडवरून सिडकोकडे जाणारा रस्त्यावरील चौरस्ता चांगला आहे.

**श्री.प्रकाश निकाळजे :** झालेल्या खर्चाबाबत चौकशी करण्यांत यावी. सभागृह तुमच्या पाठीशी आहे.

**मा.महापौर** : चौकशी करण्यांत येईल.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपती संभाजी यांचा पुर्णकृती १० फुट उंचीचा ब्रांझ पुतळा टी.व्ही. सेंटर चौक ऐवजी जळगांव रोडवरील सिडको बसस्टँड जवळ असलेल्या औरंगाबाद जालना रोडवरील चौकात बसविण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. या ठिकाणी पुतळा उभारण्यासाठी मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता, मा उप महापौर,मा.सभापती, व श्री.प्रदिपकुमार जैस्वाल, यांचा समावेश असलेली उपसमिती नियुक्त करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. या उपसमितीने आपला अहवाल पुढील बैठकीच्या वेळी दाखल करावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७/३ :**

आयुक्त ,महानगरपालिका औरंगाबाद यांनी सुधारित प्रस्ताव सादर केला की, मौलाना अब्दुल कलाम आझाद हे थोर स्वांतत्र सैनिक होते. देशाच्या स्वतंत्र चळवळीत त्यांचा मोलाचा वाटा आहे.त्यांच्या कार्याची स्मृती कायम स्वरूपी राहावी व नविन पीढींना त्यांच्या कार्याची ओखळ व्हावी. हया हेतूने औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने "मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र" उभारण्याचे तसेच हया संशोधन केद्राच्या इमारतीतच प्लानेपेटेरियम (तारांगण) उभारण्याचे ठरले असून ह्या कामासाठी दि.०४.१०.१९९७ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.१०२/६ अं.प.रे.रु.१७२.०० लाखास मंजूरी मिळालेली आहे.

ह्या प्रकल्पासाठी श्री.विजय तावडे ह्यांची ह्या प्रकल्पाचे वातुशास्त्रज्ञ म्हणुन नेमणुक करण्यांत आलेली होती. परंतू दि.२८.१०.१९९७ रोजी मा.महापौर ह्यांचे दालनात बैठक झाली. त्यात असे ठरले की, श्री.विजय तावडे यांच्या ऐवजी श्री.एस.बी.सुतारी यांची या प्रकल्पासाठी आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करण्यांत यावी.

दि.०३.१२.१९९७ रोजी मा.महापौर साहेब सोबत श्री.सोनी (अ.श.अ.) श्री.सुतारी आर्किटेक्ट यांची बैठक झाली. यावेळी श्री.अ.रऊफ स.नगरसेवक व श्री.रशीद खॉन (मामू) महापौर हे दोघे उपस्थित होते. मा.महापौर ह्यांनी श्री.अब्दुल रऊफ स.नगरसेवक त्यांच्याशी चर्चा करुन मजनूहिल येथील जागा नक्की केली होती. व या ठिकाणी ठरल्याप्रमाणे ब्लॅनोटेरीयम ऐवजी सुमारे ३५० ते ४०० लोक समावतील असा आधुनिक सर्व सोयीने युक्त असा मिटींग हॉल व लायब्ररी इमारत बांधावयाचे आराखडे तयार करण्यासाठी बैठकीतच सुचित केले होते.

परंतू, दि.०१.०१.१९९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये मा.महापौर साहेबांनी मौलाना अब्दुल कलाम आझाद रिसर्च सेंटर कुठे करावयाचे याबाबत वाद विवाद चालु होता. याबाबत काही विरोध अविरोध मजूकर स्थानिक वर्तमान पत्रातही छापुन आलेला होता. परंतू मौलाना अब्दुल कलाम आझाद रिसर्च सेंटर हे मजनूहिल येथे न होता ते शिवाजी मैदान जवळील रिकाम्या जागेवर करण्याचा निर्णय संबंधित समितीने दिला आहे. त्या नुसार प्रशासनाने कार्यवाही करावी या समितीने दिला आहे.

या समितीच्या दोन तीन वेळेस बैठका झाल्या बैठकीत अकरापैकी दोन स.सदस्य गैरहजर होते. बाकी नऊ स.सदस्यांची समितीने दिलेल्या निर्णयानुसार शिवाजी मैदान (आमखास) येथील जागेत मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र उभारण्यास मंजूरी देण्यांत येते असा ठराव पारित केलेला आहे.

तसेच सदर प्रकल्पासाठी दिरंगायी होत आहे. म्हणून दि.१७.०४.१९९८ रोजी एक मिटींग आयोजित करण्यांत आली. त्यात खालीलप्रमाणे स.सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

१. माजी खासदार मा.श्री.प्रदिप जैस्वाल
२. मा.महापौर श्री.रशिद खॉन (मामू)
३. अतिरिक्त शहर अभियंता श्री.सी.एस.सोनी.
४. उप-अभियंता (बांधकाम-१) श्री.एस.डी.पानझडे
५. प्र.कार्यकारी अभियंता (स्लम) श्री.सैय्यद सिकंदर अली.
६. मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद, श्री.डी.एन.वैद्य.
७. वास्तुशास्त्रज्ञ श्री.एस.बी.सुतारी

वरीलप्रमाणे स.सदस्य व अधिकारी यांच्या संयुक्त बैठकीत मजनूहिल व आमखास मैदान येथील दोन्ही जागेबाबत तुलनात्मक तक्ता देणे बाबत चर्चा होऊन वास्तुशास्त्रज्ञ

श्री.एस.बी.सुतारी यांना तुलनात्मक तक्ता देणे बाबत आदेशित केले असता त्यांनी दोन्ही जागेची तुलना खालीलप्रमाणे केली आहे.

**अ) मजनूहिल येथील जागा**

१. मुख्य इमारती शिवाय पार्कींग व गार्डन साठी ३ एकर जागा आहे.

२. जमीनीचे एकूण क्षेत्रफळ ३.५ एकर आहे.

३. सदरील प्रकल्प हा जुन्या व नवीन शहर मिळून विमानतळ ते विभागीय आयुक्त कार्यालय या रस्त्यावर येत आहे.

४. सदर जागा उंच टेकडीवर येत असून समोर सलीम अली तलाव व सिडकोचे मुख्य गार्डन आहे.

५. मौलाना अब्दुल कलाम आझाद ही इमारत उंच टेकडी वर आल्यामुळे शहरातील जालना रोड, जळगांव रोड, विद्यापीठ परिसर अथवा ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळ, पानचक्की व बीबीका मकबरा येथुन दिसेल.

६. इमारतीचे बांधकाम करते वेळी जागा कठीण असल्यामुळे पाया जास्त खोदण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे पाया बांधकामासाठी जादा रकमेची गरज भासणार नाही.

७. इमारत उंच टेकडीवर येत असल्याने प्राकृतिक सौंदर्य करण्यात भर पडेल व इमारतीचे सुशोभीकरण करणेस कमी खर्च लागेल.

८. सदरील जागेच्या उत्तरेकडील बाजुस तलाव येत असून पुर्वेकडील बाजुस गार्डन व टी.व्ही.सेंटर येत आहे. तसेच सदर प्रकल्पाच्या पश्चिमेकडील भाग हा शांततामय असून त्यामुळे प्रकल्पाची सौंदर्यात भर पडेल.

ब) आमखास मैदान येथील जागा :

१. एकूण जमिनीचे क्षेत्रफळ १.५ एकर आहे.

२. मुख्य इमारती शिवाय पार्कींग व गार्डनसाठी १ एकर जागा आहे.

३. सदरील प्रकल्प हा महावीर चौक ते कलेक्टर ऑफिस या व्ही.आय.पी. रोडवर येत असून या ऐतिहासिक आमखास मैदानावरील सांस्कृतिक कार्यक्रम, राजकीय व सार्वजनिक सामाजिक सभा राष्ट्रीय कार्यक्रम या मैदानावर करण्यांत येतात.

४. सदर जागेचा परिसर हा उत्तरेकडील बाजुस येत असलेल्या जुन्या कोर्ट वाल पेक्षा किती तरी खोलवर आहे.

५. जागेच्या चौहोबाजुंनी पाणी येत असल्याने पाण्याचा बंदोबस्त करण्यासाठी मोठ्या आकाराची रिटेनिंग वाल बांधावी लागेल.

६. डी.पी.रोड पासुन ६.०० मीटर खोलवर जागा येत आहे.

७. सदरील प्रकल्प ज्या जागेवर बांधावयाचा आहे. त्या जागेवर चौहोबाजुने पाणी येते. आरेफ कॉलनी व इतर परिसरातील च्या बरोबरीने येत असल्याने संपूर्ण पाणी ह्या जागेवर येते. त्यामुळे इमारतीस तडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

८. तसेच पाया खोदतांना कठीण जागा खोलवर असुन बांधकाम करण्यासाठी जास्त रक्कम लागण्याची शक्यता आहे.

९. प्रकल्पाची जागा फार खोलवर असून इमारतीच्या दर्शनी भागास सुशोभिकरण करावयाचे झाल्यास तेथे भरती करुन इमारतीची उंची वाढवावी लागेल व त्यामुळे प्रकल्पाचा खर्च वाढेल.

१०. प्रकल्पासाठी रहदारी करिता अतिरिक्त रस्ता करावा लागेल व त्यामुळे आणखी जास्त खर्च लागेल.

११. प्रकल्पाची उंची वाढवावी लागत असल्यामुळे उत्तर आणि पश्चिम बाजुस मोठ्या आकाराची रीटेनिंग बांधावी लागेल.

१२. तसेच शिवाजी मैदान सिटी सर्व्हे नं.२३४१ क्षेत्रफळ १८१०२.७ चौरस मिटर असून महाराष्ट्र शासनाचे स्टेडीयमसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी औरंगाबाद कार्यालयास शासन निर्णय क्र.एल.एन.डी.-३९८३/४२२९२/सी.आर./१२१९/जी.एस. मंत्रालय, मुंबई - ३, दि.१६.११.१९८३ अन्वये हस्तांतरीत केलेली आहे.

सी.टी.सर्व्हे नं.२३४१ च्या जमिनीतून महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या मालकीचे दोन रोड गेले असून ह्या दोन रोड मध्ये दोन एकर जागा गेलेली आहे. असे जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी कळविले आहे. तरी वरील मुद्यावर विचार होऊन मजनूहिल किंवा आमखास मैदान या दोन्ही जागेबाबत योग्य तो निर्णय होणेस्तव प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :-**

**श्री.संजय जोशी :-** मौलाना आबुल कलाम आझाद संशोधन केंद्र उभारण्याच्या कामासाठी नेमण्यात आलेले वास्तुशास्त्रज्ञ बदलण्यात आले आहेत. या कामासाठी यापुर्वी वास्तुशास्त्रज्ञ श्री.तावडे यांची नेमणूक करण्यात आली होती. तेव्हा वास्तुशास्त्रज्ञ श्री.तावडे यांना का बदलण्यात आले आहे. वस्तुतः मौलाना आबुल आझाद संशोधन केंद्र उभारण्याच्या कामाला उशिर झाला आहे. या कामासाठी श्री.तावडे हे वास्तुशास्त्रज्ञ नेमावे.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राचे वास्तूशास्त्रज्ञ प्रशासनाचे मंजूरीने बदलण्यात आले आहेत. महावीर चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय मुख्य रस्त्यावरील छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रालय डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेंटर या इमारतीजवळच मौलाना अबुल कलाम संशोधन केंद्र उभारण्यात यावे.

**श्री.संजय जोशी :-**मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राचे उभारणी साठी नव्याने आलेले वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडे वास्तुशास्त्रज्ञसाठी आवश्यक असलेली पदवी नसतांनाही सदर व्यक्तीची संशोधन केंद्र उभारण्यासाठी वास्तुशास्त्रज्ञ म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. ही बाब योग्य नाही.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्राहलय डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र या तिन्ही महत्वाच्या वास्तू महावीर चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय या मुख्य रस्त्यावर असल्यास या केंद्रांना भेट देणाऱ्या नागरिकांना सुविधा होईल असा ठरावात बदल करावयाचा असल्यास नियमाप्रमाणे तीन महिन्याचा कालावधी द्यावा लागतो. हा प्रकल्प होवू नये अशी रचना केली जात असल्याची शंका येते.

**श्री.अब्दुल रशिद खान (मामू) :-** मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र उभारण्यासाठी प्रथम कुलकर्णी व तावडे वास्तुशास्त्रज्ञ नेमले होते.

**श्री. संजय जोशी :-** सभागृहाची दिशाभूल केली जात आहे.

**श्री.अ.रशीद खॉन (मामू), श्री.प्रभाकर विधाते :-** मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र उभारण्याच्या कामासाठी प्रथम पांच वास्तुशास्त्रज्ञांची एक समिती नेमण्यात आली होती. या समितीने संशोधन केंद्र उभारण्याचे काम वास्तुशास्त्रज्ञ श्री.तावडे यांचेकडे सोपविण्यात आले होते. (गोंधळ वेळ अंदाजे १३.००)

**मा.महापौर :-** स.विरोधी पक्ष नेता यांनी सर्व सभासदांना जागेवर बसवावे असे प्रकार घडू नये याची दखल घ्यावी. मंजूर करण्यात येतो.

**श्री.विखारोद्दीन :-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर, छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय आणि मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र हे एकच मुख्य रस्त्यावर झाले पाहिजे आणि तसा निर्णयही सभागृहात झाला होता. मग हा बदल करण्याचा ठराव का ठेवला जात आहे. याचा खुलासा व्हावा.

**श्री.जावेद रज्जाक :-** फुटबॉल सारखा हा ठराव फिरवला जात आहे . मुसलमान समाजाशी खिळवाड केली जात आहे.

**मा. महापौर :-** स.सभासदांनी विषयावरच चर्चा करावी स. सभासदांनी जो आक्षेप घेतला आहे ते योग्य नाही. विषय क्र.३ मंजूर करण्यात येतो.

**श्री.जावेद रज्जाक :-** मौलाना अबुल कलाम संशोधन केंद्राची जागा बदलण्याबाबत ठराव सभागृहापुढे येणे योग्य नाही. हे संशोधन केंद्र छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर ज्या मुख्य रस्त्यावर आहे त्याच मुख्य रस्त्यावर उभारण्यात यावे असा निर्णय सभागृहात झाला आहे. संशोधन केंद्राची जागा बदलण्याबाबत पदाधिकाऱ्यांशी चर्चा झाली. इतरा सोबत काणती चर्चा झालेली नाही. संशोधन केंद्र उभारणे हा प्रश्न एका देशभक्ताचा आहे. श्री.मौलाना अबुल कलाम आझाद यांनी आपले संपूर्ण आयुष्य देशासाठी वाहिले. विचार करून सभागृहाने निर्णय घ्यावा.हे संशोधन केंद्र प्रथम आमखान मैदान येथे उभारण्यास मंजुरी मिळाली होती. हा मुख्य रस्ता आहे. छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्राहलय आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर हे याच मार्गावर आहेत. मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र आमखास येथे करण्यास अनेक कारणे दिली आहेत. महान नेत्याचे स्मरणार्थ वास्तू उभारणे हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक आहे. काम करावयाचे झाले तर सर्व काही करता येते. प्रत्यक्षात काम होणे महत्वाचे आहे. मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र हे आमखास येथेच उभारावे यासाठी सभासद श्री.अब्दुल रउफ हे उपोषणास बसले होते. ऑडिटेरियमची आवश्यकता नाही रिसर्च सेंटर हवे आहे. त्यासाठी योग्य निर्णय घेण्यात यावा. संशोधन केंद्रासाठी आमखासचीच जागा योग्य आहे. हा निर्णय झाला नाही तर आमरण उपोषणास बसू या प्रकल्पाचा भूमिपूजन समारंभ केव्हा होईल याचाही निर्णय आजच्याच सभेत घेण्यात यावा.

**श्री.स.अली मिरा सलामी :-** गेल्या एक वर्षापासून मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र उभारणीबाबत चर्चा चालू आहे. सर्व हिंदूस्थान मौलाना अबुल कलाम आझाद यांना जाणतो. छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्राहलय , डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र आणि मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र हे तिन्ही प्रकल्प एकाच मुख्य रस्त्यावर असावे असे यापूर्वी ठरले होते. या सर्व बाबींचा विचार करून मा. महापौर यांनी निर्णय घ्यावा व सदरील काम केव्हा सुरू होईल याबाबतही निर्णय द्यावा. मजनुहील येथील जागेस विरोध आहे.

**फैय्याज कुरेशी :-** प्रस्तुत प्रस्तावावरून मौलाना अबुल कलाम आझाद सशोधन केंद्र विरोधी पक्षनेता होवू नये असे काहींचे मत असल्याचे दिसते. तेव्हा आमखास मैदानावर सदर संशोधन केंद्र व्हावे. काम केव्हा सुरू होणार त्याबाबतचा निर्णय घ्यावा. मजनुहिल येथील जागेस विरोध आहे.

**श्री.अविनाश कुमावत :-** सभागृहनेता मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र मजनूहील येथे उभारावे असा प्रस्ताव आहे. त्याप्रमाणे निर्णय घ्यावा.

**मा.महापौर :-** विषय क्र. ३ वर सभागृहात बरीच चर्चा झाली आहे. विषय क्र.३ मंजूर करण्यात येतो. येत्या आठ दिवसांत कामाला सुरूवात होईल.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे थोर स्वातंत्र सैनिक मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या कार्याची नवीन पिढील ओळख व्हावी या हेतूने दिनांक १४-४-९८ च्या बैठकीतील निर्णयानुसार वास्तुशास्त्रज्ञ यांनी दाखल केलेल्या तुलनात्मक तक्त्यातील बाबींचा विचार करता मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र व त्या अंतर्गत प्लॅनेटेरियम ऐवजी सुमारे ३५० ते ४०८ नागरिक सामावतील असा सर्व सोयींनी युक्त असा आधुनिक मिटींग हॉल व वाचनालय मजनूहिल येथे उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या वास्तूचे कामाकरीता वास्तुशास्त्रज्ञासंबंधी प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८/४ :-**

महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १६-१२-९७ चे विषय क्र.१४७/११ नुसार प्रभाग क्र.४६ पैठणगेट या प्रभागातील सादिया चित्रपटगृहाच्या मागे महानगरपालिकेने बांधलेल्या व्यापारी संकुलाच्या पहिल्या मजल्यावर कम्युनिटी हॉल बांधण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करणेत आला असता या प्रकरणात सहा. संचालक नगर रचना यांनी पाहणी करून अहवाल सादर करण्याचा निर्णय झालेला आहे.

सहा. संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा.क्र.मनपा/नरवि /१६३८/९८ दिनांक २-६-९८ अन्वये अहवाल सादर केला की, सादिया सिनेमामागे औरंगाबाद महानगरपालिका कडून व्यापारी संकुलन बांधण्यात आले आहे. त्या अस्तीत्वातील तळमजल्यावरील देय चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) मर्यादित पहिल्या मजल्याकरिता कम्युनिटी हॉल बांधणे व त्याचा सामाजिक सांस्कृतिक तथा तत्सम वाणिज्य वापर करण्यास हरकत नाही.

तरी सादिया चित्रपट गृहाच्या मागील बाजूस महानगरपालिकेचे व्यापारी संकुलाच्या पहिल्या मजल्यावर कम्युनिटी हॉल बांधणेचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

**सौ लता दलाल :-**प्रस्तुत कोणत्या विभागाकडून ठेवण्यात आला खुलासा व्हावा. त्यानंतर या विषयावर चर्चा करावी.

यावेळी स.सभासद श्री.अब्दुल रउफ यांनी मा.महापौर यांचे समोर (डायससमोर) येवून विषय पत्रिका फाडली.

(वेळ अंदाजे १३.१० वाजता.)

स.सभासद श्री.अब्दुल रउफ यांनी सभागृहात विषय पत्रिका फाडली आहे. हे कृत्य सभागृहाचे नियमा विरूध्द असल्याने स. सभासद श्री. अब्दुल रउफ यांचे एक दिवसांचे सभासदत्व रद्य करण्यांत येते. अशाी घोषणा मा. महापौर यांनी केली. आणि आजची सभा ००.१० मिनिटे तहकूब करण्यांत येते असे जाहिर केले.

तहकूब करण्यांत आलेली सभा १४.२० वाजता पुंन्हा सुरू झाली.

**मा.महापौर :-** नगर सचिव यांनी प्रस्तुत प्रस्तावा बाबत खुलासा करावा.

**नगर सचिव :-** सर्वसाधारण सभा ठराव क्र.१४७/११ नुसार सादिया टॉकीज दुकानाच्यावर कम्युनिटी हॉल बांधण्याबाबत सहाय्यक संचालक नगर रचना यांनी अहवाल द्यावा असा ठराव झाला आहे.

त्यावर सहा.संचालक नगर रचना यांनी जो खुलासा दिला तो खुलासा मा. महापौर यांचे मंजूरीने सभागृहापुढे ठेवले ( खुलासा वाचून दाखविला)

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :-** सादिया टॉकीजच्या दुकानावर जागा आहे तर प्रशासनाने कार्यवाही करण्याची गरज आहे.

**सौ.लता दलाल :-** कोणत्या विभागाकडून सदर प्रस्ताव आला याचा खुलासा करण्यांत यावा.

**श्री.अब्दुल रशिद खान (मामू) :-** सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार सहाय्यक संचालक नगर रचना यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवाल सभागृहापुढे ठेवण्याचा अधिकार नगर सचिव यांना आहे त्यांनी त्याप्रमाणे ठराव ठेवला आहे.

**श्री.संजय जोशी :-** सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार शहर अभियंता / सहा. संचालक नगर रचना यांच्याकडून प्रस्ताव का आला नाही . नगर सचिवांना काय गरज होती.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री.अब्दुल रशिद खान (मामू) :-** सभागृहाची दिशाभूल करू नका. सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार पस्ताव ठेवला आहे. या ठरावानुसार सहाय्यक संचालक यांनी हा प्रस्ताव मा. आयुक्तांकडे का सादर केला नाही याची चौकशी व्हावी अशी मागणी करीत आहेत.

**मा.महापौर :-** या बाबतची चौकशी करण्यांत येईल . सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत येतो.

**ठराव :-**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यांत येतो सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ९/५२ :-**

उप आयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.एन.बी.गिते, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास योजना जालना यांची प्रतिनियुक्ती नगर विकास विभाग यांचे संमतीने, ग्रामीण विकास व जल संधारण विभाग यांचें शासन निर्णय क्रमांक मविसे १०९८/प्र.क्र.२६९०/ १० दिनांक १५ एप्रिल ९८ अन्वये उप आयुक्त या पदावर सोबतच्या अटी व शर्ती प्रमाणे ते सदर पदाचा पदभार स्विकारतील त्या दिनांकापासून तीन वर्षासाठी केली आहे.

डॉ.एन.बी.गिते हे उप आयुक्त या पदावर दिनांक १७-४-९८ रोजी माध्यान्हांतर रूजू झाले आहेत. त्यांच्या सेवेची महानगरपालिकेस गरज आहे

करिता डॉ.एन.बी.गिते, उप आयुक्त यांची दिनांक १७-४-९८ पासून तीन वर्षासाठी औरंगाबाद महानगरपिालका येथे शासनाने केलेल्या प्रतिनियुक्ती वरील कालावधीस सोबतच्या अटी व शर्ती नुसार मंजुरी देण्याबाबत ठराव विचारार्थ सादर.

शासकीय कर्मचाऱ्यांची स्वियेत्तर सेवेत बदली करण्या संबंधीतातील प्रमाणे अटी व शर्ती

**टिप :**

या अटीमध्ये जेथे जेथे **"शासकीय कर्मचारी"** असा शब्द प्रयोग करण्यांत आला असेल तेथे तेथे या अटी लागू करतांना शासकीय कर्मचाऱ्यांचे नांव नमूद करण्यांत यावे.

सांविधिक महामंडळे, स्वायत्त संस्थाधरून स्वायतर सेवेत शासकीय कर्मचाऱ्यांची बदली करण्यांच्या प्रमाण , अटी आणि शर्ती पुढील प्रमाणे आहेत. असा विहित केलेल्या अटी व शर्ती यांच्या बाबतीत कोणतीहीविचलन अनुज्ञेय असणार नाही.

**१ प्रतिनियुक्तीचा कालावधी :-**

शासकीय कर्मचारी ज्या तारखेला शासकीय सेवेतील पदाचा कार्यभार सूपूर्द करील त्या तारखेपासून स्वायेत्तर सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला तो आपल्या पदाचा कार्यभार पुन्हा स्विकारील त्या तारखेला समाप्त होईल.

प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी शासकीय कर्मचारी प्रतिनियुक्तीवर राहील परंतू...

**(एक)** जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर, प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्याला परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन / समक्ष प्राधिकार राखून ठेवील.

**(दोन)** जर त्यांची सेवा स्वायेत्तर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर, त्याल मुळ विभागाकडे परत पाठवण्याची मुभा स्वायेत्तर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठवण्यापूर्वी स्वायेंत्तर नियोक्त्याने शासनाला / सक्षम प्रधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे.

आणि

**(तीन)** त्याने मुळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्येश आहे अशी कमीतकमी तीन महिन्याची लेखी नोटीस शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्या नंतर त्याला मुळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

**२ वेतन :-**

शासकीय कर्मचाऱ्याला स्वायेत्तर सेवेत असतांना सर्वसाधारण नियमानुसार प्रतिनियुक्तीच्या पदाचे वेतन निश्चित करवून घेणेकिंवा जर त्यांची स्वीयेत्तर सेवेत प्रतिनयुिक्ती झाली नसतीतर त्याच्या प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी त्याने जे पद धारण केले हाते त्या पदाकरिता विहित केलेल्या रू.२२००-७५-२८०० द.से.१००-४००० या वेतनमानात मूळ विभागामध्ये जे वेतन घेतले असते ते वेतन अधिक शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक स्वियेत्तसे १०८८/प्र.क्र.१०९३/सेवा-२ , दिनांक ८ जुलै १९९० च्या अनुषंगाने देय असणारा प्रतिनियुक्ती भत्ता घेणे यापैकी कोणताही पर्याय स्विकारता येईल. प्रतिनियुक्ती भत्याचा हिशोब करतांना मुळ विभागात वेतनमान ऐवजी मंजूर केलेले विशेष वेतन विचारात होता येईल.

**३ महागाई भत्ता**

शासकीय कर्मचारी राज्य शासनाकडील आपले वेतनमान कायम ठेवील किंवा स्वायंत्तेर सेवेतील पदाशी संलग्न असणाऱ्या वेतनमानात वेतन घेईल याप्रमाणे त्याला राज्य शासनाकडील किंवउ स्वीयेत्तर नियोक्त्याकडील नियमानुसार अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

**४ घरभाडे भत्ता / स्थानिक पूरक भत्ता**

शासकीय कर्मचाऱ्याला राज्य शासनाच्या नियमानुसार वेळोवेळी अनुज्ञेय असेल त्याप्रमाणे घरभाडे भत्ता/ स्थानिक पुरक भत्ता मिळण्याचा हक्क असेल पण स्वायेत्तर नियोक्ता स्वेच्छा निर्णयानुसार स्वीयेत्तर सेवेच्या नियमान्वये हे भत्ते मंजूर करू शकेल.

**५ पदग्रहण अवधी वेतन आणि बदली प्रवास भत्ता :-**

स्वियेत्तर सेवेत बदली झाल्यानंतर आणि तेथून परत आल्यानंतर अशा दोन्ही वेळच्या पदग्रहण अवधीमध्ये त्याचे वेतन व प्रवास भत्ता, राज्य शासनाच्या संबंधीत नियमानुसार स्वीयेत्तर नियोक्तयाकडून देण्यांत येईल.

६ **प्रतिनियुक्त्ीच्या कालावधीत कर्त्यव्यार्थ केलेल्या प्रवासा करिता प्रवास भत्ता :-**

शासकीय कर्मचाऱ्याला स्वायत्तेर सेवेत रूजू झाल्या नंतर कराव्या लागणाऱ्या प्रवासाकरीता राज्य शासनाच्या संबंधित नियमान्वये किंवा स्वीयेत्तर नियोक्त्यांच्या नियमान्वये प्रवासभत्ता आणि दैनिक भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

७. **रजा :-**

अशा बदलीपूर्वी शासकीय कर्मचाऱ्याला लागू केलेले रजेचे नियम बदली नंतरही त्याला लागू होत राहतील. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ च्या नियम १८(२)मध्ये दिलेल्या कार्यपध्दतीचा कोटेकोरपणे अवलंब करण्यांत यावा.स्वीयेत्तर सेवेतून मुक्त झाल्यानंतर त्यांनी परस्पर रजेवर जाण्यास स्वीयेत्तर नियोक्त्याने परवानगी देता कामा नये. म्हणजे प्रथम शासकीय सेवेत रूजू होवून मुळ विभागातील सक्षम प्राधिकाऱ्याकडून नेहमीच्या पध्दतीने त्याने आपली रजा मंजूर करून घेतली पाहिजे.

८ स्वीयेत्तर सेवेच्या दरम्यान किंवा अखेरीस घेतलेल्या रजेच्या कालावधी बद्यल द्यावयाच्या कोणत्याही पुरक भत्त्याच्या संबंधातील संपूर्ण खर्च स्वीयेत्तर नियोक्त्याला सोवावा लागेल.

९ स्वीयेत्तर सेवेत असतांना किंवा अशा सेवेच्या अखेरीस महिला शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, तिने घेतलेल्या प्रसूति रजेच्या कालावधीबद्यल द्यावयाच्या रजा वेतनाचा खर्च स्वीयेत्तन नियोक्त्याला सोसावा लागेल.

(जेव्हा जेव्हा महिला शासकीय कर्मचाऱ्यांची स्वीयेत्तर सेवेची प्रतिनियुक्ती करावयाची असेल तेव्हा तेव्हा अर्थाची विशिष्ट अट समाविष्ट करण्यांत यावी.)

१० **विकलांगता रजेबद्यल रजा वेतन**

स्वीयेत्तर सेवेत किंवा अशा सेवेमुळे आलेल्या विकलांगतेबद्यल मंजुर करता येईल अशा रजेच्या संबंधात अशी विकलांगता स्वीयेत्तर सेवा संपल्या नंतर उघडकीस आली तर सुध्दा रजा वेतन देण्यांत स्वीयेत्तर नियौक्त जबाबदार असेल. अशा रजा वेतनाचा खर्च स्वीयेत्तर नियोक्त्या करून वसूल करण्यांत येईल.

११ **रजा वेतन आणि निवृत्ती वेतन अंशदाने**

**(ए)** परिशिष्ट चार मध्ये विहित केलेल्या दरानुसार स्वीयेत्तर नियोक्त्याकडून रजा वेतन आणि निवृत्ती वेतन अंशदाने देण्यांत येतील.

**ब)** स्वीयेत्तर नियोक्ता, प्रत्येक वित्तीय वर्षा अखेरीपासून पंधरा दिवसांच्या आंत किंवा वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी स्वीयेत्तर सेवतेतील प्रतिनियुक्ती समाप्त होत असेल तर स्वीयेत्तर सेवेच्या अखेरीस पुढील दरांनी वार्षिक रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदाने येईल.

**एक)** रजा वेतन अंशदान-----------------दरमहा------------------रूपये

**दोन)** निवृत्तीवेतन अंशदान---------------दरमहा------------------रूपये अंशदानाच्या रकमा पुढील लेखशिर्षाखाली जमा कराव्यात.

**एक)** रजा वेतन अंशदान - X (योग्य ते अर्थसंकल्पीय शिर्ष नमूद करावे.)

X (ज्या सेवा लेखाशिर्षाखाली अधिकाऱ्यांचे वेतन खर्ची टाकले जाते त्या सेवा लेखाशिर्षाला अनुरूप असे जमा शिर्ष येथे नमूद करावे किंवा जेव्हा त्या प्रधान शिर्षाशी अनुरूप असे कोणतेही जमा शिर्ष नसेल तेव्हा "००७० इतर प्रशासकीय

सेवा ६० इतर सेवा (८००)इतर जमा रकमा (नउ रजा वेतन अंशदाने हे शिर्ष नमूद करावे.)

**दोन)** निवृत्तीवेतन अंशदान : ००७१ निवृत्तीवेतन व इतर सेवा निवृत्ती लाभ यांच्या वसूली संबंधातील अशंदाने व वसूलीच्या रकमा ०१-नागरी १०१ अभिदाने व अशंदाने (एक) स्वीयेत्तर सेवेतील अधिकारी"

**सी)** स्वीयेत्तर सेवेतील, शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, रजा वेतनाची किंवा निवृत्तीवेतनाची देय असणारी अंशदाने पूर्वावत कालावधीत दिली गेली नाहीत तर शासनाने स्पष्टपणे सूट दिलेली नसल्यास, स्ीयेत्तर नियोक्ता हा उदत्त अंशदानाच्या रकमेवर, म्हणजेच पूर्वावत कालावधी संपण्याच्या तारखेपासून अंशदाने अंतिमरित्या दिल्याच्या तारखेपर्यंत देय होणाऱ्या रक्कमेवर दर दिवशी प्रत्येकी १०० रूपयास दोन पैसे या दराने शासनाला व्याज देईल. शासकीय कर्मचारी किंवा स्वीयेत्तर नियोक्ता यापैकी ज्याने अंशदाने भरले असेल तो व्याज देईल.

**ड)** रजा वेतन अंशदाने अणि निवृत्तीवेतन अंशदाने निरनिराळया लेखशिर्षाकडे जमा केली जात असल्यामुळे ती वेगवेगळी भरावीत आणि कोणत्याही बाबी दाखल शासनाकडून वसूल करावयाच्या येणे रक्माची अशा अंशदानामधून वजावट करण्यांत येवू नये.

**१२ रजा मुदती प्रवास सवलत :-**

या विषयावरील राज्य शासनाच्या संबंधित नियमान्वये शासकीय कर्मचाऱ्यांला रजामुदती प्रवास सवलत मिळण्याचा हक्क असेल , या संबंधातील खर्च स्वीयेत्तर नियोक्त्याला सोसावा लागेल.

**१३ रजेचे रोखीकरण :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम ,१९८१ च्या नियम ७३ अन्वये अनुज्ञेय असलेल्या अर्जित रजेच्या रोखीकरणचा लाभ घेण्याचा हक्क शासकीय कर्मचाऱ्यांला असेल, रजा वेतनावर प्रदेय असणाऱ्या पुरक भत्त्याचा व महागाई भत्त्याचा खर्च स्वीयेत्तर नियोक्त्याला सोसावा लागेल.

**१४ वैद्यकीय सवलती :-**

शासकीय कर्मचाऱ्याला महाराष्ट्र नागरी सेवा (वैद्यकीय उपचार) नियम १९६१ अनुसार अनुज्ञेय असणाऱ्या वैद्यकीय सुविधापेक्षा कमी प्रतीच्या नसतील अशा सुविधा मिळवण्याचा हक्क असेल आणि त्या वरील खर्च स्वीयेत्तर नियोक्त्याला सोसावा लागेल.

**१५ सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची वर्गणी :-**

शासकीय कर्मचारी विहीत नियमानुसार ज्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची वर्गणीदार असेल त्यास निधीला वर्गणी देणे चालू ठेवील.

**१६ विभागीय चौकशी :-**

जर शासकीय कर्मचाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशी सुरू करावयाची असेल तर त्याला त्याच्या मुळ विभागकडे परत पाठविण्यांत येईल. शासन त्याला निर्वाह भत्ता देईल पण तो स्वीयेत्तर नियोक्त्याकडून वसूल करण्यांत येईल.

**१७ बोनस / सानुग्रह प्रदान :-**

**ए)** दरमहा जास्तीत जास्त रू.२५००/- वेतन घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याला बोनस प्रदान अधिनियम १९६५ अन्वये ज्यांनी कायदेशिररित्या बोनस देणे आवश्यक आहे, त्या सार्वजनिक उपक्रमांमध्ये तो तात्पुरत्या बदलीवर असेल तेव्हा अशा उपक्रमांनी घोषित केलेल्या बोनस स्वीकारण्याची परवानगी देण्यांत येईल.

**बी)** बोनस किंवा सानुग्रह प्रदान जाहिर करणाऱ्या सार्वजनिक उपक्रमांमध्ये (त्यांच्यावर बोनस देण्याचे कायदेशिर बंधन नसेल तरीही) तात्पुरती बदली करण्यांत आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना, अशा उपक्रमांनी जाहिर केलेले सानुग्रह प्रदान स्वीकरण्यांत परवानगी देता येईल.

**टिप :-**

**(१)** वरील (ए) मध्ये "वेतन" याचा अर्थ बोनस प्रदान अधिनियम १९६५ च्या कलम २(२१) मध्ये व्याख्या करण्यांत आल्याप्रमाणे " पगार किंवा मंजुरी "असा असेल व त्यामध्ये वेतन कोणतेही असल्यास विशेष वेतन आणि महागाई भत्ता यांचा समावेश होईल. प्रतिनियुक्ती भत्ता हा " विशेष वेतन " म्हणून वर्गीकृत करण्यांस आल्यामुळे तो देखील हिशोबात घेण्यांत यावा. या प्रयोजनाकरीता शहर पुरक, भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी हिशेबात घेण्यांत येवू नयेत.

**(२)** वरील टिप १ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे दरमहा जास्तीत जास्त रूपये २५००/- इतके वेतन घेणाऱ्या प्रतिनियुक्ती शासकीय कर्मचाऱ्यांनाच केवळ असे सानुग्रह प्रदान स्वीकारण्याची परवानगी देण्यांत येईल.

**(३)** शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा रू.१६००/- पेक्षा अधिक असेल तेव्हा , सदर वेतन दरमहा रू.१६००/- आहे. असे मानून सानुग्रह प्रदान किंवा यथास्थिती बोनस यांची गणना करण्यांत येईल. अशा उपक्रमांमध्ये प्रतिनियुक्तीवर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यांत येणाऱ्या सानुग्रह प्रदानाची किंवा बोनसची जास्तीत जास्त रक्कम ,कायद्याने प्रदेय असलेल्या बोनस प्रमाणे दरमहा रू.१६००/- पेक्षा अधिक नसलेल्या वेतनाच्या २० टक्क्यापर्यंत मर्यादित असावी.

**१८ प्रपत्र बढती :-**

शासकीय कर्मचारी प्रतिनियुक्तीवर असतांना त्याची मुळ विभागात बढती होण्याची वेळ आली असेल तर सर्वसाधारणपणे त्याची प्रतिनियुक्ती पुढे चालू ठेवू नये तथापी जर सक्षम प्राधिकाऱ्याने त्याची प्रतिनियुक्ती पुढे चालू ठेवली तर, त्याला प्रतिनियुक्ती भत्ता न देता निकट निम्नता नियमाचा लाभ सहा महिन्यांनंतर अनुज्ञेय असणार नाही.

**१९ कायमचे समावेश :-**

जर मागाहून हया शासकीय कर्मचाऱ्यांची सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या स्वायत्त मंडळाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवामध्ये समावून घेतले जाण्याची इच्छा असेल तर तो सामावून घेतला जाईल त्या तारखेस, शासकीय सेवेतून निवृत्त झाल्याचे मानले जाईल.

**२० राज्य गट विमा योजने अंतर्गत वर्गणी :-**

शासकीय कर्मचारी विहित नियमानुसार राज्य गट विमा योजने अंतर्गतची वर्गणी सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत लेखाशिर्ष "८०८१ विमा व निवृत्तीवेतन निधी १०६ इतर विमा व निवृत्ती वेतन निधी -१ महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची गट विमा योजना " मध्ये जमा केली जाईल.

**संवाद :**

**मा.महापौर :-** प्रस्तुत प्रस्तावानुसार एक वर्षाच्या प्रतिनियुक्ती कालावधीसाठी मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय क्र. मविसे९/५ १०९८/प्र.क्र.२६९०/१० दिनांक १५ एप्रिल ९८ अन्वये डॉ.एन.बी.गिते, यांची दिनांक १७-४-१९९८ पासून एक वर्षाचे कालावधीसाठी उप आयुक्त या पदावर शासकीय कर्मचाऱ्यांची स्वियेत्तर सेवेत बदली करण्या संबंधातील प्रमाण अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्ती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०/६:-**

मा. आयुक्त ,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दलित वस्ती सुधारणा योजना समाज कल्याण विभागाकडून राबविण्यांत येत असून, सदरील योजना आता शासनाने नागरी भागातील दलित वस्त्यामध्ये राबविण्याचा निर्णय घेतला आहे. ही योजना ज्या वार्डामध्ये दलित लोकसंख्या ५०% टक्के पेक्षा जास्त आहे अशा वार्डामध्ये राबविण्यांत येत आहे. या योजने अंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या कामासाठी १००% टक्के शासकीय अनुदान अनूज्ञेय राहील.

या योजने अंतर्गत जोड रस्ता तयार करणे, गटारी बांधकाम करणे, समाजमंदिर बांधणे व मोठया स्वरूपाची काम जसे की सा. पाणी पुरवठा, सार्वजनिक सेप्टीक टँक (सुलभ शौचालय) नाल्याचे शिस्तीकरण (संरक्षित भिंत) इत्यादी कामे करता येतील.

अंदाज पत्रके उप संचालक नगर रचना विभाग यांचे मार्फत शासनास पाठविणे आवश्यक आहे.

सदरील कामे शासनाने मालकीच्या अथवा ताब्यात असलेल्या जमिनीवर घेण्यांत येतील या योजने अंतर्गत निधी हा उप संचालक नगर रचना यांच्या कडे सूपूर्द करण्यांत येईल व सदरील निधी मनपाचे संयुक्त खात्यात जमा करण्यांत येवून, होणारा खर्चाचे प्रमाण मा. आयुक्त यांचे स्वाक्षरीने खर्च करण्यांत येईल.

करिता वरील प्रस्ताव शासनास पाठविणे साठी सर्व साधारण सभेची मंजुरी आवश्यक असून सर्वसाधारण सभेच्या मंजुरी नंतर प्रस्ताव शासनास उप संचालक नगर रचना विभाग यांचे मार्फत पाठविण्यांत येतील.करिता सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे कामे हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

दलित वस्ती सुधारण योजना अंतर्गत हाती घ्यावयाच्या कामाची यादी.

| अ.क्र. | वार्ड क्र. | कामाचे नांव | अ.प.रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २७ | मो.शताब्दीनगर येथे उंच टेकडी कटींग करून लेव्हल करणे, खडी रस्ता तयार करणे, तसेच दगडीभिंत बांधणे व खांडकी बसविणे बाबत. | २६,०६,०००.०० |
| २ | २७ | मो.शताब्दीनगर येथे शहाबादी फरशी बसविणे व सिमेंट कॉक्रीट रोड तयार करणे | ७,६०,०००.०० |
| ३ | १ | मो.भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथे खडी रस्ते व डांबरी रस्ते तयार करणे | १०,२९,८००.०० |
| ४ | १ | मो.भिमनगर,भावसिंगपूरा स्लम येथे फुटपाथ व ब्रिज बांधणे | १,७५,०००.०० |
| ५ | ६ | मो.घाटी स्लम येथे सिमेंट रोड तयार करणे | १,५०,०००.०० |
| ६ | ११ | मो.हर्सूल स्लम भागात शहाबादी फरशी बसविणे | ४,००,०००.०० |
| ७ | ११ | मो.हर्सूल स्लम येथे पश्चिमेस असलेल्या नदीस पूर नियंत्रण भिंत बांधणे | २०,००,०००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | ११ | मो.हर्सूल फुलेनगर येथे समाजमंदिर बांधणे | ३,००,०००.०० |
| ९ | ११ | मो.हर्सूल फुलेनगर येथे पुर्वेस असलेल्यानदीस पूर नियंत्रण भिंत बांधणे | ५,५५,०००.०० |
| १० | ११ | मो.चेतनानगर भागात डांबरी रस्ते तयार करणे | ५,००,०००.०० |
| ११ | ११ | मो.हर्सूल स्लम येथे सांगळे गल्लीत रस्ता रूंदीकरण करणे | ५०,०००.०० |
| १२ | ३७ | मो.तक्षशिलानगर स्लम येथे डांबरी रस्ता तयार करणे | ४,००,०००.०० |
| १३ | ३७ | मो.तक्षशिलानगर स्लम येथे शहाबादी फरशी बसविणे | ३,५०,०००.०० |
| १४ | ४८ | मो.गौतमनगर स्लम येथे सिमेंट रोड तयार करणे | १,००,०००.०० |
| १५ | ८२ | मो.चिकलठाणा येथे पुष्पक गार्डन ते बौध्दवाडा मागे चिकलठाणा नदी पर्यंत दगडी गटार बांधणे | २५,००,०००.०० |
| १६ | ८२ | मो.चिकलठाणा चौधरी कॉलनी पासून ते पूलापर्यंत पिंचींग करणे | ६२,००,०००.०० |
| १७ | ८० | मो.संजयनगर मुकुंदवाडी येथील रोहीदासनगर पासून ते रामनगर पर्यंतदगडी गटार बांधणे | ९,४२,०००.०० |
| १८ | | मो.दलित लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त असलेल्या वस्ती मध्ये विज पूरवठा करणे व फिचर्स इत्यादी बसविणे बाबत. | ८३,४७,०००.०० |
| | | एकूण रूपये | २,७३,७१,८००.०० |

**संवाद**

**श्री.संजय जोशी :-**वॉर्ड क्र.५८ मधील संसारनगर ,पंचशिलानगर या भागाचा प्रस्तूत प्रस्तावात समावेश करण्यांत यावा.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :-** वार्ड क्र.६७ मधील भिमनगर भागाचा प्रस्तुत प्रस्तावात समावेश करण्यांत यावा.

**सौ.मंदा काळूसे :-** वार्ड क्र.७८ लोकशाहीर कॉलनी ,संतोषीमातानगर या भागाचा प्रस्तुत प्रस्तावात समावेश करण्यांत यावा.

**श्री.जयवंत ओक :-** संपूर्ण शहरात ज्या वसाहतीत ५०% दलित वस्ती आहे अशा संपूर्ण वसाहतीचा प्रस्तुत प्रस्तावात समावेश करण्यांत यावा. या कामी संबंधित अधिकाऱ्याकडून आर्थिक तरतुदी बाबत खुलासा घेण्यात यावा. त्यानुसार निर्णय घेणे सोयीचे होईल. ज्या वसाहतीचा प्रस्तुत प्रस्तावात समावेश करावयाचा आहे त्याबाबतचे पत्र देण्यांत येत आहे.

**कार्यकारी अभियंता (स्लम) :-** सभागृहाचे चर्चेनुसार ज्या वसाहती ५०% पेक्षा जास्त दलित वसाहत आहे अशा वसाहतीत काम घ्यावयाचे आहे यासाठी आवश्यक फंड येण्यास विलंब लागेल सोबत जी कामे घ्यावयाची आहेत त्याची यादी दिली आहे.

**श्री.व्ही व्ही देशमुख :-** दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करावयाच्या कामाचा सर्वे करून ज्या दलित वस्त्यांत काम करणे आवश्यक आहे त्याची पाहणी करावी व वार्ड क्र.३०व ३१ मधील वस्त्यांचा त्यात समावेश झाला पाहिजे.

**मा.महापौर :-** दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत ५०% दलित वस्ती असलेल्या वसाहतीत ही कामे करण्यांत यावीत.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत हाती घ्यावयाच्या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ.क्र.१ ते १८ च्या कामासाठी रक्कम रू. २,७३,७१,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

तसेच शहरातील ज्या वसाहतीमध्ये ५०% दलित वसाहती आहे अशा सर्व वसाहतीमध्ये दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत कामे हाती घेण्यात यावीत असे सर्वानुमते ठरले .

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ११/०१ :**

मा.उप आयुक्त (प्रशासन) हयानी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या सिध्दार्थ जलतरण तलावावर मागील तीन ते चार वर्षापासून विविध संवर्गात ठराविक वेतनावर कर्मचारी कार्यरत आहेत. सदर ठिकाण कायम स्परूपी कर्मचारी आवश्यक आहे. सदरील पदे ही महानगरपालिका आस्थापनेवर मंजूर नाहीत पदासमोर ती ती पदे भरणे का आवश्यक आहेत याचा खुलासा करण्यांत आलेला आहे.

**व्यवस्थापक (वेतनश्रेणी रू.१६००-२६६०) :-**

१ पद तलावावरची सर्व व्यवस्थापकीय कामे पहाणे इतर कर्मचाऱ्यांकडून त्यांचे सोपविलेले कामे व्यवस्थितरित्या करून घेणे.

**जलनिर्देशक (कोच) : (वेतनश्रेणी रू.१४००-२३००)**

१ पद व्यवस्थापक गैरहजेरीत तलावाची संपूर्ण जबाबदारीची संपूर्ण कामे साभांळणे , लाईफ गार्ड यांच्या कार्यावर लक्ष देणे, जलतरण प्रशिक्षण व्यवस्थितरित्या करून घेणे. व्यवस्थापकाने सांगितलेली सर्व कामे सांभाळणे

**सहा. जलनिर्देशक (पुरूष/महीला) (वेतनश्रेणी रू.१२००-२०४०)**

२ पदे सभासदांना प्रशिक्षण देणे लाईफ गार्ड गैरहजर अथवा रजेवर असतांना सांभाळणे, व्यवस्थापक यांचे मार्गदर्शनाप्रमाणे तलावावर काम करणे, महिला सभासदांना लहान मुलामुलींना प्रशिक्षण देणे.

**प्लॅन्ट ऑपरेटर (वेतनश्रेणी रू.१४००-२३००) :-**

२ पदे तलावावरील फिल्टरची संपूर्ण जबाबदारी सांभाळणे गरज भासल्यास व्यवस्थपनाच्या इतर कामात मदत करणे.

**लाईफ गार्ड (जिवरक्षक) (वेतनश्रेणी रू.९५०-१४००) :-**

३ पदे पोहण्याच्या वेळामध्ये तलावावर कार्यदक्ष राहणे. बुडणाऱ्या सभासदांना वाचवणे, गरज भासल्यास सहाय्यक प्रशिक्षक यांना सभासदांना पोहण्यास शिकविणे.

**विद्युत लाईनमन (वेतनश्रेणी रू.९५०-१४००) :-**

१ पद तलावाच्या परिसरातील सर्व विद्युत उपकरणाची जबाबदारी सांभाळणे व देखभाल वेळेवर करणे.

**लिपीक (वेतनश्रेणी रू.९५०-१५००)**

१ पद सभासदांचे सभासदत्व करून घेणे ओळखपत्र तयार करणे व वाटप करणे, सभासद शुल्क वेळेवर कार्यालयात भरणा करणे, त्याचा हिशोब ठेवणे व कार्यालयात कामे पहाणे.

**स्विपर (वेतनश्रेणी रू.८२५-१२००) :-**

२ पद तलावाच्या तळाची व भिंतीची सक्श्यन ब्रशने रोज साफसफाई करणे, गर्दीच्यावेळीव्यवस्थपनास मदत करणे.

**साईड ब्रशर (वेतनश्रेणी रू.८२५-१२००) :-**

४ पदे तलावाच्या उभ्या भिंतीची सफाई रोज करणे, ब्लिचिंग कालवणे तसेच वेळ पडल्यास सक्शन स्विपरला मदत करणे. तलावाच्या परिसरातील साफसफाई कामे करणे.

पुरुष/स्त्री मजुर, शिपाई, वॉचमन,स्वीपर, माळी हे कर्मचारी आवश्यकते प्रमाणे कार्यालयामार्फत करून देण्यांत येतील.

सिध्दार्थ जलतरण तलाव कार्यरत झाले पासून म्हणजेच दिनांक १-६-१९९४ ते ३१-३-१९९८ या कालावधीत रू.३३,३२,६०/- चे उत्पन्न झालेले आहे. सन १९९७-९८ मध्ये ८,८१,८०५./- सभासदांकडून वर्गणी पोटी प्राप्त झालेले आहे.

उक्त पदे मनपाच्या आस्थापनेवर निर्माण केल्यास रू.७,७७,९०७/- लक्षचा अतिरिक्त खर्च महापालिकेवर पडेल.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजूरी देण्याकरीता सादर. तसेच सदर पदांना मान्यता मिळाल्यानंतर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत येईल.

मान्यतेस्तव सादर.

**संवाद**

**मा.महापौर :-** मंजुर - यात स्विपर पदाचा समावेश करण्यांत यावा.

**टराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या सिध्दार्थ जलतरण तलावासाठी आवश्यक असलेली खालीलपदे निर्माण करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | रू.१६००-२६६० | एक |
| २ | जलनिर्देशक (कोच) | रू.१४००-२३०० | एक |
| ३ | सहा जलनिर्देशक (पुरूष/महिला) | रू.१२००-२०४० | दोन |
| ४ | प्लॅन्ट ऑपरेटर | रू.१४००-२३०० | दोन |
| ५ | लाईफ गार्ड (जिवरक्षक) | रू.९५०-१४०० | तीन |
| ६ | विद्युत लाईनमन | रू.९५०-१४०० | एक |
| ७ | लिपीक | रू.९५०-१४०० | एक |
| ८ | सक्शन स्विपर | रू.८२५-१२०० | दोन |
| ९ | साईड ब्रशर | रू.८२५-१२०० | चार |
| १० | स्वीपर | | एक |

नियमाप्रमाणे शासनाची मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यांत यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर नविन विभागाची निर्मिती झाली . शहराचा विकास मोठया प्रमाणावर झाला. परंतू त्या प्रमाणात वर्ग -४ च्या कर्मचारी वर्गाचे पदाची निर्मिती झाली नाही. त्यामुळे शहराच्या साफ सफाई वर परिणाम झाला. त्यामुळे पर्यायाने साफसफाईसाठी व इतर कामासाठी दैनिक वेतनावर वर्ग -४ चे कर्मचारी नियुक्त करणे भाग पडले. नविन विभाग निर्माण झाल्यामुळे व शहराचा विस्तार मोठया प्रमाणावर झाल्यामुळे प्रमाणकानुसार खालील वर्ग -४ ची पदे निर्माण करणे आवश्यक आहे. खालील विभाग निहाय पदे फक्त विद्यूत विभागासाठी लाईनमनची पदे असून , इतर विभागासाठी वर्ग -४ ची पदे आहेत.

| अ.क्र. | आवश्यकता असलेल्या विभागाचे नांव | पदांची संख्या | पदांची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | सर्व विभागीय कार्यालये (१ ते ६) | | |
| | स्त्री मजूर | २६३ | ७५०-९४० |
| | पुरूष मजूर | ३२३ | ७५०-९४० |
| | स्वीपर | २९ | ७५०-९४० |
| २ | मुख्य कार्यालय | २६ | ७५०-९४० |
| ३ | शिक्षण विभाग | १५ | ७५०-९४० |
| ४ | आरोग्य विभाग | १२ | ७५०-९४० |
| ५ | मलेरिया विभाग | ४९ | ७५०-९४० |
| ६ | उद्यान विभाग | ५७ | ७५०-९४० |
| ७ | पशुधन विकास विभाग | ५७ | ७५०-९४० |
| ८ | सुरक्षा विभाग | १३ | ७५०-९४० |
| ९ | विद्युत विभाग (लाईनमन) | २२ | ९५०-१४०० |
| १० | पाणी पुरवठा-१ | ५५ | ७५०-९४० |
| ११ | पाणी पुरवठा-२ | ५० | ७५०-९४० |
| १२ | यांत्रिकी विभाग | ३१ | ७५०-९४० |
| १३ | जकात विभाग | १७ | ७५०-९४० |
| १४ | प्रकल्प विभाग | ०५ | ७५०-९४० |
| १५ | झोन क्र.७ (पाणीपट्टी वसूली) | २५ | ७५०-९४० |
| १६ | बांधकाम विभाग | १२ | ७५०-९४० |
| १७ | प्रशासकीय विभाग | १८ | ७५०-९४० |
| १८ | गरवारे क्रिडा संकुल | १२ | ७५०-९४० |
| | एकूण | १०९१ | |

करिता वरीलप्रमाणे पदासमोर दर्शविलेल्या वेतनश्रेणीत पक्षनिर्मिती प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर नवीन विभागाची निर्मिती आधि शहरात विस्तार मोठया प्रमाणावर झाल्यामुळे प्रमाणकानुसार प्रस्तावात दर्शविलेली अ.क्र.१ ते १८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वर्ग ४ ची पदे निर्माण करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र. १३/१ :-**

प्रस्तावात सादर करण्यात येतो की, जिन्सी मार्केट वार्डातून निजामगंज कॉलनी ते खासगेट कडे जाणाऱ्या सि.स.नं.९२३३/४ मधील रस्त्यासाठी जागा भू-संपादित करुन रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करुन घेऊन जनतेला जवळच्या मार्ग उपलब्ध करुन द्यावा. या दृष्टीने मनपाने संबंधित जमीन मालकास बोलणी करुन सातत्याने भेडसावत असलेल्या प्रश्नांची उकल करावी. अशी सभागृहाला विनंती करीत आहे.

**सुचक :-** वसंत विनायक देशमुख
**अनुमोदक :-** किशोर तुळशीबागवाले

**ठराव १३/१:-**

प्रस्तुत प्रस्तावाचे अनुमोदक सभागृहात उपस्थित नसल्याने सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१४/२ :-**

वरील विषयी विनंती करुन आपले लक्ष वेधण्यात येते की, जिन्सी प्राथमिक शाळेसाठी सद्याची असलेली इमारत ही रस्ता विस्तारीकरणात बांधित होत आहे. सदर इमारतीच्या पुर्व बाजुस असलेली मार्केट वार्डातील कृषिउत्पन्न बाजार समितीच्या अखत्यारित असलेली जागा भूसंपादित करुन सदर जागेवर अद्यावत इमारत शालेय कामी उभी करावी यासाठी तातडीने जागा घेणे आवश्यक आहे कारण-

अ) भविष्यात अशा प्रकारची जागा मिळणे अशक्य होणार आहे.

ब) सध्याच्या इमारतीत सुध्दा प्रशस्त खेळाचे मैदान उपलब्ध नाही. ही जागा पुढे अन्य कामी विक्री झाल्यास मनपाला जागा मिळणे शक्य होणार नाही.

क) या शाळेच्या सभोवतालचा रो-हौसिंग सोसायटी टाईप घरकुल त्या राहणारे कामकरी, हमाल, मापाडी, खाकेवाले व दारिद्र्य रेषेखझलील लोक काम करतात अशांची मुले शिक्षण घेतात म्हणून एक चांगल्या प्रकारची इमारत साकारण्यासाठी जागा भूसंपादित करावी.

अशी विनंती सर्वसाधारण सभेला करण्यांत येत आहे.

**सुचक :-** श्री.व्ही.व्ही. देशमुख
**अनुमोदक :-** श्री.किशोर तुळशीबागवाले

**ठराव क्र.१४/२ :-**

प्रस्तुत प्रस्तावाचे अनुमोदक सभागृहात उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १५/३ :-**

संजयनगर हा ५० ते ६० हजार लोकसंख्येचा भाग असून या ठिकाणी मनपाची प्राथमिक शाळा नाही. यासाठी या भागातील विद्यार्थ्यांना खाजगी संस्थेमध्ये शिक्षणाशिवाय पर्याय नाही. सदर भागातील कामगार, तळागाळातील जनसामान्याच्या मुलांना शालेय शिक्षण घेण्यासाठी शाळा सुरु करणे आवश्यक आहे. व त्यासाठी इमारत सुध्दा आवश्यक

आहे. या भागातील मध्यवर्ती अशा ठिकाणी गल्ली नं.बी-३ मध्ये इमारती उभारणीसाठी ३ प्लॉट १८०० स्क्वेअर फुटाची जागा भूसंपादित करण्यांत यावी. अशी विनंती आहे.
**सुचक :-** व्ही.व्ही. देशमुख
**अनुमोदक :-** किशोर तुळशीबागवाले

**ठराव क्र. १५/३ :-**

प्रस्तुत प्रस्तावाचे अनुमोदक सभागृहात उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१६/४ :-**

औरंगाबाद महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.एस.बी. झनझन व उप मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.एस.बी.झनझन व उपमुख्य अग्निशमन अधिकारी श्री.के.पी.राऊत यांना चांगल्या प्रकारची सेवा केल्याबद्दल केंद्र शासनातर्फे राष्ट्रपती गौरव पुरस्कार करुन सन्मानीत करण्यात आले आहे. या पुरस्कारामुळे औरंगाबाद महानगरपालिकेचे नांव देशभरात उंचावले आहे. श्री.झनझन व राऊत यांना प्राप्त झालेल्या पुरस्कारात महानगरपालिकेतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात यावे.

ठराव विचारार्थ मंजूरीस्तव सादर.
**सुचक :-** व्ही.व्ही. देशमुख
**अनुमोदक :-** डॉ.भागवत कराड

**ठराव क्र.१६/४ :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.एस.बी.झनझन आणि उप मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.पि.के.राऊत यांना चांगल्या प्रकारची सेवा केल्याबद्दल शासनातर्फे राष्ट्रपती गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यांत आल्याने औरंगाबाद महानगरपालिकेचे नांव देशभरात उंचावले आहे. मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. एस.बी.झनझन आणि मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.राऊत यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यांत येते.

ठरावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१७/५ :-**

बन्सीलालनगर वॉर्ड क्र.६४ मध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या सांस्कृतिक सभागृह व वाचनालय स्वर्गीय आर.पी.जैन यांचे नांव देण्यांत यावे.
**सुचक :-** श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल
**अनुमोदक :-** श्री.प्रफुल्ल मालानी

**ठराव क्र.१७/५ :-**

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१८/६ :-**

आपल्या औरंगाबाद महानगरपालिकेचे बरेच दवाखाने आहेत. आतापर्यंत फक्त ॲलोपॅथीक व आयुर्वेदिक डॉक्टरांचे पदे आहेत. परंतू, "दंत वैद्यकीय" (दातांचे डॉक्टर) व होमियोपॅथीक या पदाचे डॉक्टरर्स आपल्या महापालिकेत नाहीत.

तरी दोन "दंत वैद्यकीय" व होमियोपॅथीक पदाच्या जागा निर्माण करण्यांत याव्यात.

**सुचक :-** श्री.डॉ.भागवत कराड
**अनुमोदक :-** श्री.संजय केनेकर

**ठराव क्र.१८/६ :-**

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १९/७ :-**

भारत एकता केंद्र औरंगाबाद व शमा ड्रामा असोसिएशन व युवक कल्याण मंडळ, औरंगाबाद यांच्या सामुहिक प्रयत्नाने, भारताच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने औरंगाबादेत प्रथमच एक व्ही.डी.ओ.टेलिफील्म (सीरीज) हिंदी व मराठी मध्ये निर्माण करीत आहे. या राष्ट्रीय कार्यासाठी आर्थिक सहायता कमी पडल्यामुळे हे कार्य थांबले आहे.

यांनी यापुर्वी संपूर्ण साक्षरता अभियानावर "नई रोशनी" चित्रीत करुन व्ही.डी.ओ. कॅसेट जिल्हाधिकारी यांना दिलेली आहे. व जिल्हाधिकारी यांनी ते सर्व केबलवर दाखविले आहे. तसेच राष्ट्रीय कार्यावरच "एकता" व्ही.डी.ओ. टेलिफिल्म दोन तासाचे यांनी चित्री केले आहे. त्यात काही कार्य बाकी आहे.

आता भारतातील ज्वलंत समस्यांवर उदा.एड्स, वृक्षारोपण, पर्यावरण, भ्रष्टाचार निर्मूलन, परिवार नियोजन शिक्षण/साक्षरता, महिला व बालकल्याण, घर-गांव व शहरातील स्वच्छता, कर्मठता, नशाबंदी, बालविवाह, बच्चा मजदुरी, आरोग्य, राष्ट्रीय उत्पादन, मनोरंजन, खेळासाठी प्रोत्साहन, राष्ट्रीय एकता, एकात्मता, बंधूभाव, हुंडाबंदी, अंधश्रध्दा निर्मूलन इत्यादी विषयावर या टेलिफिल्म सिरीज मध्ये भर देण्यांत येणार आहे. यामुळे समाज प्रबोधन व जनजागृती होऊन जनतेंला या समस्या पासून अवगत करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तरी महापौरांनी मनपाच्या सर्व साधारण सभेत हा प्रस्ताव ठेवून अशा या राष्ट्रीय कार्यास प्रत्येक नगरसेवक, स्वेच्छा निधीतून कमीत कमी तीन हजार रुपये देण्यासाठी प्रयत्न करावे. व औरंगाबादेत राष्ट्रीय कार्य सतत सुरु राहण्यासाठी अशा सक्रीय स्वयंसेवी संस्थाना आर्थिक मदत करावी. ही विनंती.

**सुचक :-**

१) श्रीमती अलका रमेश पाटील,
२) श्री.राजकुमार बचाटे,
३) सौ.शकुंतला धांडे,
४) श्री.संजय केनेकर,
५) श्रीमती फरहद बानो,
६) श्री.गौतम लांडगे,
७) श्रीमती नुरजहॉं बेगम,
८) श्री.स.अ.एकबालोद्दीन,
९) श्री.व्ही.व्ही. देशमुख,
१०) श्री.जावेद रज्जाक,
११) श्री.मुश्ताक अहेमद.

**अनुमोदक** :-

१) श्रीमती आबेदा बेगम,
२) श्री.फजलउल्लाहखॉन,
३) श्रीमती मोहसिना बिल्कीस,
४) श्रीमती साजेदा बेगम,
५) श्री.मोहम्मद विखारोद्दीन,
६) सौ.उषा दिलीप गायकवाड,
७) श्री.अजिजखॉंन,
८) श्री.महमद अब्दुल रऊफ,
९) श्री.प्रकाश निकाळजे,
१०) श्री.माहेम्मद कुरेशी

**ठराव क्र.१९/७ :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भारत एकता केंद्र औरंगाबाद व शमा ड्रामा असोसिएशन व युवक कल्याण मंडळ, औरंगाबाद यांचा सामुहिक प्रयत्नाने भारतातील ज्वलंत समस्यांवर उदा.एड्स, वृक्षारोपण, पर्यावरण, भ्रष्टाचार निर्मूलन, परिवार नियोजन, शिक्षण साक्षरता, महिला व बालकल्याण, घरगांव, शहरातील स्वच्छता, कर्मठता, नशाबंदी, बालविवाह, बाल मजूरी, आरोग्य राष्ट्रीय, उत्पादन, मनोरंजन, खेळासाठी प्रोत्साहन, आरोग्य राष्ट्रीय एकता-एकात्मता, बंधुभाव, हुंडाबंदी, अंध्दश्रध्दा इत्यादी विषयावर टेलिफिल्म मध्ये भर देऊन समाज प्रबोधन व जनजागृती करण्यांत येऊन या समस्या जनतेला अवगत करण्याचे कार्य करण्यांच्या येत असल्याने ज्या स.सन्माननीय सभासदांची असेल अशा सभासदांनी स्वेच्छानिधीतून रु.३०००/- (तीन हजार फक्त) पर्यंत आर्थिक मदत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०/८ :-**

वॉर्ड क्र.३० माझ्या वार्डात संजयनगर, बौध्दवाडा, गोधडीपुरा गादिया पार्क, बायजीपुरा व इंदिरानगर चा काही भाग येत आहे. माझा वार्ड स्लम विभागात मोडतो व येथील लोकांना खाजगी शाळेत मुलांना शिकवणे कठीण होऊन बसले आहे. या वॉर्डाची लोकसंख्या अंदाजे ५० हजार आहे. या वार्डात महानगरपालिकेची जागा नसल्यामुळे माझ्या स्वेच्छा निधीतून एकूण रुपये ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) घेवून बसैय्ये बंधुची ३०००" स्क्वेअर फुटाची जागा महानगरपालिकेने खरेदी करुन घ्यावे व शाळेची इमारत बांधण्यात यावे. तसेच भू-संपादनाचा उर्वरीत खर्च महानगरपालिकेने करावे, ही विनंती.

**सुचक :-** श्रीमती नुरजहॉं बेगम,
**अनुमोदक :-** श्रीमती जाहेदा बेगम

**संवाद :-**

**नगरसचिव :** टंकलिखित करतांना अनावधानाने सुचक/अनुमोदक यांची नावे सुटलेली आहे. त्याबद्दल दिलगीर आहोत. (विषय क्र.८ वाचुन दाखविला)

**ठराव क्र.२०/८ :-**

सदर प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

ऐनवेळचे जे विषय या सभेत चर्चेला आले नाहीत. ते सर्व विषय आगामी सभेत ठेवण्यात यावेत, असे मा.महापौर यांनी घोषित केले.

"जन-गण-मन" या राष्ट्रगितानंतर आजची सभा संपल्याचे मा.महापौर यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| **नगरसचिव** | **मा.महापौर** |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दि.१६ जुलै १९९८ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त गुरुवार दि.१६ जुलै १९९८ रोजी सकाळी ११.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मा.महापौर सौ.शिलाबाई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे "सभागृहात वंदेमातरम गीताने सुरूवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील सन्माननिय सभासद उपस्थित होते. स.सभासदांची उपस्थिती हजेरी रजिष्टर प्रमाणे**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.डॉ. कराड भागवत किशनराव | - | उप महापौर |
| २. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | स.सदस्य |
| ३. | स.स.श्री. अविनाश लक्ष्मणराव कुमावत | - | स.सदस्य |
| ४. | स.स.श्री. फैय्याज अहेमद कुरैशी | - | स.सदस्य |
| ५. | स.स.श्रीमती लोखंडे रुख्मणबाई खंडेराव | - | स.सदस्य |
| ६. | स.स.श्री. अफसर खाँ यासिन खाँ | - | स.सदस्य |
| ७. | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | - | स.सदस्य |
| ८. | स.स.सौ. साजेदा बेगम | - | स.सदस्य |
| ९. | स.स.श्री. म.सलिम म.हनिफ | - | स.सदस्य |
| १०. | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | - | स.सदस्य |
| ११. | स.स.श्री. ॲड.गणेश किसनराव वानखेडे | - | स.सदस्य |
| १२. | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | - | स.सदस्य |
| १३. | स.स.श्री. लांडगे गौतम लिंबाजी | - | स.सदस्य |
| १४. | स.स.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | - | स.सदस्य |
| १५. | स.स.श्री. भालेराव अभिमन्यु रामभावू | - | स.सदस्य |
| १६. | स.स.श्री. नरेंद्र यादवराव पाटील | - | स.सदस्य |
| १७. | स.स.श्री. कोकाटे काशीनाथ हरिभावू | - | स.सदस्य |
| १८. | स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास | - | स.सदस्य |
| १९. | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | - | स.सदस्य |
| २०. | स.स.सौ. पद्मा बाबुराव शिंदे | - | स.सदस्य |
| २१. | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | - | स.सदस्य |
| २२. | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल रामचंद्र | - | स.सदस्य |
| २३. | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | - | स.सदस्य |
| २४. | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | - | स.सदस्य |
| २५. | स.स.सौ.फरहत बानो भ्र.मो.नवाज | - | स.सदस्य |
| २६. | स.स.श्री. फजलउल्ला खॅान अजमत उल्लाखान | - | स.सदस्य |
| २७. | स.स.श्री. अजीज खॉ गणी खाँ | - | स.सदस्य |
| २८. | स.स.श्रीमती आबेदा बेगम मुस्तफा | - | स.सदस्य |
| २९. | स.स.श्रीमती नुरजहाँ बेगम अ.रहेमान | - | स.सदस्य |
| ३०. | स.स.श्री. महंमद मुस्तफा अहमद | - | स.सदस्य |
| ३१. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सदस्य |
| ३२. | स.स.श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी | - | स.सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३. | स.स.सौ. मोहसीना बिल्कीस विखारोद्दीन | - | स.सदस्य |
| ३४. | स.स.श्री. जावेद रज्जाक | - | स.सदस्य |
| ३५. | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | - | स.सदस्य |
| ३६. | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | - | स.सदस्य |
| ३७. | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | - | स.सदस्य |
| ३८. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | - | स.सदस्य |
| ३९. | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | - | स.सदस्य |
| ४०. | स.स.श्री. अ.अ.रऊफ म.अ.माबुद | - | स.सदस्य |
| ४१. | स.स.श्री. स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन | - | स.सदस्य |
| ४२. | स.स.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | - | स.सदस्य |
| ४३. | स.स.श्री. सय्यद अली मीरा सलामी | - | स.सदस्य |
| ४४. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सदस्य |
| ४५. | स.स.श्री. संजय किशनराव केनेकर | - | स.सदस्य |
| ४६. | स.स.श्रीमती वाघमारे मुक्ताबाई सुदाम | - | स.सदस्य |
| ४७. | स.स.सौ. लता दलाल श्रीनिवास | - | स.सदस्य |
| ४८. | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | - | स.सदस्य |
| ४९. | स.स.सौ. धांडे शकुंतला हरिदास | - | स.सदस्य |
| ५०. | स.स.श्री. अब्दुल रशिद खॉंन (मामू) | - | स.सदस्य |
| ५१. | स.स.कु. माया लिंबाजी लाडवाणी | - | स.सदस्य |
| ५२. | स.स.सौ. आव्हाड सविता धनंजय | - | स.सदस्य |
| ५३. | स.स.श्री. अब्दुल रशिद अ.सत्तार | - | स.सदस्य |
| ५४. | स.स.श्री. विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | - | स.सदस्य |
| ५५. | स.स.श्री.जैन विकास रतनलाल | - | स.सदस्य |
| ५६. | स.स.श्री. गंगाधर सुखदेव गाडे | - | स.सदस्य |
| ५७. | स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन | - | स.सदस्य |
| ५८. | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | - | स.सदस्य |
| ५९. | स.स.श्री. जोशी संजय रामदास | - | स.सदस्य |
| ६०. | स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | - | स.सदस्य |
| ६१. | स.स.सौ. जोस्त्ना हिवराळे | - | स.सदस्य |
| ६२. | स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | - | स.सदस्य |
| ६३. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सदस्य |
| ६४. | स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | - | स.सदस्य |
| ६५. | स.स.श्री. विठ्ठल किशन जाधव | - | स.सदस्य |
| ६६. | स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | - | स.सदस्य |
| ६७. | स.स.श्री. काळुसे मंदा धनंजय | - | स.सदस्य |
| ६८. | स.स.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | - | स.सदस्य |
| ६९. | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | - | स.सदस्य |
| ७०. | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | - | स.सदस्य |
| ७१. | स.स.श्री. नवपुते कचरु चंद्रभान | - | स.सदस्य |

कोरम अभावी आजची सभा ००.३० मिनीटे तहकुब करण्यात येत असल्याची घोषणा मा.महापौर यांनी केली. (वेळ सुमारे ११.२० वा.)

तहकुब करण्यात आलेली सभा दुपारी ११.५० वाजता पुन्हा सुरु करण्यांत आली. सन्माननीय नगरसेवक श्री.सुभाष कच्छवाह यांच्या आजी सोनाबाई कच्छवाह आणि स.नगरसेवक श्री.विखारोद्दीन यांच्या मातोश्री व स.नगरसेविका सौ. निर्मळा कांबळे, सासुबाई पुर्णवार्दाचा पंडीत किसनरावजी पाडळकर यांच्या दु:खद निधनानिमित्त सभागृहाने ००.०२ मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली.

**संवाद :-**

**श्रीमती फरहत बानो :** माझ्या वार्डातील राममंदिर ते आझाद चौकापर्यंतच्या रस्त्याचे कामाबाबत अनेक वेळा पत्र देऊनही काम अद्याप सुरु झाले नाही. तेव्हा जोपर्यंत माझ्या वार्डातील कामाचे आश्वासन मिळत नाही. तो पर्यंत मी माझ्या खुर्चीचा त्या करुन मोकळ्या जागेत बसत आहे.

**श्रीमती मोहसिना बिल्कीसा :** स.नगरसेविका श्रीमती फरहत बानो यांनी सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे त्यांच्या वार्डातील काम बरोबर होत नाही, खराब होत आहे. याबाबत संबंधित अधिकारी योग्य तो खुलासाही करीत नाही. त्याप्रमाणे माझ्या वॉर्डातील कामाबाबत अनेक पत्र देण्यात आले आहेत. पण त्याबाबत काहीही खुलासा झालेला नाही. अधिकारी वर्गाचा हा व्यवहार योग्य नाही. त्याबाबत निषेध करण्यात येतो.

यानंतर स.नगरसेविका श्रीमती पाटील, श्रीमती मोहसिना बिल्कीस, सौ.शकुंतला धांडे, श्रीमती आबेदा बेगम, श्रीमती जाहेदा बेगम व श्रीमती फरहत बानो यांनी व्यासपीठा समोरील मोकळ्या जागेत बैठा सत्याग्रह केला.

**संवाद :-**

**मा.महापौर :** स.सभासदांनी आपआपल्या जागेवर बसून घ्यावे. स.नगरसेवकांनी आपल्या मागण्याबाबतचे पत्र या ठिकाणी दिले आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :-** किराडपुरा भागातील राममंदिर ते सिडको रस्त्यावर पावसाळ्यात भपूर पाणी वाहुन येत होते. वाहतुकीच्या दृष्टीने रस्ता खोदून घेतला आहे. त्यावर आवश्यक असलेले पुलही बांधण्यात आले आहेत. तसेच रस्त्याच्या मध्ये येणारे पोल हलविण्यात येऊन रस्त्याचे खडीकरण करण्याचे काम झाले आहे. पावसाळ्यानंतर या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येईल.

**श्रीमती फरहत बानो :** रस्त्याचे रुंदीकरण आणि खडीकरणाचे काम झाले आहे ही बाब मला माहिती आहे. डांबरीकणांचे कामही होणार आहे. पण व्यासपीठासमोर बसण्याचा आमचा तो उद्देश नसून रस्ता रुंदीकरणाचा आहे. याबाबत मनाई हुकूम आलेला आहे. ही बाब माहित आहे. ज्या नागरिकांनी स्टे आणला आहे. त्यांना रक्कम देण्यात यावी. हे नागरीक रक्कम घेण्यास येत नसतील. तर त्यांना कोर्टा मार्फत सात दिवसांची नोटीस देण्यात यावी. नोटीस दिल्यानंतर ही हे नागरिक रक्कम घेण्यास आले नाही तर सरळ त्यांची घरे तोडण्याचे काम सुरु करण्यात यावे. नाक्याजवळ उभारलेल्या टपऱ्या ज्याप्रमाणे नोटीस न देता उचलण्यात आल्या त्याप्रमाणे हे काम करण्यात यावे. या बाबत अनेक वेळा पत्र दिलेले आहेत. प्रत्यक्ष भेट ही घेण्यात आली आहे. मा.आयुक्त यांचे बरोबर पाहणी ही करण्यात आली आहे. तरी काहीही काम झाले नाही. एक महिन्यात काम झाले पाहिजे. याबाबत लेखी खुलासा झाल्याशिवाय खुर्चीवर बसणार नाही.

**मा.महापौर :** सन्माननिय सभासदांनी आपआपल्या जागेवर बसुन घ्यावे. मा.आयुक्त खुलासा करत आहेत.

**सौ.अलका पाटील :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करतांना ड्रेनेज/लाईट/पाणी या समस्यांबाबतही खुलासा करावा. नगरसेवकांची कोणतीच कामे झाली नाहीत.

**श्रीमती मोहसीना बिल्कीस :** शहाबाजार येथील रस्त्याबाबत मा.सहाय्यक संचालक, नगररचना यांना अनेक वेळा सुचना दिली आहे. व पत्रही दिल आहे पण? याबाबत कार्यवाही झालेली नाही. मा.आयुक्तांना पत्र दिले तर संबंधित अधिकाऱ्यांना सुचना दिल्या आहेत. असे उत्तर मिळते. सभासदांना काही महत्व नाही का?

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** स.नगरसेविका श्रीमती फरहत बानो यांनी पत्र दिले म्हणून सहानुभूती म्हणून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले आहे. या मागणीसाठी स.नगरसेविका या व्यासापीठाजवळ खाली बसलेल्या आहेत. म्हणून त्यांच्या मागण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना खुलासा करण्याची सूचना मा.महापौर यांनी द्यावी. स.नगरसेविका या एक समजदार नगरसेविका आहेत. त्यांनी अधिकाऱ्यांचा खुलासा एकूण आपल्या जागेवर बसावे.

**सहाय्यक संचालक,नगररचना :** स.नगरसेविका श्रीमती मोहसीना बिल्कीस यांनी जी मागणी केली आहे. त्यानुसार शहाबाजार रोडबाबतचा प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजूर झालेला आहे. प्रकरण मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेले आहे. या प्रकरणात न्यायालयाचा मनाई हुकूम आलेला होता. प्रकरणी कार्यवाही चालु आहे. रोशनगेट ते सिडको रस्त्याबाबतची जमिन संपादनाची कार्यवाही चालु आहे. या रस्त्यात बांधीत होणाऱ्या मालमत्ताधारकांना वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले होते. तथापि, ऐनवेळी या नागरिकांना वाटाघाटीसाठी नकार दिला आहे.

**श्रीमती फरहत बानो :** अधिकाऱ्यांनी सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे कोणत्याही नागरिकांना लेखी नोटीस दिली आहे. फक्त आपण यावे मनपा आपल्याला रक्कम देईल अशी तोंडी सुचना नागरिकांना करण्यांत आली आहे. तेव्हा नागरिकांना सात दिवसांची नोटीस देण्यात यावी.

**सहाय्यक संचालक, नगररचना :** नागरिकांना मालकी हक्का बाबतचे कागदपत्र दाखल करण्याबाबत सांगण्यात आले आहे. त्यानंतर रक्कम दिली जाईल. लेखी पत्रही दिले आहे. या प्रकरणात न्यायालयाचा मनाई हुकूम असल्याने काही करता येत नाही.

**श्री.नरेंद्र पाटील :** अशा प्रकारे एकत्र चर्चा करण्याऐवजी काही काळासाठी सभा तहकुब करुन सन्माननीय नगरसेविका श्रीमती फरहत बानो यांना काय उत्तर द्यावयाचे हे ठरवावे.

**मा.महापौर :** सर्व सदस्यांनी जागेवर बसावे. मा.आयुक्त खुलासा करत आहे.

**मा.आयुक्त :** किराडपुरा राम मंदिरापासुन सिडको पर्यंत हा एक महत्वाचा रस्ता आहे. व हा रस्ता डांबरीकरण व्हावा म्हणुन स.नगरसेवकांनी मागणी केली आहे. त्या दृष्टीने ऐनवेळचा प्रस्ताव सभागृहात आणला होता. व सभागृहाने हा अशासकीय प्रस्ताव मंजूर केला. त्यानुसार प्रशासनाने अंदाजपत्रक तयार केले . या कामासाठी स.नगरसेवकांच्या मागणीनुसार तीन दिवसांची अल्प मुदतीची निविदाही काढली व काम तातडीने सुरु केले. खडी करण्याचे काम पुर्ण आहे. परंतु मला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे पोल स्थलांतरीत

न झाल्यामुळे डांबरीकरणाचे काम करता आले. ह्या रस्त्यांच्या रुंदीकरणात ज्या नागरीकांच्या मालमत्तेचा वाद होता. त्या नागरीकांनी मनाई हुकूम आणला आहे. खाजगी वाटाघाटीने सुटावा अशी मागणी आल्यानुसार संबंधित नागरिकांना चर्चेसाठी बोलावले असता याबाबत वाटाघाटी फिसकटल्या. यावेळी या नागरिकांचे मालकी हक्का बाबतचे कागदपत्र पाहिले असता त्यात मोठ्या गुंतागुंत दिसुन आले. यावरुन हा प्रश्न खाजगी वाटाघाटीने सुटणार नाही असे दिसल्यानंतर संपादनाची कार्यवाही प्रकरण मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविले आहे. त्यासाठी किमान सहा महिन्याचा कालावधी लागतो. न्यायालयाच्या हुकुमामुळे या नागरिकांच्या मालमत्तेचा जो मोबदला असेल तो मोबदला महापालिका देण्यास तयार आहे. असे लेखी प्रशासनाने न्यायालयात दाखल केलेला आहे. हा रस्ता लवकर पुर्ण करावयाचा असेल तर त्यासाठी लोकप्रतिनिधी त्या भागातील नागरिक यांचे संपुर्ण सहकार्य लाभले तर वाटाघाटीने हा प्रस्ताव सोडवता येईल. यादृष्टीने बांधीत होणाऱ्या मालमत्ता धारकांना लवकरच बोलावून घेऊन त्यांच्या मालकी हक्काबाबतचे कागदपत्र पाहिल्यानंतरच त्यांना रक्कम देण्यांत येईल. तेव्हा हा रस्ता लवकरात लवकर करावयाचा असेल तर स.नगरसेवकांनी सहकार्य करावे व त्याप्रमाणे मी त्यांना आश्वासन देतो. व न्यायालयाला दिलेल्या खुलाशाप्रमाणे लवकरात लवकर मनाई उठवण्यास न्यायालयास विनंती केली जाईल. व रस्ता लवकरात लवकर करुन देण्याबाबत कार्यवाही केली जाईल. असे मी स.नगरसेवकांना आश्वासन देतो. स.नगरसेवकांनी, सभागृहात जो खुलासा केला आहे तो मान्य करावा व जागेवर बसावे अशी त्यांना विनंती केली आहे.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** शहराला येत्या २-३ दिवसांत पाणी पुरवठा होणार नाही. अशी बातमी प्रसिध्द झाली आहे. हा विषय, विषयपत्रिकेमध्ये नसला तरी जनतेच्या दृष्टीने महत्वाच्या असल्यामुळे पाणी पुरवठ्याबाबत प्रशासनाने पर्यायी काय व्यवस्था केली आहे. याबाबत खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त :** रेल्वे स्टेशन या ठिकाणी उड्डाण पुलाचे काम सुरु झालेले आहे. त्यासाठी शहरास पाणी पुरवठा करणारी ७०० व १४०० मी.मी. व्यासाची पाणी पुरवठा लाईन स्थलांतरीत करावी लागत आहे. यापैकी ७०० मी.मी. व्यासाची पाईप लाईन स्थलांतरीत करावयाचे काम झाले आहे. आणि १४०० मी.मी. व्यासाची पाईपलाईन स्थलांतरीत करावयाची आहे. या कामासाठी किमान २ दिवस पाणी पुरवठा बंद ठेवावा लागेल. शहरातील नागरीकांना ७०० मी.मी. व्यासाच्या पाईप लाईनवरुन पाणी देण्याचा अविश्वास प्रयत्न प्रशासना करणार आहे. तथापि, या पाईप लाईनवरुन कोणत्याही भागास पाणी पुरवठा होणार नाही. हे आमचे पाणी पुरवठा अधिकारी सांगू शकतील.

**श्री.स.अली मिरा सलामी :** पाईप लाईन स्थलांतरीत करण्याचे काम आवश्यक आहे. त्यास आमचा विरोध नाही. पण पाणी येणार नाही. याबाबतच्या सुचना देणे आवश्यक आहे. शहरास फक्त एक तास किंवा ३० मि.पाणी पुरवठा केला जातो. ज्या दिवशी पाणी येणार नाही. त्या दिवशी सकाळी त्याबाबतची सुचना वृत्तपत्रात दिली जाते. अशा वेळी नागरीक पाण्यासाठी साठा कसा करुन ठेवणार तेव्हा पाईप लाईन स्थलांतरीत करा पण त्याबाबतची सुचना दोन दिवस आगाऊ वृत्तपत्रात द्या म्हणजे आवश्यक

पाण्याचा साठा करुन ठेवतील. ही पाईप लाईन २० तारखेला स्थलांतरीत करावी. त्याबाबतची सुचना उद्याच्या पेपर मध्ये देण्यात यावी म्हणजे नागरीक पाण्याचा साठी करुन ठेऊ शकतील.

**श्री.नरेंद्र पाटील :** स.नगरसेवक श्री.स.अली मिरा सलामी यांनी जी सुचना केली ती अत्यंत योग्य आहे. पाणी येणार नाही. याबाबतची सुचना कमीत कमी दोन दिवस अगोदर शहरातील नागरीकांना माहिती होणे आवश्यक आहे. आणि ज्या काळात पाणी येणार नाही. त्या काळात टँकर द्वारे कसा पाणी पुरवठा करता येईल, याची ही माहिती जनतेला होणे आवश्यक आहे. पाणी पुरवठ्याबाबत पर्यायी व्यवस्थाही झालीच पाहिजे. यासाठी नियोजन करुन योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** ज्या वेळी शहराला पाणी पुरवठा करण्यात येणार नाही. अशी सुचना दिली जाते. त्या-त्या वेळी ज्या भागांना पाणी मिळणार नाही. त्या भागांच्या नावांचा उल्लेख या सुचनेत करण्यात यावा म्हणजे या भागातील नागरीक आवश्यक तो पाण्याचा साठा करुन ठेवतील.

**श्री.जयवंत ओक :** वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार दिनांक १७ पासुन या शहराचा पाणी पुरवठा ३ दिवसांसाठी बंद राहणार आहे ही सुचना शहरातील नागरिकांना किमान २ दिवस मिळणे आवश्यक होती. जर शहराचा पाणी पुरवठा ३ दिवस बंद होणार आहे. तर शहर आणि सिडको भागातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक पाणी साठा करण्याची व्यवस्था केली आहे काय?

**श्री.जावेद रज्जाक :** वृत्त पत्रातील बातमीनुसार शहरास पाणी पुरवठा होणार नसल्याबाबत सभागृहात चर्चा चालु आहे. विकासासाठी पाईप लाईन स्थलांतरीत करण्याचे काम ठिक आहे. पण त्याबाबतची सुचना अशा ज्या दिवसापासून पाणी पुरवठा बंद होणार आहे. त्याच दिवशी सकाळी वृत्तपत्रात प्रसिध्द होणे योग्य नाही. पुष्कळ ठिकाणी तर पाणी येतच नाही. किंवा जी सुचना वृत्तपत्रात दिली आहे. त्याऐवजी येत्या सोमवार पासून तीन दिवस पाणी पुरवठा बंद ठेवावा व त्या अगोदर शहरातील नागरिकांना जादा पाणी पुरवठा करण्यात यावा. म्हणजे नागरीक पाण्याचा साठा करुन ठेऊ शकतील व लोकांना पाण्याबाबत त्रासही होणार नाही. व या बाबतची सुचना वृत्तपत्रात देण्यात यावी. मंगळवार पासुन पुढे दोन दिवस पाणी पुरवठा बंद करण्यात यावा.

**श्रीमती मोहसिना बिल्कीस :** १७ तारखेला पाणी पुरवठा बंद करण्यात ऐवजी सर्व नागरिकांना सोयीस्कर होईल अशी पुढील तारिख निश्चित करण्यात यावी. आणि या काळात पाईप लाईन स्थलांतराचे काम करण्यांत यावे. त्यासाठी चार दिवस लागले तरी चालतील पण तत्पुर्वी पाणी पुरवठा बंद काळात नागरिकांना आवश्यक असलेले पाणी टँकर द्वारे पुरविण्याची व्यवस्था करावी.

**श्री.जयवंत ओक :** सद्या शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या १४०० मी.मी. व्यासाची पाईप लाईन स्थलांतरीत करण्याचे काम करण्यात येणार आहे. पण फारोळा येथे गेल्या ११ वर्षापासुन एक लाईन लिकीज होत आहे. पाईप लाईनच्या स्थलांतराच्या कामाबरोबरच जायकवाडी ते शहरापर्यंत पाणी पुरवठा करणाऱ्या लाईन वर ज्या ज्या ठिकाणी लिकीज असेल हे लिकीज बंद करण्याचे काम करण्यात यावे.

**मा.महापौर :** संबंधित अधिकाऱ्यांनी या बाबत खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** जायकवाडीपासुन शहरास पाणी पुरवठा करणारी १४०० मी.मी. व्यासाची जी जलवाहिनी आहे. तरी रेल्वे उड्डाण पुलाच्या मध्यभागी येत असल्याने ती स्थलांतरीत करणे आवश्यक आहे. ही जलवाहिनी रेल्वे उड्डाण पुलाच्या मध्यभागी येत असल्याने उड्डाण पुलाचे काम थांबले आहे. शुक्रवार हा म.रा.वि.मं.चा शट डाऊनचा दिवस असतो या दिवशी पुरवठा बंद असल्याने जलवाहिनी स्थलांतराच्या कामासाठी निवड करुन शुक्रवार व शनिवार या दिवशी हे काम करण्यात येणार आहे. १४०० मी.मी. व्यासाची लाईन बंद असतांना शहरास पुरवठा करणारी ७०० मी.मी.व्यासाची जलवाहिनी २४ तास चालु ठेवून या लाईन वरुन शहराच्या जास्तीत जास्त पाणी देण्याची योजना आहे. त्या दृष्टीने संपूर्ण आराखडाही तयार झालेला आहे. उद्या शहरास पाणी पुरवठा करण्याचे कामही हाती घेण्यात आलेले आहे. उद्या शहरास पाणी मिळणार असल्यामुळे नागरिकांना पाणी साठवणास वेळ मिळू शकतो त्यानुसार उद्या काम सुरु करावे असा आराखडा आहे.

**श्री.अविनाश कुमावत :** दैनिक तरुण भारत या वृत्तापत्रामध्ये महापौर बंगल्यावरुन लाखो रुपयाचे सामान चोरीस गेल्याबाबतचे वृत्त प्रसिध्द झाले आहे. याबाबतीमध्ये महापालिकेचे जे तीन महापौर होऊन गेले आहे. त्यांच्यावर लाखो रुपयांचे सामान चोरीस गेल्याचे आरोप केले आहे. हे आरोप करत असतांना महापालिकेच्या एका अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली आहे. असे वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे किंवा महापालिकेचे लाखो रुपयाचे सामान चोरीस गेल्या बाबत पोलिसात तक्रार झाली आहे किंवा कोणत्या अधिकाऱ्यांने लाखो रुपयाचे सामान चोरीस गेल्याची माहिती वृत्तपत्राला दिली. याचा सविस्तर खुलासा सभागृहात झाला पाहिजे (बातमी सभागृहात वाचुन दाखविली)

**मा.महापौर :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**श्री.रशिद खॉन (मामू) :** वृत्त पत्रात अशा प्रकारची बातमी छापून येणे हा महापौर पदाचा अपमान आहे. ९ महापौर झालेले आहे कुणाचे नांव नाही ही माहिती कोणत्या अधिकाऱ्यांनी पुरवली याचा खुलासा झाला पाहिजे. माझ्या महापौर काळातील महापौर बंगल्यावरील सर्व सामान मिळाल्याचे प्रमाणपत्र माझ्याकडे आहे. मग हे सामान कोणी नेले कोणत्या अधिकाऱ्यांने ही बातमी वृत्तपत्राला दिली. याचा खुलासा व्हावा.

**मा.महापौर :** सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. संबंधित अधिकारी खुलासा करत आहे.

**मुख्य लेखधिकारी :** वृत्तपत्रात जी बातमी प्रसिध्द झाली आहे. ती माहिती संपूर्ण चुकीची आहे. महापौर बंगल्यावरुन कोणतेही सामान चोरीस गेलेले नाही. सर्व सामान जमा आहे. यापुर्वीही दोन वेळा अशीच बातमी प्रसिध्द झाली होती. दि.१७.०४.१९९७ ला त्याबाबत खुलासा करण्यात आला होता. त्यानंतर त्याप्रमाणे ३०.०४.१९९८ ला ही दैनिक रहिबर या वृत्तपत्रात अशा प्रकारची बातमी आली होती. त्याबाबतचा संपूर्ण अहवाल दि.०८.०५.१९९८ रोजी मा.आयुक्त यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे. या बातमीत कोणतेही तथ्य नाही. महापौर बंगल्यावरील कोणतेही सामान चोरीला गेलेले नाही. महापौर बंगल्यावरील साहित्याबाबतचे सर्व रेकॉर्ड आमच्याकडे आहे. ते अवलोकनासह दाखवू शकतो.

**श्री.स.अली मिरा सलामी :** महापौर बंगल्यावरील सामान चोरीस गेल्याबाबत वृत्तपत्रात जी बातमी प्रसिध्द झाली आहे. त्याबाबत चौकशी समिती गठीत करुन चौकशी करण्यांत यावी.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** महापौर बंगल्यावर लाखो रुपयाचा भ्रष्टाचार अशी बातमी प्रसिध्द झाली आहे. या प्रकरणाची चौकशी होणे आवश्यक आहे. जी चौकशी समिती नेमण्यात येईल त्या चौकशी समितीने आपला अहवाल तीन दिवसात द्यावा नसता मा.महापौरांचा अपमान केला म्हणून संबंधित पेपरवर दावा दाखल करण्यात यावा. अशी विनंती आहे.

**श्री.प्रकाश निकाळजे :** दरवर्षी नवीन महापौर येतात. दरवर्षी नवीन सामान खरेदी केले जाते. तेव्हा ज्या प्रमाणे सामान खरेदी करण्यात येते. त्याप्रमाणे ते सर्व सामान आहे का? ते सामान स्टोअरला जमा आहे का?

**श्री.रशिद खॉन (मामू) :** नवनिर्वाचित महापौर किंवा महापौर बंगल्याचा चार्ज घेतात त्यावेळी त्या ठिकाणी भांडार अधिक्षक हजर असतात. गेल्या तीन वर्षाच्या काळात महापौर बंगल्यासाठी फर्निचर खरेदी केलेले नाही. तेव्हा वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीबाबत संबंधित वृत्तपत्रावर कार्यवाही करण्यात यावी. त्याच बरोबर अब्रु नुकसानीचा दावाही दाखल करण्यात यावा. या प्रकरणात संपुर्ण चौकशी करण्यात यावी. या वृत्तपत्राची जाहिरात बंद करण्यात यावी.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** "महापौर" हे या शहराचे भुषण आहे. या शहराचा प्रथम नागरीक आहे. वृत्तपत्रतत बातमी देण्यापुर्वी संबंधित संपादकांनी याबाबतची माहिती देणे आवश्यक होते. तेव्हा विद्यमान महापौरांनी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमी बाबत संपादकाशी संपर्क साधुन त्याचे विचार जाणून घेतले पाहिजे. माजी महापौर श्री.रशिद खॉन (मामू) यांनी सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे या बातमीमुळे संपूर्ण शहरावरती शिंतोडे उडविल्यासारखे होत आहे. किंवा या बातमीत काही तथ्य आहे काय? याची चौकशी झाली पाहिजे.

**श्री.नरेंद्र पाटील :** वृत्तपत्रात जी बातमी प्रसिध्द होते. त्यास संपूर्णपणे संपादक जबाबदार आहे असे नाही. ही बातमी ज्या प्रतिनिधीने दिली आहे. त्याची संपूर्ण चौकशी करावी. व त्याप्रमाणे तो अहवाल सभागृहापुढे मांडावा.

**श्री.गजानन बारवाल :** महापौरांबाबत एखाद्या वृत्तपत्रात अशा प्रकारची बातमी प्रसिध्द होणे याबाबींचा मी प्रथम निषेध करतो. वृत्तपत्रात जी बातमी प्रसिध्द झाली आहे. त्याबाबत चौकशी करण्यात यावी. आणि त्या बातमीत तथ्य नसेल तर अशा वृत्तपत्राची जाहिरात बंद करण्यात यावी.

**श्री.ॲड गणेश वानखेडे :** हा महापौरांचा अपमान आहे. त्याचा मी निषेध करतो. स.नगरसेवक श्री.नरेंद्र पाटील यांनी शंका व्यक्त केली आहे. त्याचा पण मी निषेध करतो. या प्रकरणात चौकशी करण्यात यावी. त्यासाठी कमिटी गठीत करणे.

**श्री.भगवान घडामोडे :** दैनिक तरुण भारत मध्ये जी बातमी प्रसिध्द झाली आहे. त्या बातमीमुळे नुसता महापौराचांच नाही तर संपूर्ण सभागृहाचा अवमान आहे. तरी पण या सभागृहाला वेटीस धरु शकत नाही. या बातमीत काही तथ्य आहे अशी आपणास शंका येत असेल तर त्या संपादकास नोटीस द्यावी व त्यांच्याकडुन पुरावा मागवावा व त्याची शहानिशा करण्यांत यावी. आणि मग

त्यावर कार्यवाही करावी. वृत्तपत्रात बातमी आली म्हणून जाहिरात बंद करण्याची असली कुठलीच पध्दत नाही.

**श्री.अविनाश कुमावत :** वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीबाबत माहिती घेण्यात यावी. त्यानुसार जर महापौर दोषी असतील तर त्यांनी आपला राजीनामा द्यावा किंवा अधिकाऱ्यांनी खोटी माहिती दिली असेल तर अशा अधिकाऱ्याला निलंबित करण्यात यावे. किंवा वृत्तपत्रावर अब्रु नुकसानीचा दावा करण्यात यावा.

**मा.महापौर :** सर्व सभासदांनी आपआपल्या जागेवर बसुन घ्यावे.

**श्री.अब्दुल रशिद खॉन (मामू) :** महापौर हा संपूर्ण शहराचा असतो. महापौरांचा अपमान म्हणजे संपूर्ण शहराचा अपमान आहे. या वृत्तपत्रात नऊ महापौरांचा उल्लेख आहे. विद्यमान महापौर हे नववे महापौर आहे.

**श्री.संजय जोशी :** वृत्तपत्रात जी बातमी प्रसिध्द झाली आहे. सभासदांनी भावना व्यक्त केल्या आहेत तेव्हा यावर काहीतरी निर्णय झाला पाहिजे.

**श्री.जयवंत ओक :** वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार दरवर्षी महापौर निवडून आल्यानंतर काय काय साहित्य खरेदी केले जाते. याबाबत अधिकाऱ्यांनी खुलासा केल्यानंतर यावर चर्चा करता येईल.

**मा.उपमहापौर :** फर्निचर खरेदी केल्यानंतर त्याला काही लाईफ आहे काय? किती दिवसात फर्निचर गालीचे भांडी बदलावयास पाहिजे, जे साहित्य घेतले ते सभागृहाच्या निदर्शनास आणावे.

**मा.आयुक्त :** नवीन महापौर नियुक्त झाल्यानंतर आपल्या सोईप्रमाणे महापौर बंगल्यात व्यवस्था असावी अशी महापौरांची इच्छा असते. महापौर हे शहराचे दृष्टीने सर्वोच्च पद आहे. या महापौर बंगल्यात अतिथीची भोजन/स्वागत व्यवस्था करण्यासाठी साहित्याची नितांत गरज आहे. क्रॉकरी फुटू शकते. इतर ज्या काही वस्तु आहेत. त्यास काही तोडफोड झाली तर ती दुरुस्त करुन दिली जाते. नवीन महापौरांचे इच्छेप्रमाणे बंगल्यावरील साहित्यांची सजावट करीत असतो. वृत्तपत्रातील बातमीनुसार सभागृहात जी चर्चा चालु आहे सभागृहात महापौर बंगल्यावरील सामान चोरी गेले आहे काय किंवा कसे? याबाबतची शहानिशा केली असता अशा प्रकारचे कोणतेही सामान चोरीला गेले नसल्याचा अहवाल आहे. तथापि सभागृहाने भावना प्रकट व्यस्त केल्याप्रमाणे एखादी चौकशी समिती सभागृह गठीत करु शकते.

**श्री.हमीद्दीन ताबा :** महापौर बंगल्यावरील सामानाची चोरी झाली किंवा नाही याचा प्रथम खुलासा करण्यात यावा.

**मा.महापौर :** महापौर बंगल्यावरुन सामानाची खरोखरच चोरी झाली आहे काय याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीप्रमाणे अशा प्रकारची कोणतीही चोरी झालेली नाही. महापौर बंगल्यासाठी कॉकरी, फुटरेस, मॅट अशा प्रकारच्या वस्तु खरेदी करत असतो.

**श्री.संजय केनेकर :** महापौर बंगल्यावरील सामान चोरीला गेल्याची सभागृहात जी चर्चा झाली. त्यात संबंधित वृत्तपत्राचे संपादकाशी चर्चा करावी अशी सुचना सन्माननीय नगरसेवकांनी केली आहे. त्यानुसार संपादकाकडुन प्रसिध्द झालेल्या बातमीबाबत पुरावे मागविण्यात यावे व त्यानंतर या प्रकरणी कार्यवाही करावी, अशी सुचना आहे.

**श्री.हमीमोद्दीन ताबा :** शहरातील प्रत्येक वृत्तपत्रात अशा प्रकारची बातमी येईल. तेव्हा हे सभागृह सगळयांशी चर्चा करणार आहे काय?

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** वृत्तपत्रातील बातमी जी उपसमिती नेमण्यात आली आहे. या उप समितीमध्ये माजी महापौरांचा समावेश नसावा.

स.सभासदांनी केलेल्या सभागृहातील भावनांचा विचार करता वृत्तपत्रातील बातमीनुसार महापौरांवर जो आरोप केला आहे. त्याप्रकरणी एक उप समिती नेमण्यात येते. या उप समितीने आपला अहवाल तीन दिवसांत चौकशी करुन दाखल करावा व त्यानंतर प्रशासनाने चौकशी करुन कार्यवाही करावी. या चौकशी समितीमध्ये खालील स.सभासदांचा समावेश असेल.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.अविनाश कुमावत | - | उपसमितीचे अध्यक्ष |
| २. | श्री.फैय्याज कुरैशी | - | सदस्य |
| ३. | श्री.गंगाधर गाडे | - | सदस्य |
| ४. | श्री.जयवंत ओक | - | सदस्य |
| ५. | श्री.नरेंद्र पाटील | - | सदस्य |

असे मा.महापौर यांनी रुलींग दिले. त्यास सर्वानुमते मंजूरी दिली.

**श्री.जावेद रज्जाक :** उप समिती नेमण्यावर आमचा विश्वास नाही. या प्रकरणी पोलिसा मार्फत चौकशी व्हावी.

**मा.महापौर :** विषय क्र.१ चर्चेस घेण्यात येतो.

**विषय क्र.२१/१ :-**

दि.१७.०६.१९९८ रोजी संपन्न झालेली सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**संवाद :-**

**श्री.सुदाम सोनवणे :** दि.१७.०६.१९९८ च्या सभेत विषय क्र.६/२ वरील चर्चेच्या वेळी सिडको येथील टी.व्ही.सेंटर चौकात छत्रपती संभाजी महाराजाच्या पुतळा बसविण्यास मंजूरी मिळालेली आहे. परंतू, इतिवृत्तानुसार हा पुतळा जालनारोड वरील सिडको बसस्टॅण्ड चौकात बसविण्यास मंजूरी दिल्याचे दिसते. कृपया मुळ प्रस्तावानुसार सदर पुतळा टी.व्ही. सेंटर येथील चौकातच बसविण्यास मंजूरी देण्यात यावी व तशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा.महापौर :** छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा सिडको येथील टी.व्ही.सेंटर चौकात बसविण्यात यावा, अशी दुरुस्ती करण्यास मंजूरी देण्यात येते.

**श्री.संजय केनेकर :** दि.१७.०६.१९९८ च्या सभेत जलतरण तलावासाठी लागणारी पदे निर्माण करण्यास मंजूरी देत असतांना या जलतरण तलावावर सध्या जे कर्मचारी काम करुन त्यांचा प्राधान्याने विचार करण्यांत यावा. त्या कर्मचाऱ्यांना या पदावर घेण्यात यावे, अशी चर्चा झाली आहे. तथापि, तशी नोंद झालेली नाही, ती घेण्यात यावी.

**श्री.व्ही.व्ही. देशमुख :** दि.१७.०६.१९९८ च्या सभेतील विषय क्र.१३/१, १४/२, १५/३, २०/८ स्थगित ठरावावर चर्चा करुन मंजूरी द्यावी.

**मा.महापौर :** मंजूर.

**ठराव क्र.२१/१ :-**

दि.१७.०६.१९९८ अन्वये मंजूर झालेल्या इतिवृत्तात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येते.

१) **ठराव क्र.६/२ :-** दि.१७.०६.१९९८ अन्वये मंजूर झालेल्या ठरावा ऐवजी टी.व्ही.सेंटर सिडको भागात पोलिस चौकीसमोर जे गोल वाहतुक बेट सिडकोतर्फे बांधण्यात आलेले आहे. त्यात छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. या ठिकाणी पुतळा उभारण्यास मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता, मा.उपमहापौर, मा.सभापती, स्थायी समिती आणि श्री.प्रदिपकुमार जैस्वाल यांचा समावेश असलेली उपसमिती नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. या उपसमितीने आपला अहवाल पुढील बैठकीच्या वेळी दाखल करावा.

२) **ठराव क्र.१३/१ :-** दि.१७.०६.१९९८ अन्वये स्थगित ठेवण्यात आलेल्या विषयास मंजूरी देण्यात येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी मार्केट वार्डातून निजामगंज कॉलनी ते खास गेट कडे जाणाऱ्या सि.स.नं.१२३३/४ मधील रस्त्यासाठी लागणारी जागा संबंधित जमिन मालकाशी बोलणी करुन रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करुन जवळच मार्ग उपलब्ध करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

३) **ठराव क्र.१४/२ :-** दि.१७.०६.१९९८ अन्वये स्थगित ठेवण्यात आलेल्या विषयास मंजूरी देण्यात येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी प्राथमिक शाळेसाठी अस्तित्वात असलेली इमारत ही रस्ता रुंदीकरणात बांधित होत असल्याने प्रस्तावित अ.ब.क. बाबींचा विचार करता सदर इमारतीच्या पुर्व बाजूस असलेली मार्केट वार्डातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अकत्यारीतील जागा संपादन करुन सदर जागेवर अद्यावत शालेय इमारत उभी करण्यासाठी जागा संपादन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

४) **ठराव क्र.१५/३ :-** दि.१७.०६.१९९८ अन्वये स्थगित ठेवण्यात आलेल्या विषयास मंजूरी देण्यात येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ५० ते ६० हजार लोकसंख्या असलेल्या संजयनगर भागात राहणाऱ्या कामगार, तळागाळातील जनसामान्याच्या मुलांना शालेय शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असलेली शालेय इमारत उभारणीकरिता गल्ली नं.बी-३ येथील १८०० स्क्वे. फुटाचा प्लॉट क्र.३ संपादित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

५) **ठराव क्र.१७/५ :-** दि.१७.०६.१९९८ अन्वये स्थगित ठेवण्यात आलेल्या विषयास मंजूरी देण्यात येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६४ बन्सीलाल नगर येथे नव्याने बांधण्यात आलेल्या सांस्कृतिक सभागृह व वाचनालय या इमारतीस स्व.आर.पी. जैन यांचे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

६) **ठराव क्र.१८/६ :-** दि.१७.०६.१९९८ अन्वये स्थगित ठेवण्यात आलेल्या विषयास मंजूरी देण्यात येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या दवाखान्यात दोन दंत वैद्यकीय व होमियोपॅथीक पदाच्या जागा निर्माण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

७) **ठराव क्र.२०/८ :-** दि.१७.०६.१९९८ अन्वये ठेवण्यात आलेल्या विषयास मंजूरी देण्यात येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३० मधील नागरिकांच्या मुलांच्या शिक्षणासाठी महापालिकेची शाळा नसल्याचे बसैये बंधु यांची ३००० स्केअेर फुटाची जागा संपादन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. जागा संपादनासाठी संबंधित वार्डाच्या नगरसेविका यांच्या स्वेच्छा निधी रु. ५०,०००/- आणि उर्वरीत रक्कम महापालिका फंडातून खर्च करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.

वरील दुरुस्तीसह दि.१७.०६.१९९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२/२ :-**

श्री.प.ल. गोहिल, नगर रचनाकार यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या नगर रचनाकार (शासकीय अस्थापना) या पदावर पदस्थापना देण्यांत आली होती. दि.०४.१०.१९९७ च्या सर्वसाधारण सभेत त्यांना सहा महिन्यासाठी शासनाच्या आदेशान्वये रुजू करुन घेण्यांत आले होते. सदर सहा महिन्याचा कालावधी संपला आहे.

तथापि, सहाय्यक संचालक, नगर रचना व नगर रचनाकार ही पदे शासकीय आस्थापनेवर असून त्यांचे वेतन व भत्तेबाबत दरवर्षी शासनाकडुन महापालिकेत प्रतिपुर्ती करण्यात येते. सदरील पदे मंजूरीसाठी सबब शासनाचे आदेशानुसार श्री.गोहिल यांना मुळ नेमणूकी पासून म्हणजे दि.२५.०९.१९९७ ते २४.०९.१९९८ या एक वर्षासाठी मंजूरी देणे योग्य राहील.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :-**

**श्री.अविनाश कुमावत :** प्रस्तुत प्रस्तावानुसार नगर रचनाकार या पदावर श्री.गोयल यांना सहा महिन्यासाठी पदस्थापना देण्यात आली असून पुढील सहा महिन्यासाठी पदस्थापना देण्यास हरकत नाही. परंतू श्री.गोयल यांचा पदस्थापना कालावधी पुर्ण झाल्यानंतर या पदावर शासनाकडुन अधिकारी न मागविता महापालिका आस्थापनेवरील अधिकाऱ्यांना पदोन्नती देऊन हे पद भरण्यात यावे. तसा ठराव घेऊन शासनाकडे पाठविण्यात यावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** महापालिकेच्या नगर रचना विभागातील सहाय्यक संचालक हे पदही शासनाकडील पदस्थापनेवर भरले जाते. याचा विचार करता नगर रचनाकार हे पद शासनाकडील पद स्थापनेवर न भरता महापालिका आस्थापनेवरील अधिकाऱ्यांतून हे पद भरण्यात यावे म्हणजे महापालिका अधिकाऱ्यांना त्या ठिकाणी काम करण्याची संधी मिळेल.

**श्री.संजय जोशी :** नगर रचनाकार या पदावर श्री.गोयल यांना सहा महिने मुदतवाढ देण्यास हरकत नाही. परंतू श्री.गोयल यांचा कार्यकाळ संपल्यानंतर नगर रचनाकार या पदावर शासनाकडील अधिकारी पदस्थापना न करता महापालिका अधिकाऱ्यांना या पदावर नियुक्ती देण्यात यावी. तसा ठराव घेऊन शासनाकडे पाठविण्यात यावा.

**श्री.जावेद रज्जाक :** नगर रचनाकार श्री.गोयल यांना मुदत वाढ देण्यास माझा विरोध नाही. त्यांना मुदतवाढ दिली पाहिजे. नगर रचनाकार या पदा व्यतिरिक्त आणखी काही पदासाठी शासकीय अधिकाऱ्यांची पदस्थापना करण्यात आली आहे. यापैकी सहाय्यक संचालक नगर रचना या पदावर काम करणारे श्री.चौथाई यांना या महापालिकेत काम करीत असलेले किती वर्ष झाले आहेत. तेव्हा सहाय्यक संचालक या वरील पदस्थापनेचा ठराव या सभागृहापुढे का

ठेवण्यात आला नाही. श्री.चौथाई चौकशी करण्यात यावी. म्हणून मनपा समोर बसणार आहे.

**मा.महापौर :** स.नगरसेवकांनी विषयाच्या अनुषंगाने चर्चा करावी. क्र.२ मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र.२२/२**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सहाय्यक संचालक, नगर रचना व नगर रचनाकार ही पदे शासकीय अस्थापना पुढे असून या पदाचे वेतन आणि भत्ते याबाबत दरवर्षी शासनाकडुन महापालिकेस प्रतिपुर्ती करण्यात येत असता शासनाचे आदेशानुसार श्री.गोहिल यांना त्यांच्या मुळ नेमणूकीपासून म्हणजेच दि.२५.०९.१९९७ ते २४.०९.१९९८ या एक वर्षासाठी पदस्थापना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३/३ :**

सर्वसाधारण सभा ठराव क्र.२१६ दि.२२.१२.१९९६ अन्वये जायकवाडी ते औरंगाबाद शहर पाणी पुरवठ्यापोटी महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास प्रतिमहा रक्कम रु.५०.०० लाख प्रत्येक महिन्यास जमा करण्यात यावेत. असा ठराव संमत करण्यांत आला होता. त्यानुसार महानगरपालिका महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास रक्कम रु.५०.०० लाख प्रत्येक महिन्यास जमा करीत होती. परंतू मध्यंतरी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने विद्युत पुरवठा खंडीत करणे बाबत महानगरपालिकेस नोटीस बजावली होती. त्या संदर्भात मा.आयुक्त यांनी स्वत: उप-मुख्यमंत्री तथा उर्जामंत्री श्री.गोपीनाथरावजी मुंढे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या संदर्भात चर्चा केली. चर्चेअंती मा.उप-मुख्यमंत्री यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास रक्कम रु.५०.०० लाख ऐवजी रक्कम रु.७५.०० लाख द्यावेत असे तोंडी आदेशित केले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास रक्कम रु.७५.०० लाखांचा एक हप्ताही महानगरपालिकेने अदा केला आहे. त्यानंतर मा.उर्जासचिव यांनी दि.१७.०५.१९९८ रोजी एक बैठक घेऊन सदर बैठकीत रक्कम रु.७५.०० लाख ऐवजी रक्कम रु.१.०० कोटी हप्ता महाराष्ट्र विद्युत मंडळास देण्यात यावा असा निर्णय घेतला. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने रक्कम रु.१.०० कोटीचा हप्ता देण्यांत यावा म्हणून पत्र व झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांची प्रत आपल्या कार्यालयाकडे पाठविली आहे.

तरी जायकवाडी ते औरंगाबाद शहर पाणी पुरवठ्यापोटी महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास रक्कम रु.५०.०० लाखऐवजी रक्कम रु.१.०० कोटी प्रतिमहा जमा करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.काशिनाथ कोकाटे :** जायकवाडीपासुन शहरापर्यंत पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन हस्तांतर करुन घेण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूर करतांना या वरील जी थकबाकी आणि देणे रक्कम बाकी आहे. त्यासाठी शासनाने अनुदान द्यावे असा ठराव मंजूर करण्यात आला होता. या चर्चेच्या वेळी विद्युत बिलाची जी थकबाकी आहे. त्याबाबत महापालिकेने ५० लाख रुपये द्यावेत असे ठरले होते. परंतू या ठिकाणी जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे. त्या मा.उप-मुख्यमंत्री यांच्या समवेत चर्चा झाल्यानुसार ७५ लाख रुपये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास द्यावे अशी चर्चा झालेली असतांना या ठरावात मंडळाकडुन वेळोवेळी मिळालेल्या नोटीसनुसार

दरमहा एक कोटी रुपये देण्यात यावे असे या ठरावात म्हणले आहे. या वरुन शासन आणि विद्युत मंडळ हे प्रत्येक वेळी महापालिकेवर दबाब टाकत आहे. बिल दिले नाही तर विद्युत पुरवठा खंडीत करण्यात येईल अशी नोटीस दिली जाते. परंतू गेल्या तीन महिन्याच्या काळात वेळोवेळी विद्युत पुरवठा खंडीत झाल्यामुळे पाणी पुरवठ्याबाबत नागरिकांना विशेषतः सिडको भागातील नागरिकांना जो मनस्ताप झाला आहे. त्यास जबाबदार कोण आहे. विद्युत मंडळाने विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस दिल्यावर मात्र आपण प्रथम ५० लाख, नंतर ७५ लाख आणि आता १ कोटी रुपये दरमहा देण्याचा ठराव ठेवत आहोत. पण यास माझा वैयक्तिक विरोध आहे. पाणी पुरवठ्यासाठी लागणारा विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही. अशी व्यवस्था मंडळाने केली तरच ५० लाख रुपये देण्यात यावेत. नसता ते ५० लाख रुपये पण देण्यात येऊ नयेत. मंडळाकडुन कुठलीही पर्यायी व्यवस्था करण्यात येत नाही. म्हणून ५० लाखापेक्षा जास्त रक्कम मंडळाला देण्यात येऊ नये.

**श्री.नरेंद्र पाटील :** हा विषय महापालिकेच्या दृष्टीने गंभीर आहे. जायकवाडीहुन शहरास जे पाणी येते. त्यासाठी शेतकऱ्यांना ज्या दराने वीज बिल आकारण्यात येते. त्या दराने महापालिकेस वीज बिल आकारण्यात करण्यात यावी. यासाठी गेल्या दोन वर्षापासुन पाठपुरावा केला जात आहे. विद्युत मंडळ आधी ५० लाख रुपये घेण्यास मान्य झाले होते. आता ते १ कोटी रुपयाची मागणी करता आहेत. यात मा.उप-मुख्यमंत्री ७५ लाख रुपये विद्युत मंडळाला द्या असे सांगत आहेत. तर मा.उर्जासचिव रु.१ कोटी विद्युत मंडळास द्या असे सांगत आहेत. आज १ कोटी रुपये देण्याची महापालिकेची परिस्थीती आहे का? उद्या हीच मागणी २ कोटीची होईल. मनपाला पाण्याचे जे बिल लावण्यात येते ते अग्रीकलचर रेट प्रमाणे लावण्यात यावे. अशी मागणी युध्दपातळीवर झाली पाहिजे. जो दर लावला जातो तो चुकीचा आहे. अधिकारी, पदाधिकारी मंत्री चर्चा करतात पण ती चर्चा नेमक्या विषयावर होत नाही. लोकसंख्या वाढलेली आहे. कामही वाढलेली आहेत. जे दर लावले आहेत त्याचा विचार झाला पाहिजे. ॲग्रीकलचर रेटने दर लावल्याशिवाय गत्यंतर नाही. स.नगरसेवक श्री.कोकाटे यांनी सुचविल्याप्रमाणे महापालिका रु.५० लाख पेक्षा जास्त रक्कम देऊ शकत नाही. या सभागृहाच्या भावना मा.मुख्यमंत्री, मा.उर्जामंत्री यांच्याकडे मांडाव्यात. नसता शहराचा विकास खुंटेल. तसेच महापालिका पदाधिकाऱ्यांसाठी खरेदी केलेल्या स्टीम आणि टाटा इस्टेट गाडी खरेदी करण्यांत आल्या होत्या. या गाड्या एका गॅरेजमध्ये धुळ खात पडल्या आहेत. या बाबत काहीही कार्यवाही झालेली नाही. याचाही खुलासा झाल्यास योग्य होईल.

आजची सभा ००.१० मिनीटांसाठी तहकुब करण्यात येते, असे मा.महापौर यांनी घोषित केले. (वेळ अंदाजे १.२५ वाजता)

तहकुब करण्यात आलेली सभा पुन्हा सुरु झाली (वेळ अंदाजे दुपारी २.३० वाजता)

**श्री.अब्दुल रशीद खान (मामू) :** ००.१० मिनीटासाठी तहकुब करण्यात आलेली सभा तब्बल १.०० तासाने पुन्हा सुरु करण्यात आली आहे. बाहेर जाऊन काय निर्णय झाले याचा खुलासा व्हावा. हे योग्य नाही. याबाबींचा निषेध करण्यात येतो.

**श्री.नरेंद्र पाटील :** ००.१० मिनिटासाठी तहकुब करण्यात आलेली सभा तब्बल १.०० तासाने सुरु करण्यात येते. ही मोठी खेदाची बाब आहे. अशी पध्दत जरचालु राहिली तर त्यावर व्यक्तीशः बहीष्कार घालतो यापुढे अशी पध्दत खपवून घेतली जाणार नाही.

**श्री.अब्दुल रशीद खान (मामू) :** शहरास ज्या पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा केला जातो. त्या लाईनवरुन ३/४ ग्रामपंचायत आणि ६/७ कंपन्यांना पाणी पुरवठा केला जातो यासाठी वापरात येणाऱ्या विद्युत पुरवठ्याच्या बिलाची आकारणी महानगरपालिका कडुनच केली जाते. या विद्युत बिलाची वसुली केली जाते. याचा खुलासा करण्यात यावा. विद्युत बिलाची आकारणी अश्वशक्तीवर करण्यात यावी.

**श्री.अविनाश कुमावत :** अतिशय महत्वाचा हा प्रश्न आहे. शहरासाठी मिळणारे पाणी हे अतिशय ग्रामीण भागातून मिळते. त्यासाठी विद्युत बिलाची आकारणी ग्रामीण भागाप्रमाणे केली जाते काय याचा खुलासा व्हावा. विद्युत बिलापोटी १ कोटी रुपये दरमहा दिले तर या शहराचा विकास करता येणार नाही. म्हणून ७५ लाखापेक्षा जास्त रक्कम महापालिका देऊ शकणार नाही. अशी विनंती शासनास करण्यात यावी. शासनास तयार ठराव पाठविण्यात यावा.

**श्री.गजानन बारवाल :** प्रस्तुत प्रस्तावानुसार विद्युत बिलाची रक्कम दिल्यानंतर महापालिकेच्या कोणकोणत्या कामावर त्याचा काय परिणाम होणार आहे. याचा खुलासा या ठिकाणी करण्यात यावा. महापालिकेची आजची आर्थिक स्थिती काय आहे. ठरावानुसार रक्कम दिल्यास महापालिकेची स्थिती काय राहणार आहे. याचाही खुलासा व्हावा. त्याच बरोबर महापालिकेचे काही डिपॉझिट आपण विड्रॉल करु शकतो काय याची माहिति देण्यात यावी.

**सौ.लता दलाल :** पाण्यासारखा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न या ठिकाणी चर्चेला जात आहे. विद्युत बिलापोटी ५० लाख रुपये हा सुध्दा महापालिकेवर आर्थिक भार पडत आहे. १ कोटी रुपये भरण्याचा प्रस्ताव प्रशासनाकडुन आला आहे. १ कोटी रुपये महापालिका भरु शकणार नाही. विद्युत बिलापोटी भरण्यात येणारी ७५ लाखाची जी रक्कम देणार आहोत. त्यात पाणीपट्टीची रक्कम वजा जाता किती रक्कम द्यावी लागणार आहे. ती कशी जमा केली जाणार आहे. याचा विचार करता ७५ लाखापेक्षा जास्त रक्कम विद्युत मंडळाला देऊ नये अशी आग्रहाची मागणी आहे. ठराव आहे. हे ७५ लाख रुपये विद्युत मंडळला देत असतांना जादा रक्कम कोणत्या लेखा शिर्षकातून काढुन देण्यात येणार आहे. याचाही खुलासा झाला पाहिजे. बांधकाम, जलनिःसारण, जकात किंवा वेतन व भत्ते या लेखा शिर्षकातून हा जादा पैसा महापालिका काढणार आहे. ज्या लेखाशिर्षकातून हा पैसा काढला जाणार आहे. त्यावर त्याचा काय परिणाम होणार आहे. याचाही खुलासा व्हावा. जसा पाण्याचा प्रश्न जिव्हाळ्याचा आहे. त्याचप्रमाणे शहराच्या विकासाचा प्रश्नही नागरिकांच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा आहे. याचा खुलासा व्हावा.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** विद्युत बिलापोटी ५० लाख रुपये भरत होतो. त्यानंतर ७५ लाख रुपये देत होतो. आणि आता १ कोटी रुपये देण्याचा प्रस्ताव सभागृहापुढे आहे.

यासाठी लागणार पैसा महापालिका कसा उपलब्ध करणार आहे. त्यासाठी कोणत्या लेखाशिर्षकातून पैसा घेतला जाणार आहे. याचा खुलासा व्हावा. या प्रस्तावात ५२ कोटी रुपये थकबाकी दाखविण्यात आली आहे. ही थकबाकी किती दिवसांपासुनची आहे. ती वेळीच का भरली नाही. विद्युत मंडळाकडुन कनेक्शन तोडण्याची धमकी आलेली आहे. ही थकबाकी कधीपासुन व कशी कशी आहे. याचा खुलासा झाला पाहिजे. शेतकऱ्यांना ज्या दराने वीज दिली जाते. त्या दराने महापालिकेस वीज बिल आकारणी करावी. ही मागणी गेल्या सात वर्षापासून केली जात आहे. पण प्रशासनाने याबाबत काहीच कार्यवाही केली नाही. विद्युत मंडळाचे जे मीटर आहेत ते बरोबर नाही. त्याची तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबतही काहीच कार्यवाहीच झाली नाही. विद्युत बिला पोटी दरमहा ५० लाख रूपये भरू शकु अशा प्रकारचा ठराव मंजुर शासनाला पाठविण्यांत यावा. व विनंती करण्यांत यावी की जास्त रक्कम महापालिका देवू शकत नाही.

**श्री.जयवंत ओक** : या ठिकाणी विज बिलाबाबत सभागृहात चर्चा चालू आहे. विद्युत बिलापोटी ५२ कोटी रूपयाची थकबाकी मंडळाकडें आहे. प्रस्तुत प्रस्तावानुसार विद्युत बिलापोटी रू.७५ लाख किंवा १ कोटी रूपये द्यावयाचे यावर सभागृहात चर्चा आहे. विद्युत बिलाची दरमहा रूपये ७५ लाख भरल्यावर त्यातून थकबाकी कमी होणार आहे का याचा खुलासा करण्यांत यावा. विद्युत बिलाचीही आकारणी करण्यात येते. ज्या प्रमाणात शहरास पाणी येते. याचाही खुलासा करण्यात यावा. पाणी पुरवठा करण्यांसाठी बसविण्यांत आलेले विद्युत पंप हे गेल्या २५ वर्षापुर्वी बसविलेले असून त्यापैकी बरेच पंप नादुरूस्त आहेत. त्या १४०० मी मी व्यासाचे पाईप लाईनवरील ८ आणि ७०० मी मी व्यासाचे पाईप लाईन वरील ६ पंप नादुरूस्त आहेत. शहरास पाणी पुरवठा होतांना या पाईप लाईनमधून अर्धे पाणी खाली वाया जात आहे. त्याप्रमाणे जनतेचा पैसा विनाकारण खर्च आहे. या सर्व बाबींचा विचार करता विद्युत बिलाची थकबाकी दरमहा किती भरावयाची आणि ती भरत असतांना ती कमी कशी होईल याबाबतचा धोरणात्मक निर्णय कसा द्यावयाचा या सर्व बाबींचा विचार करून सभागृहात निर्णय घेण्यात यावा अशी विनंती आहे.

**श्री.प्रकाश निकाळजे :** पाण्यासारख्या अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा होत आहे. विद्युत बिलापोटी सुरूवातीला २५ लाख रुपये अदा केले जात होते. यानंतर शासनाने सुरुवातीला ५० लाख त्यानंतर ७५ लाख आणि आता १ कोटी रुपये देण्याची मागणी केली आह. तसा प्रस्ताव सभागृहापुढे आला आहे. या शहरास दोन ठिकाणाहून वीज पुरवठा होत आहे. यावर विद्युत मंडळ करोडो रुपये वसुल करत आहे. त्यावर महापालिका कोणत्याही प्रकरणी आकारणी करत नाही. विद्युत मंडळाच्या पोल/डीपीवर कोणताही कर आकारला जात नाही. या बाबत चर्चा करण्याचेही ठरले होते. पण त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. शहरात आयात होणाऱ्या मालावर महापालिका कर आकारते. विद्युत बिलाची आकारणी ज्या मीटरवरुन करण्यात येते व मीटर नादुरुस्त आहेत. तरीही अशी दुरुस्त मीटर वरुनच विद्युत बिलाची आकारणी करण्यात आली आहे. मीटर मध्ये दोष आहे का

याची पाहणी करण्याचे ठरले होते व त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. असा प्रस्ताव सभागृह चर्चेसाठीही आला होता ही चर्चा न झाल्यामुळे विद्युत बिलात वाढ होत गेली आहे. महापालिका पुरवठ्याच्या कामात तोटा सहन करुन नागरिकांना पाणी पुरवत आहे. खुलताबाद/वैजापूर या ठिकाणी पाणी पुरवठ्याच्या कामासाठी/सवलतीच्या दराने वीज पुरविली जाते. औरंगाबाद शहरास ७० कि.मी. अंतरावरुन पाणी पुरवठा होत आहे. अनेक कामात महापालिका शासनास व विद्युत मंडळास मदत करीत आहे. या सर्व बाबींचा विचार करता दरमहा फक्त ५० लाख रुपये विद्युत बिलापोटी देण्यात यावेत. अशी सभागृहाला विनंती आहे.

**श्री.व्ही.व्ही. देशमुख** : विद्युत बिलाचे थकबाकीपोटी मंडळाकडे दरमहा १ कोटी रुपये भरणा करण्याबाबतचा प्रस्ताव सभागृहापुढे आहे. याबाबत यापुर्वी चर्चा करण्यात आलेली आहे. यापुर्वी झालेल्या चर्चेनुसार माजी खासदार श्री.प्रदीपकुमार जैस्वाल यांच्या प्रयत्नाने विद्युत बिलाची थकबाकी माफ झालेली आहे. प्रशासनाला अनेक कामाच्या आर्थिक व्यवहाराचे दृष्टीने तोंड द्यावे लागते. नगरपालिका अथवा महानगरपालिकांना पाणी पुरवठ्यासाठी जी विद्युत बिलाची आकारणी करण्यात येते त्याची वसुली त्या भागातील जनतेकडुन करण्यात यावी. याचा खुलासा विद्युत मंडळातर्फे दरवर्षी ज्या दैनंदिन रोजनिशी पुरविण्यात येतात. त्यात नमुद केलेली आहे. दुरसंचार विद्युत मंडळ या सुध्दा महापालिकप्रमाणेच स्वायत्त संस्था आहेत. शहरी भागास ही ग्रामीण भागाप्रमाणे विद्युत बिलाची आकरणी करण्यात यावी. असा आग्रह महापालिका धरु शकते. त्यासाठी खंबीर भूमिका घेणे आवश्यक आहे. विद्युत मंडळ हे जे पोल रोवते त्यामुळे शहरात अतिक्रमण वाढत आहे. हे पोल रस्त्यावर रोवले जातात. महापालिकेच्या जागेवर रोवण्यात आलेली डी.पी. स्थलांतरीत करावयाची आहे. तर महापालिकेला मंडळाकडे ३ लाख २० हजार भरावे लागते. त्यानंतरच डी.पी. स्थलांतरीत केली जाते. पोलची ही तीच परिस्थीती आहे. एक पोल हलविण्यासाठी (कैलास नगर भागातील) २२ हजार रुपये महापालिकेला भरावे लागते. विद्युत बिलाची जी आकारणी करण्यात आली आहे. त्यात दंडनीय रक्कमेचा समावेश करण्यात येते. याचाही विचार करता दोन्ही संस्था स्वायत्त असल्याने अशी दंडनिय आकारणी करण्यात येऊ नये. या सर्व बाबींचा विचार व्हावा आणि विद्युत बिलापोटी ७५ लाख रुपये भरण्यात यावेत, अशी विनंती आहे.

**श्री.जयवंत ओक** : प्रशासनाकडुन घेतलेल्या माहितीनुसार पंपींग हाऊसचे दरमहा १ कोटी ५८ लाखाचे बिल येते. थकबाकीचे ५२ कोटी रुपये देणे आहे. म्हणजे भविष्य काळात महापालिकेला विद्युत बिलापोटी १०० कोटी रुपये देणे होईल. याचा विचार करता ठोस निर्णय या सभागृहाने घ्यावा. समाजमंदिर दवाखाने, बहुउद्देशीय हॉल अशा ठिकाणी बचत करुन याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. दरमहा ७५ लाख रुपये भरल्यानंतर ही १ कोटी फटका पालिकेला बसणार आहे. याचा विचार करता ज्या ठिकाणी करता ज्या ठिकाणी रस्ते लाईट पाणी अशा सुविधा दिल्या आहेत. त्या ठिकाणी पुन्हा सुविधा देण्यात येऊ नयेत. व त्यानुसार विकास कामे हाती घेण्यात आली पाहिजे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** विद्युत बिलापोटी एक वर्षास किती रक्कम द्यावी लागते. शहरात महापालिकेचे किती मीटर आहेत. या मीटरचे रिडींग बरोबर आहे. का त्यासाठी लावण्यात आलेले दर बरोबर आहेत का । किती मीटर बंद आहेत. मीटर बंद असेल तर मन मानीपणे बिलाची आकारणी केली जाते. विद्युत बिलाचे संदर्भाने मनपा प्रशासकीय अधिकारी व पदाधिकारी यांनी मुंबईत चर्चा केली आहे. या चर्चेतून काय निष्पन्न झाले याचा खुलासा या ठिकाणी करण्यात यावा. म्हणजे चर्चा करता येईल.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** विद्युत बिलापोटी दरमहा १ कोटी ५८ लाख रुपयाचे बिल येते. या बाबींचा उल्लेख प्रस्ताव मांडतांना त्यात करण्यात आला असता तर त्या अनुषंगाने चर्चा करणे सोईस्कर झाले असते. यापुर्वी १ लाख १३ हजाराचे बिल येत होते. विद्युत बिलापोटी मंडळास दरमहा १ कोटी रुपये दिले तर महापालिका रस्ते, ड्रेनेज या सारखी महत्वाची विकास कामे करु शकणार नाही. कर्मचाऱ्यांचा पगारावरील खर्च बराच आहे. या सर्व बाबींचा विचार करता शासनास अशी विनंती करण्यात यावी की, महापालिका विद्युत बिलापोटी दरमहा फक्त ७५ लाख रुपये भरु शकते. यापेक्षा जास्त रक्कम भरु शकत नाही. तेव्हा ७५ लाख रुपयाचेच बिल देण्यात यावे. तसा एक मुखी ठराव शासनास पाठविण्यात यावा. यासाटी सर्व पदाधिकाऱ्यांनी मुंबईस जाऊन मा.मुख्यमंत्री यांची यांची भेट घ्यावी व हा ठराव मंजूर करुन घ्यावा.

**श्री.प्रभाकर विधाते :** महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाकडुन पाईप लाईन हस्तांतर करुन घेताना थकबाकी असलेल्या ५२ कोटी रुपयाचा त्यात उल्लेख आहे का या थकबाकीस या पाईप लाईनवरुन ज्या ज्या भागात (ग्रामपंचायत/कंपनी) पाणी दिले जाते त्याच्या बिलाची थकबाकीचा समावेश का याचा खुलासा करण्यात यावा.

**श्री.जावेद रज्जाक :** महापालिकेचा विद्युत पुरवठा बंद करता येणार अशा प्रकारे त्याचा निषेध केला नाही. मी या बाबींचा निषेध करतो. सभागृह ५० लाख रुपये देण्यास तयार आहे. ७५ लाख रुपये दिल्यास विकास कामात अडथळा येईल. पैसा देतांना अटी शर्तीचा उल्लेख असणे आवश्यक आहे. पुढे चालु त्या विद्युत मंडळ वाट करेल. याचाही विचार करणे आवश्यक आहे. मीटरची तपासणी झाली पाहिजे.

**श्री.गौतम खरात :** अत्यंत महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा होत आहे. विद्युत मंडळाने पुरवठा खंडीत करण्याबाबतची बातमी देऊन जी चूक केली. त्याचा निषेध करण्यात येतो. शासनाचे आदेश काढल्या बरोबर आपल्या प्रशासनाने काढल्या बरोबर आपल्या प्रशासनाने १ कोटीचा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवला आहे. अर्थसंकल्पात या कामासाठी ६ कोटीची तरतूद केली आहे. तेव्हा या नवीन ठरावानुसार आणखी ६ कोटी आणावयाचे कोठून याचा या ठिकाणी खुलासा झाला पाहिजे. मंडळाने १ कोटीची मागणी केली असली तरी महापालिका जे ५० लाख रुपये देते तेच जास्त आहेत. या मंडळाचे महाराष्ट्रात २ हजार कोटी रुपये थकलेले आहेत. यापैकी नगर जिल्ह्यातील मुळा प्रवरा वीज प्रकल्पाकडे ४५० कोटी थकबाकी आहे. तसेच अहमदनगर जिल्ह्यातील अनेक कारखान्याकडे थकबाकी आहे. त्याबाबत कुठेही वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झालेली नाही. या जिल्ह्यातील अनेक

नगरपालिकांना कमी दराने वीज पुरवठा केला जात आहे. अशीच मागणी आम्ही मा.मुख्यमंत्र्याकडे केली आहे. अनेक वेळा शिष्टमंडळही जाऊन आले आहेत. विकास कामासाठी ठेवलेला पैसा कमी करुन महापालिका तोट्यामध्ये शहरास पाणी पुरवठा करीत आहे. याचा विचार करुन शासनाने विद्युत बिलाची थकबाकी भरण्यासाठी महापालिकेस आर्थिक मदत केली पाहिजे. अशी मागणी आहे. मा.उपमुख्यमंत्री हे मराठवाड्याचे सुपूत्र आहे.

(निषेध, निषेध, निषेध अशा घोषणा देत स.नगरसेवकांना आपले शब्द मागे घ्यावयाला लावा अशी मागणी स.नगरसेवक श्री.संजय जोशी, श्री.संजय केनेकर, श्री.राजकुमार बचाटे, श्री.जयवंत ओक आणि श्री.भगवान घडामोडे यांनी केली.)

**श्री.गौतम खरात :** मा.महापौर, मा.उपमुख्यमंत्र्यांना मी भुमिपुत्र म्हणलो आहे. दुसरे काहीही म्हणलेले नाही. गोंधळ घालणाऱ्या सभासदांना बाहेर काढा.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** ५२ कोटीची जी थकबाकी आहे. ती अनेक वर्षापासुनची आहे. ही बाब स.नगरसेवकाला माहिती नाही. असे दिसते महापालिका थकबाकीची एवढी रक्कम एकत्र भरु शकत नसेल तर दरमहा ७५ लाख रुपये भरावेत, अशी सुचना मा.उपमुख्यमंत्री यांनी त्यावेळी केली आहे. विद्युत मंडळाने थकबाकीबाबत धमकी देण्यास सुरुवात केली. त्यावेळी मा.आयुक्त यांनी शासनाशी पत्रव्यवहार केला आहे. तेव्हा मा.उपमुख्यमंत्री यांनी वरीलप्रमाणे सुचना केली आहे. या सभागृहात निर्णय घेतांना महापालिका ७५ लाखापेक्षा जास्त रक्कम भरु शकत नाही. असा निर्णय घ्यावा. अशी माझी सुचना आहे. रु.५२ कोटी थकबाकी ही मागील अनेक वर्षापासुनची आहे.

**मा.महापौर :** स.नगरसेवकांनी खाली बसुन घ्यावे.

**श्री.गौतम खरात :** विद्युत बिलाच्या थकबाकी बाबत मा.उपमुख्यमंत्र्याचे पत्र ७५ लाखांचे आहे. आणि मा.सचिवांचे पत्र १ कोटीचे आहे. यापैकी कोणत्या पत्रावर आपण विचार करणार आहोत. याचा खुलासा व्हावा. याबाबत ठोस निर्णय घ्यावा. थकबाकी पोटी फक्त ५० लाख रुपये देण्यात यावेत.

**श्री.भगवान घडामोडे :** शासनाने महापालिकेला बरीच मदत केली आहे. याचा स.नगरसेवक श्री.खरात यांनी विचार करावयास हवा आहे. या आर्थिक मदतीतून प्रशासनाने बरीच विकास कामे केली आहेत.

**श्री.जयवंत ओक :** ५२ कोटीची थकबाकी केव्हापासुन आहे. याचा खुलासा व्हावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** विद्युत बिलाची थकबाकी भरण्यासाठी शासनाकडुन शासन सरकारला दोष देणे योग्य नाही. ही थकबाकी कशी भरावयाची याचा विचार करावा व हा प्रश्न सोडवावा. यासाठी कोणत्या लेखा शिर्षकातून पैसा काढण्यात येणार आहे. याचा खुलासा व्हावा. पाणी पुरवठा हा नागरिकांच्या जीवनाचा प्रश्न आहे. तो आपण कसा सोडवणार आहोत याचा विचार यासाठी करण्यात यावा.

**मा.महापौर :** मा.आयुक्त याबाबत खुलसा करतील.

**मा.आयुक्त** पिण्याच्या पाण्याचे वीजेच्या बिलापोटी महाराष्ट्र विद्युत मंडळाला दरमहा १ कोटी रुपये भरावयाचा प्रस्ताव प्रशासनाने सभागृहापुढे मांडला आहे. त्यावर गेली एक तास चर्चा झाली आहे. त्यातून अनेक प्रश्न समोर आले आहे. स.नगरसेवक श्री.रशिद खान (मामू) यांनी याच लाईनवरून ३ ग्रामपंचायत आणि काही कारखाने यांना वीजेचे वेगळे बील देण्यात येते काय असा प्रश्न

विचारला आहे. त्याला नाही असे उत्तर आहे. या बीलात त्याचा समावेश आहे. स.नगरसेवक श्री.गजानन बारवाल यांनी ७५ लाखाचे किती हप्ते देण्यांत येणार आहेत असा प्रश्न विचारला आहे. यामुळे महापालिकेच्या आर्थिक व्यवस्थेवर काय परिणाम होणार आहे. असा विस्तृत प्रश्न आहे. ७५ लाख रूपये दिल्याने महापालिका कुठल्याही प्रकारची थकबाकी फेडू शकत नाही. उलट या थकबाकीत वाढच होत जाणार आहे. पिण्याच्या पाण्यापोटी दरमहा १ कोटी ६६ लाखाचे बील विद्युत मंडळाकडून येते. त्यापैकी आतांपर्यंत आपण फक्त ५० लाख रूपये देत होतो आणि दर महिन्याला १ कोटी थकबाकी त्यावर आकारण्यात येणारे विलंब शुल्क, इलेक्ट्रीसिटी डयुटी, आणि चक्रवाढ व्याज असे मिळून ही थकबाकी ६६ कोटी झाली आहे. अशीच परिस्थिती राहील. तर हा आकडा १०० कोटीच्या वर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. ७५ लाख रूपये दिल्याने विद्युत मंडळाला काही विशेष पैसे देतो की ही बाब आपण मनातून काढून टाकायला हवी. ७५ लाख भरल्याने दरमहा ७५ लाखाची भर थकबाकीत वाढत जाणार आहे. ही बाब सभागृहाने लक्षात घ्यावी. विकासाची प्रचंड कामे चालू आहेत. नागरिकांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. प्रत्येक वार्डात वाचनालय मोठे प्रकल्प पाहिजे अशी मागणी वाढत आहे. लोकप्रतिनिधी जागृत झालेले आहेत. विद्युत मंडळाची थकबाकी झाली म्हणून पहिली नोटीस मार्च मध्ये आली होती. सुदैवाने त्यावेळी मा.मुख्यमंत्री ,मा.उपमुख्यमंत्री औरंगाबादमध्ये आले होते. त्यावेळी मा. महापौर समवेत त्याची भेट घेतली. ८.५ लाख नागरिकांच्या पिण्याचा प्रश्न आहे. याचा विचार करता विद्युत कनेक्शन तोडू नये. अशी विनंती आम्ही मा.मुख्यमंत्री यांना केली. त्यावेळी मा.मुख्यमंत्री यांनी १ कोटी रूपये दरमहा भरा अशी सूचना केली होती. त्यावर महापालिकेची आर्थिक परिस्थिती एवढी रक्कम भरण्यासारखी नाही, अशी विनंती केली असता वाटाघाटीनुसार दरमहा ७५ लाख रुपये भरण्याची सुचना मा.मुख्यमंत्री यांनी केली त्यामुळे विद्युत कनेक्शन तोडण्याची सूचना रद्द झाली. वाटाघाटीनुसार ७५ लाख रूपये भरण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवला तो मान्य करून सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आला होता. यानंतर पाणी पुरवठयाचा विद्युत पुरवठा खंडीत केला जाईल. अशा प्रकारची नोटीस विद्युत मंडळाची जून महिन्यात आली आहे. मा.उर्जा सचिव काही दिवसापुर्वी येथे आले असता त्यांनी ७५ लाखा ऐवजी १ कोटी रूपये विजबिलापोटी भरा असे कळविले. मा. उर्जा सचिवांच्या सूचनेप्रमाणे विद्युत मंडळाने १ कोटी रूपये भरा नाहीतर २९ जून पासून केव्हाही विज पुरवठा खंडीत करू अशा नोटीस मंडळाने दिली. त्या नोटीस प्रमाणे शिष्टमंडळासह मुंबईस रहवाना झाल्यानंतर मा. मुख्यमंत्र्याची भेट न झाल्याने मा. उप मुख्यमंत्री यांची भेट घेतली असता त्यांना दोन महिने ७५ लाख भरावे आणि या बाबत तोडगा काढावा तोपर्यंत विद्युत कनेक्शन तोडू नये असे आदेश दिले आहेत. त्यानंतर १ कोटी रूपये भरण्याचा सल्ला मा. उपमुख्यमंत्री यांनी दिला. त्यानंतर १ कोटी रूपये भरण्याचा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवला आहे. अर्थसंकल्पात विद्युंत बिला पोटी ५० लाख रूपयाची तरतुद केली आहे. प्रस्तावानुसार १ कोटी रूपये भरावयाचे झाल्यास लागणारी ६ कोटीची तरतुद करावी लागेल याच सभागृह पाणीपटट्ी वाढीबाबतचा प्रस्ताव दिला आहे. त्यावेळी त्यावर खुलासा

करण्यांत येईल. ७५ लाख दरमहा दयावयाचे झाले तर ३ कोटीचा फरक पडतो. यासाठी छोटया गल्ल्यात फर्शी, वॉल टू वॉल कारपेंटींग या योजना आपल्या बंद कराव्या लागतील. याचे सविस्तर खुलासा आम्ही आपणाला देवू. विद्युत बिलाच्या थकबाकी बाबत ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळी रात्री जे पंपींग करण्यांत येते त्याचे वेगळे दर विलंब शुल्क इत्यादी बाबत नंतर विचार करण्यांत येईल असे विद्युत मंडळाने सांगितलेले आहे. व १ कोटी रूपये भरण्याची मानसिक तयारी ठेवा अशा सूचना केल्या आहेत.पिण्याचे पाणी पुरविणे महापालिकेचे आद्य कर्त्यव्य आहे. यातून सूटका नाही याचा विचार करता प्रशासनाने जो प्रस्ताव दिला आहे तो सभागृहाने मान्य करावा अशी विनंती आहे.

**मा.महापौर :** सर्व सन्माननीय नगरसेवकांच्या भावना लक्षात घेऊन विद्युत बिला बाबत गेल्या १ तासापासून जी चर्चा चालु आहे. याचा विचार करता विद्युत मंडळास दरमहा ७५ लाख भरण्यात यावेत. पुढील चर्चेसाठी मा.आयुक्त आणि पदाधिकारी यांचे एक शिष्टमंडळाने मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांची भेट घ्यावी. आणि त्यातून विद्युत बिलाबाबत तोडगा काढावा. आणि सध्या ७५ लाख मंजूर करण्यात यावेत यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र.२३/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जायकवाडी ते औरंगाबाद शहरास होणाऱ्या पाणी पुरवठ्यातील विद्युत बिलापोटी दरमहा १ कोटी रुपये विद्युत मंडळाला भरण्याचा प्रस्ताव असला तरी सर्व सभासदांच्या भावना विचार घेता विद्युत बिलापोटी दरमहा रु.७५ लाख रुपये विद्युत मंडळास भरण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच पुढील चर्चेसाठी मा.आयुक्त आणि पदाधिकाऱ्यांचे शिष्ट मंडळाने मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन विद्युत बिलाबाबत तोडगा काढावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४/४ :**

औरंगाबाद शहराकरिता मंजूर विकास योजना मधील हॉटेल अमरप्रित बीड बायपास रोड हा २४.०० मीटर रुंद रस्ता विकासाचे काम पुर्ण करण्यात आले आहे. या रस्त्यावर शहानुरमिया दर्गा जवळ रेल्वेच्या लेव्हल क्रॉसिंगचे काम करणे आवश्यक आहे. हे काम झाल्याशिवाय सदर रस्ता वाहतूकीसाठी खुला करणे शक्य नाही. त्यानुसार या रस्त्यावर रेल्वे क्रॉसिंग काम करणे संदर्भिय रेल्वे विभागाशी पत्रव्यवहार सुरु असून यापुर्वी सर्वसाधारण सभा ठराव क्र.२४/२२ दिनांक २०.०७.१९९६ अन्वये रक्कम रु.९.०० लाख एवढी रक्कम रेल्वे विभागाकडे जमा करण्यांत आली आहे. परंतू रेल्वे विभागाकडुन प्राप्त पत्र जा.क्र./केडब्ल्यु/२८७/आय/केएस/११५/११/१२/ऐडब्ल्युबी/दि.२७.०१.९८ अन्वये त्यांनी कळविले आहे की, सदर रस्त्याची रुंदी जास्त असल्याने सदर कामासाठी रक्कम रुपये ४०.०० लाख भरावे लागतील. यापैकी रु.९.०० लाख महानगरपालिकेने रेल्वे विभागाकडे जमा केलेले आहेत. उर्वरीत रक्कम रु.३१.०० लाख जर महानगरपालिकेने रेल्वे खात्यास देण्याची हमी देत असेल तर सदर रेल्वे क्रासिंगचे काम करण्यांत येईल, असे कळविले आहे.

तरी अमरप्रित हॉटेल ते बीड बायपास रोड या २४.०० मीटर रुंद विकास रस्त्यावर शहानुरमियाँ दर्गाजवळ असलेल्या रेल्वे क्रॉसिंगवर रेल्वे लेव्हल क्रॉसिंगचे काम

करण्याकरिता रेल्वे विभागास रक्कम रु.४०.०० लाखापैकी उर्वरीत रक्कम रु.३१.०० लाख जमा करणे बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव क्र.२४/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजूर विकास योजने नुसार अमरप्रित हॉटेल ते बीड बायपास रोडवरील शहानुरवाडी मियाँ दर्गाजवळ असलेल्या रेल्वे क्रॉसिंगवर रेल्वे लेव्हल क्रॉसिंगचे काम करण्याकरिता रक्कम रु.४० लाखापैकी उर्वरीत रक्कम रु.३१ लाख रेल्वे विभागास जमा करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.आमदार श्री. शालिग्राम बसैये (बंधु) यांनी खालील ठिकाणी लोकोपयोगी विविधा प्रकारच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यापैकी दोन इमारती चे काम पुर्ण झाले असून एका इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. या इमारतींना खालीलप्रमाणे नामकरण करण्याबाबत त्यांनी त्यांचे पत्र दि.३०.१२.९७ अन्वये विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | इमारत | | करावयाचे नामकरण |
|---|---|---|---|
| १. | जसवंतपुरा बायजीपुरा येथील सभागृह | - | परमवीर अब्दुल हमीद सभागृह |
| २. | मिलींदनगर (रेल्वेस्टेशन) येथील सभागृह | - | संत गाडगे बाब सभागृह |
| ३. | बेगमपुरा मनपा शाळेसमोरील समाज मंदिराच्या पहिल्या मजल्यावरील सभागृह | - | हुतात्मा अनंत कान्हेरे सभागृह |

वरीलप्रमाणे इमारतीचे नामकरण करण्याबाबतचा रितसर प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.गजानन बारवाल :** आमदार शालीग्रामजी बैसेये यांना महापालिका हद्दीत जे काम केले आहे. त्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात यावा.

**ठराव क्र.२५/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.आमदार श्री.शालीग्रामजी बसैय्ये (बंधु) यांनी प्रस्तावात अ.क्र.१ ते ३ या ठिकाणी लोकोपयोगी विविध प्रकारच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला असल्याने दि.३०.१२.९७ च्या पत्रकान्वये अ.क्र.१ ते ३ च्या समोर दर्शविल्याप्रमाणे या इमारतीचे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६/६ :**

औरंगाबाद शहर दक्षिण अमेरिकेतील पेरु देशातील "कुस्को" शहराचे जुळे शहर करण्याबाबतचा प्रस्ताव औरंगाबाद महानगरपालिकेने शासन निर्णयानुसार दि.०४.१२.१९९७ च्या सर्वसाधारण सभेच्या मंजूर ठराव क्र.११८/६ ने महाराष्ट्र शासनास सादर केला, महाराष्ट्र शासनाने भारत सरकार कडे प्रस्ताव सादर केला असता त्यास भारत सरकारने नगर विकास विभागाचे पत्र के.एन.-११०२५/४७/९६-यु.डी.सी.-दि.२८.०४.९८ ने मान्यता

देऊन त्या संदर्भात सामंजस्य करार करण्यास शासनाची हरकत नसल्याचे कळविले आहे. सोबत "सामंजस्य करार" चा मसुदा सादर केला असून सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर शासन निर्देशानुसार मसुदा नगर विकास विभाग (भारत सरकार) यांचेकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येईल.

करीता सामंजस्य कराराचा (Memorondum of Understaining) मसूदा मान्यतेसाठी सादर. मसुदा सोबत जोडला आहे.

**औरंगाबाद शहर व कुस्को (पेरु दक्षिण अमेरीका) मधील समंजस्य कराराचा मसुदा :**

१. औरंगाबाद शहर व दक्षिण अमेरीकेतील पेरु देशातील "कुस्को" शहराचे जुळे शहर करण्यासाठीचे प्रस्ताव नगर विकास विभाग भारत सरकार यांनी मान्यता देऊन त्यांसदर्भात "सामंजस्य करार" करण्यास भारत सरकारची हरकत नसल्याचे कळविले आहे.

२. **"जुळे शहर" या संकल्पनेची प्रमुख उद्दीष्टे व मार्गदर्शक तत्वे :**

२.१ दोन शहरात उत्तम समन्वये व उपयुक्त माहितीची देवाण घेवाण यास प्राधान्य.

२.२ दोन शहरातील मैत्री संबंध प्रस्थापित करुन ते दृढ करणे.

२.३ कला साहित्य, संस्कृती, भाषा इ.चे अभ्यासासाठी त्या-त्या शहरातील नागरिकांना प्रोत्साहित करणे.

२.४ वैद्यकीय, शैक्षणिक सामाजिक, प्रशासकीय तसेच साहित्य, क्रिडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यरत व्यक्ती/मान्यवरांच्या भेटीचे आयोजन करुन त्या योगे त्या-त्या क्षेत्रातील विविध संकल्पना नवीन विचार, इतरांचे अनुभव इ.बाबत वैचारिक देवाण घेवाण करणे.

२.५ युवा संघटना, व्यापारी/औद्योगिक प्रतिष्ठाने, सामाजिक सेवा, संघटना इ.चे जुळ्या शहरातील समकक्ष संघटनाशी संबंध प्रस्तापित करुन विकसीत करणे.

२.६ शहर विकास, नागरी सुविधा विकसीत करणे, नागरी समस्या सोडवणे, उदा.निवारा, परिवहन व दळळवळण जमिनीचा वापर इ.बाबत तज्ञाचे मार्गदर्शन, सेवा उपलब्ध करणे.

२.७ जुळ्या शहरातील नागरिकांना/कुटूंबाना आमंत्रित करुन एकमेकांचे राहणीमान दैनंदिन जिवन, एकमेकांचे सामाईक प्रश्न, समस्या समजावून घेऊन त्याबाबत माहिती घेवुन उपाययोजना करणे.

२.८ आंतरराष्ट्रीय संबंध, सामंजस्य व संस्कृती समृध्द करण्यास प्राधान्य.

२.९ उद्योग धंदे, उद्योगधंद्यातील गुंतवणूक, तंत्रज्ञानाचा विकास, देवाणघेवाण इ.बाबी प्राधान्य.

३. ह्या जुळ्या शहरातील नागरिकांनी स्वखर्चाने जुळ्या शहरास भेट द्यावयाचे अपेक्षित असून त्यांची राहण्याची व इतर व्यवस्था त्या-त्या शहरातील नागरिकांना त्यांना आपल्या कुटूंबात समावून घेवून करावयाची आहे. स्थानिक स्वराज्य संस्था/महानगरपालिकेचा आर्थिक सहभाग मर्यादित असून त्यामध्ये फक्त स्थानिक सहली विविध ठिकाणास भेटीचे व त्यासाठी वाहतूक व्यवस्थास इ. किंवा परस्परांच्या संमतीने ठरणाऱ्या बाबी.

४. या योजने अंतर्गत प्रत्येक प्रकरणी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडुन राजनैतिक दृष्टीने व अर्थ विभागाकडुन वित्त मंत्रालयाकडुन परकीय चलनाचे दृष्टीने मंजूरी होणे आवश्यक आहे.

५. "कुस्को" शहराचे नागरिकांना/तेथील शिष्ट मंडळास जुळे शहर योजने अंतर्गत भारत भेटीसाठी विहित पध्दतीने/कार्यवाही अंतर्गत भारत सरकारच्या संबंधित विभागाची मंजूरी आवश्यक असून त्याप्रमाणे पुर्तता करावी लागेल.

६. महापालिका सदस्य, शासकीय अधिकारी, सांस्कृतिक समूह/ग्रुप इ.साठीही अशा भेटी करीता भारत सरकारची शासकीय धोरणानुसार निर्देशानुसार परवाना मंजूरी घेणे आवश्यक आहे.

**Draft of Memeorandum of Understanding between. Aurangabad City form Maharashtra (India) & CUSCO Peru.**

The proposal to twining of Aurangabad Maharashtra (India) with the CUSCO (Peru) has been approveel by the Govt. of India Ministry of Urban Affairs & Employment (Dett. of Urban Developement)

The Ministry has further given "No Objection" to the signing of the Twining Agreement (Memorandum of Understanding) between the representative of Aurangabad Municipal Corporation & CUSCO city (Peru)

2. The main guideline / objectives of twining are

2.1 To Promote better understanaing & exchange of useful information.

2.2 To strengthen bond of friendship between both cityes.

2.3 To encourange the study of culture, art, literature & hanguage of these both twinned city cityes for better understanding between citizens.

2.4 To promote exchange visites of persons in the field of health education, & social services between these both cities, exchange of material & information regarding different aspect of city administation & also in the field of culture & literature.

2.5 To encourage establishment of links between non Governmental organisation, touth bodies & trade associations in these twin cities.

2.6 To make avail aoleexpenline in the matter of provision of services & shelter, landuse transportion & other urban development matter.

2.7 To promote international understanding food will enrichment of culture.

2.8 To invite people of the twinned cities to undertake visites & specil facility encourage femilies or associations in the cities to accept the families from other cities as guests in order to observe the life style of citizen closely & to indentity common problems & solutions.

2.9 To promote exchange in the area of trade & incistment also, in the areas of technological growth & excellance the twinning snould take place between recognised cities having the informal designation of commercial or business capitals of the countries. Concerneed in keeping with the potential for high level of co-operation & colla boration in the above areas.

3. The finicial involvement of concerned local body is restricted only to arranging local tours, transport etc as mutually agreed. The persons/families visiting CUSCO/ AURANGABAD Under this scheme are expected to undertake the tour with their own finance & will accomodated in families form respective cities.

4. In this scheme each case is to be cheared by the Ministry of External Affaires from political angle & by the Department of Economics Affairs & Ministry of Finance for Foreign Exchange implications.

5. Visits of Citizen of CUSCO (delegation) in pursuance of twinning arrangements follow established procedure relating to visits & obtaining clearance from concerned Department of Govt. of India.
6. For the visits of cultural troupe of Municipal Councillors/Govt. officials should be as per the Govt. prescribed scales & also that prior approval of Govt. of India is obtained for such visits.

**ठराव क्र.२६/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर हे दक्षिण अमेरिकेतील पेरु क्षेत्रातील "कुस्को" शहराचे जुळे शहर करण्याच्या प्रस्वातास भारत सरकारचे नगर विकास विभागातील पत्र क्र.एन-११०२५/४७/९६-युसीडी, दि.२८.०४.९८ अन्वये मान्यता दिली असल्याने त्या संदर्भाने प्रस्तावात दर्शविलेला सामंजस्य करार करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७/७ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, १९९८-९९ च्या अर्थसंकल्पात मालमत्ता कर वसुली संदर्भाने खालील प्रमाणे प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे.

१. जे नागरिक खालील निर्धारित वेळेच्या आंत मालमत्ता कराचा पुर्ण भरणा करतील त्यांना खालीलप्रमाणे सवलत देण्यांत येईल.
२. ३० जून पुर्वी थकबाकीसह पुर्ण रक्कमेचा भरणा केल्यास ५% सवलत.
३. ३१ जुलै पुर्वी भरणा केल्यास ४% सवलत.
४. ३१ ऑगस्ट पुर्वी भरणा केल्यास ३% सवलत.
५. ३० सप्टेंबर पुर्वी भरणा केल्यास २% सवलत.
६. ३१ ऑक्टोंबर पुर्वी भरणा केल्यास १% सवलत.

सध्या मालमत्ता कराची बिले बनविण्याचे काम चालु असून जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात हे काम पुर्ण होऊ शकेल व त्यानंतर मागणी पत्रके वितरीत करण्याचे काम सुरु होईल. ही बाब लक्षात घेता उक्त प्रमाणे देण्यात येणाऱ्या सवलतीत मुदतवाढ दिल्यास जास्तीत जास्त मालमत्ताधारक थकबाकीसह कराचा भरणा करतील. अशी प्रशासनाची धारणा आहे. त्यामुळे अर्थसंकल्पीय प्रस्तावातील थकबाकी न भरणाऱ्या मालमत्ता धारकाविरुध्द आकारण्यांत यावयाचे व्याज नळ/ड्रेनेज कनेक्शन तोडणे या बाबी तशाच ठेवून खालीलप्रमाणे सुधारित प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

**१) पहिला प्रस्ताव :**

जे नागरीक खालील निर्धारित वेळेच्या आंत मालमत्ता कराचा पुर्ण भरणा करतील त्यांना खालीलप्रमाणे सवलत (सुट) देण्यांत यावी.

१. ३० सप्टेंबर पुर्वी थकबाकीसह पुर्ण रक्कमेचा भरणा केल्यास ५% सवलत.
२. ३१ ऑक्टोंबर पुर्वी भरणा केल्यास ४% सवलत.
३. ३० नोव्हेंबर पुर्वी भरणा केल्यास ३% सवलत.
४. ३१ डिसेंबर पुर्वी भरणा केल्यास २% सवलत.
५. ३१ जानेवारी ९९ पुर्वी भरणा केल्यास १% सवलत.

या सवलतीमुळे शहरातील नागरिक मालमत्ता कराचा लवकरात लवकर भरणा करतील अशी अपेक्षा आहे.

२) **दुसरा प्रस्ताव :**
ज्या नागरीकांकडे मालमत्ता कराची थकबाकी आहे, व ज्यांनी वरील सवलतीचा फायदाही घेतलेला नाही व ज्यांनी नोटीस दिल्यानंतरही कराचा भरणा केला नाही अशा मिळकत धारकांकडुन थकबाकीसह मालमत्ता करावर दरसाल दरशेकडा ५% व्याजासह रक्कम वसुल करण्यांत यावे.

**ठराव क्र.२७/७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मालमत्ता कराची बिले बनविण्याचे काम जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात पुर्ण होऊन मागणी पत्रके वितरीत करण्याचे काम सुरु केले जाईल ही बाब लक्षता घेता थकबाकी न भरणाऱ्या मालमत्ता धारकां विरुध्द आकारण्यात यावयाचे व्याज, नळ/ड्रेनेज कनेक्शन तोडणे या बाबी तशाच ठेऊन सन १९९८-९९ या वर्षात मालमत्ता कराचा भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना खालीलप्रमाणे सुधारित सवलत (सुट) देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

१)

१. ३० सप्टेंबर पुर्वी थकबाकीसह पुर्ण रक्कमेचा भरणा केल्यास ५% सवलत.
२. ३१ ऑक्टोंबर पुर्वी भरणा केल्यास ४% सवलत.
३. ३० नोव्हेंबर पुर्वी भरणा केल्यास ३% सवलत.
४. ३१ डिसेंबर पुर्वी भरणा केल्यास २% सवलत.
५. ३१ जानेवारी ९९ पुर्वी भरणा केल्यास १% सवलत.

२) ज्या नागरिकांकडे मालमत्ता कराची थकबाकी आहे. व वरील सवलतीचा फायदाही घेतलेला नाही. नोटीस दिल्यानंतरही कराचा भरणा केला नाही. अशा मिळकत धारकांकडुन थकबाकीसह मालमत्ता करावर दरसाल दर शेकडा ५% व्याजासह रक्कम वसुल करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८/८ :**

मालमत्ता अधिकारी यांचेकडुन मा.आयुक्तांच्या मंजूरीनुसार प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी टपऱ्यांची जागा देण्याबाबत धोरण निश्चित करण्याकरिता स्थायी समिती ठराव क्र.१९ दि.०९.०६.१९९५ ला टपरी उप समिती गठीत करण्यांत आली होती. समिती मध्ये प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी घेण्यात आले होते. सदर समिती मार्फत रस्त्याचे सर्वेक्षण करुन शहरातील अनाधिकृत, अधिकृत व बंद टपऱ्या बाबत माहिती घेऊन कोठे जागा उपलब्ध होते, त्या ठिकाणी संख्याची पाहणी करण्यांत आली व अहवाल सादर केला.

उपरोक्त समितीने सादर केलेल्या टपरी अहवाल मंजूरीस्तव सर्वसाधारण सभेने ठराव क्र.१६२/२ दि.१६.०३.९६ वर सभेत चर्चा करुन मान्यता दिली होती. परंतू फॉर्म वाटप व टपऱ्याबाबत धोरण निश्चित झाले नाही.

त्यावेळी मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठण करुन फॉर्म वाटप करणे बाबत बैठका घेण्यात आल्या. परंतू निर्णय झाला नाही. नंतर पुन्हा सर्व साधारण सभेत फॉर्म वाटत व टपरी बाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला.

त्यास दि.२७.०३.९८ च्या सभेत ठराव क्र.१८६/९ अन्वये टपरी समितीने केलेल्या शिफारशी मुद्दा क्र.४,५,,६,७ व ८ अन्वये स्वीकृतीसह मंजूरी देण्यात आली.

तथापि, मालमत्ता विभागाने टपरी फॉर्म तयार करुन ठेवले आहेत. परंतू फॉर्म कसे वाटावयाचे यांचे धोरण निश्चित झाले नसल्याने टपरी समितीच्या अहवालातील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीस पात्र राहुन त्या पारदर्शकता राहण्यासाठी खालीलप्रमाणे प्रशासकीय समिती व पदाधिकारी समिती गठीत करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. गठीत प्रशासकीय समितीसमोर आलेल्या अर्जदार मा.आयुक्त यांनी दि.०२.०६.९६ च्या दिलेल्या सुचनानुसार विचार करुन, येणाऱ्या अर्जांची पडताळणी करुन, प्रशासकीय समिती आठ दिवसांच्या आत पदाधिकारी समितीसमोर टपरी वाटप बाबत अहवाल सादर करील. त्यानंतर त्या अर्जांना पदाधिकारी समितीने शिफारस केल्यास मालमत्ता विभागाकडुन इतर अटींची पुर्तता करुन परवानगी देण्यांत येईल.

तरी प्रशासन समिती व पदाधिकारी समिती खालील प्रमाणे असावी असे वाटते.

**प्रशासकीय समिती :**

१. मा.उपआयुक्त (महसुल)
२. मा.सहाय्यक संचालक नगर रचना.
३. मा.अतिरिक्त शहर अभियंता.
४. मा.मालमत्ता अधिकारी.
५. शहर वाहतूक शाखा पोलिस उप-निरिक्षक

**पदाधिकारी समिती**

१. मा.महापौर.
२. मा.उपमहापौर.
३. मा.स्थायी समिती सभापती.
४. संबंधित वॉर्डाचे नगरसेवक/नगरसेविका.

टपरी समितीने मंजूर केलेल्या अटी-शर्तींचे पालन करुन सदर प्रकरणात पारदर्शकता राहण्यासाठी वरीलप्रमाणे समिती गठीत करणेस विचार व्हावा.

तरी सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर :** कॉलनी अंतर्गत जे रोड असतात ते ३० फुटाचे असतात तेव्हा अशा ठिकाणी टपरी टाकण्यासाठी पोलिसाच्या ना हरकत प्रमाणपत्राची गरज असू नये. अशी दुरुस्ती करण्यात यावी. तसेच ८०० व १०० फुट जे रोड असतील त्यावर टपऱ्यांना परवानगी देण्यांत येऊ नये.

**श्री.जयवंत ओक :** या शहरात ज्या विनापरवाना टपऱ्या आहेत. अशा टपऱ्यांकडुन महापालिका पैसे वसुल करते काय? या शहरात विनापरवाना टपऱ्यांची संख्या वाढत आहे. या टपऱ्या मनमानी करुन ५० हजार घेऊन भाड्याने दिल्या जातात. उलट महापालिका टपरीधारकांकडुन रु.७५, रु.१५०, रु.२०० असे भाडे वसुल करीत आहे. एकाच नागरिकांकडे ४/४ टपऱ्या आहेत. याबाबत प्रशासनाने काय विचार केला आहे. ज्या विनापरवानगी टपऱ्या आहेत त्यापैकी ७५% टपऱ्या कडुन महापालिका भाडे वसुल करीत नाही. तेव्हा ८०, १०० फुट रस्त्यावर किती टपऱ्या आहेत किती टपऱ्यांची भाडे वसुल होते. याबाबत प्रशासन काय कार्यवाही करणार याचा खुलासा व्हावा.

**श्री.हमीदोद्दीन ताबा :** आचार संहिता काळात महापालिकेने किती टपऱ्यांना परवाना दिला याचा खुलासा व्हावा. टपरीबाबतचा जो प्रस्ताव आज सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे. त्यापुर्वी प्रशासनाने १५० टपऱ्याबाबत प्रस्ताव वाहतुक नियंत्रण

विभागाकडे पाठवित असल्याची माहिती मिळाली आहे. आणि त्यानंतर हा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आला हा ठराव सभागृहाची दिशाभूल करणार आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** शहरात सुशिक्षित बेकारांची संख्या वाढत आहे. उपजीवीके साठी हे युवक टपऱ्या उभारुन स्वत:च्या व्यवसाय उभारत आहेत. पण महापालिका त्यांच्या टपऱ्या उठविण्याच्या विचार करत आहे. जुन्या ज्या टपऱ्या आहेत. त्यांच्याकडुन नियमाप्रमाणे भाडे वसुल करण्यात यावे. नवीन टपऱ्यांना परवानगी देतांना विचार करावा. रेल्वे स्टेशन येथील रस्ता रुंदीकरणात ज्या टपऱ्या उठविल्या आहेत. त्यांना महापालिकेने पर्यायी जागा दिली आहे. प्रस्तुत प्रस्तावानुसार जी उपसमिती नेमण्यांत आली आहे. त्या मा.विरोधी पक्ष नेता याचा समावेश असावा. अशी सुचना आहे. ९५ पर्यंत ज्या टपऱ्या बसल्या आहेत. त्या हलवु नयेत.

**श्री.जयवंत ओक :** प्रस्तुत प्रस्तावात सभागृहापुढे मंजूरीला येण्यापुर्वी प्रशासनाने १५० टपऱ्याबाबतचा प्रस्ताव वाहतूक नियंत्रण विभागाकडे पाठविण्याची माहिती मिळाली आहे. सभागृहाने टपरी बाबतचा ठराव अद्याप मंजूर केला नाही. तेव्हा या १५० टपऱ्याबाबतचा प्रस्ताव रद्द करावा. टपरीसाठी फक्त रु.७५/-, रु.१००/- या प्रमाणात भाडे आकारण्यात येते. त्यातही वाढ झाली पाहिजे.

**श्री.भगवान घडामोडे :** प्रस्तुत प्रस्तावावर बरीच चर्चा झाली आहे. शहरात ज्या टपऱ्या आहेत. मग त्या ९५ पुर्वीच्या असोत किंवा त्यानंतरच्या असोत जर या टपऱ्या काढुन टाकण्यात याव्यात.

**मा.महापौर :** सर्व सन्मानिय नगरसेवकांच्या भावना लक्षात घेता ज्या १५० विनापरवानगी टपऱ्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनातर्फे वाहतूक नियंत्रण विभागाकडे पाठविण्यात आला आहे तो प्रस्ताव रद्द करण्यांत येतो. या बाबत मा.आयुक्त यांनी चौकशी करुन पुढील सभेत चर्चेला ठेवावा.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** अधिकाऱ्यांनी माझ्या वार्डात टपऱ्या बसवल्या आहेत. नगरसेवक यांना विश्वासात घेतलेशिवाय या टपऱ्यांना परवानगी द्यावयाची नाही असा ठराव झाला आहे. मग या टपऱ्यांना परवानगी कशी देण्यांत आली याचा खुलासा व्हावा.

**सौ.लता दलाल :** सन १९९५ पासुन टपऱ्याबाबत सभागृहात चर्चा चालु आहे. टपऱ्यांना परवानगी दिली तर त्याबाबतचा प्रस्ताव सभागृहासमोर निर्णयासाठी ठेवण्यात आला होता का? १५० नागरिकांना टपऱ्या देण्याबाबतची यादी शहर वाहतूक विभागाकडे पाठविली आहे. हे खरे आहे काय? ही यादी कोणत्या अधिकारात पाठविली आहे. स.नगरसेवक श्री.विकास जैन त्यांच्या वार्डात टपऱ्यांना परवानगी दिली आहे. पण त्याबाबतची माहिती संबंधित नगरसेवकांना नाही. तेव्हा या टपऱ्या कोणाच्या दबावासाठी देण्यांत आल्या आहेत. याचा खुलासा व्हावा.

**मालमत्ता अधिकारी :** सभागृहाच्या निर्णयानुसार टपऱ्या देतांना सहाय्यक संचालक, नगर रचना आणि वाहतूक नियंत्रण कक्ष यांच्याकडुन ना हरकत प्रमाणपत्र घेतल्यानंतर टपऱ्या परवानगी द्यावी असे ठरले आहे. त्याप्रमाणे प्रशासनाने टपऱ्या दिल्या आहेत.

**श्री.स.अली मिरा सलामी :** मध्यवर्ती बसस्थानक आणि प्रशासकीय मुद्रणालय या ठिकाणी टपऱ्या हलवल्या आहेत. त्यांना इतरत्र जागा द्यावी. मा.विरोधी पक्ष नेता यांचा टपरी कॅमिटीत समावेश करण्यात यावा.

**ठराव क्र.२८/८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभा ठराव क्र.१८६/९, दि.२७.०३.९८ अन्वये टपरीबाबत समितीच्या शिफारशीनुसार मुद्दा क्र.४ ते ८ अन्वये मंजूरी मिळाली असली तरी फॉर्म कसे वाटावयाचे या बाबतचे धोरण निश्चित न झाल्यामुळे टपरी समिती सर्व अटी व शर्तीस पात्र राहुन फॉर्म वाटपाबाबत खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१) प्रशासकीय समिती :

१. मा.उपआयुक्त (महसुल),

२. मा.सहा.संचालक, नगर रचना,

३. मा.अति.शहर अभियंता,

४. मा.मालमत्ता अधिकारी

५. मा.पोलिस निरिक्षक, शहर वाहतूक शाखा मा.आयुक्त यांच्याकडील दि.०२.०६.९८ च्या सुचनानुसार उक्त समिती आलेल्या अर्जाची आठ दिवसांचे आंत पडताळणी करुन पदाधिकारी समिती आपला अहवाल सादर करील.

२) पदाधिकारी समिती

१. मा.महापौर

२. मा.उपमहापौर

३. मा.स्थायी समिती, सभापती

४. संबंधित वार्डाचे नगरसेवक

उक्त समिती टपरी समितीने मंजूर केलेल्या अटी/ शर्तीचे पालन करुन सदर प्रकरणात पारदर्शकता राहील. अशाप्रकारे शिफारस करुन मालमत्ता विभागाकडुन टपरीची परवानगी देण्यांत येईल. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, क्रांतीचौक ते महाविर चौक या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्यांच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४५,५८,७४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकात रस्त्याच्या दोन्ही बाजुने २.०० मी रुंदीचे रस्ता रुंदीकरण करणे. (खडीकरण करणे) व रस्त्याच्या दोन्ही बाजुस १०.५० मी. रुंदी गृहीत धरुन एकूण २१.०० मी. रुंदीचे डांबरीकरण करावयाचे प्रस्तावित आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडुन प्राप्त रक्कम रु.४.०० कोटी व मनपाचा हिस्सा रक्कम रु.४.०० कोटी असे एकूण आठ कोटी मधुन करण्यांत येईल. सदर कामासाठी लागणाऱ्या रक्कमेच्या ५० टक्के मनपाचा हिस्सा हा सन १९९८-९९ या आर्थिक वर्षाच्या बजेट मधील "भांडवली रस्ते" या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतूदीमधुन वळती करुन घ्यावी लागेल.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४५,५८,७४०/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव क्र.२९/९:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक ते महावीर चौकापर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण आणि डांबरीकरण करण्याच्या कामसाठी रक्कम रु.४५,५८,७४०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०/१०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, महावीर चौक ते रेल्वेस्टेशन या रस्तयाचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार र.रु. ४९,३२,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास रस्त्याच्या दोन्ही बाजूने ९.०० मी. रुंदी गृहित धरून एकुण १८.०० मी. रुंदीचे डांबरीकरण करावयाचे प्रस्तावित आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त र. रु. ४.०० कोटी व म.न.पा. चा हिस्सा र.रु. ४.०० कोटी असे एकूण आठ कोटी मधून करण्यात येईल. सदर कामासाठी लागणाऱ्या रकमेच्या ५० टक्के मनपाचा हिस्सा हा. सन ९८-९९ या आर्थिक वर्षाच्या बजेट मधील "भांडवली रस्ते" या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून वळती करून घ्यावी लागेल.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४९,३२,५००/- चे अंदाजपत्रक मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र.३०/१०:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महावीर चौक ते स्टेशनपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यांच्या रक्कम रु. ४९,३२,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१/११:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मूथीयान कॉर्नर ते पीरबाजार रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ११,३९,७१०/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च ९८-९९ या शासकीय अनुदान (डांबरीरस्ते) ४ कोटी मधून करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र.३१/११:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुथीयान कॉर्नर ते पीरबाजारपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रुपये. ११,३९,७१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२/१२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने नेहरू बालोद्यान येथे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्राहलयाचे काम प्रगती पथावर असून या संग्रहालयात सातवाहनकालीन वस्तुचे एक दान असावे असे या पूर्वीच ठरले आहे.

या कामी पुराण वस्तु मिळविण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून मा. आयुक्त साहेबांचे मार्गदर्शनाखाली व त्यांचे नेतृत्वाखाली इतिहासतज्ञ डॉ. मोरवंचीकर साहेब (निवृत्त इतिहास विभाग प्रमुख डॉ. बाबाबसाहेब आंबेडकर महराठवाडा विद्यापीठ) व अतिरिक्त शहर अभियंता, तसेच उप-अभियंता (बांधकाम-१) हे तेर,भूम उस्मानाबाद, वाशि इ. ठिकाणी जाऊन आले. या दौऱ्यात त्यांनी ज्या ज्या ठिकाणी शिवकालीन अथवा सातवाहन कालीन वस्तु मिळण्याची शक्यता आहे, त्या त्या ठिकाणी जाऊन अनेक व्यक्तीशी संपर्क साधून चर्चा केली. त्यात प्रामुख्याने खालील ठिकाणी संपर्क व चर्चा करण्यात आली.

१) श्री. रेवणसिध्द लामतुरे, तेर, जि. उस्मानाबाद
२) श्री. विजयराजे थोरात, मु. भुम, जि. उस्मानाबाद.
३) श्री. अरुणोजीराव श्रीनिवासराव देशमुख मु. वांशी, जि. उस्मानाबाद.

वरिल पैकी श्री. विजयराजे थोरात व श्री अरुणोजीराव देशमुख यांनी त्यांचेकडे वस्तु नसल्याचे सांगितले. मात्र श्री. रेवणसिध्द लामतुरे, मु. तेर, जि. उस्मानाबाद यांचेशी चर्चा व संपर्क केला असता, त्यांनी सातवाहनकालीन अनेक वस्तु दाखविल्या. या वस्तुची यादी इतिहास तज्ञ डॉ. मोरवंचीकर साहेब यांचे मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली असून त्यात एकूण २८० वस्तू संग्रहालयात मांडून ठेवण्यायोग्य आहेत. या वस्तु प्रामुख्याने इ.स. पूर्ण पहिले शतक ते तिसरे शतक या कालावधीतील आहेत.

या वस्तु औरंगाबाद महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालया करिता देण्याची विनंती मा. आयुक्त साहेबांनी श्री. रेवणासिध्द लामतुरे यांना केली व त्यांच्या काही अटी किंवा शर्ती आहेत काय या बाबत त्यांच्याशी चर्चा केली असता रेवणसिध्द लामतुरे यांनी खालील प्रमाणे अटी समोर ठेवल्या.

१) मा. रेवणसिध्द लामतुरे यांना श्रीमती छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय सल्लागार समितीवर सदस्य म्हणून घेण्यात यावे.
२) सल्लागार समितीच्या वर्षातुन किमान ३ ते ४ बैठका घेण्यात याव्यात व त्या बैठकीचे नियंत्रण मा. रेवणसिध्द लामतुरे यांना देण्यात यावे, जेणे करून संग्रहालय उभारणी व भविष्यातील विकास कामी त्यांना सहभागी होता येईल.
३) मा.श्री.रेवणसिध्द लामतुरे यांनी कोणत्याही स्वरुपात मानधन त्यांना नको असल्याचे नमुद केले. मात्र त्यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली की, ज्यांच्या अथक प्रयत्नामधुन या दुर्मिळ पुराणवस्तु जमा झाल्या ते कै.रामलिंग अप्पा लामतुरे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ महानगरपालिकेने रु.२५,०००/- (रुपये पंचविस हजार फक्त) महानगरपालिका, औरंगाबादच्या हद्दीत श्री.रेवणसिध्द लामतुरे सुचवितील त्या विकास कामी खर्च करावे.
४) श्री. रेवणसिध्द लामतुरे यांची भाची जी सध्या उस्मानाबाद जिल्हा परिषदेअंतर्गत रुग्णालयात परिचारिका म्हणून कायमस्वरुपी नौकरीत आहे, तिला औरंगाबाद महानगरपालिकेस तिच्या आतापर्यंतच्या जिल्हा परिषदेमध्ये झालेल्या सेवेनुसार वेतन व भत्ते देऊन सेवेत घेण्यात यावा.

वरील चार अटी श्री.रेवणसिध्द लामतुरे यांनी मांडल्या असून, त्यांचेकडील सुमारे २८० वस्तु महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन देण्यांस संम्मती दर्शविली आहे.

तरी वरील अटींचा विचार करता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव व विचारार्थ सादर. जर अटी मंजूर असतील तर श्री.लामतुरे यांचेशी करारनामा करण्यांत येईल. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.अब्दुल रशीद (मामू)** : छत्रपती शिवाजी महाराज पुराणावस्तु संशोधन केंद्रासाठी किती सामानाची आवश्यकता आहे. यापुर्वी डॉ.पुरेवार यांच्याकडुन सामान घेतले आहे. त्याबाबत डॉ.पुरेवार यांच्याकडुन अद्याप सामान मिळाले नाही. यासाठी खर्च होत आहे. आतापर्यंत या केंद्रासाठी किती सामान मिळाले आहे. या सर्व बाबींचा खुलासा व्हावा.
**मा.आयुक्त :** छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संशोधन केंद्राचे काम अंतिम टप्प्यात आहे.
**मा.महापौर :** विषय क्र.१२ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव क्र.३२/१२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संशोधन केंद्रातील सातवाहन कालीन वस्तुचे दालनासाठी मु.तेर, जि.उस्मानाबाद येथील श्री.रेवणसिध्द लामतुरे यांच्याकडील २८० वस्तु प्रस्तावातील अ.क्र.१ ते ४ पर्यंतच्या अटीनुसार संबंधितांकडुन हस्तांतर करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका मार्फत हाती घेण्यांत आलेल्या वेगवेगळ्या कामासाठी सिमेंटची आवश्यकता आहे. त्यानुसार ५०,०००/- गोणी सिमेंट खरेदी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९७-९८ वर्षाच्या दरसुची नुसार प्रति गोणी रु.१२५/- प्रमाणे (भांडारात पोचते) रक्कम रु.६२,५०,०००/- चे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यांत आले. त्यास मा.आयुक्त साहेब यांनी दि.२२.०५.१९९८ रोजी मान्यता दिली आहे. खर्च साठा खरेदीसाठीच्या तरतूदी मधून करण्यांत येईल.

तरी वरीलप्रमाणे प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र.३३/१३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकेमार्फत हाती घेण्यांत आलेल्या वेगवेगळ्या कामासाठी आवश्यक असलेले ५०,०००/- गोणी सिमेंट खरेदीसाठी रक्कम रु.६२,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.३४/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.रोजेबाग येथे प्राथमिक शाळा बांधावयाची आहे. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९५-९६ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.१०,३८,५५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामासाठीची जागा महानगरपालिकेच्या मालकीची नसुन ती जागा दर्गा हजरत अब्दुल रज्जक यांचे नांवे असून जागे बाबत वक्फ बोर्डाने एन.ओ.सी. दिलेली आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.०६.०६.१९९८ रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब उपरोक्त कामचे अंदाजपत्रक रक्कम रु.१०,३८,५५०/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ. सदरील कामाचा खर्च रुपये ७,५३,२१२/- ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखाशिर्षा अंतर्गत व उर्वरीत रक्कम रुपये २,८५,३३८/- सी.ऐ. इमारती सन १९९८-९९ या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र.३४/१४ :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दर्गा हजरत अब्दुल रज्जाक यांचे नांवे असलेल्या जागेवर शाळा बांधण्यासाठी वक्फ बोर्डाने ना हरकत प्रमाणपत्र दिल्यामुळे रोजेबाग येथे प्राथमिक शाळेची इमारत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रुपये १०,३८,५५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदरील कामाचा खर्च ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजने अंतर्गतातील लेखाशिर्षकातून रुपये ७,५३,२१२/- आणि सी.ए.इमारती या लेखा शिर्षकातून रु.२,८५,३३८/- याप्रमाणे करण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३५/१५ :-**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, पुंडलिक नगर व लगतच्या वसाहतीसाठी पाणी पुरवठा करावयाचा आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ तर्फे रक्कम रु.४९६.७० लाखाची योजना तयार केली आहे. त्यामध्ये मुख्य गुरुत्व जलवाहिनी व विविध व्यासांच्या वितरण वाहिण्या टाकण्यांच्या कामांचा समावेश आहे. सदरची योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळातर्फे राबविण्यांत येणार असून योजना पुर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेस देखभाल व दुरुस्ती करिता हस्तांतरीत करुन घ्यावी लागणार आहे.

करिता पुंडलिकनगर व लगतच्या परिसरासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या योजनेस व व्यासाची येणाऱ्या खर्चाच्या मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :-**

**श्री.संजय केनेकर :** प्रस्तुत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे या कामासाठी शासनाकडुन अनुदान मिळाल्यामुळे असल्याने या प्रस्तावात सभागृहाने काय मंजूरी द्यावयाची त्याची आवश्यकता काय? याबाबत खुलासा करावा.

**श्री.संजय जोशी :** प्रस्तावातील कामासाठी जर शासन पैसा देत आहे तर हा प्रस्ताव सभागृह कशा करता मंजूर करत आहे. पुंडलिकनगर व त्यालगतच्या परिसरातील पाणी पुरवठा योजनेसाठी परिसर प्राधिकरण खर्च करणार आहे. किंवा महापालिका खर्च करणार आहे. जर प्राधिकरण खर्च करणार असेल तर सभागृहाच्या मंजूरीची काय आवश्यकता आहे.

**मा.आयुक्त :** महापालिका हद्दीत कोणती कोणती पिण्याच्या पाण्याची योजना राबवावयाची असेल तर त्या योजनेला महापालिकाची परवानगी आवश्यकता असते ही योजना प्राधिकरण राबविणार असेल तरी परवानगीची गरज असते. योजनेच्या अंदाजपत्रकात वाढ झालेली आहे. ती ५ कोटी २७ लाख पेक्षा जास्त झाली आहे. या योजनेत पाणी वितरण व्यवस्थेचा समावेश आहे.

**ठराव क्र.३५/१५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुंडलिकनगर आणि त्या लगतच्या वसाहतीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळातर्फे तयार करण्यांत आलेल्या पाणी पुरवठा योजनेसाठी (मुख्य गुरुत्वा जलवाहिनी व विविध व्यासाच्या वितरण वाहिन्या टाकण्यासह ) रक्कम रु.४९६.७० लाखाच्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३६/१६ :**

कार्यालयीन आदेश जा.क्र./मआ/स्वीस/सी.आर.-८/९७/५२९, दि.१५.०७.१९९८ अन्वये रमानगर येथील समाज मंदिराच्या शेजारी उपलब्ध असलेल्या जागेवर प्राथमिक आरोग्य केंद्र बांधल्या बाबतच्या अंदाजपत्रकास ४% कमी दराने प्रशासकीय मंजूरी मिळालेली असतांना ४% जास्त दराचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर केल्याने तसेच सिल्क मिल कॉलनी येथे २० खाटीचे आरोग्य केंद्र उभारण्याच्या कामाच्या अंदाजपत्रक ४% कमी दराने प्रशासकीय मंजूरी मिळालेली असतांना तत्कालीन आयुक्तांनी इंग्रजीत लिहिलेल्या (Below) या शब्दास खाडाखोड करुन त्या शब्दामध्ये "a" हे इंग्रजी अक्षर लिहून ४% जास्त असे लिहिल्याचे भासविण्याचा प्रयत्न करण्यांत आला व या कारणावरुन उपरोक्त दोन्ही प्रकरणात सर्वश्री आय.टी.गायकवाड, शहर अभियंता, शेख खमर, उप अभियंता (ड) व्ही.आर. भोये, क.अ.डी.एन.साळवे, कनिष्ठ लिपीक व के.एस.जाधव, कनिष्ठ लिपीक यांची खाते निहाय चौकशी करण्यांचे आदेश देण्यांत आले.

खातेनिहाय चौकशीसाठी प्रकरणात चौकशी अधिकारी म्हणून श्री.के.बी.फंड, उपआयुक्त-१ व श्री.महेंद्र खैरनार, लेखाधिकारी यांची नियुक्ती करण्यांत आली होती.

त्यानुसार सर्व संबंधितास दि.२२.०८.१९९७ रोजी आरोपपत्र (जोडपत्र-१ ते ४ सह) देण्यांत आले.

दरम्यान दि.१५.०७.१९९७ च्या कार्यालयीन आदेशान्वये श्री.डी.एन.साळवे, कनिष्ठ लिपीक,व के.एस.जाधव, कनिष्ठ लिपीक, यांस दोषी आढळल्यामुळे आदेशाच्या तारखेपासुन निलंबित करण्यांत आले. परंतू दि.२२.०७.१९९७ च्या कार्यालयीन आदेशान्वये त्यांना खाते निहाय चौकशीच्या अधिन राहुन निलंबनाची कारवाई मागे घेऊन कामावर पुनश्च घेण्यांत आले.

श्री.कमलाकर फड, चौकशी अधिकारी तथा उपआयुक्त यांनी जा.क्र./मनपा/उ.आ.-१/९७/५०५, दि.२९.१२.१९९७ नुसार प्रकरणांचा चौकशी अहवाल सादर केला.

ज्यानुसार चौकशी अधिकारी खालीलप्रमाणे निष्कर्षास आलेले आहेत.

**निष्कर्ष :**

१) संचिका तयार करणे, त्यास प्रशासकीय मान्यता घेणे सक्षम समिती समोर प्रस्ताव मंजूरीस्तव सादर करणे ही बाब कनिष्ठ लिपीकापासुन विभाग प्रमुखापर्यंत सर्वांची संयुक्त जबाबदारी आहे. उपरोक्त दोन्ही प्रकरणामध्ये ही जबाबदारी संयुक्तरित्या पार पाडलेली गेली नाही हे चौकशी अंती व संचिका पडताळणी केली असता दिसून येते. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले नसले तरी दोन्ही प्रकरणांत महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ (१) (३) चा भंग झाल्याचे निष्पन्न होते. दोन्ही प्रकरणांत सर्वांची संयुक्त जबाबदारी समजून श्री.आय.टी.गायकवाड, श.अ.शेख खमर, उपअभियंता, के.एस.जाधव, लिपीक/टंकलेखक, श्री.डी.एन.साळवे, कनिष्ठ लिपीक या सर्वांची देय वेतनवाढ दोन वर्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात पुढील वेतनावाढीवर परिणाम होणार नाही अशा स्वरुपात रोखण्यात यावी. अशी शिफारस करण्यांत येते.

२) श्री.डी.एन.साळवे, कनिष्ठ लिपीक, व श्री.के.एस.जाधव, लिपीक/टंकलेखक निलंबन कालावधी त्यांचे खाती शिल्लक असलेल्या रजेत रुपांतरीत करण्यांत यावा, अशी शिफारस करण्यांत येते.

३) कनिष्ठ अभियंता, श्री.व्ही.आर.भोये, यांचा प्रत्यक्ष संचिकाशी संबंध येत नाही व काम सुरु करण्यापुर्वी त्यांनी संचिकेतील सर्व बाबी तपासुन पहावयास पाहिजे होत्या

त्यांनी स्वत:च्या लग्नामुळे व कंत्राटदाराच्या दबावामुळे घाईघाईने देयक तयार केले ही बाब लक्षात घेता त्यांच्यावर "ठपका ठेवण्यात येतो" अशी शिफारस करण्यांत येते.

४) सिल्क मिल कॉलनी येथे २० खाटाचे आरोग्य केंद्र बांधण्या संदर्भाने मा.आयुक्तांच्या इंग्रजी लिपीतील "below" या शब्दामागे "a" हे अक्षर कोणी लिहून अंदाजपत्रकीय दर जास्त दराने मान्य झाल्याचे भासविण्याचा प्रयत्न नेमका कोणी केला हे नोंदविलेल्या बयानावरुन निष्पन्न होत नसल्याने हस्ताक्षर तज्ञाचा तांत्रिक अहवाल मागविण्यात यावा व तो प्राप्त झाल्यानंतर यातील निष्कर्षानुसार पुढील रितसर कार्यवाही करणे उचित राहील.

चौकशी अधिकारी यांनी सदर केलेला चौकशी अहवाल मा.आयुक्त यांनी मान्य केलेला आहे.

करिता प्रकरणात चौकशी अधिकाऱ्यांनी सादर केलेला चौकशी अहवाल सर्वसाधारण सभेस विचारार्थ सादर.

**संवाद :-**

**मा.महापौर :** सर्वांना समज देऊन दोषमुक्त करण्यांत यावे.

**ठराव क्र.३६/१६ :**

सभागृहापुढे सादर केलेल्या प्रस्तावाबाबत विचार करता प्रशासनाने झालेल्या प्रकरणी सखोल चौकशी झाली. चौकशी अहवालाच्या निष्कर्षानुसार महापालिकेचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नसल्याचे नमुद केले आहे. या बाबींचा विचार करता या प्रकरणात दोषी ठरवलेल्या शहर अभियंता श्री.आय.टी.गायकवाड, उप अभियंता श्री. शेख खमर, कनिष्ठ लिपीक/टंकलेखक श्री.के.एस.जाधव, व श्री.डी.एन.साळवे यांची वर्षासाठी रोखण्यास प्रस्तावित करण्यात आलेली वेतनवाढ शिक्षेस स्थितिलता देऊन आणि क.अ.श्री. भोये यांचेसह ताकीद देऊन प्रस्तावित कार्यवाही रद्द करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.व प्रशासनाच्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी यापुढे आदेशाचे व नियमाचे काटेकोर पालन करावे.

**विषय क्र.३७/१७ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या वतीने सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षात मा.आयुक्तांनी आदेशित केल्याप्रमाणे विज्ञान उद्यान हा उपक्रम शिक्षण विभागाच्या वतीने राबवावयाचा आहे. सदर उद्यानास भेट देणाऱ्या प्रत्येकाला बघता बघता आपोआप विज्ञान शिकत यावे, ही योजनेची मुळ संकल्पना आहे.

या योजनेसाठी, विकास कामासाठी अपेक्षित खर्च तीन टप्प्यात एकूण अंदाजे रु.१३,००,०००/- तरतूद करण्यांत आलेली आहे. पैकी सन १९९८-९९ च्या अर्थसंकल्पात चार लाख रुपयाची तरतूद करण्यांत आलेली आहे.

तरी योजना कार्यान्वित करण्यासाठी सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात येत आहे.

**ठराव क्र.३७/१७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षात विज्ञान उद्यान हा उपक्रम शिक्षण विभागामार्फत राबविण्यासाठी योजनेसाठी विकास कामाकरिता अपेक्षित खर्च तीन टप्प्यातून करण्यास रक्कम रुपये १३,००,०००/- पैकी १९९८-९९ या अर्थसंकल्पात

रक्कम रुपये ४,००,०००/- रुपयांची तरतूद करण्यांत आले असल्यास ही योजना कार्यान्वित करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८/१८ :**

मनपाच्या वतीने सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षात दोन मराठी माध्यमाची व एक उर्दू माध्यमाचे प्राथमिक स्वरुपात दोन विद्यानिकेतने सुरु करण्याबाबत मा.आयुक्त यांनी आदेशित केलेले आहे. यामध्ये वर्ग तिसरी मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. या विद्यानिकेतनची रचना कशी असावी. या संदर्भात तज्ञांची समिती प्रस्तावित करण्यांत आली आहे.

या विद्यानिकेतनची योजनेचा प्रस्ताविना, उद्दिष्टे, ठिकाणे, समिती, शिक्षकांची निवड, कार्यपध्दती या बाबत सविस्तर टिप्पणी सोबत देण्यांत आलेली आहे.

या योजनेसाठी सन १९९८-९९ च्या अर्थसंकल्पात पाच लाख रुपयाची तरतूद करण्यांत आलेली आहे.

तरी योजना कार्यान्वित करण्यासाठी सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यांत येत आहे.

**ठराव क्र.३८/१८ :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चालु शैक्षणिक वर्षात दोन मराठी माध्यमांची व एक उर्दू माध्यमाची विद्यानिकेतन सुरु करण्यास व या योजनेसाठी सन १९९८-९९ च्या अर्थसंकल्पात रु.५,००,०००/- तरतूद करण्यात आली. असल्याने योजना कार्यान्वित करण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९/१९ :**

**पुरवणी विषय पत्रिका**

कैलास नगर स्मशान भूमिकडे जाणाऱ्या रस्त्यावर कैलासनगरच्या गल्ली नं.२ मध्ये श्री मकबुल मिस्त्री यांनी अतिक्रमण केले आहे. असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. परंतू मनपाचे प्रशासकीय अधिकारी यांनी स्थायी समिती मध्ये खुलासा केला की, संबंधिताकडे पी.आर.कार्ड आहे. जर असे असलेले तर रस्ता नागरिकांना उपलब्ध व्हावा. याकरिता सदरील जागा संपादन करुन रस्ता तयार करावा किंवा अतिक्रमण असल्यास ते त्वरीत हटवून रस्ता तयार करावा. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** सौ.यशोदा धनंजय वाडेकर.

**अनुमोदक :** १) श्री.प्रदिप जैस्वाल.
२) श्री.अविनाश कुमावत.
३) श्री.जयवंत (बंडु) ओक.

**ठराव क्र.३९/१९ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैलास नगर स्मशान भूमिकडे जाणाऱ्या रस्त्यावरील गल्ली नं.२ मध्ये श्री. मकबुल मिस्त्री यांच्याकडे त्या जागेचे पी.आर.कार्ड असेल तर जागा संपादन करुन हा रस्ता नागरिकांसाठी उपलब्ध करुन देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०/२ :**

नारेगांव येथील पाण्याच्या टाकी जवळील विकशीत करण्यांत आलेल्या उद्यानास छत्रपती शिवाजी महाराज उद्यान बालक उद्यान "माणिकनगर" असे नामकरण करण्यांत यावे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**सुचक :** श्री.महादेव सुर्यवंशी.

**अनुमोदक :** १) श्री.प्रभाकर विधाते.
२) श्री.गीरजाराम हाळनोर.
३) श्री.विकास जैन.

**ठराव क्र.४०/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव येथील पाण्याच्या टाकीजवळील विकसीत करण्यात आलेल्या उद्यानास छत्रपती शिवाजी महाराज बाल उद्यान "माणिकनगर" असे नामकरण करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१/३ :**

नारेगांव येथील नव्याने विकसीत करण्यांत आलेल्या स्मशान भूमीस "व्यंकुटधाम स्मशान भूमी" माणिकनगर असे नामकरण करण्यांत यावे.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**सुचक :** श्री.महादेव सुर्यवंशी

**अनुमोदक :** १) श्री.प्रभाकर विधाते.
२) श्री.गीरजाराम हाळनोर.
३) श्री.विकास जैन.

**ठराव क्र.४१/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव येथील नव्याने विकसीत करण्यांत आलेल्या स्मशान भूमीचे "व्यकुंटधाम स्मशान भूमी" माणिकनगर असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२/१ :**

**ऐनवेळचे विषय**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ४५८ अन्वये पाणी पुरवठ्याबाबत उपविधी तयार केलेला आहे. सदर उपविधीचे कलम ३ मध्ये पाणी पुरवठ्याचे सध्या अस्तित्वात असलेले दर हे अपूरे आहेत. सध्या पाणी पुरवठा व्यवस्थेवरील एकूण खर्च रु.२७.५० कोटी एवढा अपेक्षित आहे. व पाणी पट्टीपासून उत्पन्न रक्कम रुपये ९.०० कोटी एवढी अपेक्षित आहे. खर्च व उत्पन्न पाहता रुपये १८.५० कोटी एवढा तोटा महानगरपालिकेस सहन करावा लागतो. सदरील तुट कमी करण्याच्या दृष्टीने पाणीपट्टी दरवाढ क्रमप्राप्त आहे. सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे दरवाढ करणे आवश्यक आहे. सदर दरवाढ केल्यास महानगरपालिकेस रुपये १४.०० कोटी एवढा उत्पन्न होईल असे अपेक्षित आहे. तरी सुध्दा महापालिकेस दरवाढ करुन रुपये १३.५० कोटी एवढ्याची तूट राहणार आहे. ही तूट कमी करण्यांच्या दृष्टीने दरवाढ दरवर्षी करणे आवश्यक आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**पाणी पुरवठा-१**

**महानगरपालिका, औरंगाबाद**

| अ. क्र. | नळाचे प्रकार | नळ कनेक्शनचा व्यास | प्रचलित दर | प्रस्तावित दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | घरगुती वापरासाठी | १५ मी.मी.व्यास<br>१५ मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२० मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२० मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२५ मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२५ मी.मी.व्यास (मिटरसह) | रु.७००.०० प्रति वर्ष<br>रु.३.०० प्रति वर्ष<br>रु.१५००.०० प्रति वर्ष<br>रु.३.०० प्र.ह.लि.<br>रु.३५००.०० प्रति वर्ष<br>रु.३.०० प्र.ह.लि. | रु.१५००/- प्रतिवर्ष<br>रु.४/- प्रति हजार लिटर्स<br>रु.२०००/- प्रतिवर्ष<br>रु.४/- प्रति हजार लिटर्स<br>रु.३५००/- प्रतिवर्ष<br>रु.४/- प्रति हजार लिटर्स | |
| २ | उद्योग धंद्यासाठी | १५ मी.मी.व्यास<br>१५ मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२० मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२० मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२५ मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२५ मी.मी.व्यास (मिटरसह) | रु.३५००.०० प्रति वर्ष<br>रु.१०.०० प्र.ह.लि.<br>रु.४५००.०० प्रति वर्ष<br>रु.१०.०० प्र.ह.लि.<br>रु.१०५००.०० प्रति वर्ष<br>रु.१०.०० प्र.ह.लि. | रु.३५००/- प्रतिवर्ष<br>रु.१०/- प्रति हजार लिटर्स<br>रु.४५००/- प्रतिवर्ष<br>रु.१०/- प्रति हजार लिटर्स<br>रु.१०५००/- प्रतिवर्ष<br>रु.१०/- प्रति हजार लिटर्स | |
| ३ | बांधकामासाठी तात्पुरते नळ कनेक्शन | १५ मी.मी.व्यास<br>२० मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२५ मी.मी.व्यास<br>बांधकामासाठी (मिटरसह) | रु.५००.०० प्रति महा<br>रु.१०००.०० प्रति महा<br>रु.१५००.०० प्रति महा<br>रु.१०.०० प्र.ह.लि. | रु.५००.०० प्रति महा<br>रु.१०००.०० प्रति महा<br>रु.१५००.०० प्रति महा<br>रु.१०.०० प्र.ह.लि. | |

**संवाद :**

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** प्रशासनातर्फे पाणी पट्टी बाबतचा प्रस्ताव सभागृहात मांडण्यात आला आहे. अर्थसंकल्प मंजूर करतांना पाणी पट्टी वाढी बाबत जो प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्यास सर्व सभागृहाने विरोध केला होता. आजची प्रशासनातर्फे रु.१५००/- पाणीपट्टी करण्याबाबतचा प्रस्ताव आला आहे. त्यास सर्व सभागृहाचा विरोध असणार आहे. या शहरात राहणारी गोरगरीब जनता रु.१५००/- पाणी पट्टी भरु शकणार नाही. म्हणून प्रशासनातर्फे पाणीपट्टी वाढीबाबत जो ठराव ठेवण्यात आला आहे. तो रद्द करावा. अशी विनंती आहे.

**श्रीमती जाहेदा बेगम :** प्रशासनातर्फे रु.१५००/- जी पाणीपट्टी वाढविण्यात आली आहे. ती या शहरातील जनता भरु शकणार आहे. अर्थसंकल्पीय मंजूरीच्या वेळी या सभागृहाने पाणीपट्टी वाढ करुन ती रु.७००/- केली आहे. या शहरातील नागरिक वाढलेली पाणीपट्टी भरु शकणार नाही म्हणून घरगुती वापराच्या पाणीपट्टीत वाढ न करता ती रु.७००/- पाणीपट्टी आहे. तीच कायम ठेवावी. उद्योग धंद्याच्या कनेक्शनबाबत दरवाढ केली तरी चालेल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सिडको भागासाठी दररोज २८ एम.एल.डी. पाणी देण्यांत यावे, असे आदेश मा.आयुक्त यांनी कार्यकारी अभियंता यांना दिले आहे. आज सिडको भागातील नागरिकांना आवश्यक ते पाणी मिळत नाही. जरा प्रमाणात पाणीपट्टीत वाढ केली आहे. त्या प्रमाणात नागरिकांना पाणी मिळाले पाहिजे. तेव्हा जोपर्यंत वाढीव पाणी नागरिकांना मिळत नाही. तोपर्यंत पाणीपट्टीत वाढ करु नये. पाणीपट्टीत वाढ केली आहे. त्या प्रमाणात नागरिकांना पाणी मिळाले पाहिजे. तेव्हा जोपर्यंत वाढीव पाणी नागरिकांना मिळत नाही. तोपर्यंत पाणीपट्टीत वाढ करु नये. पाणीपट्टीत वाढ केली तर तो जनतेवर अन्याय होईल. सिडको भागातील नागरिकांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. याचा विचार करता कार्यकारी अभियंता यांना सिडको

भागासाठी २८ एम.एल.डी.पाणी दररोज देण्याचे आदेश व्हावेत. यासाठी आवश्यक वाढल्यास या भागाचा सर्वे करण्यांत यावा.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** गेल्या मार्चमध्ये पाणीपट्टी वाढीबाबतचा अशा प्रकारचा प्रस्ताव अर्थसंकल्पीय सभेचे वेळी प्रशासनातर्फे ठेवण्यांत आला होता. त्यावेळी पाणीपट्टीबाबतचा जो ठराव मांडण्यात आला होता. या सभागृहाने रद्द करुन पुर्वीची जी पाणी पट्टी आहे तीच कायम ठेवण्यात यावी. असा ठराव मंजूर केला होता. यानंतर प्रशासनाने रु.१५००/- या प्रमाणे वाढीव पाणीपट्टी बाबतचा ठराव सभागृहापुढे ठेवला आहे. पाणी पट्टीत वाढ केल्यानंतर हा प्रश्न सुटेल काय हा खरा महत्वाचा मुद्दा आहे. इतर करात काही वाढ करुन येणारा तोटा भरुन काढण्यासाठी विचार का केला नाही. हा माझा प्रशासनाला प्रश्न आहे. विद्युत मंडळाकडुन जी बिलाची आकारणी करण्यात येते. त्याबाबत विचारणा का करण्यात आली नाही. तेव्हा ज्या ज्या इतर करामध्ये वाढ करणे शक्य आहे. त्याबाबतचा कर वाढीचा प्रस्ताव या सभागृहापुढे ठेवण्यात यावा. पण पाणीपट्टी वाढ करण्याचा प्रस्ताव ऐनवेळी न ठेवण्यात यावा पण पाणी पट्टी वाढ करण्याचा प्रस्ताव ऐनवेळी न ठेवता आहे तीच पाणीपट्टी कायम ठेवावी.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** प्रशासनाने एक गांभीर्याची बाब या सभागृहापुढे ठेवली आहे. पाणीपट्टी वाढ केली नाही. तर काय परिणाम होणार आहेत. याचा तोटा सभागृहाचे निदर्शनास आणून दिला आहे. यापुर्वी पाणीपट्टी वाढी बाबतचा जो प्रस्ताव सभागृहापुढे मांडण्यात आला होता. त्या चर्चेच्या वेळी अनधिकृत नळ कनेक्शन घेऊन चोरुन जे पाणी घेतले जाते. त्यामुळे महानगरपालिकेचे जे नुकसान होते. या संदर्भाने प्रशासनाने काय कार्यवाही केली आहे. त्यापासुन किती उत्पन्न प्राप्त झाले आहे, किती तुट भरुन काढता येईल, याबाबतचा सविस्तर खुलासा प्रशासनाने सभागृहासमोर सादर करावा.

**श्री.गजानन बारवाल :** पाणीपट्टीत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहापुढे मांडण्यात आला आहे. अर्थसंकल्पीय चर्चेच्या वेळी प्रस्ताव सभागृहापुढे चर्चेला आला होता. पाणी पट्टीत वाढ करण्याबाबत ज्याप्रमाणे लक्ष दिले जाते. त्याचप्रमाणे महापालिका उत्पन्नाच्या इतरही अनेक बाबी आहेत. त्याच्याकडेही लक्ष दिले गेले पाहिजे. पाणी पट्टी वाढ केलेल्या किती तोटा भरुन काढता येईल. माझ्या माहितीप्रमाणे यातून जास्त प्रमाणात तुट भरुन काढता येईल. असे दिसत नाही. यासाठी पाणी पुरवठ्याच्या कामात येणारा तोटा कायम स्वरुपी भरुन काढण्यासाठी आवश्यक बाबींचा विचार करण्याकरिता एका उपसमितीची नेमणूक करण्यात यावी किंवा एखाद्या तज्ञ व्यक्ती किंवा सल्लागार समितीकडुन त्याबाबतची माहिती घेण्यात यावी. पाणी पुरवठ्याच्या तुट भरुन काढणे आवश्यक असल्याने जनतेला त्रास होणार नाही. अशा प्रमाणात कमीत कमी पाणी पट्टी वाढवावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**श्री.जावेद रज्जाक :** याच सभागृहाने मागील बैठकीच्या वेळी पाणी पट्टीत वाढ करण्यात येणार नाही. अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे. असे असतांना कुठल्याही प्रकारची पुर्व सुचना नसतांना पाणी पट्टीवाढी बाबतचा हा ठराव सभागृहापुढे कसा मांडण्यात आला. महापालिकेला उत्पन्नचे साधन फक्त पाणीपट्टीच नसून इतरही मार्गाने महापालिकेला उत्पन्न मिळते. पाणीपट्टी वाढतीत

असतांना अनधिकृत नळ कनेक्शन बाबत कधीही विचार झालेला नाही. घरगुती पाणीपट्टीत वाढ करतांना उद्योग धंद्यासाठी पाणीपट्टीचे जे दर पुर्वी होते. तेच कायम ठेवण्यात आले आहेत. याबाबत माझा विरोध आहे. यापुर्वी जो पाणी पट्टीचा प्रस्ताव आला होता. त्यावेळी खुलासा केल्याप्रमाणे पाणीपट्टीत वाढ झाल्यास याच महापालिकेच्या आवारात मी आत्मदहन करीन या माझ्या निर्णयावर मी कायम आहे.

**सौ.लता दलाल :** याच सभागृहात यापुर्वी पाणीपट्टी वाढ बाबतच्या प्रस्तावावर अनेक वेळा चर्चा झालेली आहे. शहरातील नागरिक आणि महापालिकेचे हित पहाणे हे प्रथम कर्तव्य असल्याने याचा भावनेने पाणीपट्टी वाढीस विरोध केला आहे. या सभागृहाची पाणीपट्टीत वाढ न करण्याची भुमिका पाणीपट्टी ही रुपये ७००/- च ठेवावी. इतर करात वाढ करुन दुकान केंद्रे बांधून महापालिका आपले उत्पन्न वाढवून तेव्हा इतर करात वाढ करावी. व त्यासाठी वेगळे उपाय योजावेत.

**श्री.कचरु नवपुते :** शहरातील अनधिकृत नळ शोधून काढण्यासाठी काही प्रमाणात तोटा भरेल. या महापालिकेत शहराभोवती असलेला गृहीत भाग समाविष्ट झालेला आहे. याचा विचार करता पाणी वाढ करण्यात येऊ नये. पुर्वीप्रमाणे रु.७००/- या प्रमाणेच पाणीपट्टी कायम ठेवावी.

**सौ.रुख्मीनीबाई लोखंडे :** शहरात ५००० अनधिकृत नळ कनेक्शन आहेत. ते शोधून काढावेत. सर्व स.नगरसेवकांकडे वाढ कनेक्शनचे फॉर्म देण्यात यावेत.व असे अनाधिकृत नळ कनेक्शन नियमित करुन घेण्यात यावेत. यासाठी जनतेला वेळ देण्यात यावा. या नागरिकांच्या दोन टप्प्यांत रक्कम वसुल करावी. ही अशी सवलत देण्यात यावी. अशा प्रकारे योजना केल्यास अनधिकृत नळ कनेक्शन नियमित केल्याने महापालिकाचे उत्पन्न वाढेल. याचा विचार करुन पाणी पट्टी पुर्वीप्रमाणे रु.७००/- ठेवावी.

**श्री.रविंद्र इंगळे :** पाणीपट्टी वाढीबाबत जनतेचा विरोध झालेला आहे. सिडको भागातील नागरिकांना वेळेवर पाणी मिळत नाही. हा चिंतेचा विषय झाला आहे. तेव्हा पाणी पट्टी वाढीबाबतचा प्रस्ताव स्थगित ठेवावा. आणि पुर्वीप्रमाणेच रु.७००/- पाणीपट्टी कायम ठेवावी.

**श्री.अ.रशीद खान (मामू) :** शहरातील जनता आणि महापालिका प्रशासन या दोघांचेही नुकसान होणार नाही. अशा प्रकारचा निर्णय या प्रकरणी सभागृहाने घेतला पाहिजे. विजेच्या व दरात वाढ झालेली आहे. पाणीपट्टीत वाढ करावयाची नाही. असा आग्रह धरला तर प्रशासन वाढणार कसे याचाही विचार केला पाहिजे.

**श्री.जयंवत ओक :** या शहारात ५००० ते ६००० अनधिकृत नळ कनेक्शन आहेत. या कनेक्शनला नियमित केल्यास महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. आज ते पाणी शहरातील नागरिकांना दिले जाते ते समप्रमाणात दिले जाते का? काही ठिकाणी जास्त तर काही ठिकाणी कमी प्रमाणात पाणी वितरीत केले जाते ज्यांचे १००% विकास खर्च भरले आहे. त्यांना सुरळीत पाणी मिळत नाही. याचा विचार करता पाणी पट्टीत वाढ करु नये अशी विनंती आहे.

**श्रीमती मोहसीना बिल्कीस :** शहरातील अनधिकृत कनेक्शन नियमित करण्याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली आहे. याबाबतचा अहवाल सभागृहापुढे

ठेवण्यात यावा. त्यानंतर पाणीपट्टी वाढी बाबतचा प्रस्ताव ठेवण्यात यावा. शहरातील नागरिकांना रात्री अपरात्री पाणी दिले जाते. मग पाणी पट्टी वाढ कशासाठी करण्यात येत आहे. याचा खुलासा व्हावा.

**श्री.मुश्ताक अहमद** : शहरातील नागरिकांना पाणी पुरविणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे. याचा विचार करता एकाच वेळी शहरातील सर्व नागरिकांना पाणी मिळाले पाहिजे. पाणी पट्टीत वाढ करु नये. त्याऐवजी इतर ठिकाणाहून महापालिकेचे उत्पन्न कसे वाढवता येईल याचा विचार करावा. जकातीच्या उत्पन्नात वाढ करावी इतर खर्च रोकावा.

**श्रीमती नुरजहाँ बेगम :** पाणी पट्टीत वाढ करु नये आहे तीच पाणीपट्टी कायम ठेवावी.

**श्री.गौतम खरात** : शहरातील नागरीकांसाठी शाळा, इमारती, रस्ते इत्यादीचा विकास केला जाईल हे पाहाणे आवश्यक आहे. सिल्लोड/वैजापूर, गंगापूर अशा ठिकाणी पाणीपट्टीत वाढ झालेली आहे. महापालिकेकडे विद्युत बिलाची थकबाकी आहे, शासनाला जसे सरकार चालवावयाचे आहे. तसेच आपल्याला ही महापालिका चालवावयाची आहे. व्यापारी/नौकरदार यांची आर्थिक स्थिती वाढलेली आहे. या भागातील नागरिक वाढीव दराने पाणीपट्टी देवू शकत नाही. याचा विचार या ठिकाणी करावा. आणि स्वत:ही करिता पाणी पट्टीत वाढ करु नये. शहरी भागाकरिता एकदम ४०% वाढ करणे हे सुध्दा योग्य होणार नाही. तेव्हा ती थोडी थोडी वाढविणे आवश्यक आहे. रु.१५००/- प्रमाणे पाणीपट्टीत वाढ करणे तर शक्य नाही. पण काहीतरी प्रमाणात पाणीपट्टीत वाढ करणे आवश्यक आहे. असे मला वाटते. सर्वपक्ष प्रमुखांनी बसावे. निर्णय घ्यावा.

**मा.आयुक्त :** सध्या ७००/- रु. प्रतिवर्ष याप्रमाणे पाणीपट्टी आहे. वाढ करुन रु.१५००/- पाणीपट्टी प्रतिवर्ष याप्रमाणे प्रशासनाने वाढ सुचविली आहे. अर्थसंकल्पीय प्रस्तावाचे वेळी पाणी वाढीचा प्रस्ताव सभागृहापुढे मांडला होता. त्यावेळी सदर प्रस्ताव मान्य झाला नाही. आत फेरविचारासाठी हा प्रस्ताव पुढे मांडला आहे. हा निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे. त्या शिवाय तरणोपाय नाही. जायकवाडीची पाईपलाईन यावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी हे महापालिकेकडे आले आहेत. विद्युत मंडळाचे बील, पाईप लाईनवरील दुरुस्ती व देखभालचा अशा प्रकारे पाणी पुरवठ्याच्या खर्चात वाढ झालेली आहे. त्यासाठी २३ कोटी रुपये नगद खर्च आहे. त्या मानाने वसुली ६ कोटी आहे. याचा विचार करता प्रशासनाला १८ कोटीचा तोटा सहन करावा लागत आहे. पिण्याचे पाणी अत्यंत आवश्यक बाब आहे. विद्युत बिलापोटी महापालिका दरमहा ७५ लाख रुपये मंडळाला देते. पाणी पुरवठ्यासाठी ६ कोटीची तरतूद भरुन काढावयाची आहे. म्हणून हा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवला आहे. शहरातील नागरिकांना महापालिका दिवसाला दोन रुपये याप्रमाणे पाणी देते. याचा या सभागृहाने गांभीर्याने विचार करावा. अप्रीय असला तरी हा निर्णय घेणे सभागृहाला आवश्यक आहे.

**श्रीमती जाहेदा बेगम :** ७००/- पेक्षा जास्त एक पैसाही वाढवू नये.

**श्री.गजानन बारवाल, श्री.प्रदिपकुमार जैस्वाल, श्री.अविनाश कुमावत :** प्रशासनाची भूमिका मान्य असली तरी एकदम एवढी वाढ करणे सभागृहाला शक्य होणार नाही.

**श्री.गंगाधर गाडे :** पाणीपट्टीत वाढ गरजेचे आहे. महापालिका प्रशासनावर आर्थिक ताण वाढ आहे. प्रशासनाने सुचविलेल्या वाढीस सहमत नाही. जास्तीत जास्त

रु.८००/- प्रतिवर्ष या प्रमाणे पाणीपट्टी आकारणी करावी. पाणीपट्टी वाढवित असतांना नागरिकांचा ही विचार करावा. विद्युत बिलाची पुर्वीची जी थकबाकी आहे. ती भरावयाची म्हणून पाणीपट्टीत वाढ करावयाची आहे हे मी मान्य करणार नाही. विद्युत बिलाच्या थकबाकी पोटी माहापालिकेने दरमहा ७५ लाख रुपये द्यावेत असे मा.मंत्री म्हणतात. तर मा.उर्जा सचिव दरमहा १ कोटी दिले पाहिजे असे सांगतात. मग या नोकरशाहीवर लोकप्रतिनिधीचा अंकुश नाही असे दिसते. महाराष्ट्र शासनाने विद्युत बिलाच्या थकबाकी च्या ५२ कोटीपैकी किमान अर्धी रक्कम सबसिडी म्हणून मंजूर केली पाहिजे. महाराष्ट्रातील इतर महापालिकांना अशी सुट दिली आहे. यासाठी या शहराचे पालक मंत्री व इतर मंत्र्यांनी आपले वजन खर्च करावे. औरंगाबाद शहर हे नव्याने विकसीत होत आहेत. रु.८०० प्रतिवर्ष या प्रमाणे पाणीपट्टी आकारणीस सहमत आहोत ही पाणीपट्टी आकारत असतांना आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या नागरिकांना सवलत दिली पाहिजे.

**मा.आयुक्त :** महाराष्ट्र शासनाने या महापालिकेस प्रथम १० कोटी त्यानंतर ४ कोटी त्यानंतर पुन्हा ४ कोटी असे अनुदान दिलेले आहे. पाणी पुरवठ्यावरील एकूण खर्चाचा विचार करता प्रतिवर्ष रु.२३०० या प्रमाणे पाणीपट्टी केली तर " ना नफा ना तोटा" या तत्वावर पाणी पुरवठा करणे शक्य होईल. पण एकदम प्रतिवर्ष रु.२३००/- पाणीपट्टी करण्याचे धाडस झाले नाही म्हणून प्रतिवर्ष रु.१५००/- प्रमाणे पाणीपट्टी सुचविली आहे. हा प्रस्ताव मंजूर करणे नितांत आवश्यक आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सिडको भागासाठी २८ एम.एल.डी. पाणी पुरवठा देत नाही याचे सभागृहात उत्तर द्या. आधी पाणी पट्टी वाढवा.

**श्रीमती आबेदा बेगम :** झोपडपट्टी भागात गरीब लोक राहतात. त्या भागात रु.६००/- पाणीपट्टी करावी.

**श्री.फैय्याज कुरेशी :** प्रस्तावावर विचार व्हावा. महापालिका प्रशासन चालवित आहे. सर्व विरोधी सत्ताधारी मिळून निर्णय घ्यावा.

आजची सभा ००.०५ मिनीटासाठी तहकूब करण्यात येते. असे मा.महापौर यांनी घोषित केले. (वेळ सुमारे ५.२०)
तहकूब करण्यात आलेली सभा पुन्हा सुरु करण्यात आली. (वेळ सुमारे ५.२५ वा.)

**श्री.अविनाश कुमावत, श्री.फैय्याज कुरेशी :** पाणीपट्टी वाढी बाबत विचार विनिमय केल्यानंतर प्रति रु.१०००/- प्रतिवर्ष या प्रमाणे पाणीपट्टी आकारण्यात यावी असे सर्वानुमते ठरले आहे.

**श्री.जावेद रज्जाक :** पाणीपट्टी वाढीस माझा विरोध आहे. पाणी पट्टी वाढीबाबत मी यापुर्वी केलेल्या घोषणेवर आजही कायम आहे.

**मा.आयुक्त :** सर्व स.नगरसेवकांची बैठक झाली. सर्वांनी मिळून पाणीपट्टी वाढी बाबतचा निर्णय घेतला आहे. मा.महापौर तो सभागृहात जाहिर करतील.

**मा.महापौर :** सर्व सन्माननिय नगरसेवकांच्या भावना लक्षात घेवुन महानगरपालिकेस पाणी पुरवठ्यानंतर येणारा तोटा विचारात घेता पाणीपट्टीत काही अशी वाढ करणे आवश्यक आहे. याबाबींचा विचार करता घरगुती अर्धा इंच नळ कनेक्शन करिता प्रतिवर्ष रु.१५००/- ऐवजी रु.१०००/- प्रमाणे पाणीपट्टी करण्यात

यावी. तसेच उद्योग धंदा वापरासाठी असलेल्या अर्धा इंच कनेक्शन करिता प्रतिवर्ष रु.३५००/- ऐवजी रु.४०००/- याप्रमाणे पाणीपट्टी आकारण्यात यावी. पाणी पट्टीबाबत यापुर्वी घेतलेला ठराव रद्द करण्यात येतो.

**ठराव क्र.४२/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहराच्या पाणी पुरवठ्यावर होणारा खर्च आणि पाणीपट्टीपासुन मिळणारे उत्पन्न या बाबींचा विचार करता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५८ अन्वये तयार करण्यांत आलेल्या उपविधीतील कलम ३ मध्ये सध्या अस्तित्वात असलेले दरात खालील दर्शविल्याप्रमाणे दुरुस्ती व वाढ करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

| अ. क्र. | नळाचे प्रकार | नळ कनेक्शनचा व्यास | प्रस्तावित दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | घरगुती वापरासाठी | १५ मी.मी.व्यास<br>१५ मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२० मी.मी.व्यास<br>२० मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२५ मी.मी.व्यास<br>२५ मी.मी.व्यास (मिटरसह) | रु.१५००/- ऐवजी रु. १०००/- प्रतिवर्ष<br>रु.४/- प्रति हजार लिटर्स<br>रु.२०००/- प्रतिवर्ष<br>रु.४/- प्रति हजार लिटर्स<br>रु.३०००/- प्रतिवर्ष<br>रु.४/- प्रति हजार लिटर्स | |
| २ | उद्योग धंद्यासाठी | १५ मी.मी.व्यास<br>१५ मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२० मी.मी.व्यास<br>२० मी.मी.व्यास (मिटरसह)<br>२५ मी.मी.व्यास<br>२५ मी.मी.व्यास (मिटरसह) | रु.३५००/- ऐवजी रु.४०००/- प्रतिवर्ष<br>रु.१०/- प्रति हजार लिटर्स<br>रु.४५००/- प्रतिवर्ष<br>रु.१०/- प्रति हजार लिटर्स<br>रु.१०५००/- प्रतिवर्ष<br>रु.१०/- प्रति हजार लिटर्स | |
| ३ | बांधकामासाठी तात्पुरते नळ कनेक्शन | १५ मी.मी.व्यास<br>२० मी.मी.व्यास<br>२५ मी.मी.व्यास<br>बांधकामासाठी (मिटरसह) | रु.५००/- प्रति महा<br>रु.१०००/- प्रति महा<br>रु.१५००/- प्रति महा<br>रु.१०/- प्र.ह.लि. | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३/२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या ७०० मी.मी. व्यासाच्या अशुध्द/शुध्द उर्ध्वनलिकेद्वारे पैठण ते औरंगाबाद पाणी पुरवठा प्रकल्पाद्वारे वैयक्तिक नळ कनेक्शन देणे बाबत मागणी होत आहे.

जायकवाडी पाणी पुरवठा प्रकल्प दि.०१.०४.१९९८ पासुन महापालिकेकडे हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे सदरील प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीचे काम महानगरपालिका प्रशासन करीत आहे. यापुर्वी जिवन प्राधिकरण मंडळामार्फत असे एकूण २३ कनेक्शन देण्यात आलेले आहेत.

करिता अशा प्रकारचे वैयक्तिक नळ कनेक्शन जीवन प्राधिकरण मंडळाने ठरवुन दिलेल्या दरातच महानगरपालिकेतर्फे देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव क्र.४३/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या पैठण ते औरंगाबाद या ७०० मी.मी. व्यासांच्या उर्ध्वनलिका जलवाहिनी द्वारे अशुध्द व शुध्द पाणी पुरवठा होतो

हा प्रकल्प दिनांक ०१.०४.१९९८ पासून महानगरपालिकेकडे हस्तांतरण झालेला आहे. या जलवाहिनीवरुन २३ कनेक्शन देण्यांत आलेली आहे. या २३ कनेक्शनांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ ज्या दराने पाणी देते. त्याच दराने महानगरपालिका देखील आकारणी करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४/३ :**

औरंगाबाद शहराच्या मध्यवस्तीतील गुलमंडी या भागात गट्टाणी बिल्डींग व लगतच्या भागासह ची जागा शासन मंजूर विकास योजने मध्ये आ.क्र.६१ "खुलीजागा" या वापरासाठी आरक्षित आहे. सदर मंजूर वि.योजना (जुन्या न.प.हद्दीची) सुधारित करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला होता.

त्यानुसार दि.३०.०३.१९९५ रोजी प्रसिध्द झालेल्या प्रारुप वि.यो. (सुधारित) मध्ये मुळ मंजूर वि.यो.तील आरक्षणाचा वापर बदलून तो आ.क्र.५३ "वाहनतळ" क्षेत्र ०.१८ हे असा करण्यात आला आहे.

प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुप विकास योजना (सुधारित) वर जनतेकडून हरकती व सुचना मागवण्यात आल्या होत्या. प्राप्त हरकती/सुचनांवर विचार करुन नियोजन समितीने वाहनतळाच्या क्षेत्रात बदल केला. त्यानुसार आ.क्र.५३ च्या दक्षिणेकडील काही भाग आरक्षणातून वगळण्यात आला आहे. वगळण्यात आलेल्या क्षेत्रा नंतर पार्किंग साठी आरक्षित क्षेत्र ०.११ हे इतके आहे. त्यापैकी विद्यमान पार्कींग व रस्त्याचे मिळून क्षेत्र अंदाज ०.०६५ हे आहे. नियोजन समितीच्या निर्णयाला सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. वरील बदलांची अंतर्भाव करुन प्रारुप वि.यो. (सु.) म.प्रा.व.न.र. अधिनियम १९६६ चे कलम १६२(१) अन्वये नियुक्त अधिकारी यांनी शासनास मंजूरीसाठी दि.२५.०३.९८ रोजी सादर केली आहे.

गुलमंडी येथील निवासी श्री.नारायण गट्टाणी यांनी त्यांची जागा सि.स.न.४४३९ म.न.पा.ने संपादित करावी म्हणून क्र.याचिका क्र.५४५/९८ मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.१९.०६.९८ रोजी आदेशात केले आहे की, गुलमंडी येथील "पार्कींग" चे आरक्षण संपादन करण्याबाबत दि.३१ जुलै,१९९८ पुर्वी म.न.पा. ने निर्णय घ्यावा. व तसे न्यायालयास कळवावे.

शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार पार्कींग आरक्षणापैकी दक्षिणेकडील बहुतांश भाग वगळण्यात आला आहे. उर्वरीत जागेत बांधिव क्षेत्र व विद्यमान पार्कींग क्षेत्र आहे. उर्वरीत जागा कमी असून बांधीव क्षेत्र संपादनास जास्त खर्च लागेल. त्यामुळे पार्कींग क्षेत्रापैकी बांधीव भाग वगळण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्तावित वगळण्यात येणाऱ्या जागेमध्ये बांधकाम करतांना स्टील्ट वर इमारत बांधणे बंधनकारक राहील. या प्रमुख अटीवर मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** संबंधितांनी या संदर्भात खुलासा करावा.

**सहा.संचालक :** गुलमंडी येथील मुळ विकास योजनेतील खुली जागाचे आरक्षण प्रारुप विकास योजना (सुधारित) मध्ये वाहनतळ साठी आरक्षित ठेवलेली आहे. या प्रारुप विकास योजना (सुधारित) मध्ये या आरक्षणाच्या दक्षिणेकडील बांधीव भाग वगळून आरक्षणाच्या हद्दीत बदल केला आहे. व ही प्रारुप विकास योजना (सुधारित) मंजूरीसाठी शासनास सादर केली आहे.

सदर प्रकरणी श्री.गट्टाणी यांनी मा.उच्च न्यायालयात प्रकरण दाखल केले असून मा.उच्च न्यायालयाने २ ऑगस्ट ९८ पर्यंत हे आरक्षण संपादन करणार किंवा नाही या संबंधित लेखी अहवाल मागितला आहे. या संपादनास १ ते १.५ कोटी खर्च अपेक्षित आहे. या मुळे आरक्षणाच्या दक्षिणेकडील भाग वगळला आहे, स्टीटवर बांधकाम करावे या अटीवर आरक्षण वगळण्याबाबत शासनास कळविण्यांत येईल. असे न्यायालयात म्हणणे दाखल करण्यात येईल. विकास योजनेचा ४० फुट रुंद रस्त्याची आखणी कायम ठेवण्यात आलेली आहे.

**श्री.अ.रशिद खान (मामू) :** नवीन डेव्हलपमेंट प्लान मंजूर झालेले नाही. त्यास मान्यता देता येईल काय. गट्टाणी बिल्डींग बद्दल पेपरला बातमी छापून आलेली आहे. त्यामुळे भिती वाटते का. रस्ता ४० फुटच घेणार आहे का?

**मा.महापौर :** रस्ता ४० फुट ठेवून प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र.४४/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भुतपूर्व नगर परिषदे च्या हद्दीसाठी मंजूर झालेली विकास योजना सुधारित करण्याच्या कामात गुलमंडी येथील मुळ विकास योजने या आरक्षण क्र.६१ "खुली जागा" सुधारित विकास योजने मधील आरक्षणाच्या वापरा बद्दल करुन आरक्षण क्र.५३ "वाहनतळ" क्षेत्र ०.१८ हे असे करण्यात आले आहे. विकास योजना सुधारित करतांना आलेल्या सुचना व हरकतीचा विचार करुन आरक्षणाच्या हद्दीत दुरुस्ती करुन आरक्षण क्र.५३ चे क्षेत्र ०.११ हेक्टर इतके केले असून ही प्रारुप विकास योजना (सुधारित) शासनास दिनांक २५.०३.९८ रोजी सादर करण्यात आलेली आहे.

मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल केलेली याचिका क्र.५४५/९८ या संदर्भात मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी त्यांचे १९/६/९८ च्या आदेशात सदर पार्कींगचे आरक्षण भु-संपादन करण्याबाबत दि.३१ जुलै ९८ पुर्वी महानगरपालिकेने निर्णय घ्यावा असे आदेशात केले होते. "वाहनतळ" या आरक्षणाच्या दक्षिणेकडील बहुतांशः भाग वगळण्यात आला असल्याने उर्वरीत जागा कमी असून बांधीव क्षेत्र व विद्यमान पार्कींगचे क्षेत्र आहे. बांधीव क्षेत्र संपादण्यास जास्त खर्च लागेल, त्यामुळे "वाहनतळ" आरक्षणापैकी बांधीव भाग वगळण्याच्या प्रस्तावास, वगळण्यात येणाऱ्या जागेमध्ये बांधकाम करतांना स्टील्टवर इमारत बांधणे बंधनकारक राहील. या अटीवर प्रस्तावित केल्याप्रमाणे "वाहनतळ" आरक्षणातील बांधीव भाग वगळून रहिवासी भागात समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५/४ :**

औरंगाबाद महानगरपालिकेने महानगरपालिका हद्दीत मो.मालजीपुरा येथील वरद गणेश मंदिरा लगतची नाला जमीन औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघ औरंगाबाद यांना "पत्रकार भवन" बांधण्यासाठी भाडे पट्ट्यावर देण्याचे प्रस्तावास सर्वसाधारण सभेच्या दि.२५.१०.९६ च्या सभेत ठराव क्र.३६७/४ ने मंजूरी देण्यात आलेली आहे. प्रचलित धोरणानुसार नाला जमिनीचे प्रकरण शासनास सादर केले असता शासनाचे पत्र क्र.ए.एम.सी.११९६/१७१/प्र.क्र.-१०९/९६/नवि-३४, दि.२४.०४.९८ ने हया जमिनीचा पत्रकार भवन करिताची जमीन असा वापर निर्देशित करुन त्या दृष्टीने मंजूर विकास योजनेमध्ये

तसा किरकोळ फेरबदल करण्याचा म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेची कार्यवाही करण्यांबाबत कळविलेले आहे.

करिता मंजूर विकास योजने संदर्भाधिन नाला जमीन म्हणून निर्देशित जमिनीचा "पत्रकार भवन" असा वापर दर्शविण्याचा किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसारची पुढील कार्यवाही करुन प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल.

म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाचे पुढील कार्यवाही अंतर्गत शासनाची अंतिम मंजूरी घेण्याकरिता ठरवून दिलेल्या कार्य पध्दतीस अनुसरुन फेरफार करण्यास प्रस्तावित फेरफारास अंतिम स्वरुप देण्याकरिता जनतेकडुन सूचना/हरकती मागविण्याचे आणि अंतिम प्रस्तावास मंजूरी मिळविण्याकरिता राज्य शासनाकडे आवश्यक तो पत्रव्यवहार करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात यावेत.

**ठराव क्र.४५/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.मालजीपूरा येथील वरद गणेश मंदिरालगतची नाला जमीन औरंगाबाद जिल्हा मराठा पत्रकार संघ "पत्रकार भवनासाठी" भाडेपट्ट्याच्या स्वरुपात प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजूरी देण्यात आली असून, शासनाने दिनांक २४.०४.९८ च्या पत्रान्वये विकास योजनामध्ये सदर जमिनीचा जमीन वापर पत्रकार भवनासाठी दाखविण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे बाबत कळविण्यासाठी सदर नाला जमिनीवर "पत्रकार भवन" असा जमिन वापर दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्याच्या कार्यवाहीस मंजूरी देण्यात येऊन या संदर्भात जनतेकडून सुचना व हरकती मागवून सुनावणी घेणे, ठरवून दिलेल्या कार्य पध्दतीचा अवलंब करणे, व सदर प्रस्तावास मंजूर करण्याकरिता राज्य शासनाकडे पत्र व्यवहार करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मा.सर्वसाधारण सभेने दिनांक २०.१२.९५ विषय क्र.१२२/१२ अन्वये मो.कैसर कॉलनी येथे २० खाटांचा दवाखाना बांधणे बाबत प्रस्तावास सर्वानुमते मान्यता दिलेली आहे. त्यानुसार त्यासाठी रक्कम रु.२५.०० लाखाचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. त्यास मा.सर्वसाधारण सभेने दि.२०.०७.९६ विषय क्र.१४ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

दरम्यान नकाशे/डिझाईन इत्यादींचा पुरवठा करणेस्तव वास्तुत/अभियंता यांचे पॅनल तयार करण्यात आले. त्यानंतर नकाशे मंजूर करण्यात आले.

आता उपलब्ध नकाशे नुसार त्या ठिकाणी प्रस्तुतीगृह व रुग्णालय बांधण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.२४,५०,०००/- चे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यानुसार रक्कम रु.२४,५०,०००/- चे सविस्तर अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. उपरोक्त कामाचा खर्च सन १९९८-९९ च्या विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

**ठराव क्र.४६/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.कैसर कॉलनी येथे २० खाटांचा दवाखाना बांधण्याकरिता रुपये २५.०० लाखाचे ढोबळ अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. तथापि, मध्यांतरीत सदर वास्तुचे नकाशे/रेखा चित्र (डिझाईन) महानगरपालिका पॅनॉलवरील वास्तुशास्त्रज्ञ/अभियंता यांच्याकडुन मंजूर करण्यात आलेली आहेत. व उपलब्ध झालेल्या नकाशानुसार वस्तीगृह, रुग्णालय बांधण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन १९९७-९८ चे जिल्हा दरसुचीनुसार तयार केलेले २४,५०,०००/- चे सविस्तर अंदाजपत्रकास सन १९९८-९९ च्या विकास इमारत व शाळा, दवाखाना या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४७/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे बाबतीत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे कलम १० (१) (२) नुसार वर्ग-१, २ व ३ या कर्मचाऱ्यांना वयाच्या ५८ व्या वर्षी व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना वयाच्या ६० व्या वर्षी सेवानिवृत्त करण्यात येते.

महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र.सेमीवे/१०९८/४५ सेवा-४, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई, दि.२९ मे १९९८ नुसार शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवा निवृत्ती वय ५८ वर्षावरुन ६० वर्षावर खालील अटींच्या अधिन राहून करण्यात आले आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडण्यात आली आहे.

**अटी :**

अ) अन्यथा विनिर्दिष्टपणे तरतूद केली असेल तर ते खरीज करुन ज्यांचे सध्यांचे "सेवा निवृत्तीचे वय ५८ वर्ष आहे. असा प्रत्येक शासकीय कर्मचारी आता ज्या महिन्यात ६० वर्ष वयाचा होईल त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी माध्यानोत्तर सेवेतून निवृत्त होईल. तथापि ज्या शासकीय कर्मचाऱ्यांची जन्मतारिख महिन्याच्या एक तारखेला असेल तो कर्मचारी ६० वर्ष वयाचा होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी माध्यानोत्तर सेवानिवृत्त होईल.

ब) नियम वयोमानाच्या वयानंतर सेवेत मुदतवाढ देणे/पुनर्नियुक्ती देणे यावर पुर्णतः बंदी राहील. महानगरपालिका स्वायत्त संस्था असल्याने या बाबतीत महानगरपालिका स्वतःचे धोरण ठरवू शकते. कारण महानगरपालिकेचे कर्मचारी जे दि.०१.१०.६४ नंतर सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना सेवानिवृत्ती अनुदान (पेन्शन) महानगरपालिका फंडातून द्यावे लागते. सदरील खर्च सर्वस्वी महानगरपालिकेच्या उत्पन्नातून करण्यात येत असून त्यासाठी शासनाकडुन महानगरपलिकेस कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका निहित असल्याने याबाबत धोरण ठरवण्यास नेमणूक प्राध्याकाऱ्याची मान्यता आवश्यक असल्याने प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.गौतम खरात :** महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष ऐवजी ५८ वर्ष ठेवण्यात यावे.

**ठराव क्र.४७/६ :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असल्याने व महानगरपालिकेचे कर्मचारी जे दिनांक ०१/१०/६४ नंतर सेवानिवृत्त झाले आहे. त्यांना सेवानिवृत्त झाले आहे. त्यांना सेवानिवृत्ती अनुदान महानगरपालिका फंडातून द्यावे लागत असल्याने हा खर्च महानगरपालिकेच्या उत्पन्नातून करण्यात येणार आहे. त्यामुळे शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अनुसार नेमणूकीचे अधिकार महानगरपालिकेत निव्हित महापालिका आस्थापनेवरील अधिकारी व वर्ग-३ चे कर्मचारी सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्ष ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८/७ :**

महानगरपालिका, औरंगाबादने भूतपुर्व नगर परिषद क्षेत्रासाठी मंजूर झालेल्या विकास योजनेच्या आराखड्यातील नाविकास क्षेत्र वगळून, उर्वरीत क्षेत्र व सिडकोच्या अधिसूचित क्षेत्रातून वगळलेले क्षेत्र हयासाठी सुधारित विकास योजना तयार करण्याचे ठरविले होते. त्यानूसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २३ (१) सहकलम ३८ नुसार मंजूर विकास योजना सुधारित करण्याचा इरादा महानगरपालिकेने दि.१६.०८.८८ च्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.८ अन्वये जाहिर केलेला होता.

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७२/२ दि.१९.०२.९० अन्वये विकास योजना कार्यालय सुरु करण्यास मान्यता दिली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाने सुधारित विकास योजनेचे काम पार पाडण्यासाठी उपसंचालक, नगर रचना विकास योजना औरंगाबाद या कार्यालयाची स्थापना केली. हे कार्यालय दिनांक १८.०६.९२ पासून अस्तित्वात आले आहे. सदर कार्यालयाच्या आस्थापनेवर विविध उद्दिष्टांवर झालेला वर्षनिहाय खर्च हा महानगरपालिकेने वित्तीय वर्षा अखेर शासन खाती जमा करावयाचा असतो. महानगरपालिका औरंगाबादने आदेश क्र.ए.एम.सी./एडीटीपी/एटीपीओ/१२३५/१९९३, दि.१२.०४.९३ द्वारे उपसंचालक नगररचना विकास योजना औरंगाबाद यांची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये "नगर रचना अधिकारी" म्हणून नेमणूक केली होती.

मा.उपसंचालक, नगर रचना विकास योजना औरंगाबाद तथा नगर रचना अधिकारी यांनी विकास योजना आराखडा व अहवाल तयार करुन तो प्रसिध्द करणे साठी महानगरपालिकेकडे दिनांक १५.०३.९५ रोजी सादर केला होता. सदर विकास योजना शासन राजपत्रात दिनांक ३०.०३.९५ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

प्रसिध्द करण्यात आलेल्या विकास योजनेवर जनतेकडुन प्राप्त हरकती व सुचना यावर निर्णय घेण्यासाठी नियोजन समितीची नियुक्ती करण्यात आली होती. नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालास, महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे. सद्नंतर सदर प्रारुप विकास योजना (सु) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १६२ (१) अन्वये नियुक्त अधिकारी यांनी दि.२५.०३.९८ रोजी शासनास मंजूरीसाठी सादर केलेली आहे.

विकास योजना आता शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात आलेली असल्यामुळे उपसंचालक, नगर रचना विकास योजना औरंगाबाद हया कार्यालयाचे कामकाज आता संपुष्टात आले असल्यामुळे हे कार्यालय यापुढे सुरु ठेवण्याची आवश्यकता राहिली नाही. त्यामुळे हे कार्यालय दिनांक ०१.०९.९८ पासून बंद करण्यात यावे. अशी शासनास विनंती

करावी. कारण या कार्यालयाच्या आस्थापनेवर होणाऱ्या खर्चाची प्रतिपुर्ती महानगरपालिकातर्फे करण्यात येत असते.

सबब प्रस्ताव मान्यतेसाठी सादर मान्यतेनंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव क्र.४८/७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भुतपुर्व नगर परिषदेच्या अटीसाठी मंजूर झालेल्या विकास योजनेच्या आराखड्यातील नाविकास क्षेत्र वगळून उर्वरीत क्षेत्र व सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळलेले क्षेत्र यासाठी सुधारित विकास योजना तयार करुन सुधारित विकास योजना तयार करण्या करिता उपसंचालक, नगर रचना या संवर्गात महाराष्ट्र शासन उपसंचालक नगररचना विकास योजना औरंगाबाद या दि.१८.०६.९२ पासून निर्मिती करण्यात आली. सदर कडील विकास योजना आराखडा व अहवाल तयार करुन त्यानंतर नियोजन समितीची नियुक्ती होऊन आलेल्या सुचनावर निर्णय घेऊन महानगरपालिकेच्या सर्वसाधारण मंजूर केलेली आहे व या प्रारुप विकास योजना औरंगाबाद (सुधारित) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १६२ (१) अन्वये नियुक्त अधिकारी यांनी दि.२५.०३.९८ रोजी शासनास मंजूरीसाठी सादर केलेली आहे. त्यामुळे उपसंचालक नगर रचना विकास योजना औरंगाबाद या कार्यालयाने कामकाज संपुष्टात आल्यामुळे हे कार्यालय पुढे चालु ठेवण्याची आवश्यकता नसल्याने हे कार्यालय दि.०१.०९.९८ पासून बंद करण्यात यावे. असा शासनास विनंती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. व या ठरावास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळची पुरवणी विषयपत्रिका

**विषय क्र.४९/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद या ऐतिहासिक शहरात दि.२ व ३ ऑगस्ट ९८ रोजी ऋषी प्रभाकरण सिध्दी समाधी योगचे जनक हे येत आहेत. त्यांनी पुण देशास सिध्दी समाधी योगाचा प्रचार केला असून त्यांचे १५००० भक्त आहेत. तरी महानगरपालिकेतर्फे सिध्दी समाधी योगाचे जनक ऋषी प्रभाकरण यांना सन्मानित पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात यावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** डॉ.भागवत कराड.

**अनुमोदक :** श्री.संजय जोशी, श्री.भगवान घडामोडे.

**ठराव क्र.४९/१ :**

प्रस्तावात दर्शथ्वल्थ्याप्रमाणे औरंगाबाद या ऐतिहासिक शहरात दि.२, ३ ऑगस्ट ९८ रोजी सिध्दी समाधी योगचे जनक ऋषी प्रभाकरण येत आहे.त्या निमित्ताने महानगरपालिका तर्फे त्यांचा समन्मान पत्र देऊन सत्कार करण्यांच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते व या प्रस्तावाला याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.०२ ऑगस्ट पासून शालीवाहन आयुर्वेद सेवा प्रतिष्ठाण तर्फे राज्यस्तरीय सर्व आयुर्वेद डॉक्टरांचे मेळावा घेऊन दोन दिवसीय रुग्णांना

मोफत वैद्यकीय उपचार करण्यात येणार आहे. या करिता आम्ही खालील सह्या करणाऱ्या सर्व नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून एकूण रक्कम रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार पर्यंत फक्त) निधी देणे करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.संजय केनेकर

**अनुमोदक :** श्री.राजकुमार बचाटे

श्री.डॉ.भागवत कराड,

श्री.संजय जोशी,

श्री.भगवान घडामोडे,

सौ.विमलताई मंडलिक,

श्री.कुवरसिंग बैनाडे,

श्री.डॉ.विजयकुमार मेहेर

**ठराव क्र. ५०/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शालीवाहन आयुर्वेद सेवा प्रतिष्ठाण तर्फे राज्यस्तरीय सर्व आयुर्वेद डॉक्टरांचा दिनांक ०२.०८.९८ दोन दिवसीय मेळावा घेण्यात येणार असून त्यात रुग्णांना मोफत वैद्यकीय उपचार करण्यात येणार आहे. त्यासाठी वर प्रस्तावात दर्शविलेल्या स.नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) निधी देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. व या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण संचालक परिपत्र क्र.अशिवे/१४७७/क, दि.०२.११.७९ तसेच ज्या ठिकाणी १ ली ते ७ वी पर्यंत वर्ग असतील ते रेझोटेशन पीटीसी/पी-१०६९/३९८१८, दि.२८ सप्टेंबर ७३ नुसार महानगरपालिकेच्या शाळेत चित्रकला शिक्षक तसेच जेथे हस्तकला शिक्षकांचा कारभार आहे तेथे हस्तकला शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना या दोन्ही विषयाबाबत आवश्यक ते ज्ञान मिळत नाही.

तरी हस्तकला व चित्रकला शिक्षकांच्या रिक्त जागा भरणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.राजकुमार बचाटे (मामा)

**अनुमोदक :** श्री.कंवरसिंग बैनाडे,

श्री.संजय केनेकर.

**ठराव क्र.५१/३ :**

प्रस्तावात नमूद केलेल्या परिपत्रकांप्रमाणे महानगर पालिकांच्या शाळेत जेथे चित्रकला शिक्षक व हस्तकला शिक्षकांची आवश्यकता आहे. व चित्रकला व हस्तकला शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत, विद्यार्थ्यांना चित्रकला व हस्तकलांचे ज्ञान होणे आवश्यक असल्याने अशा रिक्त जागा भरण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२/४ :**

महानगरपालिकातर्फे स.नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून डॉयव्हर व संगणक प्रशिक्षण सुशिक्षीत बेकारांना देण्यात येते. त्याऐवजी सदरील प्रशिक्षण महानगरपालिकातर्फे देण्यात

यावे. या करिता गारखेडा व आमखास मैदान या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र महानगरपालिकेतर्फे करण्यात यावे. यासाठी स.नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून २५०००/- (पंचवीस हजार) पर्यंत प्रत्येकी ठेवण्यात यावे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.अविनाश कुमावत.
**अनुमोदक :** श्री.फैय्याज कुरेशी.

**संवाद :**
**सौ.लता दलाल :** प्रशिक्षण केंद्राची पुर्ण व्यवस्था होईपर्यंत मागच्या पध्दतीप्रमाणेच चालू ठेवावे.
**मा.महापौर :** मंजूर.

**ठराव क्र.५२/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुशिक्षीत बेकारांना वाहनचालक, संगणक इ.प्रशिक्षण देण्यासाठी गारखेडा, आमखास मैदान, सिडको इ.भागात महानगरपालिकेने प्रशिक्षण केंद्राची उभारणी करण्यास आणि त्यासाठी स.नगरसेवकांच्या विकास कामाच्या स्वेच्छानिधीतून प्रत्येकी रु.२५०००/- ठेवण्यास मान्यता देण्यात येते. तसेच सदर प्रशिक्षण केंद्राची पुर्ण व्यवस्था होईपर्यंत मागच्या पध्दती प्रमाणेच कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३/५ :**

महानगरपालिकेचे पशुधन विकास अधिकारी तथा प्राणी संग्रहालय अधिक्षक डॉ.एस.व्ही.रझवी हे वन्य प्राणी क्षेत्रात प्रशिक्षणासाठी जर्सी (इंग्लंड) येथे जाणार आहे. भारतातून फक्त दोनच व्यक्तींची निवड झाली. त्यापैकी औरंगाबाद महानगरपालिकेचे डॉ. रझवी यांची निवड झालेली आहे. त्याबद्दल त्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात यावे.

**सुचक :** श्री.विकारोद्दीन.
**अनुमोदक :** श्री.अशफाक सलामी,
श्री.नरेंद्र पाटील,
श्री.गौतम खरात,
श्री.किशोर तुळशीबागवाले.

**ठराव क्र.५३/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वन्य प्राणी प्राणी क्षेत्रात जर्सी (इंग्लंड) येथे प्रशिक्षणासाठी संपूर्ण भारतातून फक्त दोनच व्यक्तींची निवड झाली. त्यापैकी औरंगाबाद महानगरपालिकेचे पशुधन विकास अधिकारी तथा प्राणी संग्रहालय अधिक्षक डॉ.एस.व्ही.रझवी यांची निवड झाल्याबद्दल सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड (२२) कैसर कॉलनी भागातील "खासगेट" ते रोशन गेट रोडकडून येणारा रस्ता डाव्या बाजूच्या मेन रस्त्याला स्वर्गवासी स्वातंत्र्य सैनिक "जवाहर लालजी दर्डा" याचे नांव देण्यात यावे. अर्थ पुतळा बसविण्यात यावा.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.डॉ.भागवत कराड.
**अनुमोदक :** श्री.मोहसीन अहमद,
श्री.किशोर तुळशीबागवाले.

**ठराव क्र.५४/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खासगेट ते रोषनगेट रोड पर्यंत रस्त्याला स्वातंत्र्य सैनिक जवाहरलालजी दर्डा हे नांव देण्यास आणि नागसेन कॉलनी येथील महानगरपालिकेची खुल्या जागेत त्यांचा अधिकार पुतळा बसविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५/७ :**

या शहरातील स्थानिक कलावंतना प्रोत्साहन देणे मनपाचे कर्तव्य आहे. लकी स्टार या स्थानिक नोंदणीकृत संस्थेच्या वतीने एक मालिका तयार करण्यात येत आहे. औरंगाबाद शहराचे सांस्कृतिक चळवळीत मोठे योगदान आहे. या चळवळीत हातभार लावणेसाठी नगरसेवक स्वेच्छा निधीतून प्रत्येकी एक हजार रु. प्रमाणे अर्थसहाय्य या संस्थेस देण्यात यावे. सदर फिल्म महानगरपालिका, औरंगाबाद नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून तयार करण्यात आली आहे. म्हणून जाहिरात करण्यात येणार आहे.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक :** श्री.गौतम खरात.
**अनुमोदक :**

| | |
|---|---|
| श्री.गंगाधर गाडे, | श्री.गौतम लांडगे, |
| श्री.अ.रशिद सत्तार, | श्री.विठ्ठल जाधव, |
| श्री.हमीद ताबा, | श्री.नरेंद्र पाटील, |
| श्री.फैय्याज अहेमद कुरेशी, | श्री. अब्दुल रशिदखान (मामू) |
| श्री.अविनाश कुमावत, | श्री.अ.स.अली मिरा सलामी, |
| सौ.लता दलाल, | श्री.प्रदिप जैस्वाल, |
| श्री.संजय जोशी, | श्री.जयवंत ओक, |
| श्री.भगवान घडामोडे, | श्री.गजानन बारवाल, |
| श्री.विकास जैन, | श्री.संजय केनेकर, |
| श्री.सुदाम सोनवणे, | श्री.प्रफ्फुल्ल मालानी, |
| श्री.ज्योत्सना हिवराळे, | श्री.कचरु नवपुते, |
| श्रीमती पुष्पाताई गंगवाल, | श्री.माया लाडवाणी, |
| श्री.किशोर तुळशीबागवाले, | श्री.कोकाटे काशिनाथ. |

**ठराव क्र.५५/७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील लक्की स्ट्रार या स्थानिक नोंदणीकृत संस्थेच्या वतीने व्हीडीओ फिल्म मालिका तयार करण्यात येत आहे. त्यात औरंगाबाद शहराची सांस्कृती व सामाजिक चळवळीचे दर्शन घडवून येणार आहे. त्यासाठी नगरसेवक स्वेच्छा निधीतून प्रत्येकी रुपये १ हजार प्रमाणे या संस्थेस अर्थसहाय्य देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे स्वीय सहाय्यक नानकचद रत्तू यांचे सामाजिक चळवळीतील योगदान लक्षात घेता महापालिकेतर्फे त्यांना मानपत्र देऊन गोरविण्यात यावे.

**सुचक :** श्री.गौतम खरात,

**अनुमोदक :** कु.माया लाडवाणी,

श्री.गौतम लांडगे,

श्री.फैय्याज कुरेशी.

**ठराव क्र.५६/८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वीय सहाय्यक नानकचंद रत्तू यांचे सामाजिक चळवळीतील योगदान लक्षात घेवून औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे त्यांना मानपत्र देवून त्यांचा गौरव करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५७/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिवसेनेचे विभाग प्रमुख कै.मोतीलालजी जैस्वाल यांचे दुर्देवाने पाण्यात बुडून निधन झाले. त्यावेळी महापालिका अग्निशमन विभागाचे प्रमुख श्री.शिवाजी झनझन तसेच फायरमन श्री.महादेव मोरे, श्री.एन.एस.निकम, सब ऑफिसर श्री.आर.आर.कुबेर यांनी रात्रीचे वेळी पावसात लाईट नसतांना अथक परिश्रम करुन कै.मोतीलालजी जैस्वाल यांचा मृतदेह बाहेर काढला, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यांत यावे तसेच या सर्वांना एक जादा वार्षिक वेतनवाढ देण्यांत यावी.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.अविनाश कुमावत.

**अनुमोदक :** श्री.जयवंत (बंडु) ओक,

कु.माया लाडवाणी.

**ठराव क्र.५७/९ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अग्निशमन विभागाचे प्रमुख श्री.शिवाजी झनझन, उपप्रमुख श्री.आर.आर.कुबेर, फायरमन श्री.महादेव मोरे, श्री.एन.एस.निकम यांनी रात्रीच्या वेळी पावसात विद्युत पुरवठा नसतांना शिवसेनेचे विभाग प्रमुख कै.मोतीलाल जैस्वाल यांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यासाठी अथक परिश्रम केल्याबद्दल त्यांचे महानगरपालिकेतर्फे अभिनंदन करुन सर्वांना एक जादा वार्षिक वेतनवाढ देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय (प्रशासकीय)

**विषय क्र.५८/१ :**

औरंगाबाद शहराचे मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.२०५ ने माध्यमिक शाळाच्या आरक्षणाने बाधित होणारी स.नं.१०/पै.मो.जसवंतपुराची आरक्षित जमिन औरंगाबाद

महानगरपालिकेने यापुर्वी १९८५ साली खाजगी वाटाघाटीने संपादित करण्याची कार्यवाही केली होती. त्यानंतर जागेचे क्षेत्र संदर्भातील संदिग्धता संदर्भाने अर्जदाराने प्रकरणे न्यायप्रविष्ट करुन महानगरपालिकेस प्रत्यक्ष जागेवर विकास कामे करण्यासाठी मनाई केली होती. न्यायप्रविष्ट प्रकरण दिवाणी दावा क्रमांक ७१४/८९ मध्ये न्यायालयाने दिलेला निर्णय व तद्नंतर महानगरपालिकेने वरीष्ठ न्यायालयात केलेले अपील व अंतिम निर्णय घेणेस लागणारा कालावधी इ.चा एकत्रित विचार करुन आता अर्जदाराने महानगरपालिकेस तडजोड प्रस्ताव सादर केला आहे. तसेच हया जमिनीतून जाणाऱ्या नाल्याचे नाला ट्रेनिंग कामीही अर्जदाराने न्यायालयातून बाधित क्षेत्राचे मोबदल्यासाठी मनाई हुकूम आला आहे. त्यामुळे नाला ट्रेनिंगचे काम सध्या बंद आहे.

नाला, ट्रेनिंग कामाची आवश्यकता व वर नमूद केल्याप्रमाणे न्यायालयीन अंतिम निर्णयात लागणारा कालावधी विचारात घेता महापालिकेने संबंधिताने सादर केलेल्या तडजोड प्रस्तावांनुषगाने वाटाघाटी करुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे दोहोबाजू कडून मान्य करण्यात आले.

१. संबंधित जमीन मालक महापालिकेत तीन एकर क्षेत्राची जमीन रितसर नोंदणीकृत दस्तऐवजाने हस्तांतरीत करुन देतील.

२. नाला, ट्रेनिंगचे बांधित क्षेत्र व पाण्याचे टाकीस/महानगरपालिकेचे जागेत उपलब्ध होणारा पोच रस्ता/प्रारुप विकास योजना नुसार १२.०० मी. रुंद रस्त्याने बाधित होणारे क्षेत्रासाठी संबंधितास मोबदला न देता त्याऐवजी संबंधित महानगरपालिकेस देणार असलेल्या तीन एकर क्षेत्रापैकी १६ गुंठे (१६०० चौ.मी.) क्षेत्र कमी करुन उर्वरीत क्षेत्र महानगरपालिकेस देतील हया बाधित क्षेत्रासाठी महानगरपालिका संबंधितास कसलाही रोख स्वरुपातील मोबदला देणार नाही.

३. जमिनीचे क्षेत्र व नाला, ट्रेनिंग या अनुषंगाने न्यायप्रविष्ठ असलेली प्रकरणे, दावे संबंधित स्वत:हून स्वखर्चाने काढून घेतील.

४. नाला ट्रेनिंगचे थांबविलेले काम पुन्हा सुरु करण्यात त्वरीत अनुमती देतील.

करिता वरील प्रमाणे कार्यवाही करुन गेल्या १३ वर्षापासून प्रलंबित असलेल्या प्रकरणातील जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेऊन विकत कामाकरिता प्रत्यक्ष वापर करणे शक्य होईल.

करिता तडजोडीचा प्रस्ताव व त्यानुसार करावयाचे पुढील कार्यवाही बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर करारनामा व हक्क सोड प्रमाणपत्र (Relinguishrnent deed) संबंधिताकडून वर नमूद केल्याप्रमाणे तीन एकर क्षेत्रापैकी १६ गुंठे क्षेत्र वजा करता २ एकर २४ गुंठे जमीन नोंदणीकृत दस्तऐवजाने महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेण्यात येईल.

सदरील प्रस्ताव पाहता महानगरपालिकेने १९८५ साली वरील सर्व्हे नंबर मधील २ हेक्टर ३५ आर एवढी क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादित केले होते. त्यापैकी आता तडजोड प्रस्तावानुसार २ एकर २४ गुंठे क्षेत्र महानगरपालिकेकडे ठैवून उर्वरीत क्षेत्र मुळ जमीन मालक नंतर कोणत्या संदर्भाने या जमिनीबाबत तक्रार करणार नाहीत. त्या अटीवर मुळ मालकासाठी सोडण्यात येईल व त्यानुसार ७/१२ मध्ये नोंद घेता येईल.

**ठराव क्र.५८/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भूतपुर्व नगर परिषदेच्या वेळी मंजूर झालेल्या विकास योजनचे आरक्षण क्र.२०५ माध्यमिक शाळा स.न.१० (भाग) जसवंतपूरा पैकी २.३५ हेक्टर जागा १९८५ ला खाजगी वाटाघाटीने मनपातर्फे संपादन करण्यात आली असून, सदर जागेच्या संदर्भात मुळ मालकाने क्षेत्राच्या संधिग्तचे बाबत न्यायालयात प्रकरण दाखल केले. दिवानी दावा क्र.७१४/८९ मध्ये न्यायालयाचे निर्णया विरुध्द अपिल दाखल केले असून प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. या जागेत विकास कामे करण्यास महानगरपालिकेस न्यायालयाने मनाई केलेली होती. शिवाय याच जागेतून दावेदाराने नाला संरक्षित भिंतीचे काम बंद पाडले आहे.

सदर जागेचा विकास करता यावा आणि नाला संरक्षित भिंत बांधता यावी. तसेच न्यायालयीन प्रकरणांत अंतिम निर्णय लागण्यास लागणारा कालावधी इ.बाबतचा विचार करुन अर्ज़दाराने तडजोडीचा प्रस्ताव सादर केल्याप्रमाणे त्यानुसार वाटाघाटी करुन प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ.क्र.१ ते ४ च्या अटीस अधिन राहून प्रस्तावित तडतोडीच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. तसेच मुळ जमिन मालकाची १९८५ साली स.न.१०/पै. जसवंतपूरा पैकी २.३५ हेक्टर जमीन संपादन केली होती. आता तडजोडीत २ एकर २४ गुंठे क्षेत्र महानगरपालिकेकडे ठेवून उर्वरीत जमिन मुळ मालकास परत करण्यास ते न्यायालयात जाणार नाही, कोणत्याही संदर्भात जमिनीबाबत (स.न.१० जसवंतपूरा) भविष्यात तक्रार करणार नाही, २ एकर २४ गुंठे जमिन महानगरपालिकेस नोंदणीकृत दस्तऐवज (करारनामा, हक्कसोड प्रमाणपत्र) Relinguishrnent deed करुन देतील. या जमिनीच्या विकास कामात, नाला संरक्षण भिंत बांधणेच्या कामात अडथळा करणार नाही. व आताच्या प्रमाणे ७/१२ च्या मालकी हक्कात दुरुस्ती करणेत येईल. यात प्रस्तावातील सर्व अटीस अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात येते. व याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५९/२ :**

आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ.सौ.मंगला कुर्तडीकर यांची नेमणूक मुंबई प्रांतिक अधिनियम कलम ५४ अन्वये निवड समितीने दि.२३.१२.९७ रोजी शिफारस केल्याप्रमाणे नियुक्ती केली. त्यावेळी त्यांचे वय ५ वर्ष ५ महिने जास्त होते. परंतू अनुभवी व उच्च शिक्षणाची गरज असल्यामुळे वयाची अट शिथिल करण्यास मा.स्थायी समितीने ठराव क्र.४२२/१८ दि.१३.०२.९६ अन्वये मंजूरी दिली. त्यांना दि.०७.११.९६ रोजी समितीने वेतन श्रेणीवर नेमणूक करुन एक वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी संपला त्यांचे काम चांगल्या प्रकारे असल्याने त्यांचा परिविक्षाधिन कालावधी खुला करण्यास मंजूरी द्यावी. मंजूरीस्तव सादर.

**ठराव क्र.५९/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.सौ.मंगला कुर्तडीकर यांची नेमणूक मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये निवड समितीच्या शिफारशीनुसार आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. नियुक्तीच्या वेळी त्यांचे वय ५ वर्ष ५ महिने जास्त होते. अनुभवी व उच्च शिक्षणामुळे मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.४२२/१८ दि.१३.०२.९६ च्या अधिन राहून त्यांना वयाची अट शिथील केली आहे. व त्यांनी परिविक्षाधिनाच्या एका वर्षाच्या कालावधीत चांगल्या प्रकारे कामे केली असल्याने त्यांचा परिविक्षाधिन कालावधी खुला करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जनगणमन" या राष्ट्रगितानंतर आजची सभा संपल्याचे मा.महापौर यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १९ ऑगस्ट १९९८ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बुधवार दिनांक १९ ऑगस्ट १९९८ रोजी सकाळी ११.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस मा.महापौर सौ.शिलाबाई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात "वंदेमातरम्" या गीताने सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील सन्माननिय सभासद उपस्थित होते. स.सभासदांची उपस्थिती हजेरी रजिष्टर प्रमाणे**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.डॉ. कराड भागवत किशनराव | - | उप महापौर |
| २. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | स.सदस्य |
| ३. | स.स.श्री. अविनाश लक्ष्मणराव कुमावत | - | स.सदस्य |
| ४. | स.स.श्री. अफसर खाँ यासिन खाँ | - | स.सदस्य |
| ५. | स.स.श्रीमती लोखंडे रुख्मणबाई खंडेराव | - | स.सदस्य |
| ६. | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | - | स.सदस्य |
| ७. | स.स.सौ. साजेदा बेगम | - | स.सदस्य |
| ८. | स.स.श्री. म.सलिम म.हनिफ | - | स.सदस्य |
| ९. | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | - | स.सदस्य |
| १०. | स.स.श्री. ॲड.गणेश किसनराव वानखेडे | - | स.सदस्य |
| ११. | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | - | स.सदस्य |
| १२. | स.स.सौ. उषाताई दिलीप गायकवाड | - | स.सदस्य |
| १३. | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | - | स.सदस्य |
| १४. | स.स.श्री. लांडगे गौतम लिंबाजी | - | स.सदस्य |
| १५. | स.स.श्री. नरेंद्र यादवराव पाटील | - | स.सदस्य |
| १६. | स.स.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | - | स.सदस्य |
| १७. | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | - | स.सदस्य |
| १८. | स.स.श्री. बैनाडे कवरसिंग किसनसिंग | - | स.सदस्य |
| १९. | स.स.सौ. पद्मा बाबुराव शिंदे | - | स.सदस्य |
| २०. | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | - | स.सदस्य |
| २१. | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल रामचंद्र | - | स.सदस्य |
| २२. | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | - | स.सदस्य |
| २३. | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | - | स.सदस्य |
| २४. | स.स.सौ.फरहत बानो भ्र.मो.नवाज | - | स.सदस्य |
| २५. | स.स.श्री. फजलउल्ला खॅान अजमत उल्लाखान | - | स.सदस्य |
| २६. | स.स.श्री. अजीज खॅा गणी खाँ | - | स.सदस्य |
| २७. | स.स.श्री. महंमद मुस्ताक अहमद | - | स.सदस्य |
| २८. | स.स.श्रीमती नुरजहाँ बेगम अ.रहेमान | - | स.सदस्य |
| २९. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सदस्य |
| ३०. | स.स.श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी | - | स.सदस्य |
| ३१. | स.स.सौ. मोहसीना बिल्कीस विखारोद्दीन | - | स.सदस्य |
| ३२. | स.स.श्री. जावेद रज्जाक | - | स.सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३. | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | - | स.सदस्य |
| ३४ | स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | - | स.सदस्य |
| ३५. | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | - | स.सदस्य |
| ३६. | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | - | स.सदस्य |
| ३७. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | - | स.सदस्य |
| ३८. | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | - | स.सदस्य |
| ३९. | स.स.श्री. अ.अ.रऊफ म.अ.माबुद | - | स.सदस्य |
| ४०. | स.स.श्री. स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन | - | स.सदस्य |
| ४१. | स.स.श्री. खाखोरडीया धिरज शांतीलाल | - | स.सदस्य |
| ४२. | स.स.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | - | स.सदस्य |
| ४३. | स.स.श्री. सय्यद अली मीरा सलामी | - | स.सदस्य |
| ४४. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सदस्य |
| ४५. | स.स.श्री. फैय्याज अहेमद कुरेशी | - | स.सदस्य |
| ४६. | स.स.श्रीमती वाघमारे मुक्ताबाई सुदाम | - | स.सदस्य |
| ४७. | स.स.सौ. लता दलाल श्रीनिवास | - | स.सदस्य |
| ४८. | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | - | स.सदस्य |
| ४९. | स.स.सौ. धांडे शकुंतला हरिदास | - | स.सदस्य |
| ५०. | स.स.श्री. अब्दुल रशिद खाँन (मामू) | - | स.सदस्य |
| ५१. | स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण | - | स.सदस्य |
| ५२. | स.स.सौ. आव्हाड सविता धनंजय | - | स.सदस्य |
| ५३. | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | - | स.सदस्य |
| ५४. | स.स.श्री. अब्दुल रशिद अ.सत्तार | - | स.सदस्य |
| ५५. | स.स.श्री. धिल्लन तरविंदरसिंग महेद्रसिंग | - | स.सदस्य |
| ५६. | स.स.श्री. विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | - | स.सदस्य |
| ५७. | स.स.श्री.जैन विकास रतनलाल | - | स.सदस्य |
| ५८. | स.स.श्री. गंगाधर सुखदेव गाडे | - | स.सदस्य |
| ५९. | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | - | स.सदस्य |
| ६०. | स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | - | स.सदस्य |
| ६१. | स.स.सौ. जोत्सना हिवराळे | - | स.सदस्य |
| ६२. | स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | - | स.सदस्य |
| ६३. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सदस्य |
| ६४. | स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | - | स.सदस्य |
| ६५. | स.स.श्री. विठ्ठल किशन जाधव | - | स.सदस्य |
| ६६. | स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | - | स.सदस्य |
| ६७. | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | - | स.सदस्य |
| ६८. | स.स.श्री. काळुसे मंदा धनंजय | - | स.सदस्य |
| ६८. | स.स.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | - | स.सदस्य |
| ६९. | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | - | स.सदस्य |
| ७०. | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | - | स.सदस्य |

कोरम अभावी आजची सभा ३० मिनीटे तहकुब करण्यात येत असल्याची घोषणा मा.महापौर यांनी केली. (वेळ सुमारे ११.०० वा.)

तहकुब करण्यात आलेली सभा दुपारी ११.३० वाजता पुन्हा सुरु करण्यात आली. महानगरपालिकेतील कर्मचारी शाखा अभियंता पै.श्री.एम.ए.हक, तसेच मानस सरावरातील दुर्गघटनेस मृत्यूमुखी पडलेले नागरिक, व नांदेड महानगरपालिकेतील सन्माननीय नगरसेवक तथा सभागृह नेता स्व.श्री.शशीशेखर पांडे यांच्या दुःखद निधनानिमित्त सभागृहाने ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

**संवाद :**

**श्री. जावेद रज्जाक :** मागील सर्वसाधारण सभेत झालेल्या विषयावर चर्चा करावयाची आहे.

**मा.महापौर :** चर्चानंतर करावी. अगोदर विषय पत्रिकेतील विषयावर चर्चा करावी.

**श्री.जावेद रज्जाक, श्री.अफसर खान, श्रीमती आबेदा नुरजहाँ बेगम, सौ.फरहद बानो,**

**मा.महापौर :** विषय पत्रिकेतील विषयावर नंतर चर्चा करण्यात यावी. आधी चर्चेतील विषयावर बोलू द्यावे.

**मा.महापौर :** स.सदस्यांच्या सुचनेनुसार विषय पत्रिकेतील विषयावर चर्चा करावी. चर्चेसाठी विषय पत्रिका संपल्यावर एक तासाचा अवधी देण्यात येईल.

(याच वेळी आघाडीचे श्री.जावेद रज्जाक, श्रीमती फरहद बानो, श्रीमती नुरजहाँ बेगम, श्रीमती जाहेदा बेगम, श्री.अफसर खॉन व इतर काही आघाडीच्या नगरसेवकांनी पाणीपट्टी वाढ या विषयावर चर्चा होऊ देण्याबाबत सभागृहात मोठमोठ्या आवाजात मागणी करत होते.)

टिप : दि.१७.०७.९८ च्या सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनुसार, इतिवृत्त टंकलिखीत करतांना विषय क्र.२६/६ चा मजकूर अनावधानाने टंकलेखनातून राहिल्याने तो पुढीलप्रमाणे वाचावा.

**श्री.संजय जोशी :** भारताने अणुस्फोट केले म्हणून अमेरिकेने आर्थिक निर्बंध घातले आहेत. हे आर्थिक निर्बंध उठल्यानंतर या ठरावाचा विचार करण्यात यावा. यास माझा विरोध आहे.

**मा.महापौर :** विषय क्र.१ वर चर्चा करावी.

**विषय क्र.६०/१ :**

दि.१२.०६.९८ च्या विशेष सर्वसाधारण सभेचे व दि.१६.०७.९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर :** १) दि.१६.०७.९८ च्या इतिवृत्तातील विषय क्र.२२/२ मधील (पृष्ठ क्र.१५ वरील) ठरावात सभागृहाने श्री.प.ल.गोहिल नगररचनाकार यांना एक वर्षासाठी पदस्थापना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. परंतू यापुढे असे ठरले की, महानगरपालिकेतील आस्थापनेवरील अधिकारी यांची सदरील पदावर नेमणूक व्हावी व तसे शासनास कळविणे. असे वाक्य ठरावात आलेले नाही. तरी ते घेण्यात यावे.

२) दि.१६.०७.९८ च्या इतिवृत्तील (पृष्ठ क्र.३१ वर) टपरी बाबत असे ठरले होते की, ३० फुटाच्या आत जे रोड आहे. (जे इंर्टनल रोड असतात) त्या ठिकाणी टपरी टाकण्यासाठी पोलिसाच्या ना हरकत प्रमाणपत्राची गरज असू नये असे ठरले होते, परंतू ठरावात तसा उल्लेख केलेला नाही. तरी ठरावात

तसा उल्लेख करुन दुरुस्ती करण्यात यावी. तसेच ४०,६०,८० फुटाचे जे रोड आहेत. अशा रोडवर टपरी टाकण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे असे ठरले होते.

**श्री.भगवान घडामोडे :** दि.१६.०७.९८ च्या इतिवृत्तातील (पृष्ठ क्र.५८) विषय क्र.५८/१, ५९/२ हे ऐनवेळचे विषय मागच्या मिटींगला विषय पत्रिकेत नसतांना ही इतिवृत्तांत त्यांचा समावेश करण्यात आला आहे. विषय पत्रिकेत विषय नसतांना ही विषय इतिवृत्तात येतो कसा कन्फॉरमेशन हा विषय येतोच कसा संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** विषय पत्रिकेत हा विषय नव्हता परंतू ऐनवेळेचा प्रस्ताव दिले होते. त्यात हा विषय होता व त्यावेळी सभागृहाने या सर्व ऐनवेळच्या विषयाला मंजूरी दिली आहे.

**श्री.नरेंद्र पाटील :** स.सदस्यांनी ज्या विषयाबाबत सुचना केली आहे. हा महत्वाचा विषय असून मा.महापौर यांचे लक्ष वेधू की, हा ठराव भूसंपादन वगळण्याबाबतचा असून महत्वाचा आहे. आणि तो या ठिकाणी पारित झालेला आहे. असे का दाखवता. शहरातील असे बरेच प्रस्ताव भूसंपादन वगळण्याबाबत येऊन सभागृहात कायम करण्याबाबत मंजूर झाले असतील मागे ही संभाजी महाराजाचा पुतळा टि.व्ही. सेंटर उभारण्याचे ठरले आणि प्रस्ताव येतो कायम करणेसाठी जालना रोडचा हे कसे काय? पाणी पट्टी वाढीच्या संदर्भात सभागृहाने निर्णय घ्यावयाचा असतो. परंतू या ठिकाणी बोलू दिले जात नाही. मात्र स.सदस्यांना आपल्या दालनात बोलावून चर्चा करणे योग्य नसून हा सभागृहाचा अपमान आहे. आपली कार्यवाही ही व्यवस्थित रित्या पार पाडता येत नसेल तर आपण आपल्या पदाचा राजीनामा देऊन टाकावा.

(याच वेळी सभागृहात सत्ताधारी पक्षातर्फे एकच आवाज होतो काहीही ऐकू येत नाही.)

**श्री.गिरजाराम हाळनोर :** मा.महापौर यांच्या समाकक्षात कोणाला काय चर्चा करावयाची आहे. हा महापौर यांचा अधिकार असून सर्व साधारण सभेत पाणीपट्टी बाबत सर्वांच्या संम्मतीने मंजूरी दिलेली आहे. स.नगरसेवकांनी सभागृहात विचार विनिमय करुनच बोलावे.

**श्री.हमीद ताबा, श्रीमती मोहसीन बिल्कीस :** स.सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी संबंधित विषयावर जी चर्चा केली आहे. ती योग्य असून या बाबत खुलासा व्हावा.

**श्री.विजयकुमार मेहेर, श्री.भगवान घडामोडे, श्री.अविनाश कुमावत :** पृष्ठ क्र.५८ वरील भूसंपादनाचा प्रस्ताव हा विषय पत्रिकेत नव्हता हा प्रस्ताव इतिवृत्तात आला कसा सदस्यांना याबाबत माहिती दिली होती का? स.सदस्यांना याबाबत प्रस्तावाच्या प्रति दिलेल्या होत्या का? या ठरावावर चर्चा करावी.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**सहा.संचालक, नगररचना :** सदरील प्रस्ताव हा प्रशासकीय असून याबाबत नगर सचिवांकडे प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविला होता का? या बाबत माहिती द्यावी.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** सचिव यांच्या माध्यमातून प्रस्ताव येत असतात त्यांनी हा प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविला होता का? याबाबत माहिती द्यावी.

**मा.महापौर :** सचिव यांनी या प्रस्तावाबाबत खुलासा करावा.

**श्री.गंगाधर गाडे :** सदरील ठरावावर चर्चा झालेली नाही. तरी मा.महापौर यांनी या ठरावास पारित कसे केले, याची माहिती द्यावी. कोणतेही प्रस्ताव सभागृहात ठेवणार

आणि त्या प्रस्तावाच्या ठरावात पारित केलेले दाखविणार ही बाब सभागृहाला अशोभनीय आहे. प्रथमतः कोणत्याही सभेत ठराव येणेसाठी मा.महापौर यास जबाबदार आहेत.

**श्री.गौतम खरात :** मागच्या ३ वर्षापासून महानगरपालिकेतील ओपन जागा, नालेतील जागा हया कित्येक लोकांना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत सी.बी.आय. तर्फे चौकशी झाली पाहिजे. महानगरपालिकेच्या मोठमोठ्या क्षेत्रफळ असलेल्या कित्येक मोकळ्या जागा हया सर्रासपणे विकल्या जात असून हा एकच प्रस्ताव नव्हे तर असे अनेक प्रस्ताव प्रशासनामार्फत सभागृहात आले व मंजूरही झाले आहेत. महानगरपालिकाच्या जागा विकण्याच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय या सभागृहात घेतले पाहिजे. अशाच प्रकारे जर भूसंपादनाच्या व ओपन स्पेसच्या जागा कुणाही संस्थेस किंवा व्यक्तींस देत राहणे हे आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहत असून आम्ही ते मुळीच खपवून घेणार नाही.

**श्री.गंगाधर गाडे :** सभागृहात कोणत्या विषयावर चर्चा झाली व कोणत्या विषयावर चर्चा झाली नाही. याबाबत माहिती महापालिकेच्या गेटजवळ बोर्ड ठेवून नोंद करावी. म्हणजे शहरातील नागरीकांना प्रस्तावा संदर्भात काय जो आक्षेप नोंदवायचा असेल. ते नोंदवतील. परंतू सभागृहात ऐनवेळचे विषय म्हणून त्याबाबत चर्चा न होता. त्या विषयाचा ठराव कायम करण्यासाठी येतो. हे चुकीचे धोरण आहे.

**श्री.गौतम खरात :** नारळीबाग सारख्या भागात तेथील लोकांना सुराणा बिल्डरवर जमिनी विकल्या त्या बिल्डरने बेकायदेशीर बांधकामे करुन त्या नाल्यात पावसाचे पाणी सतत शिरते व त्यामुळे तेथील लोकांचे किती हाल अपेष्टा होत आहे ते प्रत्यक्ष जाऊन पाहिल्यानंतर समजले त्या नाले जवळच्या जागा त्या बिल्डरला कसे देण्यात येते. प्रशासन सर्व बाजू तपासून पाहत नाही काय.

**श्री.जयवंत ओक :** नगरपरिषदेच्या काळापासून व आता महापालिकेच्या अखत्यारात तेथील जागा हया महापालिकेच्या होत्या तर महापालिकेने तेथे वॉल कंपाऊड, तार कंपाऊंड का केले नाही. त्या आरक्षित जागा महापालिकेच्या फक्त कागदोपत्री दाखविल्या जातात. या ठिकाणी रोड कल्वर्ट का बांधले नाही. ग्रीन बेल्ट आहे, पार्कींगचे आरक्षण आहे. व दुसऱ्या व्यक्तींनी घरे बांधले त्या ठिकाणी प्रशासनाने जागा संरक्षित राहण्यासाठी काही कार्यवाही केली आहे काय? अशा प्रकारच्या किती शहरातील जागा इतर व्यक्तींना गिळंकृत केली याचा तपास व्हावा.

(याच वेळी अनेक स.सदस्यांचा आवाज होतो.)

**मा.महापौर :** स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसुन घ्यावे. एका वेळी एकाच स.सदस्यांनी बोलावे.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** विषय क्र.५८/१ व ५९/२ या विषयावर स.सदस्य यांना अभ्यास करावयाचा आहे. सध्यातरी हा विषय स्थगित ठेवून यापुढे सभागृहात येणारे ऐनवेळचे सर्व विषय सभागृहात वाचुन दाखवावे. त्यानंतरच निर्णय घेण्यात यावा.

**मा.महापौर :** सदरील विषय स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र.६०/१ :**

दि.१७.०७.९८ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येते.

१) ठराव क्र.२२/२ अन्वये मंजूर झालेल्या ठरावामध्ये नगर रचनाकार हे पद शासकीय पदस्थापनेवर न भरता महापालिका आस्थापनेवर भरण्यात यावे व त्यासाठी आवश्यक ती शासनाची मंजूरी घेण्यात यावी. अशी दुरुस्ती करण्यात येते.
२) ठराव क्र.२८/८ अन्वये मंजूर झालेल्या ठरावामध्ये कॉलनी अंतर्गत ३० फुटाचे रस्त्यावर टपरी टाकण्यासाठी पोलिसाच्या नाहकरत प्रमाणपत्राची अट शिथील करुन ३० फुटापेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यावर टपरीसाठी पोलिस खात्याचे नाहकरत प्रमाणपत्र घेणे आवश्यक अशी दुरुस्ती करण्यात येते.
३) ठराव क्र.५८/१ व ५९/२ स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. अशी दुरुस्ती करण्यात येते.
४) ठराव क्र.४४/३ या ठरावास दि.१७.०७.९८ च्या सभेतच स्विकृती देण्यात आली आहे. अशी दुरुस्ती करण्यात येते.
५) विषय क्र.२६/६ च्या मजकुरा नंतर पुढील खालीलप्रमाणे मजकुर वाचावा.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर हे दक्षिण अमेरीकेतील पेरु क्षेत्रातील कुस्को शहराचे जुळे शहर करण्याच्या प्रस्तावास भारत सरकारचे नगर विकास विभागाकडील पत्र क्र.एन-११०२५/४७/९६ युडीसी, दि.२८.०४.९८ अन्वये मान्यता दिली असल्याने त्या संदर्भाने प्रस्तावात दर्शविलेला सामजंस्य करार करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

वरील दुरुस्त्यासह दि.१२.०६.९८ चे व दि.१६.०७.९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६१/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सुल ते जमन ज्योती या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी मा.महापौर यांनी त्यांचे पत्र जा.क्र.मनपा/महापौर/स्वीस/९८/२०, दि.२३.०४.९८ च्या पत्राद्वारे सुचित केले आहे.

परंतू, सदरच्या रस्त्याबाबत चौकशी केली असता असे समजले की, हा रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्याचा आहे व त्यांचे कडून हया रस्त्याचे खडीकरणाचे काम करण्यात आलेले आहे. तसेच दि.२९.०६.९८ रोजी मा.महापौर यांचे सोबत चर्चा केली असता त्यांनी सुचविले की, हा रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्याचा असेल तर त्यांना एक पत्र देऊन हा रस्ता महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करुन घ्यावा कारण म.न.पा. हद्दीत हा रस्ता येत आहे. या रस्त्यांच्या दुरुस्तीला व डांबरीकरणाला जो खर्च येईल. तो म.न.पा. फंडातून करावा. त्यासाठी सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मंजूरीस्तव ठेवावा असे सांगितले. त्यानुसार सदरील रस्त्याबाबत पुन्हा चौकशी केली असता कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र./जिपऔ/बांध/ताशा/१/९८/२४४२, दि.१७.०७.९८ अन्वये कळविले आहे की, हर्सुल ते जमन ज्योती मंदिर ते इस्लाम पुरवाडी हा ३.८०० कि.मी. लांबीचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचेकडुन त्याचे पत्र जा.क्र./रोहयो/४१००/९८, दि.०५.०६.९८ द्वारे सदरचा रस्ता जिल्हा परिषद, औरंगाबाद (बांधकाम) यांच्याकडे हस्तांतरासाठी पाठविली आहे. म्हणून पत्रात उल्लेख केलेला आहे.

तसेच सदर रस्त्यापैकी हर्सुल ते जमज ज्योती हा २.०० कि.मी. रस्ता महानगरपालिके मार्फत डांबरीकरण करण्यास या कार्यालयाची (जिल्हा परिषद, औरंगाबाद) हरकत नसल्या बाबत व काम पुर्ण झाल्यानंतर त्या बाबतचा अहवाल या कार्यालयास (जिल्हा परिषद औरंगाबाद) कळविणे बाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी दि.१७.०७.९८ च्या पत्राद्वारे कळविले आहे.

त्याप्रमाणे प्रस्तुत रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्हा परिषद कार्यालयास त्याचे पत्र क्र.रोहयो/४१००/९८, दि.०५.०६.९८ अन्वये हस्तांतरासाठी पाठविलेला असल्यामुळे व जिल्हा परिषद औरंगाबादचे कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तुत २.०० कि.मी. च्या रस्त्यावर महानगरपालिकेतर्फे डांबरीकरण करण्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र दिल्यामुळे प्रस्तुत रस्ता महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करुन घेणेच्या कार्यवाहीस्तव व सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत विचार विनिमय होणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.नरेंद्र पाटील :** सदरील रस्त्यावर डांबरीकरण करावयाचे आहे. परंतू ती जागा किंवा तो रस्ता सध्या कुणाच्या ताब्यात आहे. याची माहिती द्यावी. जेव्हा सदरील रस्ता आपल्या ताब्यात नाही आणि त्या संदर्भात प्रस्ताव आहे. याच प्रकारचा प्रस्ताव जालनारोडवरील रस्त्याबाबत होता. तो अद्याप पर्यंत महापालिकेने का घेतला नाही. त्या रस्त्याबाबत प्रशासनामार्फत प्रस्ताव का येतो. याचे कारण काय एकतर महापालिकेची आर्थिक स्थिती ठिक नाही आणि दुसरीकडे जालना रोड हया रस्त्यावर खुपच वाहतूक सध्याही होते. वाहतुकीस अनेक अडथळे येतात. मग गेल्या १० वर्षापासून हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून महापालिकेने का हस्तांतर केला नाही? सदरचा प्रस्ताव आपल्या स्वतःच्या वार्डातला असल्याने हा प्रस्ताव घेण्यात येत आहे. सदरचा रस्ता २ कि.मी. अंतरापर्यंतचा रस्ता हस्तांतर करणे व त्याचे डांबरीकरण करणे या बाबतचा असून एकंदरित खर्च किती येणार आहे. आणि तो कुठल्या "हेड" मधुन टाकणार आहे. त्या कोण कोण शेअर्स करणार आहे. याची संपूर्ण माहिती सभागृहात द्यावी. व जोपर्यंत रस्ता हस्तांतर होत नाही. तोपर्यंत अशा कोणत्याही प्रस्तावावर महापालिका प्रशासनाने खर्च नये यास आमचा विरोध आहे.

**श्री.मोहसीन अहेमद :** महानगरपालिकेच्या हद्दीत हा रस्ता येत नसून त्यास हस्तांतर करुन घेऊन त्याची दुरुस्ती करुन डांबरीकरण करणे हे चुकीचे धारेण आहे. शहरातील इतर रोड डेव्हलपमेंट करावयाचे राहून गेलेले आहेत. एका बाजूने आपण टॅक्स वाढवता व दुसऱ्या बाजूने महापालिकेच्या हद्दीत नसलेल्या जागेचे हस्तांतर करुन डेव्हलपमेंट करण्याच्या खर्चाच्या तयारीत आहात हे योग्य नसून माझा त्यास विरोध आहे.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** सभागृहाची मान्यता मिळाल्यावर महापालिका मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ प्रमाणे खर्च करु शकते.

**श्री.मोहसीन अहेमद :** सदरील प्रस्तावास मंजूरी देऊ नये. त्यास आमचा विरोध आहे. दिल्यास मी कोर्टात अपील करील याची नोंद घ्यावी.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** सदरील रस्ता हा जिल्हा परिषदेचा आहे, त्याचे ई.जी.एस.मध्ये पी.डब्ल्यू.डी. नी त्याचे डब्ल्यू.बी.एम. करुन दिलेले आहे. आणि जिल्हा

परिषदेला तो रस्ता दिलेला आहे. महापालिकेने तो हस्तांतरण करुन घ्यावे व काम करुन घेण्यात यावे या दृष्टीकोनातून हा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

**श्री.विखारोद्दीन :** शहरातील अनेक रोड डेव्हलपमेंट करावयाचे बाकी आहेत. बऱ्याच वेळेस शहरातील रस्ता विकसीत करण्यास सभागृहात संबंधित अधिकारी यांना कार्यवाही करण्याचे आदेश दिले जाते व लेखी सुचनाही दिल्या जातात. परंतू त्यावेळी संबंधित अधिकारी त्या संदर्भात बजेट नाही, अशा प्रकारची उत्तरे देतील जे रोड अस्तित्वात आहेत. त्याची सुधारणा होत नाही व महापालिकेच्या हद्दीत रोड येत नाही. त्यास हस्तांतर करुन घेऊन डांबरीकरण करुन घेणेचा प्रस्ताव मांडल्या जातो ही बाब खेदजनक होय. हुकूमशाहीने काम होवू नये. सभागृहाला विश्वासात घ्यावे. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**मा.महापौर :** ठराव मंजूर करण्यात येतो.

**श्री.नरेंद्र पाटील :** हा ठराव मंजूर करत असाल तर माझा त्यास विरोध आहे.

(याच वेळी स.सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी सभागृहात विषय पत्रिका फाडून मा.महापौरांच्या व्यासपीठा जवळ फेकून सभागृहाबाहेर निषेध नोंदवून जातात.)

**श्री.अविनाश कुमावत :** स.सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी समाकक्षात विषय पत्रिका फाडून महापौर यांच्या आसनाजवळ फेकली त्यामुळे असे गैरकृत्य करणे योग्य नसून त्याचे ५ दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

**श्री.मोहसीन अहेमद :** स.सदस्यांच्या भावना सभागृहात जर विचारात घेतल्या जात नसतील तर आणि सर्वच विषय मंजूर करावयाचे असेल तर मंजूर करुन टाकावे व राष्ट्रगीताला सुरुवात करावी. म्हणजे सभा घेण्यात काहीही अर्थ नाही. आम्ही या ठिकाणी येण्याचा उद्देश काय आहे?

**श्री.अफसर खॉन :** मा.महापौर यांना विनंती की, कुण्याही स.सभासदांना एका वेळेस एकदाच बोलण्याची संधी द्यावी. सभागृहात गोंधळ होत आहे. त्यामुळे सभागृहाचा अवमान होत आहे.

**श्री.विखारोद्दीन :** शहरातील असे बरेच रस्ते आहेत. त्यांचा विकास करणेसाठी गेल्या २ ते ३ वर्षापासून सतत सूचना दिल्या आहेत. तरी त्याचा विकास कामासाठी प्रशासनाने काहीही कार्यवाही केलेली नाही. आणि जो रस्ता महापालिकेच्या हद्दीत नाही तो हस्तांतर करण्याचा प्रस्ताव सभागृहात ठेवण्यात येत आहे. ही गंभीर बाब असून त्यास आपण मंजूरी देता हे योग्य नाही. सभागृहात स.सदस्यांच्या भावनांचा आदर करावा.

**श्री.गौतम खरात :** महापालिकेच्या हद्दीत असलेले जुने रस्ते आपल्या प्रशासनाने विकसीत केलेले नाहीत. बारापुल्ला गेट जवळ लक्ष्मी कॉलनी या ठिकाणी अरुंद रस्ता आहे. जयभिमनगर तसेच बेगमपूरा ते बुढीलैन हे रस्ते सुध्दा महापालिकेच्या मालकीचे कक्षेतील असून आजपर्यंत ते का विकसीत करण्यात आले नाही. जे रस्ते म.न.पा. च्या मालकीचे नाही ते प्रथम मालकीचे करावे.

**मा.महापौर :** प्रस्तावातील रस्ता महापालिकेच्या हद्दीत असून अनेक नागरीकांच्या समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** स.सदस्यांचे मत असे की, शहरातील जे रस्ते विकसीत करावयाचे आहे. ते का करत नाही. सदरील रस्त्याचे विकास कामे करण्यास मंजूरी द्यावी व चालू असलेल्या प्रस्तावासाठी मंजूरी देण्यात यावी.

**श्री.गौतम खरात :** शहरातील जे रस्ते महापालिकेच्या हद्दीत आहेत ते महापालिकेकडे हस्तांतर करावे व नंतरच या विषयास विचार करण्यात यावा. व जे रस्ते महापालिका हस्तांतर करणार आहे. त्या संदर्भाने ज्या नागरी सुविधा आहे. त्या सर्व पुरवण्यात आल्या पाहिजे. नुसते हस्तांतर करुन चालणार नाही. यांची नोंद घ्यावी.

**मा.महापौर :** सदर प्रस्तावास स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र.६१/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल ते जमन ज्योती या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील पत्र क्र.रोहियो/४१००/९८, दि.०५.०६.९८ आणि कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचेकडील पत्र क्र.जिपऔ/बांध/ताशा/१/९८/२४४२, दि.१७.०७.९८ अन्वये हर्सुल ते जमन ज्योती हा २.०० कि.मी. रस्ता महापालिकेकडे हस्तांतर करुन सदर रस्त्याचे डांबरीकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. सदर प्रस्तावास याच सभेत सर्वानुमते स्विकृतीही देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६२/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, दादा कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.१३,२५,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "पुर्ण: डांबरीकरण या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून काम करणेसाठी या विभागातर्फे प्रस्तावित करण्यात आले होते. परंतू अंदाजपत्रक लेखा विभागाकडे मंजूरीस्तव गेले असता त्यांनी सदरच प्रस्ताव हा "नवीन डांबरी रस्ते" या लेखा शिर्षकातून मंजूर केलेला आहे.

करीता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र.६२/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दादा कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रु.१३,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६३/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मोंढा कॉटन मार्केट व्हाया जिन्सी ते चंपा मस्जीद पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु.१०,४८,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च भाडवली "नवीन डांबरीरस्ते" या लेखा शिर्षा अंतर्गत सन १९९८-९९ च्या अर्थ संकल्पीय तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र.६३/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोंढा कॉटन मार्केट जिन्सी ते चंपा मस्जिद पर्यंत डांबरीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रु.१०,४८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६४/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, विभाग क्र.१,२,३ व ४,६ मध्ये विविध ठिकाणी गतीरोधक, साईनबोर्ड व ट्राफिक स्ट्रीप्स इत्यादी तयार करण्याचे कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.२४,७४,५५०/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च शहर वाहतूक सुधारणा प्रकल्प (चार कोटी १९९७-९८ शासकीय विशेष अनुदान) या लेखा शिर्षाखाली ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.नरेंद पाटील :** १) महापालिकेतील जे सात झोन आहे. त्या झोन मध्ये ठिकठिकाणी रस्त्यावर गतीरोधक, स्पीडबोर्ड वर रु.२४,७४,५५०/- इतका खर्च दाखविण्यात आला. महापालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास आपण हा खर्च करु शकतो काय?

२) मागे काही नागरिकांनी हायकोर्टात केसेस दाखल केलेल्या आहेत की, गतीरोधक, साईनबोर्ड बाबत बंदी आणलेली आहे. जे की, सार्वजनिक बांधकाम व महापालिकेने ठिकठिकाणी ते केलेले होते. याबाबत आपण विधी सल्लागार यांच्या मार्फत सल्ला घ्यावा. जर या विषयास मंजूरी देत असाल तर माझा त्यास विरोध आहे. परंतू प्रशासनाने इतर विकास कामावर खर्च न करता फक्त साईन बोर्ड व गतीरोधकांवर प्रचंड खर्च करणे योग्य नाही.

**श्री.मोहसीन अहेमद :** संबंधित अधिकारी यांनी वाहतुक पोलिसाचे नाहकरत प्रमाणपत्र घेतले काय? याबद्दल खुलासा करावा.

**मा.महापौर :** मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त :** शहरात अनेक ठिकाणी वेगाचे (उतरते) रस्ते आहेत. त्या रस्त्यावर वाहतुकीच्या दृष्टीकोनातून स्पीड ब्रेकर, रोड डिव्हाडर्स, झेब्रा क्रॉसिंगस, प्रेडेस्ट्रीअम क्रॉसींग, साईनबोर्ड हे असणे नितांत आवश्यक आहे. रहदारीच्या नियंत्रणासाठी व वाहतूक सुरळीत होण्यासाठी आणि पादचाऱ्यासाठी नितांत आवश्यकता आहे. महाराष्ट्र शासनाकडुन म्हणजेच पोलिस विभागाकडून (ट्राफिक विभागाकडून) या बाबीवर खर्च करण्यास आपल्याला अनुदान प्राप्त होते. या अनुदानाच्या माध्यमातून महापालिका शहरातील जे महत्वाचे रस्त्यावर जास्त वाहतुकीच्या रस्त्यावर हे साईनबोर्ड, गतीरोधक लावण्यात आपण प्रयत्न करीत आहोत. विशेष प्रिन्ट्राव्हल्स ते सुभेदारी व प्रिंन्ट्रायव्हल ते रेल्वेस्टेशन पर्यंत प्रिन्ट्रायव्हल ते क्रांतीचौक त्या प्रमाणे गणेश कॉलनी ते मजनुहील पर्यंत असे महत्वाचे रस्ते आहेत. गारखेडा या भागातही महापालिकेला ही योजना राबवावयाची आहे. जे अनुदान पोलिस खात्याकडून प्राप्त व्हावयाचे आहे ते पाहिजे त्या प्रमाणात प्राप्त झालेले

नाहीत. मागच्या वर्षी अनुदान प्राप्त झाले होते. त्यामधून महापालिकेने प्रिन्ट्रायव्हल ते सुभेदारी हा रस्ता हाती घेतला होता. तेही काम आपल्याला पुर्ण करावयाचे आहे. आणि संपूर्ण शहराचा सर्व्हे करुन सहा.संचालक नगर रचना व अति.शहर अभियंता यांनी ज्या ज्या ठिकाणी गतीरोधक, साईनबोर्ड व ट्राफिक लेन, झेब्रा क्रॉसींग वगैरे करावयाचे आहेत. त्याबाबतची माहिती आली आहे. व त्या बाबतचे अंदाजपत्रक हे २४ लाखाचे असल्याने यास सर्वसाधारण सभेची मंजूरी असल्यास प्रशासन याबाबत कार्यवाही करु शकते.

**श्री.नरेंद्र पाटील :** जे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे ते या विषयासोबत जोडण्यात का आले नाही. नुसते २४ लाख रुपयांचा खर्च सभागृहाकडुन एकदा होते. प्रस्तावातील दर्शविलेली रक्कम प्रशासन एका महिन्यात खर्च करु शकत नाही. ज्या ज्या वेळेस सर्वसाधारण सभा होते. त्या त्या हिशोबाचे बजेट ठेवून सभागृहाची मंजूरी करुन अशी कामे करण्यात यावी. अथवा जो तपशिल खर्चास आहे. तो या विषयपत्रिकेसोबत का जोडण्यात आला नाही. प्रशासन अशा प्रकारचे प्रस्ताव ठेवून दिशाभुल करीत आहे.

**अति.शहर अभियंता :** या कामासाठी २५ लाखाचे अनुदान हे शासनाचे आहे.

**श्री.मोहसीन अहेमद :** सदरील कामासाठी जे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. संबंधित अधिकारी यांनी पोलिस विभागाकडुन ना हरकत प्रमाणपत्र घेतले आहे काय?

बऱ्याच वेळेस महापालिकेचे गतीरोधक, साईनबोर्ड व ट्राफिक लेन केलेले होते. परंतू पोलिस विभागाची परवानगी नसल्याने ते तोडण्यात आलेले आहे. त्यामुळे महापालिकेचे त्या नुकसान झालेले आहे.

**अति.शहर अभियंता :** पोलिस विभागाकडुन ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय हे काम करण्यात येणार नाही.

**श्री.मोहसीन अहेमद :** संबंधित अधिकारी यांनी जे अंदाजपत्रक तयार केले आहे. ते चुकीचे मार्गाचे असून पोलिस विभागाकडुन ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय या प्रस्तावास मंजूरी देण्यात येवू नये.

**अति.शहर अभियंता :** पोलिस विभागाकडुन ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय हे काम करण्यात येणार नाही.

**श्री.मोहसीन अहेमद :** संबंधित अधिकारी यांनी जे अंदाजपत्रक तयार केले आहे ते चुकीचे मार्गाचे असून पोलिस विभागाकडुन ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय या प्रस्तावास मंजूरी देण्यात येवू नये. हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**श्री.गौतम खरात :** टाऊन हॉलच्या जवळच्या रस्त्यावर मागे स.स.श्री.विधाते यांच्या नातेवाईकांचा ॲक्सीडेंट झालेला होता. त्यात ते गतप्राण ही झाले. रस्त्यावर जे स्पीडब्रेकर टाकले होते ते पालिस कमीशनर यांच्या विभागाकडुन असे अयोग्य ठिकाणी टाकलेले स्पीडब्रेक काढून टाकण्यात आले. तर यापुढे पोलिस विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले नाही. तर काढुन टाकतील व महापालिकेने केलेला खर्च हा बिनकामी होईल. त्यापेक्षा पोलिस विभागाकडुन प्रथमतः ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे. एकंदरीत खर्च न दाखविता कामानुसारच खर्च करावे.

**श्री.गंगाधर गाडे :** मा.आयुक्तांनी जो खुलासा केला त्यात वाहतूक सुरळीत व्हावी. अडथळे टाळावे. या करीत शासनाचा निधी वापरण्याची सुचना त्यांनी केली. अडथळे टाळावे हा शब्द त्यांनी वापरला आहे. मी प्रशासनाच्या असे लक्षात आणून

देतो की, रस्त्याच्या बाजुला ज्या टपऱ्या आहेत. हया टपऱ्या रस्त्यात अडथळा आणत असेल तर त्या टपरीधारकांना पर्यायी जागा देणे यो योजनेच्या संबंधित आहे किंवा काय?

जकात नाक्याजवळीत रोषनगेटच्या पुढे अनेक टपऱ्या काढण्यात आल्या त्यामुळे अनेक बेरोजगार झालेत. त्या ठिकाणी विचारणा केली असता. असे सांगण्यात आले. वाहतुक सुरळीत होण्यासाठी, रस्ता सुरळीत होण्यासाठी टपऱ्या काढण्यात आल्या आहेत. अशा टपऱ्या काढण्यात आलेल्या बेरोजगांराना महापालिका प्रशासनाने पर्यायी व्यवस्था केली पाहिजे. मग तो शहरातील कुठलाही भाग असो त्यानुसार प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** महाराष्ट्र शासनाने दिलेल्या अनुदानातून हा खर्च करावयाचा आहे. याबाबत मा.आयुक्तांनी योग्य खुलासा केलेला आहे. पोलिस विभागाकडुन शहरातील ज्या ज्या रस्त्यावर गती रोधक, साईनबोर्ड व ट्राफिक स्ट्रीप्स करण्याचे काम संबंधित विभाग दाखवतील त्याच ठिकाणी हे काम करण्यात येणार आहे. महापालिकेला हे काम एक एजन्सी म्हणून करावयाचे आहे. हे स.सदस्यांनी लक्षात घ्यावे.

**श्री.जयवंत ओक :** शासकीय, अनुदानातून दरवर्षी जर एवढी रक्कम खर्च करावयाचे असेल तर गतीरोधक, साईनबोर्ड व ट्राफिक स्ट्रीप्स, झेब्राक्रॉसींग या बरोबर रस्त्यांच्या ट्रॅफिक सिग्नल जवळ वेगवेगळी वाहने जे की, दोन चाकी, तीन चाकी, चार चाकी हे ज्या ज्या जागेवरच उभे करतील अशी पध्दतीची एक योजना राबवावी जेणेकरुन प्रत्येक वाहने हे ज्या त्या जागेवरच उभे राहतील अपघात वगैरे होणार नाहीत.

**सौ.लता दलाल :** सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार हा प्रस्ताव सभागृहात आलेला आहे. आता १९९८-९९ चे डी.एस.आर. चालु आहे. रु.२४ लाखाचे अंदाजपत्रक हे काम दाखविलेले आहे. नंतर कामात वाढ होते. व पुन्हा सर्वसाधारण सभेत त्यांचे नवीन अंदाजपत्रक सादर करण्यात येते. व तेथे कोणत्या कामात वाढ झाली. यांची माहिती संबंधित अधिकारी देत नाही. तसेच सन १९९६-९७ च्या नुसार सन १९९७-९८ मध्ये प्रस्ताव येतो. कसा या बाबत ही खुलासा करावा.

**श्री.स.अली मीरा सलामी :** १) शहरातील बऱ्याच ठिकाणी स्पीड ब्रेकर बसविले होते. ते का काढण्यात आले आहे. याची माहिती द्यावी.

२) स.सदस्य श्री.गाडे यांनी सांगितल्याप्रमाणे प्रशासन सांगते की, ट्राफिक मध्ये अडथळा येऊ नये. परंतू कुणाच्याही टपऱ्या काढण्यात येत आहे. त्याची प्रशासन पर्यायी व्यवस्था करणार आहे काय? तसेच शासनाच्या अनुदानातून हा पैसा खर्च करणार आहे. यास विरोध नाही. परंतू तो पैसा योग्य त्या ठिकाणीच खर्च व्हावा व शहरात कोणत्या रस्त्यावर गतीरोधक, साईनबोर्ड व ट्राफिक स्ट्रीप्स झेब्रा क्रॉसींग इ. तयार करण्याचे काम करणार आहे. याची माहिती सभागृहाला द्यावयास पाहिजे.

**श्री.नरेंद्र पाटील :** या कामासाठी शासनाचे जरी पैसा असला तरी त्याचा हिशोब शासनास द्यावा लागतो. मागे जालना रोडवर स्पीड ब्रेकरमुळे एक मुलगी स्कुटरवरुन पडल्यावर तीचा मृत्यू झालेला आहे. असे प्रकार यामुळे होत असतील तर शहरातील कोणकोणत्या ठिकाणी स्पीडब्रेक, साईनबोर्ड व ट्राफिक स्ट्रीप्स करण्याचे कामे करणार आहे. याची सविस्तर माहिती पुढच्या बैठकीत

संबंधित अधिकारी यांनी प्रस्तावात सादर करावी तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**मा.महापौर :** प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र.६४/५ :**

सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.६५/६ :**

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजने नुसार ५०" रुंद रस्ता गारखेडा गांव ते छत्रपती नगर गारखेडा हा रस्ता विकसीत करणे आवश्यक आहे. हया रस्त्यांच्या विकासामुळे गजानन महाराज मंदिर ते सुतगिरणी हया रस्त्यास छत्रपती नगर व इतर त्या भागातील वसाहतींना येण्यास सरळ रस्ता मिळेल हया रस्त्यांतील ५०% ते ७०% जागा रेखांकन मंजूरीच्या वेळी ताब्यात घेण्यांत आलेली आहे. ज्या भागाचे रेखांकन झालेले नाही. तो भाग भूसंपादनाचे कार्यवाहीने ताब्यात देण्यात येईल.

करिता सदर रस्त्याचा भूसंपादनाचा प्रस्ताव त्यास येणाऱ्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.प्रकाश निकाळजे :** ६ महिन्यापुर्वी गजानन महाराज मंदिर ते दर्गापर्यंत रोड महापालिकेने केलेला असून, विद्युत लाईटची व्यवस्था झालेली आहे. परंतू त्या रोडवर खडी काही ठिकाणी डांबर नाही. त्यामुळे रस्त्यावर सध्या खाचखळगे, पडलेले आहे. तो रस्ता केव्हा झालेला आहे, त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना माहिती द्यावी. या प्रकरणी कार्यवाही होण्याबाबत मी प्रशासनास एक पत्रही दिलेले आहे.

**श्री.गिरजाराम हळनोर :** महापालिकेने लाखो रुपये खर्च करुन रोड बांधावयाचे काम करते. प्रशासनाने चांगल्या प्रकारे काम करुन घ्यावे. जेणेकरुन महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही. गुत्तेदाराने काम व्यवस्थीत केले नाही. तर संबंधित गुत्तेदार ब्लॅक लिस्टमध्ये नाव टाकावे. शहरातील बरेच ठिकाणचे ८० फुटाचे रस्त्यावरील डांबरीकरण केलेले आहे. त्याला खड्डे पडलेले दिसते. याची काही कालमर्यादा आहे की नाही. परवाच्या पावसाने शिवराज कॉलनीतील पुल फुटल्याने अनेक लोकांचे नुकसान झालेले आहे. असे नुकसान ज्या गुत्तेदाराने काम केले आहे. त्याचा महापालिका प्रशासनाने काळया यादीत नाव समाविष्ट करण्याबाबत तपासणी करावी. अधिकारी यांनी काम करतेवेळेस व्यवस्थीत सर्टीफाईड करावे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** सदर च्या प्रस्तावास येणाऱ्या खर्चाची रक्कमच दाखवलेली नाही. या प्रस्तावास त्यास येणाऱ्या खर्चासह असे दाखविलेले आहे. तर किती खर्च येणार आहे. याची पुरेपूर माहिती द्यावी. अर्धवट प्रस्ताव यापुढे सभागृहात आले न पाहिजे याच संबंधित अधिकारी यांनी काळजी घ्यावी.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** मागे स्थायी समितीमध्ये एक ठराव झाला होता की, ज्याचे कोटेशन १५ टक्के पेक्षा जास्त बिले होती ते मान्य करु नये. ज्याचे २५ टक्के, २८ टक्के पर्यंत बिले येतात, त्यामुळे कामाची प्रत चांगली राहत नाही. तरी त्या

ठरावाची अंमलबजावणी करुन ज्याचे दर १५ टक्के पेक्षा जास्त बिले असतील. त्याचे टेंडर स्विकारण्यात येऊ नये. अशी मी विनंती करतो.

**श्री.नरसिंग ढगे :** वॉर्डातील जे रस्ते झालेले आहे. त्याचे काय? माझ्या वॉर्डातील रस्ता विकास करण्याचे राहिलेले अर्धवट काम तसेच राहून गेलेले आहे. त्याचा खुलासा संबंधित अधिकाऱ्यांनी करावा.

(यावेळी सभागृहात गोंधळ निर्माण होतो काही स.सदस्य मा.महापौर यांच्या आसनाजवळ जाऊन मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

**मा.महापौर :** सन्माननीय सदस्य यांनी आपआपल्या जागेवर बसावे. संबंधित अधिकारी खुलासा करीत आहेत.

**श्रीमती फरहत बानो :** किराडपुरा राममंदिर ते सिडको या रोडचे काम ८ दिवसांत करुन देऊ असे आश्वासन यापुर्वी दिले होते. तेथील रस्त्याचे काम का करण्यात आले नाही. याची माहिती द्यावी.

**श्री. म.अ.रऊफ :** लोटा कारंजा भागातील कलम १२७ ची खरेदी सुचना देवुन ५ महिने झाले आतापर्यंत काय कार्यवाही केली.

**सहा.संचालक, नगर रचना :** कलम १२७ च्या खरेदीनुसार कार्यवाही करण्यास सहा महिन्यात कार्यवाही करणेची तरतूद आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** सदरील कामाबाबतची फाईल मा.आयुक्तांकडे मंजूरीसाठी पाठवली आहे काय? नसल्यास का पाठविली नाही, याची माहिती द्यावी.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे. मागील ज्या रस्त्याबाबत मंजूरी मिळालेली आहे. ते रस्त्याचे पुर्णतः विकसीत कामे करण्यात येईल. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र.६५/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ५० फुट रस्ता गारखेडा गांव ते छत्रपती नगर गारखेडा हा रस्ता विकसीत करणे आवश्यक असल्यामुळे या भागात रेखांकन मंजूरीच्या वेळी ताब्यात घेण्यात आलेली रस्त्याखालील जागा वगळता उर्वरीत रस्त्याची खालील जागेसाठी भूसंपादनाचे कार्यवाही करुन जागा ताब्यात घेण्यास व सदर रस्त्याच्या भूसंपादनासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६६/७ :**

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजने नुसार मो.शहानूरवाडी येथील वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी सोसायटी लगत असलेला १५ मी. रुंदीचा विकास योजना रस्ता तयार करणे आवश्यक आहे. सदर रस्ता हा उत्तरेकडील २४ मीटर रुंद विकास योजना रस्ता व गादीया विहार जवळील १५ मी. रुंद विकास योजना रस्त्यात जोडणारा रस्ता आहे. करीता सदर रस्त्याची जागा संपादित केल्यास वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी सोसायटीतील नागरिकांना रस्ता वापरास तयार करता येईल व या भागातील नागरिकांचा रस्त्याचा प्रश्न सुटेल. या दृष्टीने विचार करता विकास योजना प्रस्तावानुसार सदर रस्ता

विकसीत करणे करिता जागा संपादित करण्यासाठीचा भूसंपादना करता खर्चाच्या मंजूरीसह प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर :** सदरील प्रस्तावाबाबत माहिती द्यावी.

**सहा.संचालक, नगररचना :** गादिया विहार पासून शहानूरवाडी दर्गाह हा रस्ता झालेला आहे. त्या रस्त्याला व ८० फुट रुंद रस्त्याला जोडणारा हा रस्ता आहे. वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी सोसायटीतील नागरिकांना रस्ता वापरास तयार करता येईल. करिता १५ मी. रुंदीचा रस्ता करणे आवश्यक आहे.

**मा.महापौर :** मंजूर.

**ठराव क्र.६६/७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी येथील वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी सोसायटी भागातील नागरिकांचा रस्त्याच्या प्रश्न सुटण्यासाठी औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार या सोसायटी लगत असलेल्या १५ मीटर रुंदीचा विकास योजना रस्ता तयार करण्यासाठी जागा संपादन करणे व भूसंपादनासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६७/८ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जालननगर पैठणरोड येथे दगडी गटार बांधणेबाबत परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन १९९६-९७ च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रुपये १३,०३,६३५/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च शहरी भागामध्ये खुल्या गटारी बांधणे या लेखाशिर्षकातील तरतूदी रक्कम रुपये ५० लाखातून करण्यात येईल.

तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.गंगाधर गाडे :** प्रस्ताव सभागृहात मांडतांना योग्य त्या पध्दतीने मांडण्यास सांगावे.

**श्री.अविनाश कुमावत :** सन १९९७-९८ च्या दराने काम चालु करावे.

**श्री.अ.रशिद अ.सत्तार :** सदर ठरावास स्विकृती देण्यात यावी.

**श्रीमती नुरजहाँ बेगम, श्रीमती मोहसीना बिल्कीस :** नवीन कामे करण्यास मंजूरी देण्यात येते. जुने प्रलंबित राहते. याबाबतची माहिती द्यावी. सभागृहात उत्तरे द्यावे. वेळ देवून वार्डात अधिकारी येत नाहीत.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** महानगरपालिकेच्या नियमानुसार ठरल्याप्रमाणे कोणत्या नगरसेवकाचे पत्र दिल्यानंतर त्या पत्राच्या अनुषंगाने ही काम असेल ते ४० दिवसांच्यया आत व्हावयास पाहिजे. न झाल्यास प्रशासनाने नगरसचिव यांच्या मार्फत सभेत ७ दिवस अगोदर लेखी विचारणा करावी म्हणजे त्याचा खुलासा सभागृहात करण्यात येईल.

**मा.महापौर :** मंजूर.

**ठराव क्र.६७/८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालाननगर पैठणरोड येथे दगडी गटार बांधणे बाबत रक्कम रु.१३,०३,६३५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६८/९ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.नुर कॉलनी स्लम येथे नाल्यावर स्लॅब टाकणे बाबत कामाकरिता सा.बा.खाते यांच्या वर्ष १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रुपये १३,९५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खुली गटार + १० वा वित्त आयोग अनुदान या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.२३.०७.९८ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रु.१३,९५,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.अविनाश कुमावत :** किती व कोणते अनुदान मिळणार आहे, हा निधी कोठे वापरण्यात येईल, याची माहिती द्यावी.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (स्लम) :** सदरील काम हे नाल्यावर स्लॅब टाकणे बाबतचे आहे. सदरील काम खुली गटार व १० वा वित्त आयोग मधून करण्यात येणार आहे. करिता प्रस्ताव सादर केलेला आहे.

**श्री.विजयकुमार मेहेर :** नाल्यावर स्लॅब टाकण्याची आवश्यकता काय आहे? १० वा वित्त आयोग बद्दल माहिती द्यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** आतापर्यंत ६७ लक्ष प्राप्त झाले. सार्वजनिक सुख सोईसाठी केंद्र शासनाने मंजूर केले आहे. त्यात ५०% म.न.पा. व ५०% आयोग असे प्रमाण आहे.

**श्री.जयवंत ओक :** सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. मागील २५ वर्षापासून स्लम आहे. संरक्षित भिंत बांधलेल्या आहे. माणूस मेला तर प्रेत घेऊन जाता येत नाही.

याचवेळी स्पीकरमधून आवाज येत नसल्याने श्री.जयवंत ओक, स.नगरसेवक यांनी असे सुचविले की, यापुढे स्पीकर बंद पडल्यास संबंधितावर कार्यवाही करण्यात यावी. जे पत्रकार बसतात यांना सभागृहात काय चर्चा चालली हे काहीही ऐकू येत नाही. याची दखल संबंधिताने घ्यावी.

**मा.महापौर :** मंजूर

**ठराव क्र.६८/९ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला नुर कॉलनी स्लम येथे नाल्यावर स्लॅब टाकण्यासाठी रक्कम रु.१३,९५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६९/१० :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.सिध्दार्थनगर भागात डांबरी रस्ते सादर करणे. करिता अंदाजपत्रक रक्कम रुपये ११,३९,२९२/- सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांची दर सुची १९९७-९८ अ नुसार तयार करण्यात आली असून मा.आयुक्तांनी दि.२१.०७.९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम गलिच्छ वस्ती सुधारणा अर्थसंकल्प सन १९९८-९९ लेखाशिर्ष डांबरी रस्ते मधून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र.६९/१० :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थनगर भागात डांबरी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी रक्कम रुपये ११,३९,२९२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७०/११ :**

मो.संजयनगर ते जिन्सी मंजूर विकास योजने व्यतिरिक्त २० फुट रुंद रस्त्यासाठी भूसंपादन मो.संजयनगर (स्लम) मधून जिन्सी ते इंदिरानगर मंजूर विकास योजना ५० फुट रुंद रस्त्यास जोडणेस्तव मंजूर विकास योजने व्यतिरिक्त २० फुट रुंद रस्ता तयार करणे बाबत मागणी असून मा.शहर अभियंता यांनी सदर रस्ता करणेस्तव शिफारस केलेली आहे. सदर ठिकाणी जुना ५ फुट रुंद रस्ता आहे. त्याचे बाजुस मोकळी जागा आहे. तसेच रस्त्याचे तोंडास न.भु.क्र.१२३४६ ही मिळकत आहे. सदर मिळकत या रस्त्याने भागश: बाधीत होते ती ताब्यात घ्यावी लागेल. हा रस्ता केल्यास संजयनगर पाण्याच्या टाकी शेजारील रस्ता हा ५० फुट रुंद विकास योजना रस्ता जिन्सी ते इंदिरानगर रस्त्यास जोडला जाईल. त्यामुळे वाहतुकीची व्यवस्था होईल. करिता भूसंपादन प्रस्ताव भुसंपादनासाठी लागणाऱ्या खर्चासह मंजूरीस्तव सादर.

**ठराव क्र.७०/११ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर (स्लम) ते इंदिरानगर मंजूर विकास योजना ५० फुट रुंद रस्त्यास संजयनगर ते जिन्सी या मंजूर विकास योजने व्यतिरिक्त असलेल्या २० फुट रुंदीचा रस्ता जोडण्यासाठी या रस्त्याचे तोंडास असलेली न.भू.क्र.१२३४६ ही मिळकत बाधीत होत असल्याने बाधीत मिळकत ताब्यात घेण्यास आणि या रस्त्याचे भूसंपादनासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७१/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीचौक विनायकराव पाटील चौक ते रेल्वेस्टेशन १०० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये ६४,५०,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च १९९७-९८ च्या शासकीय अनुदान ४.०० कोटी मधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव क्र.७१/१२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक विनायकराव पाटील चौक ते रेल्वेस्टेशन १०० फुट रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रुपये ६४,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७२/१३ :**

स्थायी समिती विषय क्र.५८२/९, दि.३०.०३.९८ नुसार श्री. सुभाष तायडे नाका जवान, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे निलंबन अपिलाबाबत.

१. महानगरी सेवा शिस्त व अपील नियमानुसार ४८ तास पेक्षा जास्त कालावधीत पोलिस कस्टडीत होते. संबंधितावर ठेवण्यात आलेले दोषारोप न्यायालयाकडुन अद्याप सिध्द व्हावयाचे आहेत.

२. महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असुन कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरिकांच्या जमा झालेल्या करातूनच देण्यांत येतात. त्यामुळे प्रकरणात कर्मचाऱ्यास निलंबित ठेवून ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही.

३. उपरोक्त बाबी विचारात घेता संबंधिताचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून रद्द करण्याचा शिफारस सर्वसाधारण सभेकडे करण्यांत येते.

**संवाद :**

**श्री.अविनाश कुमावत :** हा विषय सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्याची आवश्यकता नाही. स्थायी समितीने जो निर्णय घेतलेला आहे. तो योग्य आहे व प्रशासनानेच तो निर्णय घ्यावा व प्रस्ताव स्थायी समितीकडे पुन्हा वर्ग करावा.

**श्रीमती नुरजहाँ बेगम, श्रीमती मोहसिना बिल्कीस :** स्थायी समितीने या संदर्भात जो निर्णय घेतलेला आहे. त्या बद्दल मी निषेध करते. कारण अधिकारी/कर्मचारी यांनी भ्रष्टाचार करावा व त्यांना सभेने साथ द्यावी ही बाब योग्य नाही.

**मा.महापौर :** विषय क्र.१३ व १४ स्थायी समितीकडे परत पाठवण्यात यावे.

**ठराव क्र.७२/१३ :**

प्रस्तावित प्रकरणी स्थायी समितीने अंतिम निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले. त्यानुसार प्रकरण स्थायी समितीकडे वर्ग करण्यात येते.

**विषय क्र.७३/१४ :**

स्थायी समिती विषय क्र.५८५/१२, दि.३०.०३.९८ नुसार श्री.कांतीलाल मिस्त्रीलाल बोथरा, कनिष्ठ लिपीक, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे निलंबन अपिल बाबत.

१. महानगरी सेवा शिस्त व अपील नियम ४ नुसार २४ तास पोलिस कस्टडीत नव्हते. संबंधितांवर ठेवण्यात आलेले दोषारोप न्यायालयामधून अद्याप सिध्द व्हावयाचे आहेत.

२. महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून कर्मचाऱ्यांना वेतन भत्ते नागरीकांच्या जमा झालेल्या करातूनच देण्यांत येतात. त्यामुळे प्रकरणात कर्मचाऱ्यास निलंबित ठेवून ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही.

३. उपरोक्त बाबी विचारात घेता संबंधिताचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून रद्द करण्याची शिफारस सर्वसाधारण सभेकडे करण्यांत येते.

४. संबंधितांचा निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहीत धरण्यात यावा. संबंधितांना कामावर रुजू करण्याचे आदेश द्यावेत. अन्वये सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** सदरचा प्रस्ताव स्थायी समितीकडे परत पाठविण्यात यावे.

**ठराव क्र.७३/१४ :**

प्रस्तावित प्रकरणी स्थायी समितीने अंतिम निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले. त्यानुसार प्रकरण स्थायी समितीकडे वर्ग करण्यात येते.

## पुरवणी विषय पत्रिकातील विषय

**विषय क्र.७४/१ :**

शास्त्री नगर येथील मनपा उद्यानास "श्री लाल बहादुर शास्त्री उद्यान" हे नांव देण्यात यावे.

**सुचक :** सौ.राधाबाई तळेकर,

**अनुमोदक :** श्री.तुपे त्रिंबक गणपतराव

श्री.जयवंत ओक

दि.२८.०७.९८

**संवाद :**

**श्री.नरेंद्र पाटील :** नामकरण बाबत मागे एकदा कमिटी नेमलेली होती. त्या नुसार जे प्रस्ताव नामकरणाबाबत असतील ते त्या कमिटीकडे पाठविण्यात यावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** असे सर्व प्रस्ताव समितीकडे पाठवावे.

**श्री.भगवान घडामोडे :** नामकरणा बाबतचे प्रस्ताव कधी कमिटीकडे व कधी सभागृहात येतात असे होता कामा नये.

**श्री.मुस्ताफ अहेमद, श्री.हमीद ताबा, मा.महापौर :** नामकरणा बाबत जी कमिटी होती. कमिटी जो निर्णय देईल त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**मा.महापौर :** विषय क्र.१,२ व ३ संबंधित कमिटीकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही होईल. कमिटीमध्ये मा.आयुक्त व सर्व पदाधिकारी यांचा समावेश राहील. तसेच संबंधित वार्डातील नगर सेवक यांचाही कमिटीमध्ये समावेश करण्यात येत आहे.

**ठराव क्र.७४/१ :** सर्वानुमते असे ठरले की, शहरातील रस्ते विविध भागाचे नामकरण करण्याबाबत नेहमीच प्रस्ताव सादर होतात. यावर सर्वकंश विचार करण्यासाठी पुर्वीप्रमाणे एक समिती कायम करण्यात यावी. या समितीमध्ये मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता व संबंधित वार्डाचे नगर सेवक आणि मा.आयुक्त यांचा समावेश राहील.

**विषय क्र.७५/२ :**

जवाहर कॉलनी येथील उद्यानास "श्री संत शिरोमणी सावता उद्यान" हे नांव देण्यात यावे.

**सुचक :** सौ.राधाबाई तळेकर,
**अनुमोदक :** श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
श्री.जयवंत ओक
दि.२८.०७.९८

**संवाद :**
**मा.महापौर :** संबंधित कमिटीकडे प्रस्ताव पाठवण्यात यावा.

**ठराव क्र.७५/२ :**
सर्वानुमते असे ठरले की, विषय क्र.७४/१ च्या ठरावाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र.७६/३ :**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ज्युब्लीपार्क भडकलगेट ते मलिक अंबर चौक (टाऊन हॉल) पर्यंत या व्ही.आय.पी.रस्त्याला "पै.रफिख शहबाज" (पत्रकार) रोड हे नांव देण्यांत यावे.

**सुचक :** श्रीमती अलका पाटील.
**अनुमोदक :** श्री.हमीदोद्दीन ताबा.
दि.१०.०७.९८

**संवाद :**
**मा.महापौर :** संबंधित कमिटीकडे प्रस्ताव पाठवण्यात यावा.

**ठराव क्र.७६/३ :**
सर्वानुमते असे ठरले की, विषय क्र.७४/१ च्या ठरावाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र.७७/४ :**
प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासनाच्या धोरणानुसार मनपाच्या हद्दीतील १० कि.मी. पर्यंत तसेच जवळील खेड्यांना पाणी पुरवठा महापालिकातर्फे करण्यांत यावा. शासनाच्या या धोरणानुसार महापालिकेच्या जवळील बाळापूर गोपाळपूर व झाल्टा या खेड्यांना महापालिकातर्फे पाणी पुरवठा करण्यांत यावा. लवकरच ही खेडी महापालिका हद्दीत समाविष्ट होतील. म्हणून नवीन येणाऱ्या ६५ कोटींच्या पा.पु. योजनेत सदरील खेडी समाविष्ट करुन या खेड्यांना पाणी पुरवठा मनपातर्फे करणे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** डॉ.भागवत कराड,
**अनुमोदक :** राजकुमार बचाटे
दि.१०.०७.९८
(यावेळी काही सन्माननीय सभासद मा.महापौर यांच्या आसनाजवळ जवळ एकत्र जमा होतात व मोठमोठ्याने बोलतात. काहीही ऐकू येत नाही.)

(वेळ अंदाजे १ वाजता)

**संवाद :**

**श्री.नरेंद्र पाटील :** असे चुकीचे मार्गाने सभागृहात प्रस्ताव येतात कसे? प्रस्तावात दाखवलेली गावे ही महानगरपालिका हद्दीत येतात का? शहरात पाणी पुरवठ्याबाबत कशा प्रकारे तारांबळ होत आहे. हे सर्व सभागृहाला माहित आहे. सिडकोला आता सध्या पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. या गावांचा पाणी पुरवठा करण्या संदर्भात समावेश करण्याची आवश्यकता काय? हा प्रस्ताव नामंजूर करण्यात यावा ही माझी विनंती आहे.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**श्री.मोहसीन अहेमद :** प्रस्ताव सभागृहात मांडण्याचा अधिका स.सदस्यांना आहे. सदरील प्रस्ताव मंजूर करुन शासनाकडे पाठवण्यात यावा.

(यावेळी काही स.सभासद माच.महापौर यांच्या आसनाजवळ एकत्र जमा होता व मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही) वेळ अंदाजे १.०० वाजता.

**मा.महापौर :** स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसून घ्यावे. एका वेळी एकाच स.सदस्यांनी बोलावे.

**सौ.पदमा शिंदे :** सिडको, हडको या भागामध्ये पाणी पुरवठा वेळेवर होत नाही. आणि या गावांना पाणी पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव सभागृहात येतो कसा? पहिल्यांदा जे अस्त्वितील भाग आहे त्यास पाणी पुरवठा व्यवस्थित करावा. या प्रस्तावास मंजूरी देण्यांत येऊ नये. दिल्यास माझा त्यास विरोध आहे.

**मा.महापौर :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**ठराव क्र.७७/४ :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.७८/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१ भावसिंगपुरा येथील पदमपाणी कॉलनी सर्व्हे नं.२७ जयसिंगपुरा हे मंजूर ले-आऊट असून यासाठी आज या जागेस या वसाहतीला जाणे-येण्यासाठी रस्ता उपलब्ध होत नाही. त्यामुळे तेथील रहिवाशांना लहान-लहान मुले, वयोवृध्द, रुग्णांना रहदारीसाठी अडचण होते. छावणी मंडळाच्या विद्यमान रस्त्यावरुन रस्ता उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक तेथे जमीन संपादन करुन कमीत कमी २० फुट रस्ता तयार करण्यांत यावा व लोकांना रहदारीसाठी रस्ता उपलब्ध करुन द्यावा. हे ले-आऊट १९७१ ला मंजूर झालेले आहे.

**सुचक :** सौ.रुख्मीणीबाई लोखंडे

**अनुमोदक :** श्री.नरसिंग मुरलीधर ढगे,

श्री.बन्सी तुळशिराम गांगवे

दि.०१.०८.९८

**ठराव क्र.७८/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१ भावसिंगपुरा येथील पदमपाणी कॉलनी सर्व्हे नं.२७ जयसिंगपुरा या ले-आऊट मधील नागरिकांना जाण्यायेण्यासाठी छावणी मंडळाच्या

विद्यमान रस्त्यावरुन रस्ता उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती जमीन संपादन करुन २० फुटाचा रस्ता तयार करुन देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७९/६ :**

प्रभाग क्र.१ भावसिंगपुरा येथे आरोग्य केंद्राची व्यवस्था नाही. भिमनगर, भावसिंगपुरा कॉलनी, पेठे व मुथा कॉलनी, कानिफनाथ कॉलनी, काळे ले-आऊट, नवयुग कॉलनी भागासाठी आरोग्य केंद्राची सुविधा नाही.

भावसिंगपुरा कॉलनीच्या पश्चिमेला महानगरपालिकेची जागा असून त्याला महानगरपालिकेने तार फेन्सींग केलेली आहे. या जागेमध्ये महापालिकेकडून एक आरोग्य उपकेंद्र बांधुन लोकांना प्राथमिक उपचारासाठी सुविधा उपलब्ध करुन द्यावे.

**सुचक :** सौ.रुख्मीणीबाई लोखंडे,

**अनुमोदक :** श्री.ढगे नरसिंग मुरलीधर,

श्री.बन्सी तुळशिराम गांगवे

दि.०१.०८.९८

**ठराव क्र.७९/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा अंतर्गत भिमनगर, भावसिंगपुरा कॉलनी, पेठे व मुथा कॉलनी, कानिफनाथ कॉलनी, काळे ले-आऊट, नवयुग कॉलनी इ.भागात राहणाऱ्या नागरिकांना आरोग्य केंद्राची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी भावसिंगपुरा कॉलनीच्या पश्चिमेला असलेल्या महापालिकेच्या जागेमध्ये एक आरोग्य केंद्र उभारुन सुविधा उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८०/७ :**

प्रस्तावात सादर करण्यांत येतो की, मोहल्ला शांतीपुरा येथे वसाहत ही अपंग गोरगरीब लोकांची असून आर्थिक दृष्ट्या मागासलेले आहेत. ह्या भागात मोफत प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था नाही. त्यामुळै तेथील मुलांचे शिक्षणासाठी हाल अपेष्टा होत आहे. त्यामुळे महानगरपालिकेने शांतीपुरा भागात महापालिकेची प्राथमिक शाळा सुरु करण्यात यावी.

**सुचक :** सौ. शकुंतला धांडे,

**अनुमोदक :** श्री.अफसर खॉन

दि.०५.०८.९८

**ठराव क्र.८०/७ :**

सुचक सभागृहात उपस्थित नसल्याने सदर तुर्त स्थगित ठेवण्याबाबत सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.८१/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.७६ मध्ये मनपाची शाळा बांधणे बाबत मागे सर्वसाधारण सभेमध्ये ठराव झालेला आहे. परंतू येथे जागा उपलब्ध नसल्याने शाळेचे बांधकाम अद्याप सुरु करता आले नाही. त्यामुळे गरीब मुलांचे नुकसान होत आहे. तरी

विशेष बाब म्हणून गारखेडा तेथील स.न.१७/१८ मधील निरंतर/रुग्णवाल ले-आऊट मधील खुल्या जागे मधील प्राथमिक शाळा किंवा किमान बालवाडी शाळा बांधण्यात यावी. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.
**सुचक :** श्री.विठ्ठल किसन जाधव,
**अनुमोदक :** श्री.त्रिंबक तुपे,
श्री.बंडु ओक,
श्री.सुदाम सोनवणे
दि.१२.०८.९८

**ठराव क्र.८१/८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.७६ येथील गरीब मुलांच्या शिक्षणासाठी गारखेडा सर्व्हे नं.१७/१८ मध्ये निरंतर/रुग्णवाल ले-आऊट मधील खुल्या जागेत प्राथमिक शाळा किंवा किमान बालवाडी शाळा बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८२/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जिल्हाधिकारी कार्यालय, लेबर कॉलनी ते मजनूहिल, (मुकबधीर शाळा) पर्यंतच्या या मुख्य रस्त्याला "पै.अब्दुल रज्जाक (मास्टर) रोड" हे नांव देण्यांत यावे.
**सुचक :** श्री.अजीजखान गणी खान
**अनुमोदक :** श्री.जावेद रज्जाक
दि.११.०८.९८

**ठराव क्र.८२/९ :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तुत प्रकरणी ठराव क्र.७४/१ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र.८३/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, समर्थनगर चौकात वि.दा.सावरकर यांचा पुतळा बसविण्यांत येणार आहे. तरी त्या चौकास वि.दा.सावरकर चौक व त्या चौकापासुन शनिमंदिर चौकापर्यंत वि.दा.सावरकर मार्ग असे नामांकरण करण्यांत यावे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.
**सुचक :** डॉ.भागवत कराड,
**अनुमोदक :** श्री.बापु घडामोडे,
श्री.राजकुमार बचाटे
दि.११.०८.९८

**ठराव क्र.८३/१० :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तुत प्रकरणी ठराव क्र.७४/१ प्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

**विषय क्र.८४/११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शनिमंदिर चौक ते सतिश मोटार चौक या रस्त्यावर इंडियन मेडीकल असोसिएशन (आय.एम.ए.) चे कार्यालय आहे. तरी त्या रस्त्यास आय.एम.ए.मार्ग म्हणून नामांकरण करण्यांत यावे. तसेच सतीश मोटार्स समोरील चौकास आय.एम.ए. चौक असे नामांतर करावे.

**सुचक :** डॉ.भागवत कराड

**अनुमोदक :** श्री.बापु घडामोडे,

श्री.राजकुमार बचाटे

दि.११.०८.९८

**ठराव क्र.८४/११ :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तुत प्रकरणी ठराव क्र.७४/१ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र.८५/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, मी मुंबई, ठाणे, पुणे, महानगरपालिकांचा नुकताच कर्मचाऱ्यांच्या संदर्भात दौरा केलेला आहे. त्या महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी काम केल्यानंतर त्यांना सार्वजनिक सुट्टीचा मोबदला म्हणून एक दिवसांचे वेतन देण्यांत येते.

औरंगाबाद महानगरपालिकाही (उदा.झोन/जकात/पाणीपुरवठा) विभागातील कर्मचाऱ्यांना एक दिवसांचे वेतन म्हणून सार्वजनिक सुट्टीचा मोबदला देतोत. त्याचप्रमाणे नगरसचिव विभागातील (महापौर, उपमहापौर, विरोधी पक्षे नेता, सभागृह नेता व सभापती, स्थायी समितीसह) कर्मचाऱ्यांना सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी काम केल्यास? (एक) दिवसाचे वेतन म्हणून मोबदला देण्यांत यावा. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.गौतम भागाजी खरात,

**अनुमोदक :** श्री.गौतम लांडगे

**ठराव क्र.८५/१२ :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तुत प्रस्तावाबाबत इतर महापालिकेतील पुरेपूर माहिती घेऊन प्रस्ताव पुन्हा प्रशासनामार्फत सभागृहासमोर ठेवण्यात यावा.

**विषय क्र.८६/१ :**

उपआयुक्त (महसूल) यांनी मा.आयुक्तांची मान्यता अन्वये प्रस्ताव सादर केला की, डायरेक्टर नंदकानन झुंलॉजिकल पार्क, भुवनेश्वर (ओरीसा) यांनी ठरविलेल्या "स्वामित्व शुल्क" (रॉयलटी) आकारुन सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय येथील पांढऱ्या वाघापैकी दोन (नर-मादी) पांढरे वाघ बोरवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांचेकडे हस्तांतर करण्यास दि.३०.०७.९८ चे प्रस्ताव क्र.१३२/६ अन्वये स्थायी समितीने मंजूरी दिली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | २ वर्षापर्यंत | - | रु.३.०० लाख (प्रत्येकी) |
| २. | २ ते १० वर्ष | - | रु.५.०० लाख (प्रत्येकी) |
| ३. | १० वर्षापेक्षा जास्त | - | रु.२.२५ लाख (प्रत्येकी) |

तथापि, सचिव (वने) महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र.डब्ल्यु.एलडी/१०९५/प्र.क्र./२०१/फ-१, दि.१८.०८.९८ अन्वये सिध्दार्थ उद्यान प्राणी

संग्रहालय येथील पांढरे वाघ (१ नर, १ मादी) बोरवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानास विनामूल्य तात्काळ हस्तांतरीत करण्यास कळविले आहे. (पत्र सोबत जोडले आहे) प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.अविनाश कुमावत :** मी याबाबत मा.महापौरांना पत्र दिलेले आहे. त्यानुसार प्राणी संग्रहालय येथील वाघ वाहतुकीचा खर्च संबंधिताने करावा व जेथे वाघ ठेवण्यात येणार आहे. त्या ठिकाणी औरंगाबाद महानगरपालिकेच्या सौजन्याने असे फलक लावण्यात यावे.

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.अविनाश कुमावत यांनी दिलेल्या पत्रानुसार वरील दुरुस्तीसह हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे व याच सभेत स्विकृती देण्यांत येत आहे.

**ठराव ८६/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालयातील १२ पांढऱ्या वाघापैकी २ (१ नर, १ मादी) पांढरे लहान वाघ, मा.सचिव (वने) महसूल व वने विभाग महाराष्ट्रराज्य मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक डब्ल्युएलपी/१०९५/प्र.क्र.-२०१/फ-१, दि.१८.०८.९८ अन्वये कळविल्यानुसार विनाशुल्क संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरवली यांना हस्तांतर करण्याची सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच वाहतुकीचा खर्च उपवने वन संरक्षण संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांनी करावा, आणि तेथे ठेवण्यात येणाऱ्या वाघाच्या पिंजऱ्याच्या दर्शनिय भागात औरंगाबाद महानगरपालिकेच्या सौजन्याने असा फलक लावण्याच्या मंजूरीसह सर्वानुमते मान्यता देऊन याच सभेस स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८७/२ :**

सहाय्यक संचालक, नगररचना प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहराच्या मुळ हद्दीची प्रारुप विकास योजना जी शासनाकडे मंजरीसाठी सादर केली आहे. त्यात बायजीपुरा कॉटन मार्केट परीसरात आरक्षण क्र.३६ (क्षेत्र ०.१० हे) हे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकरिता आरक्षित केले आहे. त्याच परिसरात आरक्षण क्र.३३ (क्षेत्र ०.५४ हेक्टर) हे महानगरपालिका वापरासाठी (ए.एम.सी.परपज) ठेवण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने विनंती केली आहे की, शहागंज, जिन्सी, नवाबपूरा मोंढा या भागातील विद्युत दाब सुरक्षित ठेवण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला बायजीपुरा भागात एक ३३ के.व्ही. चे उपकेंद्र तातडीने उभारावयाचे आहे. व त्या करिता किमान दीड ते दोन एकर जागेची आवश्यकता आहे. विकास योजनेतील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळासाठी आरक्षित असलेली आरक्षण क्र.३६ ची जागा (क्षेत्र ०.१० हेक्टर) ही अपुरी पडत असल्याने त्याचे ऐवजी महाराष्ट्र विद्युत मंडळाला आरक्षण क्र.३३ (क्षेत्र ०.५४ हेक्टर) ही देण्यात यावी. म्हणजे शाहगंज, जिन्सी, नवाबपूरा मोंढा या भागात विद्युत उपकेंद्राची उभारणी करुन त्या भागातील विद्युत दाब सुरक्षित ठेवता येईल. करिता आरक्षण क्र.३६ (क्षेत्र ०.१० हेक्टर) हे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाऐवजी महानगरपालिका वापर व आरक्षण क्र.३३ हे (०.५४ हेक्टर) हे महानगरपालिका वापराचे ऐवजी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळासाठी अशी अदलाबदल करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर :** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ हे स्वतःच्या खर्चाचे उपकेंद्र बांधणार आहे. त्यांना फक्त महापालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र पाहिजे आहे.

**मा.महापौर :** मंजूर.

**ठराव क्र.८७/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज, जिन्सी नवाबपूरा, मोंढा या भागातील विद्युत दाब सुरक्षित ठेवण्यासाठी औरंगाबाद शहराच्या मुळ हद्दीच्या प्रारुप विकास योजनेतील (सुधारित) रणछोडदास गिरणी कॉटन मार्केट परिसरात आरक्षण क्र.३६ (क्षेत्र ०.१० हेक्टर) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आणि आरक्षण क्र.३३ (०.५४ हेक्टर) महानगरपालिका वापर या प्रमाणे आरक्षित असलेल्या जागाच्या वापरात आरक्षण ३६ (क्षेत्र ०.१० हेक्टर) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ ऐवजी महापालिका वापर आणि आरक्षण क्र.३३ (०.५४ हेक्टर) महापालिका वापर ऐवजी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अशी आरक्षणाचे अदलाबदल करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८८/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.हर्सुल येथे शाळा बांधावयाची आहे. त्यासठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रुपये ३८,५१,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.१७.०८.९८ अन्वये मान्यता दिली आहे.

उपरोक्त कामाचा खर्च हा ८.०० कोटी शासकीय अनुदानातून करण्यात येईल.

तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.३८,५१,३००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव क्र.८८/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.हर्सुल येथे शाळा बांधण्यासाठी रक्कम रुपये ३८,५१,३००/- चे तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येऊन याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८९/४ :**

सचिव, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, आघाडीच्या निम्यापेक्षा जास्त स.नगरसेवकांनी मा.महापौर यांची समक्ष भेट घेऊन विरोधी पक्षाची भूमिका सामंजस्यपणे सभागृहात मांडता यावी. यासाठी स.नगरसेवकांनी श्री.अफसरखान पिता यासिन खान यांची विरोधी पक्षे नेता निवडी संबंधिचे पत्र सादर केले आहे. त्या अनुषंगाने मा.महापौर यांनी दि.२२.०७.९८ च्या पत्रानुसार स.नगरसेवक श्री.अफसरखान यांची विरोधी पक्ष नेता पदी केलेल्या निवडीस तत्वता मान्यता दिली असून सदरील निवड कायम करणे व त्यानुसार विरोधी पक्ष नेता यांना द्यावयाच्या सुविधा सवलती व खर्चास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र.८९/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आघाडीच्या निम्यापेक्षा जास्त स.नगरसेवकांनी दिलेल्या लेखी निवड पत्रानुसार विरोधी पक्षाची भूमिका सांमज्यसाने सभागृहात मांडण्यासाठी विरोधी पक्ष नेता या पदावर स.नगरसेवक श्री.अफसरखॉन पिता यासीन खॉन याची निवड कायम करण्यास व त्यानुसार या पदाच्या सुविधा सवलती व खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९०/१ :**

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सिल्क मिल कॉलनीच्या मागे असलेल्या "हमीदिया अबरार कॉलनी" हा भाग असून या भागातील नागरिकांकरिता विद्युत तसेच पुलाची सुविधा देण्यात आलेली आहे. ही वस्ती फार वर्षापासूनची आहे. तरी या भागातील नागरिकांना इतर आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.रशिद खान (मामू)
श्री.म.विखारोद्दीन,
**अनुमोदक :** श्री.प्रदिपकुमार जैस्वाल,
श्री.गौतम खरात

**ठराव क्र.९०/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सिल्क मिल कॉलनीच्या मागे असलेल्या "हमीदिया अबरार कॉलनी" हा भाग असून या भागातील नागरीकांकरिता विद्युत तसेच पुलाची सुविधा देण्यात आलेली आहे. ही वस्ती फार वर्षापासूनची आहे. तरी या भागातील नागरिकांना इतर आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९१/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी औरंगाबाद शहरात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होणार आहे. या उत्सवासाठी गणेश महासंघास रु.२५,०००/- फक्त महापालिकेतर्फे आर्थिक मदत देण्यात यावी. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.अविनाश कुमावत
**अनुमोदक :** श्री.अफसर खान,
श्री.राजकुमार बचाटे

**ठराव क्र.९१/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात साजरा होणाऱ्या गणेशोत्सवासाठी गणेश महासंघास महानगरपालिकेतर्फे रक्कम रुपये २५,०००/- ची आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. सदर प्रस्तावास याच सभेत सर्वानुमते स्विकृतीही देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९२/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पर्यावरण व्यवस्थापन या विषयावर "स्कुल ऑफ एन्व्हायरॉनमेंट थायलँड" तर्फे २० दिवसांची ट्रेनिंगसाठी भारतातून औरंगाबादच्या रहिवाशी कल्पना मेनकुदळे यांची निवड झालेली असून या थायलॅड सरकारने त्यांना ५० टक्क्यापेक्षाही जास्त आर्थिक सहाय्य मंजूर केलेले आहे.

तरी त्यांना ट्रेनिंगसाठी आर्थिक मदत आवश्यक असल्याने नगरसेवक स्वेच्छानिधीतून प्रत्येकी १ हजार रुपये याप्रमाणे एकूण ३०,०००/- हजार रु. पर्यंतची मदत विशेष बाब म्हणून देण्यास मंजूरी देण्यात यावी. तसेच पर्यावरणातील अभ्यासामुळे या शहराला देखिल त्याचा फायदा होऊ शकेल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.अविनाश कुमावत,
**अनुमोदक :** जयवंत ओक.

**ठराव क्र.९२/३ :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे "स्कुल ऑफ एनव्हायरॉनमेंट थायलँड" तर्फे पर्यावरण व्यवस्थापन या विषयावर २० दिवसांच्या प्रशिक्षणासाठी भारतातून औरंगाबादच्या रहिवाशी कल्पना मेनकुदळे यांची निवड झालेली असून या प्रशिक्षणासाठी कल्पना मेनकुदळे यांना नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून प्रत्येकी १ हजार याप्रमाणे एकूण ३०,०००/- रुपयाच्या मर्यादेपेक्षा आर्थिक मदत विशेष बाब म्हणून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर प्रस्तावास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९३/४ :**

**<u>स.नगरसेवक स्वेच्छा निधीतून प्रशिक्षण</u>**

मा.आयुक्तांच्या सुचनेनुसार सदर टिपणी सादर करण्यात येत आहे. नगरसेवक स्वेच्छा निधीतून बेरोजगार युवक/युवतींना तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी गेल्या २ वर्षापासून १ ते १५ प्रशिक्षण (व्यावसायिक)

| | | | **कालावधी** |
|---|---|---|---|
| १. | दुचाकी वाहन दुरुस्ती | - | ३ महिने |
| २. | चारचाकी वाहन चालक प्रशिक्षण | - | १ महिना |
| ३. | चारचाकी वाहन दुरुस्ती | - | ३ महिने |
| ४. | रिक्षा चालक प्रशिक्षण | - | १ महिना |
| ५. | डी.टी.पी.ऑफ | - | ६ महिने |
| ६. | संगणक क्षेत्रातील प्रशिक्षण | - | ६ महिने |
| ७. | टेलिफोन ऑपरेटर | - | १ महिना |
| ८. | इलेक्ट्रानिक टाईप | - | ३ महिने |
| ९. | रेडीओ/टी.व्ही.दुरुस्ती | - | ३ महिने |
| १०. | बुक बायडींग प्रशिक्षण | - | १ महिना |
| ११. | पर्स बनविणे | - | ३ महिने |
| १२. | शिवणकाम प्रशिक्षण | - | ३ महिने |
| १३. | हस्तकला प्रशिक्षण | - | ३ महिने |
| १४. | पाकीट बनविणे | - | ३ महिने |
| १५. | फाईल तयार करणे | - | ३ महिने |

१ ते १५ तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. या वर्षीही अशाच प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. या वर्षीही अशाच प्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी मा.आयुक्तांनी महानगरपालिकेचे प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याची मान्यता दिलेली आहे. परंतू सदर प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित होण्यास बराच कालावधी लागणार आहे. विविध स.स.नगरसेवकांनी प्रशिक्षण सुरु होईपर्यंत बेरोजगार युवक/युवतींना गत वर्षीप्रमाणे यावर्षीही प्रशिक्षण देण्यासाठी पत्रे दिलेले आहेत.

तरी सदर प्रशिक्षण देण्यासाठी मनपाचे प्रशिक्षण केंद्र सुरु होईपर्यंत यावर्षी निविदा काढून किंवा मागील वर्षाच्या मंजूर दराने खाजगी संस्थांना प्रशिक्षणार्थींना पाठविण्याबाबत योग्य त्या निर्णयास्तव.

गतवर्षी खालील क्षेत्रात प्रशिक्षण देण्यात आले.

१. संगणक क्षेत्रातील ६ महिने प्रशिक्षण.
२. चार चाकी वाहन चालक प्रशिक्षण १ महिना परवानासह.
३. रिक्षा चालक प्रशिक्षण १ महिना परवानासह.
४. शिवणकाम प्रशिक्षण ३ महिने.

या करिता नियम व अटी खालीलप्रमाणे असतील. ज्या संस्थाना प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणास पाठविण्यांत येतील त्यांना या नियम व अटी पूर्ण करणे आवश्यक राहतील.

१. संस्था शासनमान्य असणे जरुरीचे आहे.
२. प्रशिक्षणासाठी जागा किमान ४०० स्वे.फुट असावी.
३. संगणकांची संख्या किमान ५/६ असावी.
४. एकाच वेळी किमान २०/२५ प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण देण्याची क्षमता असावी.
५. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक ४/५ असावेत.
६. प्रशिक्षक बी.एसी./एम.सी. कॉम्प्युटर असावेत.
७. प्रतिदिन प्रात्यक्षिक दोन तास व थेअरी १ तास बंधनकारक राहील.
८. संस्थेकडे दुरध्वनी व्यवस्था असावी.
९. प्रशिक्षणार्थीची हजेरी व मासिक अहवाल प्रति माह सादर करावा लागेल.
१०. प्रशिक्षणार्थी कडुन प्रशिक्षण कालावधी व कोणतेही नुकसान झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
११. प्रशिक्षण कालावधी ६ महिन्याचा असेल.
१२. ज्या संस्थेची निवड मनपा मार्फत करण्यात येईल. त्या संस्थेने करारनामा रु.१०/- च्या बॉन्ड पेपरवर करुन घ्यावा लागेल.
१३. निश्चित केलेले दर प्रशिक्षणार्थीपुर्वी आगाऊ रक्कम म्हणून मिळणार नाही.
१४. प्रशिक्षणार्थी परिक्षा घेऊन उत्तीर्ण प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यात यावे.
१५. प्रकल्प विभागामार्फत पाठविण्यात येणाऱ्या प्रशिक्षणार्थीनाच प्रशिक्षण देण्यात यावे.
१६. सदर प्रशिक्षण संस्था व प्रशिक्षणार्थी हे मनपा हद्दीतील असावेत.
१७. प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्राची सत्यप्रत कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

**<u>रिक्षाचालक व चारचाकी वाहन चालक</u>**

१. संस्था शासन मान्य असणे बंधनकारक आहे.
२. सदर संस्थेकडे स्वतःच्या मालकीच्या रिक्षा/चार चाकी वाहन किमान ४ असणे आवश्यक आहे.

३. संस्थेकडे किमान ४ प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.
४. प्रतिदिन प्रती प्रशिक्षणार्थीस ७ कि.मी. अथवा ३० मिनीटे प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.
५. प्रशिक्षण संपल्यानंतर संस्थेने स्वखर्चाने प्रशिक्षणार्थींना परवाना मिळून देणे आवश्यक राहील.
६. प्रशिक्षण देते वेळी अपघात वा नुकसान झाल्यास जबाबदार राहणार नाही.
७. प्रशिक्षणार्थीच्या सध्या व हजेरी (मासिक) कार्यालयात सादर केल्या शिवाय देयक अदा करता येणार नाही.
८. ज्या प्रशिक्षणार्थींना प्रकल्प विभागामार्फत पाठविण्यांत येईल. त्यांनाच प्रशिक्षण देण्यात यावे.

कृपया उचित कार्यवाहीस्तव व मार्गदर्शनास्तव सादर.

१. संगणक प्रशिक्षणासाठी निविदा प्रकाशित करुन दर मागविणे योग्य. अथवा ॲप्टेकसारख्या संस्थेच्या प्रमुखास वाटाघाटीस बोलाविणे योग्य.
२. तिनचाकी व चारचाकी वाहन चालक प्रशिक्षणाचे दर निविदे द्वारे मागविणे योग्य.
३. दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची झोननिहाय यादी तयार आहे. प्रशिक्षणार्थी यामधील असावेत असे वाटते.
४. मनपातर्फे यापुर्वी प्रशिक्षण घेत असल्यास त्या प्रशिक्षणार्थीस अथवा त्या कुटूंबातील दुसऱ्या व्यक्तीस प्रशिक्षण देण्यात येऊ नये.

प्रभाग क्र.१ ते ८२ हे पाच समूह संघटकामध्ये वरील योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदारी विभागून देण्यात येईल.

मा.सर्वसाधारण सभा दि.१६.०७.९८ रोजी झालेल्या सभेचा ठराव क्र./विषय क्र.५२/४ नुसार मंजूरीस्तव सादर.

वरील नियमावलीसह सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री.विजयकुमार मेहेर :** एक महिन्यापुर्वी प्रकल्व विभागांतर्गत बेरोजगारांना स्वेच्छा निधीतून "प्रशिक्षण" हे नगरसेवकांचे स्वेच्छा निधीतून बेरोजगार युवक युवतींना प्रशिक्षण द्यावे याबाबतचा ठराव मंजूर केलेला आहे. परंतू त्यात ज्या ज्या लोकांची यादीत नावे समाविष्ट करण्यात आली आहे. ती चुकीची असून बरेचशी दारिद्रय रेषेखालील लोकांची नावे राहून गेली आहेत. त्याचा समावेश त्यात करण्यात यावा. संबंधित वार्डातील स.सदस्य यांना कल्पना न देता यादीत नावे समाविष्ट करण्यात आलेली आहे.

**मा.महापौर :** दारिद्रय रेषेखालील जे नागरिक असतील त्यांची पुरेपूर माहिती घेऊन तसेच संबंधित वार्डातील नगरसेवकांना याबाबत कल्पना देऊन यादीतील चुकीच्या नावाची पुन्हा दुरुस्ती करण्यात यावी. त्यातील ज्या त्रुट्या असतील त्या मा.आयुक्त हे तपासणी करुन दुरुस्तीची कार्यवाही करतील व पुन्हा सर्व्हेचे आदेश देण्यात यावेत.

**ठराव क्र.९३/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून बेरोजगार युवक/युवतींना अ.क्र.१ ते १५ पर्यंतचे तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी खालील अटीनुसार सर्वानुमते मंजूरी

देण्यात येते. ज्या संस्थेत प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी पाठविण्यात येतील त्या संस्थाना खालील नियम व अटी पुर्ण करणे आवश्यक राहील.

१. संस्था शासनमान्य असणे जरुरीचे आहे.
२. प्रशिक्षणासाठी जागा किमान ४०० स्वे.फुट असावी.
३. संगणकांची संख्या किमान ५/६ असावी.
४. एकाच वेळी किमान २०/२५ प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण देण्याची क्षमता असावी.
५. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक ४/५ असावेत.
६. प्रशिक्षक बी.एसी./एम.सी. कॉम्प्युटर असावेत.
७. प्रतिदिन प्रात्यक्षिक दोन तास व थेअरी १ तास बंधनकारक राहील.
८. संस्थेकडे दुरध्वनी व्यवस्था असावी.
९. प्रशिक्षणार्थीची हजेरी व मासिक अहवाल प्रति माह सादर करावा लागेल.
१०. प्रशिक्षणार्थी कडुन प्रशिक्षण कालावधी व कोणतेही नुकसान झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
११. प्रशिक्षण कालावधी ६ महिन्याचा असेल.
१२. ज्या संस्थेची निवड मनपा मार्फत करण्यात येईल. त्या संस्थेने करारनामा रु.१०/- च्या बॉन्ड पेपरवर करुन घ्यावा लागेल.
१३. निश्चित केलेले दर प्रशिक्षणार्थीपुर्वी आगाऊ रक्कम म्हणून मिळणार नाही.
१४. प्रशिक्षणार्थी परिक्षा घेऊन उत्तीर्ण प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यात यावे.
१५. प्रकल्प विभागामार्फत पाठविण्यात येणाऱ्या प्रशिक्षणार्थीनाच प्रशिक्षण देण्यात यावे.
१६. सदर प्रशिक्षण संस्था व प्रशिक्षणार्थी हे मनपा हद्दीतील असावेत.
१७. प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्राची सत्यप्रत कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

## रिक्षाचालक व चारचाकी वाहन चालक

१. संस्था शासन मान्य असणे बंधनकारक आहे.
२. सदर संस्थेकडे स्वतःच्या मालकीच्या रिक्षा २/चार चाकी वाहन किमान ४ असणे आवश्यक आहे.
३. संस्थेकडे किमान ४ प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.
४. प्रतिदिन प्रती प्रशिक्षणार्थीस ७ कि.मी. अथवा ३० मिनीटे प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.
५. प्रशिक्षण संपल्यानंतर संस्थेने स्वखर्चाने प्रशिक्षणार्थींना परवाना मिळून देणे आवश्यक राहील.
६. प्रशिक्षण देते वेळी अपघात वा नुकसान झाल्यास जबाबदार राहणार नाही.
७. प्रशिक्षणार्थीच्या सध्या व हजेरी (मासिक) कार्यालयात सादर केल्या शिवाय देयक अदा करता येणार नाही.
८. ज्या प्रशिक्षणार्थींना प्रकल्प विभागामार्फत पाठविण्यांत येईल. त्यांनाच प्रशिक्षण देण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर राष्ट्रगीतासाठी सर्व स.सभासद उभे राहिले असतांना स.नगरसेवक श्री.जावेद रज्जाक यांनी व्यासपीठासमोर राजदंड पकडून पाणीपट्टी बाबत चर्चा करावी अशी मोठमोठ्याने मागणी करु लागले.

यांचवेळी "जनगणमन" राष्ट्रगीत होऊन आजची सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दि.१९.०९.९८ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त शनिवार दिनांक १९ सप्टेंबर १९९८ रोजी सकाळी ११.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस मा.महापौर सौ.शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात" "वंदेमातरम्" या गीताने सुरुवात झाली. गणपुर्ती अभावी आजची सभा ००.३० मिनीटे तहकुब करण्यात येत असल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले. तहकूब करण्यात आलेल्या सभेस ठिक ११.३० वा.पुन्हा सुरुवात झाली.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.डॉ. कराड भागवत किशनराव | - | उप महापौर |
| २. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | स.सदस्य |
| ३. | स.स.श्री. अविनाश लक्ष्मणराव कुमावत | - | स.सदस्य |
| ४. | स.स.श्री. अफसर खाँ यासिन खाँ | - | स.सदस्य |
| ५. | स.स.श्रीमती लोखंडे रुख्मणबाई खंडेराव | - | स.सदस्य |
| ६. | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | - | स.सदस्य |
| ७. | स.स.सौ. साजेदा बेगम | - | स.सदस्य |
| ८. | स.स.श्री. म.सलिम म.हनिफ | - | स.सदस्य |
| ९. | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | - | स.सदस्य |
| १०. | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | - | स.सदस्य |
| ११. | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | - | स.सदस्य |
| १२. | स.स.श्री. लांडगे गौतम लिंबाजी | - | स.सदस्य |
| १३. | स.स.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | - | स.सदस्य |
| १४. | स.स.श्री. नरेंद्र यादवराव पाटील | - | स.सदस्य |
| १५. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | स.सदस्य |
| १६. | स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास | - | स.सदस्य |
| १७. | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | - | स.सदस्य |
| १८. | स.स.श्री. बैनाडे कवरसिंग किसनसिंग | - | स.सदस्य |
| १९. | स.स.सौ. पद्मा बाबुराव शिंदे | - | स.सदस्य |
| २०. | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | - | स.सदस्य |
| २१. | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | - | स.सदस्य |
| २२. | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | - | स.सदस्य |
| २३. | स.स.सौ.फरहत बानो भ्र.मो.नवाज | - | स.सदस्य |
| २४. | स.स.श्री. फजलउल्ला खॅान अजमत उल्लाखान | - | स.सदस्य |
| २५. | स.स.श्री. अजीज खॉ गणी खाँ | - | स.सदस्य |
| २६. | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | - | स.सदस्य |
| २७. | स.स.श्री. महंमद मुस्ताक अहमद | - | स.सदस्य |
| २८ | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सदस्य |
| २९ | स.स.श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी | - | स.सदस्य |
| ३०. | स.स.श्री. मुजीब आलमशाह मीर अलमशाह | - | स.सदस्य |
| ३१. | स.स.सौ. मोहसीना बिल्कीस विखारोद्दीन | - | स.सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | स.स.श्री. जावेद रज्जाक | - | स.सदस्य |
| ३३. | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | - | स.सदस्य |
| ३४. | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | - | स.सदस्य |
| ३५. | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | - | स.सदस्य |
| ३६. | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | - | स.सदस्य |
| ३७. | स.स.श्री. अ.अ.रऊफ म.अ.माबुद | - | स.सदस्य |
| ३८. | स.स.श्री. स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन | - | स.सदस्य |
| ३९. | स.स.श्री. खाखोरडीया धिरज शांतीलाल | - | स.सदस्य |
| ४०. | स.स.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | - | स.सदस्य |
| ४१. | स.स.श्री. सय्यद अली मीरा सलामी | - | स.सदस्य |
| ४२. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सदस्य |
| ४३. | स.स.श्री.संजय किशनराव केनेकर | - | स.सदस्य |
| ४४. | स.स.सौ. लता दलाल श्रीनिवास | - | स.सदस्य |
| ४५. | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | - | स.सदस्य |
| ४६. | स.स.श्री. अब्दुल रशिद खाँन (मामू) | - | स.सदस्य |
| ४७. | स.स.डॉ.कु.माया लिंबाजी लाडवाणी | - | स.सदस्य |
| ४८. | स.स.सौ. आव्हाड सविता धनंजय | - | स.सदस्य |
| ४९. | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | - | स.सदस्य |
| ५०. | स.स.श्री. अब्दुल रशिद अ.सत्तार | - | स.सदस्य |
| ५१. | स.स.श्री. विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | - | स.सदस्य |
| ५२. | स.स.श्री.जैन विकास रतनलाल | - | स.सदस्य |
| ५३. | स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन | - | स.सदस्य |
| ५४. | स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | - | स.सदस्य |
| ५५. | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | - | स.सदस्य |
| ५६. | स.स.श्री. जोशी संजय रामदास | - | स.सदस्य |
| ५७. | स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | - | स.सदस्य |
| ५८. | स.स.सौ. जोत्सना हिवराळे | - | स.सदस्य |
| ५९. | स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | - | स.सदस्य |
| ६०. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सदस्य |
| ६१. | स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | - | स.सदस्य |
| ६२. | स.स.श्री. विठ्ठल किशन जाधव | - | स.सदस्य |
| ६३. | स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | - | स.सदस्य |
| ६४. | स.स.श्री. काळुसे मंदा धनंजय | - | स.सदस्य |
| ६५. | स.स.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | - | स.सदस्य |
| ६६. | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | - | स.सदस्य |
| ६७. | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | - | स.सदस्य |
| ६८. | स.स.श्री. नवपुते कचरु चंद्रभान | - | स.सदस्य |

स.सदस्य श्री.नवपुते यांच्या वार्डातील चिकलठाणा गांव येथील तीन महिला १) समीनाबी अब्दुल खॉ पठाण, २) गोराबी आयुब खॉन पठाण, ३) तयमीनाबी बेगम आयुब खॉन पठाण तसेच मुंबई महानगरातील अतिवृष्टीमुळे जवळजवळ १५० लोक मृत्यूमुखी झाले त्यांना व

श्री.केनेकर या सर्वांच्या निधनानिमित्त सभागृहाने ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

## ऐनवेळी चर्चेतून आलेला विषय

**विषय क्र. ९४/**

चिकलठाणा प्रभागात पावसामुळे वाहुन गेलेल्या व त्यात मृत झालेल्यांच्या कुटूंबियांना अर्थसहाय्य करणे संबंधी.

**सुचक :** श्री.कचरु नवपुते,

**अनुमोदक :** श्री.मोहसीन अहेमद.

**संवाद :**

**श्री.कचरु नवपुते :** माझ्या वार्डातील तीन महिला ) समीनाबी अब्दुल खॉ पठाण, २) गोसाबी आयुब खॉन पठाण, ३) तयमीनाबी बेगम आयुब खॉन पठाण यांना माझ्या स्वेच्छा निधीतून ५० हजार रुपये आर्थिक मदत म्हणून त्यांच्या कुटूंबातील व्यक्तींना देण्यात यावे. तसेच ज्या स.सदस्यांना स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत म्हणून द्यावयाची असेल त्यांनी द्यावा व विशेष बाब म्हणून ही आर्थिक मदत त्या मृतांच्या कुटूंबियांना देण्यात यावी. अशी मी विनंती करतो.

**मा.महापौर :** सर्व स.सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार आहे तरी एका वेळेस एकाच स.सदस्यांनी बोलावे.

**श्री.मोहसीन अहेमद :** स.सदस्य यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबद्दल अभिनंदन सर्व स.सदस्य यांच्या स्वेच्छा निधीतून त्या मृत महिलाच्या कुटूंबियांना आर्थिक मदत म्हणून ५० हजार रुपये देण्यात यावे. त्या महिलांच्या कुटूबियांवर संकट कोसळलेले आहे. या अगोदर अशा प्रकारचा निधी महानगरपालिकातर्फे दिलेला आहे.

**श्री.अविनाश कुमावत :** ठरावाला विरोध नाही. अशा मृत झालेल्या नागरिकांच्या नातेवाईकांना स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत देण्याची तरतूद आहे काय? माहिती द्यावी.

**श्री.अफसर खॉन :** नैसर्गिक आपत्तीमुळे त्या महिला मृत्यूमुखी पडल्या आहेत.

**श्री.मोहसीन अहेमद :** त्यासाठी स.सदस्यांच्या स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत देण्यास हरकत नाही. या अगोदर स.सदस्यांच्या स्वेच्छानिधीतून अशा प्रकारची आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीचा वापर कोठे आणि कसा करावयाचा या बाबत एक नियमावली तयार केलेली आहे. त्यामध्ये अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीमुळे घटना घडतात. त्या मृत व्यक्तींच्या कुटूंबियांना किंवा नातेवाईकांना आर्थिक मदत द्यावी असे कुठेही उल्लेखित नाही. अशा प्रकारच्या घटना घडल्यानंतर मा.जिल्हाधिकारी यांच्या मार्फत निधी दिला जातो.

**श्री.मोहसीन अहेमद :** अशा मृत झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत द्यावयाची की नाही, याबाबतचा अधिकार सर्वसाधारण सभेला आहे.

**श्री.विखारोद्दीन :** गेल्या सर्वसाधारण सभेमध्ये बऱ्याच मृत व्यक्तींना अशा प्रकारची आर्थिक मदत म्हणून रक्कम देण्यात आलेली आहे. महापालिका अधिनियम ६५ व

६६ नुसार आर्थिक मदत द्यावी म्हणून तरतूद आहे. यासाठी विधी सल्लागार यांनी सभागृहात माहिती द्यावी.

**श्री.कचरु नवपुते :** मागच्या बैठकीत श्री.माळीबाबा पैठणकर यांच्या वार्डातील ३ ते ४ नागरिक जळून मृत्यूमुखी पडले त्यांना स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत देण्यात आली होती. याबाबतचे रेकॉर्ड आपल्या प्रशासनाकडे आहे.

**मा.महापौर :** उपआयुक्त (प्र.) यांनी माहिती द्यावी.

**उपआयुक्त (प्र.) :** महानगरपालिकेच्या अंतर्गत शहरात कोठेही नागरिकांवर संकट आलेले असेल त्यासाठी उपाययोजना करावी असे नियमावलीत तरतूद आहे. परंतू नैसर्गिक आपत्तीमुळे मृत पावलेल्यांना आर्थिक मदत द्यावी अशी तरतूद नियमावलीत नाही.

**श्री.कचरु नवपुते :** या तीन महिलांना माझ्या स्वेच्छा निधीतून मदत देण्यात यावी. ५० हजार ऐवजी रु.१०,१५ हजारापर्यंत आर्थिक मदत द्यावयाची असेल ती देण्यात यावी.

**श्री.संजय जोशी :** सभागृहात चर्चा करुन ठराव मंजूर करा नंतर प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

**श्री.मोहसीन अहेमद, श्री.रशिद खॉन (मामू), श्री.हमीद ताबा :** या अगोदर अशा प्रकारची आर्थिक मदत म्हणून निधी देण्यात आलेला आहे. याबाबतचे रेकॉर्ड प्रशासनाकडे आहेत. विशेष बाब म्हणून आणि महानगरपालिका फंडातून देण्यात यावे.

**मा.महापौर :** मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त :** स.सदस्य यांचा जो २ लाख रुपये स्वेच्छा निधी असतो तो कुठे वापरावयाचा याची महानगरपालिकाने नियमावली तयार केलेली आहे. परंतू स.सदस्य श्री.मोहसीन अहेमद, श्री. विखारोद्दीन, श्री.अफसर खॉन यांनी मागणी केल्यानुसार स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत द्यावी अशी मागणी केली आहे. ती देण्याची स.सदस्य यांची इच्छा आहे. त्यास सभागृहात मंजूरी द्यावी, वास्तविकता शासनाच्या नियमानुसार नैसर्गिक आपत्ती मुळे ज्यांची घरे कोसळतात, ज्यांचे संसार उध्वस्त होतात, ज्यांचे स्थलांतर करावे लागतात अशा प्रकारची नैसर्गिक आपत्तीमुळे काही घटना घडल्यावर त्यासाठी शासनाचे वेगळे खाते आहे. त्यात भूकंप, दुष्काळ, पुरग्रस्त अशा काही घटना घडून नुकसान झाले असेल त्यांना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत आर्थिक निधी दिला जातो. महापालिकेच्या प्रत्येक झोन ऑफिसरला सुचना दिल्या आहे की, या वर्षी पाऊस जास्त प्रमाणात आहे शहरात जे ही लोक नाल्यालगत वास्तव्य करुन राहतात. ज्यांचे घरे कोसळली, ते जरी अनाधिकृत राहात असेल तरी ज्यांचे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाले आहे. त्या नागरिकांच्या वास्तव्याच्या ठिकाणी जाऊन महापालिकेने पंचनामे केलेले आहे. अशा आपत्तग्रस्तांची नावे जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आली आहे. आणि वृत्तपत्रात पण जाहीर प्रगटन दिले आहे की, ज्यांचे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाले असेल त्यांनी जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून त्या व्यक्तीला आर्थिक मदत मिळू शकते. किती आर्थिक मदत द्यावयाची हे सुध्दा शासनाने जाहिर केलेले आहे. ते संबंधित अहवालानुसार त्यात १८ हजार, १५ हजार, ५ हजार असे ठरविण्यात आलेले आहे. पण स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत द्यावयाची की नाही हा सभागृहाने निर्णय घ्यावयाचा

आहे. स्वेच्छानिधी कुठे वापरावयाचा या बाबत नियमावली तयार केलेली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत देता येत नाही. जे कुणी व्यक्ती अशा नैसर्गिक आपत्तीमुळे मृत झालेले असतील त्यांच्या नावाची यादी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवून त्यांना आर्थिक मदत मिळविण्यासाठी महानगरपालिका पाठपुरावा करु शकते.

**श्री.रशिद खॉन (मामू) :** सदर महिलांच्या कुटूंबावर संकट कोसळले आहे. त्यामुळे विशेष बाब म्हणून स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत देण्यास हरकत नाही. मागे छावणी येथे महानगरपालिकेचे अंतर्गत कामासाठी विनाकारण रु.३ लाख खर्च करण्यात आले. अशा प्रकारचे महापालिकेचे नुकसान होते. याबाबतच स.सदस्य जे बोलत आहे. ते आर्थिक मदतीसाठी रु.१५, १०, ५ हजार जे काही देता येईल. ते देण्याची सम्मती द्यावी या अगोदर सभागृहात अशा मृत व्यक्तींना आर्थिक मदत म्हणून निधी देण्यात आलेला आहे.

**श्री.कचरु नवपुते :** स.सदस्य श्री.अफसर खॉन यांना मागे "ब्लॅक पॅंथर" ही दुरदर्शन मालिका बनविण्यासाठी एकूण ८२ हजार रुपये स्वेच्छा निधीतून देण्यात आलेला आहे. आणि अशा नैसर्गिक आपत्तीमुळे मृत झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना आर्थिक मदत का देण्यात येऊ नये. त्या महिला मृत झ ााल्यामुळे कुटूंबच उध्दवस्त झालेले आहे. त्या महिलांच्या कुटूंबावर दुःखाचा डोंगर पसरलेला आहे. मा.महापौर यांनी त्यांना ५० हजार ऐवजी १५ हजार रुपये तरी देण्याचे आदेशित करावेत.

**श्री.प्रभाकर विधाते :** आताच मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, यावर्षी पावसाळा जास्त असून बरेच गरीब नागरिक नाल्याजवळील जागेत अनाधिकृपणे वास्तव्य करुन राहतात. असे वास्तव्य करुन राहणाऱ्या लोकांची जबाबदारी महापालिकेवर नाही अशा अनाधिकृत नाल्याजवळ जे लोक वास्तव्य करुन राहत असतील. त्याची नावाची नोंद करुन मा.जिल्हाधिकाऱ्यांना कळविणे की, यापुढे नैसर्गिक आपत्तीमुळे या लोकांचे नुकसान झाले तर ही जबाबदारी महापालिकेची नाही. स.सदस्य श्री.नवपुते यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या धरतीवर स.सदस्य श्री.तरवेंद्रसिंग धिल्लन यांच्या वार्डातील इटखेडा गाव येथील स्मशानजोगी यांचे मागच्या वर्षीच्या पावसाने घरे खाली कोसळून वाहुन गेली आहेत. त्यांचे संसार उध्वस्त झाले आहेत. त्यांना ही आपल्या महापालिकेचे कर्मचारी म्हणून विशेष बाब म्हणून आर्थिक मदत देण्यात यावी.

**श्री.अविनाश कुमावत :** सदस्य श्री.नवपुते यांच्याच स्वेच्छा निधीतून द्यावयाचे की, सर्व स.सदस्य यांच्या स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत म्हणून निधी द्यावयाचा या बाबत माहिती द्यावी.

(याच वेळी आघाडीचे व सत्ताधिकारी स.सदस्य हे महापौर यांच्या आसनाजवळ जाऊन मोठमोठ्याने बोलतात. आर्थिक मदत देण्याची मागणी करतात यावेळी काहीही ऐकू येत नाही.)

**मा.महापौर :** सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. व एका वेळेस एकाच स.सदस्यांनी बोलावे. अशी विनंती करते.

**श्री.मोहसीन अहेमद, सौ.लता दलाल :** याबाबत सभानुभूती दाखवून अर्थसहाय्य करावे. विशेष बाब म्हणून ८२ हजार रुपये टी.व्ही. मालिका बनविण्यासाठी देऊ

शकतो. व नैसर्गिक आपत्तीमुळे एकाट्यावर संकट कोसळले. त्यांना आर्थिक मदत म्हणून स्वेच्छानिधीतून निधी उपलब्ध करु देऊ शकत नाही. अशा प्रकारचा निधी द्यावयाचा का नाही याचा अधिकार सभागृहाला आहे. सभागृहाने निर्णय घ्यावा. तसे मा.महापौर यांनी आदेशित करावे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** मा.आयुक्त यांनी केलेल्या खुलासा यास अनुसरुन मी बोलू इच्छितो की, मा.जिल्हाधिकारी यांचेकडे अशा आपतग्रस्तांना नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसान म्हणून आर्थिक मदत देण्याची नियमावलीत तरतूद आहे. तर महापालिकेच्या स.सदस्य यांच्या स्वेच्छानिधीतून अशा नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात सापडलेल्या व्यक्तींच्या कुटुबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तशी नियमावलीत तरतूद करुन घ्यावी. स.सदस्य यांना टि.व्ही. मालिका बनविण्यासाठी नगरसेवकांच्या स्वेच्छानिधी हजार रु.निधी उपलब्ध करुन दिला जातो. तर अशा मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना का नको.

**सौ.पदमा शिंदे :** सिडको हडको मधील मृत पावलेल्या व्यक्तींना अशा प्रकारची आर्थिक मदत देण्यात येईल काय?

**मा.महापौर :** मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त :** स.सदस्य यांनी वेगळ्या प्रकारचा मुद्दा या ठिकाणी मांडलेला आहे. जेव्हा विमान अपघात होतात. रेल्वे अपधात, नैसर्गिक आपत्तीमुळे महापूर येतात. त्यामध्ये जर कुणाचे नुकसान होत असेल त्यासाठी तात्काळ मदत म्हणून मा.पंतप्रधान, मा.मुख्यमंत्री यांच्या निधीतून आर्थिक मदत दिली जाते. परंतू येथे मुद्दा वेगळ्या पध्दतीचा आहे. स.सदस्य यांचे म्हणणे आहे की पाऊस पडून नाल्याला पूर आला त्यात या महिला वाहून गेल्या व मृत झाल्या. यासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून अशा नैसर्गिक आपत्तीच्या माध्यमातून घटना घडत असतात. त्या व्यक्तींना आर्थिक मदत म्हणून निधी देण्यात येतो.

**मा.महापौर :** स.सदस्य यांच्या भावनांचा विचार करता स.सदस्य यांच्या स्वेच्छा निधीतून नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या या तीन महिला मृतांच्या कुटूंबियांना एकूण १५ हजार आर्थिक मदत म्हणून निधी देण्यात येत आहे. यापुढे स.सदस्य यांच्या वार्डातील अशा प्रकारच्या घटना घडल्यानंतर त्या त्या स.सदस्य यांच्या स्वेच्छा निधीतून त्या व्यक्तींच्या नातेवाईकांना मदत म्हणून रक्कम दिली जाईल.

**ठराव क्र.९४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा प्रभागातील पावसाच्या पुरामुळे १) समीनाबी अब्दुल पठाण, २) गोराबी अय्युब खान पठाण व ३) तयमीनाबी बेगम अय्युबखाँ पठाण वाहून मृत्यूमुखी पडल्याने त्यांचे कुटुबियांना प्रत्येकी ५ हजाराप्रमाणे एकूण १५,०००/- स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत म्हणून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**हमीद ताबा :** मागील काही दिवसांपुर्वी महापालिकेतील सभागृह नेता यांचा राजीनामा तसेच मा.सभापती यांच्या बाबत वृत्तपत्रात उलट सुलट बातम्या येत होत्या. त्यामुळे प्रशासनाची बदनामी झालेली आहे. तसेच प्रशासन व पदाधिकारी

यांचे एकमेकाबद्दल मतभेद आहे असे त्यावरुन दिसून येते. आयुक्तांना बदनाम केले आहे. याबाबत सभागृहात चर्चा व्हावी.

**श्री.अविनाश कुमावत :** प्रशासनाला बदनाम करण्याबाबत नव्हते. कामे होत नव्हते. हे स.सदस्य श्री.ताबा यांना हे माहिती नाही.

**मा.महापौर :** याबाबत चर्चा करता येणार नाही. कृपया एका वेळी एकाच स.सदस्यांनी बोलावे.

(याच वेळी आघाडीचे स.सदस्यांनी मा.महापौर यांच्या आसनाजवळ आऊन सभागृह नेता यांचा राजीनामा या विषयावर चर्चा करु द्यावी असा आग्रह धरतात व मोठमोठ्याने बोलतात. काहीही ऐकू येत नाही.)

**श्री.हमीद ताबा :** या विषयावर अगोदर चर्चा करावी.

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.हमीद ताबा यांना सुचना करण्यात येते की, त्यांनी मोठमोठ्याने बोलून सभागृहात अशांतता निर्माण होईल असे कृत्य करु नये नसता आपले सभासदत्व रद्द करण्यात येईल.

(स.सदस्य श्री.हमीद ताबा हे सदर विषयावर चर्चा व्हावी म्हणून मा.महापौर यांच्या आसनाजवळ जाऊन मोठमोठ्याने बोलतात.)

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.हमीयोद्दीन ताबा यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात येते. व ही सभा १० मिनीटांसाठी तहकूब करण्यात येते.

**श्री.हमीद ताबा :** सभागृहात चर्चा करण्याबाबत मी जे बोललो ते नियमाला धरुन आहे. माझे सभासदत्व रद्द करण्यात येते व ही सभा १० मिनीटासाठी तहकूब करण्यात येते.

(वेळ अंदाजे ११.५० वाजता, सभेला सुरुवात १२.१० वाजता)

**श्री.महादेव सुर्यवंशी :** स.सदस्य श्री. हमीद ताबा यांनी चर्चा करण्याबाबत जी भाषा वापरली ती योग्य त्या पध्दतीची नव्हती.

**श्री.रशीद खॉन (मामू) :** सभागृहातील अशा गोंधळा बाबत वृत्तपत्रात वेगवेगळ्या बातम्या प्रसिध्द होऊन जनतेच्या नजरेस वेगळी प्रतिमा तयार होते तेव्हा याची स.सदस्यांनी काळजी घ्यावी.

**श्री.ओक जयवंत :** स.सदस्य हे नेहमी सभागृहात मा.महापौर, उपमहापौर, मा.आयुक्त यांच्या आसनाजवळ धावून जातात. मोठमोठ्याने बोलतात. राजदंड पळविण्याचा प्रयत्न करतात. व मान्यवरांना अपमानित करतात. हा सभागृहाचा अपमान आहे. स.सदस्यांचा अपमान आहे. स.सदस्यांनी त्यांना जो ही काही प्रश्न विचारावयाचा असेल तो मा.महापौर यांच्या समोर त्यांनी जरुर मांडावा. या ठिकाणी नागरिकांनी स.सदस्य यांना भांडण्यासाठी निवडून दिलेले नाही. जनतेची कामे कशा पध्दतीने सोडवता येईल त्यासाठी सभागृहात प्रश्न मांडण्यास प्रयत्नशील रहावे. परंतू सभागृहात गोंधळ निर्माण करुन अशांततेचे वातावरण निर्माण करणे योग्य नाही. सभागृहात कोणत्या विषयावर बोलावयाचे व कोणत्या विषयावर बोलू द्यावयाचे नाही, याचा अधिकार मा.महापौर यांना आहे. मा.महापौर यांना विनंती की, यापुढे कोणत्याही स.सदस्यांनी अशा मान्यवरांना अपमानित करुन सभागृहात गैरकृत्य करणाऱ्या स.सदस्यांना पोलिस कमीशनर विभाग मार्फत कार्यवाही करण्यात येईल असा ठराव पास करावा अशी माझी विनंती आहे.

**श्री.रशिद खॉन (मामू) :** स.सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला की सभागृहात मा.महापौर,उपमहापौर व मा.आयुक्त यांच्या आसनाजवळ जाऊन

मोठमोठ्याने बोलू नये अशांतता निर्माण करु नये यास मी ही सहमत आहे. व स.सदस्यांनी याबाबत सय्यम बाळगावा. सभापती/महापौर यांचे आसनापर्यंत येणे असे असेबंली, पार्लमेंट मध्ये चालते. सभागृहात अशा प्रकारचा गोंधळ झाल्यावर वृत्तपत्रात त्यांची प्रसिध्दी होते व महापालिका प्रशासन तसेच महापौर व इतर स.सदस्य यांची बदनामी होते. याची स.सदस्यांनी विचार करावा. परंतू सभागृहात स.सदस्य गोंधळ करतात. त्यांच्यावर पोलिस केस करणे असे स.सदस्यांनी सभागृहात बोलणे चुकीचे आहे. प्रत्येक सर्वसाधारण सभेमध्ये मा.महापौर यांच्या आसनाजवळ स.सदस्य जनतेच्या प्रश्न सोडविण्यासाठी मागण्या करतात. आजही ८२ स.सदस्य यांच्यावर वेगवेगळ्या पोलिस केस शिवाय कुणीही तेव्हा सभागृहात विकास कामावर बोलावे विनाकारण काहीही बोलू नये. तशी आवश्यकता पडल्यास सभागृहात सभगृह नेता यांनी कार्यवाही करावी. श्री.हमीद ताबा याचे बोलण्याबाबत काही वाटत असेल तर त्यांचेकडून मी दिलगिरी व्यक्त करतो. स.सदस्य जेव्हा जेल मधून मिटींगसाठी येत होते. त्यावेळी पोलिसांना मी सभागृहाच्या बाहेरच उभे ठेवले होते.

**श्री.जयवंत ओक :** प्रत्येक स.सदस्यांनी आपआपल्या वार्डातील काय मागण्या आहेत. त्यावर जरुर सभागृहात मांडाव्यात पोलिस केस करावयाची की नाही या बाबतचा निर्णय मा.महापौर यांना अधिकार आहे. स.सदस्य श्री. रशीद खॉन (मामू) यांना सभागृहात असे बोलवण्याची आवश्यकता नाही. सभागृहात आरडाओरड करुन मा.महापौर यांच्या आसनाजवळ जाऊन गोंधळ घालून बोलवण्याचा प्रकार घडला तर त्या स.सदस्यांवर काय कार्यवाही करावयाची हे मा.महापौर ठरवतील.

**श्री.अफसर खॉन :** स.सदस्य श्री.ओक यांनी जी भाषा वापरली ती योग्य नाही ते सभागृहात धमकी वजा भाषा बोलतात.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** सभागृहात असा गोंधळ घालून मा.महापौर व उपमहापौर, मा.आयुक्त यांच्या आसनाजवळ जाऊन मोठमोठ्याने बोलवणे ही सभागृहातील स.सदस्यांची योग्य शिस्त नाही. यात स.सदस्यांचीच बदनामी होते. याचा विचार स.सदस्यांनीच करावा व सभागृहात बैठकीतील अंजड्यावर चर्चा करावी.

**श्री.अविनाश कुमावत :** स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता याबाबत मी खुलासा करु इच्छितो की, राजीनामा देण्यामागे अंतर्गत कारणे होती. बऱ्याच स.सदस्यांच्या तक्रारी होत्या की प्रशासनाला कुण्याही कामाबाबतचे पत्र देऊनही त्यावर कार्यवाही होत नाही व नागरिकांच्या जे प्रश्न आहे ते सुटत नाही. मागे मा.पालकमंत्री, मा.आयुक्त व संबंधित अधिकारी आम्ही सर्वांनी एक बैठक घेऊन मा.आयुक्तांनी आश्वासन दिले होते की, १५ दिवसांपर्यंत जे ही काही स.सदस्यांच्या कामाबाबत या संचिका असतील त्याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल. ज्या काही कामाबाबत या संचिका पेंडीग राहून गेलेल्या आहेत. त्या संचिका बाबत कार्यवाही लवकरच करु असे आश्वासन दिले होते. त्यांचा मान राखला त्यामुळे वृत्तपत्रातही छापून आलेले आहे व त्यामुळे मी राजीनामा मागे घेतलेला आहे.

**मा.महापौर :** "सभागृह नेता" यांच्या राजीनामा बाबतचा चर्चेअंती खुलासा झालेला आहे. आता विषय क्र.१ वर चर्चा करावी.

(याच वेळी आघाडीचे काही नगरसेवकांना जनतेच्या प्रश्न सोडविण्यासाठी सभागृहात टपरी बाबत चर्चा करु द्यावी. नंतरच विषय पत्रिकेतील विषयावर चर्चा करावी असे मोठमोठ्याने मा.महापौर यांच्या आसनाजवळ जाऊन बोलतात. यावेळी काहीही ऐकू येत नाही.)

**श्री.अफसर खॉन :** टपऱ्याबाबत धोरण ठरविण्यात यावे. १९९५ पुर्वीच्या टपऱ्या हलवू नये.

**श्री.मुजीब आलमशाह :** कमेटीचा अहवाल आलेला आहे. ५० फुट, ८० फुट रोडवर टपऱ्या पुढे आलेल्या आहेत. १ ते २ लाखात विक्री चालू आहे. ५० फुट, १०० फुट रस्त्यावर टपऱ्या देऊ नये.

**मा.महापौर :** स.सदस्य यांनी टपरी बाबत चर्चा करु नये. त्यासाठी वेगळी बैठक घेण्यात येईल. सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर जाऊन बसावे. विषय क्र.१ वर चर्चा करावी. विषय पत्रिका संपल्यावर चर्चेसाठी १ तासाचा अवधी देण्यात येईल.

**श्री.प्रकाश निकाळजे :** गजानन महाराज मंदिर ते पीरबाजार चौक पर्यंतच्या रस्ता महापालिकेने केलेला असून परंतू सध्या त्या रस्त्यावर खडी व काही ठिकाणी डांबर टाकलेले नाही. त्यामुळे त्या रस्त्यावर खाच खंळगे पडलेले आहे. याबाबत सभागृहात चर्चा होऊन कार्यवाही लवकरच करण्यात येईल असे आश्वासन प्रशासनाने दिले होते. परंतू त्या ठिकाणी अद्याप पर्यंत काहीही कार्यवाही झाली नाही. याबाबत खुलासा करावा व हा रस्ता कधी पर्यंत चांगला करण्यात आला. याचीही माहिती द्यावी.

**श्री.प्रदिप कुमार जैस्वाल :** स.सदस्य यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो आताच्या चर्चेचा विषय नाही. यावर वेगळी चर्चा करण्यात यावी. ७ दिवस अगोदर लेखी प्रश्न विचारुन माहिती घेता येते.

**श्रीमती अलका पाटील, सौ.मोहसीना बिल्कीस :** स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता सभागृहात नागरिकांचे प्रश्न मांडण्यासाठी स.सदस्यांना चर्चा करु द्यावी.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** सभागृहात अशा प्रकारचा गोंधळ नेहमी निर्माण होतो व तशा बातम्या वृत्तपत्रात छापून येतात. यात स.सदस्यांची व प्रशासनाची बदनामी होते.

**विषय क्र.९५/१ :**

दिनांक १९.०८.९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.रशीद खान (मामू) :** दि.१९.०८.९८ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.६ वर विषय क्र.५८/१ स्थगित ठेवण्यात आला होता. त्यास मंजूरी देण्यात यावी. सदर विषय हा प्रशासनाकडून आलेल्या होता. त्यात दुरुस्ती करावी. म्हणून स्थगित ठेवला होता. सध्या त्या ठिकाणी काम थांबलेले आहे. महापालिकेचा यात पैसा खर्च झालेला आहे. दुरुस्ती करुन पुढच्या मिटींगला प्रस्ताव ठेवावा त्यावेळेसच मंजूरी द्यावी.

**मा.महापौर :** सदरील विषय दुरुस्तीसह पुढील बैठकीत ठेवावा.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** दि.१९.०८.९८ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.१० वर विषय क्र.६४/५ हा मागच्या बैठकीत स्थगित ठेवण्यात आला होता. त्यास मंजूरी देण्यात यावी.

**मा.महापौर :** मंजूरी देण्यात येते.

**श्री.प्रकाश निकाळजे :** दि.१९.०८.९८ च्या इतिवृत्तामधील पृष्ठ क्र.१४ वर गजानन महाराज मंदिर ते दर्गापर्यंत रोडवर खडी व काही अर्धवट रस्त्यावर डांबरीकरण करण्याच्या संदर्भाने बोललो होतो. त्याबाबत काहीही कार्यवाही झालेला नाही. तसेच हा रोड कधीही करण्यात आलेला आहे. याची माहिती द्यावी.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**अति.शहर अभियंता :** सुतगिरणी, शिवाजीनगर पासून रस्ता जातो तो सुमारे ४ १/२ वर्षापुर्वी केलेले आहे. या रस्त्यावर नंतर जड वाहतूक वळविण्यात आली. या रस्त्याचे डीझाईन जड वाहतुकीच्या दृष्टीने तयार केलेले नव्हते. अतिवृष्टीमुळे लिक झाले. आता डांबरीकरण करता येणार नाही. सेलिंग, मेटल टाकून, त्यावर रोलिंग करुन घेता येईल.

**श्री.अविनाश कुमावत, श्री.प्रकाश निकाळजे :** सध्या या रस्त्यावर खड्डे पडलेले आहे. तुर्त काय व्यवस्था करणार आहे? कारण मागे एकदा याच रस्त्यावरील जवाहरनगर पोलिस स्टेशन समोरील खड्ड्यात एका मुलीचा अपघात झालेला होता.

**अति.शहर अभियंता :** या रस्त्यावर मुरुम टाकून माती टाकू शकतो.

**श्री.संजय जोशी, नरसिंग ढगे :** २ १/२ ते ३ वर्षापुर्वी या रस्त्याचे काम झालेले आहे. सदर रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. तुर्त तरी या रस्त्यावर मुरुम, माती, खडी टाकण्यात यावी.

**श्री.गौतम खरात :** हा रस्ता २ ते ३ वर्षापुर्वी झालेला असून अधिकारी हे सभागृहात दिशाभूल करीत आहे. मागच्या बैठकीत असे आश्वासन दिले होते की, एक महिन्यात या रस्त्याचे काम पुर्ण करुन देऊ परंतू, सभागृहात आश्वासन दिल्याप्रमाणे अधिकारी त्यांचे पालन करीत नाही. पावसाळ्यात त्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास काय अडचण येते. तसेच महापालिकेच्या अंतर्गत जे रस्त्यावर डांबरीकरण खडीकरण केले जाते ते वापरण्यात येणारे मटेरियल हे चांगल्या प्रतीचे असल्याबाबत मटेरिअलचा दर्जा तपासून पहावा. व प्रशासनाने कामावर जाणीवपुर्वक लक्ष द्यावे.

**अति.शहर अभियंता :** खड्डे बुजण्याचे काम चालु केले होते.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी तुर्त रस्ता चांगला होईल याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व गजानन मंदिर ते गारखेडा येथील रोडचे काम तातडीने करावे.

**श्रीमती फरहत बानो :** मागील बैठकीत राममंदिर ते मौलाना आझाद चौक सिडको पर्यंतच्या रस्त्याचे काम करुन देण्याचे आश्वासन दिले होते. रस्त्यावर अर्धवट खडी टाकण्यात आली आहे. याबाबत मा.आयुक्तांना तसे कळविले होते. त्यांनी सांगितले मी स्वतः या ठिकाणी भेट देईल परंतू तसे न होता, कुणीही त्या ठिकाणी आले नाही. भेट दिली नाही. त्या रस्त्याचे कामाबाबत कार्यवाही झाली नाही.

**अति.शहर अभियंता :** राममंदिर ते आझाद चौक या रस्त्यापर्यंतचे कामाबाबत डब्ल्यु बी.एम.नी. हा रस्ता उचलून घेतलेला आहे. पावसाळा संपल्यानंतर खडी व मुरुम टाकण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. सदर कामाबाबतचे इस्टीमेंट मंजूर झालेले आहे. रस्त्याच्या बाजुला जी मोकळी जागा आहे. त्या जागेवर गटारनाली बांधणार आहे.

**श्री.मुजीब आलमशहा खॉंन :** रोषण गेट ते कटकट दरवाजा हया रस्त्यावर बऱ्याच दिवशी खड्डे पडलेले आहे. ते पण बुजविण्यात यावे. त्या ठिकाणी दोन वेळेस माती टाकण्यात आली होती. परंतू ती वाहून गेली त्या रस्त्याची सध्या दुरावस्ता झाली आहे.

**अति.शहर अभियंता :** सदर रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात आले होते. पावसामुळे ती माती वाहून गेली असेल. परंत खड्डे असतील तर तशी कार्यवाही करण्यात येईल.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी शहरातील जे अर्धवट रस्ते विकसीत करण्याचे राहून गेलेले आहेत. त्या बाबत कार्यवाही करावी. तसेच एकदा केलेला रस्ता २.२ वर्षानंतर परत विकसीत कामे करण्यासाठी प्रश्न उद्‌भवतात असे होता कामा नये. ४४% बिलो जातात. प्रशासनाने याकडे लक्ष वेधावे. महापालिकेचे त्यात नुकसान होत आहे. व कोणता ही रस्ता विकसीत करतांना वापरलेले मटेरियल हे चांगल्या प्रतीचे आहे किंवा काय या बाबत तपासणी करुन संबंधित ठेकेदार कडून व्यवस्थित पणे काम करुन घ्यावे. जेणेकरुन पुन्हा पुन्हा तेच ते काम करावे लागणार नाही.

**श्री.संजय जोशी :** दि.१९.०८.९८ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.६ वर विषय क्र.५९/२ या विषयास मंजूरी दिली आहे. तसेच पृष्ठ क्र.६ वरच विषय क्र.६१/२ यास सभागृहात विरोध असतांना त्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्यास माझा विरोध आहे. याची नोंद घ्यावी.

**श्री.मोहसीन अहेमद :** दि.१९.०८.९८ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.६ वर विषय क्र.५८/१ या विषयास मंजूरी दिली आहे. तसेच पृष्ठ क्र.६ वरच विषय क्र.६१/२ यास सभागृहात विरोध असतांना त्यास मंजूरी देण्यांत आली त्यास माझा विरोध आहे, याची नोंद घ्यावी.

**श्री.स.अली मिरा सलामी :** दि.१९.०८.९८ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.२९ वर दारिद्रय रेषेखालील जे कुटूंब असतील त्या त्या नागरिकांची नांवे यादीत टाकावयाचे सुटले असेल अशा प्रकारची सुचना स.सदस्यांना देऊन चुकीच्या नावाची दुरुस्ती करुन घ्यावी असे आदेश मागच्या बैठकीत दिले होते. त्यास १ महिना झाला तरी अद्यापपर्यंत स.सदस्यांकडे या बाबत कुणीही कल्पना तशा प्रकारची दिलेली नाही. या यादीत कुणाची नावे समावेश करण्यात येतात. तर कुणाची नाही. याबाबत अनेक तक्रारी आहेत. त्यामुळे पुन्हा सर्व्हे व्हावे.

**मा.महापौर :** वार्डाच्या अंतर्गत येणाऱ्या झोन ऑफिसमध्ये झोननिहाय यादी लावण्यात आलेली आहे. कुणाची नावे नसेल तर संबंधित झोन अधिकारी यांना तसे कळवावे. तसा खुलासा मा.आयुक्त करतील.

**मा.आयुक्त :** संबंध शहरातील दारिद्रय रेषेखालील असणाऱ्या कुटूंबाचा सर्व्हे हा २० हजार ९८८ एवढा आहे. अशी नोंद आहे. या यादीमध्ये जर काही नजरचुकीने कुणाची नावे सुटली असतील तर त्यास व्यक्तीचे नाव समाविष्ट करण्याबाबत संबंधित अधिकारी यांना त्या त्या वार्डातील स.सदस्यांनी त्या नावाची यादी झोन अधिकारी यांचेकडे १५ तारखेपर्यंत आक्षेप नोंदवावे. असे सांगितले होते. परंतू आक्षेपाची तारिख संपलेली आहे. अजूनही कुणाची नावे चुकून राहिलेली असतील तशी कार्यवाही करण्यात येईल. वास्तविकता ज्या कुटुंबातील घरामध्ये, पंखा टेलिफोन कनेक्शन, दुचाकी वाहन आहे. गॅस शेगडी आहे असे कुटूंब दारिद्रय रेषेखाली आहे असे म्हणता येणार नाही व तसे त्या कुटूंबातील व्यक्तीचे यादीत नाव समाविष्ट करता येणार नाही. ज्या

कुटूंबाचे उत्पन्न महिन्याला रु.४२९.१८ पै. पेक्षा जास्त नाही. असे कुटूंब दारिद्र्य रेषेखाली येऊ शकते. याबाबत काही नॉर्मस आहे. अशाचीच नावे स.सदस्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे पुरवावी. स.सदस्यांना स्वतंत्र अशी नावाची यादी प्रशासन पुरवू शकत नाही, याची नोंद घ्यावी.

**मा.महापौर :** सर्व स.सदस्यांना संबंधित झोनमध्ये नावाची यादी पाहण्यासाठी नोटीस बोर्ड लावण्यात येईल व ज्यांची या यादीतून नावे चुकून राहिलेली असतील अशी स.सदस्यांनी नोंद त्या झोन ऑफिस मध्ये द्यावी. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. परंतू पर्सनल नावाची यादी स.सदस्यांना मिळणार नाही ते झोननिहाय लावण्यात येईल.

**श्री.स.अली मिरा सलामी :** दारिद्र्य रेषेखालील येणाऱ्या कुटूंबीयांच्या नावाची यादी पुरविण्यात येणार की नाही? दि.१५.०९.९८ पर्यंत फक्त तारिख दिलेली होती. तसे स.सदस्यांना कळविलेले नाही याबाबत माहिती द्यावी.

**श्री.जयवंत ओक :** दि.१९.०८.९८ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.१३ वर विषय क्र.६४/५ स्थगित ठेवण्यात आला होता. त्यांस मंजूरी देऊन जवळजवळ २५ लाखाचा हा प्रस्ताव आहे. जालना रोडवर बरेचशे ॲक्सीडेंट होतात. त्यासाठी चिकलठाणा ते क्रांतीचौक व क्रांतीचौक ते बाबा पेट्रोल पंप या रस्त्यावर टुव्हिलर ट्रॅक ची व्यवस्था करण्याबाबतची अंमलबजावणी करण्यात यावी. आणखी खर्च लागल्यास हरकत नाही. परंतू ॲक्सीडेंट होऊन जिवीत हानी होणार नाही. याची दक्षता प्रशासनाने घ्यावी ही दुरुस्ती इतिवृत्तात करण्यात यावी. तसेच दारिद्र्य रेषेखालील सर्व्हे महापालिका तर्फे आहे की जिल्हाधिकारी मार्फत आहे. दारिद्र्य रेषेमध्ये जे नागरिक येतात त्याची नावे बरोबर लिहून घ्यावी. यात दुजाभाव करु नये.

**मा.महापौर :** मा.आयुक्तांना या विषयाबाबत खुलासा केलेला आहे. दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

(याचवेळी आघाडीचे व काही सत्ताधारी स.सदस्य मा.महापौर यांच्या आसनाजवळ जाऊन सदर दारिद्र्य रेषेखालील येणाऱ्या लोकांची यादी स.सदस्यांना पुरविण्यांत यावी अशी मागणी करतात.)

१० मिनीटासाठी सभा तहकूब करण्यात येते अशी मा.महापौरांनी घोषित केले. (वेळ अंदाजे १.०० वाजता सभा सुरुवात १.३० वाजता)

**श्री.स.अली मिरा सलामी :** दारिद्र्य रेषेखालील सर्वेबाबत खुलासा करण्यात येत होते. संबंधित नगरसेवकांना याद्या देण्यात यावे.

**मा.आयुक्त :** एकूण २२,८८८ एवढ्या लोकांची नावाची यादी ८२ स.सदस्यांना पुरविण्यासाठी खुप खर्च येईल. त्यासाठी यादीमध्ये चुकीने जर कुणाचे नाव टाकण्यात राहून गेले असतील ते संबंधित झोन ऑफिसला तसे कळवून यादीत त्या नावाचा समावेश करता येईल.

**श्रीमती अलका पाटील :** झोन ऑफिस मधील कर्मचारी हे दारिद्र्य रेषेखाली येणाऱ्या यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी पैसे मागतात. ज्यांची पैसे घेऊन नावे समाविष्ट करण्यात आली आहे. त्यांची नावे यादीतून काढून टाकण्यात यावी.

**मा.महापौर :** त्या कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने तशी कार्यवाही करावी.

**श्री.जयवंत ओक :** प्रत्येक वार्डातील दारिद्र्य रेषेखालील येणाऱ्या नागरिकांची नावाची यादी तयार करुन त्या त्या वार्डातील स.सदस्यांना ती नावाची यादी पुरविण्यात

यावी. त्यामुळे स.सदस्यांना लवकर लक्षात येईल की, कुणाची नावे सुटलेली आहे.

**मा.आयुक्त :** वार्डवाईज नावाची यादी देणे महापालिकेला अडचणीचे आहे. सर्व्हे झोनवाईज झालेला आहे. वार्डवाईज सर्वे झालेला नाही. वार्डवाईज वेगळे करणे अवघड आहे. प्रत्येक स.सदस्यांना नावाची यादी देणे प्रशासनाला मोठी अडचण निर्माण होईल. त्यासाठी संबंधित कार्यालयाच्या समोर नोटीस बोर्डवर वॉर्डनिहाय दारिद्र्य रेषेखाली येणाऱ्या कुटूंबीयातील नावाची यादी लावण्यात येईल.

**श्री.रशिद खॉन (मामू), श्री.स.अली मिरा सलामी , श्री.जयवंत ओक :** नुसती नावाचीच यादी लावण्यात येऊ नये. नावासमोर पत्ता वार्ड क्र. असे दर्शविलेले असावे.

**मा.महापौर :** दारिद्र्य रेषेखाली येणाऱ्या कुटूंबियातील लोकांची नावाची यादी संबंधित विभाग कार्यालयासमोर नोटीस बोर्डवर वार्डवाईज लावण्यात येईल. त्या यादीमध्ये प्रथमतः नाव व पत्ता तसेच वॉर्ड क्र. असेल जे कुटूंब दारिद्र्य रेषेखाली असून त्यांची यादीतून नावे सुटलेली आहे. अशा त्या त्या वार्डातील नगरसेवकांनी संबंधित झोन ऑफिसला कळविणे व नाव समाविष्ट करु न घेणे पुढील कार्यवाही प्रशासन करतील.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.हमीद ताबा :** दि.१९.०९.९८ च्या सभेत ठराव क्र.८५/१२ मध्ये प्रस्तावानुसार नमूद केल्याप्रमाणे समाकक्ष विभागात कर्मचाऱ्यांनाही सुट्टीच्या दिवशी काम केल्यास एक दिवसाचा पगार देण्यास मंजूरी देण्यात यावी, अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा.महापौर :** स.सदस्यांनी सुचवलेली दुरुस्ती करण्यास मंजूरी देण्यात येते. तसेच स.सदस्य श्री.हमीदोद्दीन ताबा यांचे सभासदत्व एक दिवसासाठी रद्द करण्यात आले होते. परंतू स.सदस्य यांच्या विनंतीवरुन रद्द केलेले सभासदत्वाचा निर्णय रद्द ऐवजी सभागृहात स्थानापन्न असतील असा निर्णय घेण्यात येतो.

**ठराव क्र.९५/१ :**

दि.१९.०८.९८ च्या सभेतील इतिवृत्तामध्ये

१) ठराव क्र.६४/५, दि.१९.०८.९८ अन्वये स्थगित ठेवण्यात आला होता त्या ऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्रमांक १,२,३,४ व ६ मध्ये विविध ठिकाणी गतीरोधक साईन बोर्ड व ट्राफिक स्ट्रीप्स इ. तयार करण्याच्या कामासाठी रक्कम रु.२४,७४,५५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

२) ठराव क्र.८५/१२, दि.१९.०८.९८ मध्ये प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या झोन/जकात/पाणी पुरवठा इ.विभागांत सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी काम केल्यास सदर कर्मचाऱ्यांना ज्या प्रमाणे एक दिवसांचे वेतन देण्यात येते. त्याचप्रमाणे समाकक्ष विभागातील कर्मचाऱ्यांना सुटीच्या दिवशी काम केल्यास एक दिवसांचे वेतन अतिरिक्त भत्ता म्हणून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वरील दुरुस्ती व वाढ यासह दि.१९.०८.९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९६/२ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर (मुकूंदवाडी) येथे शहाबाद फरशी करणे करिता अंदाजपत्रक रक्कम रुपये १५,४९,१८४/- सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांची दरसुची ९७-९८ अ नुसार तयार करण्यात आली असून मा.आयुक्तांनी दि.०४/०९/९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम १८ खेडी विकास योजने अंतर्गत अर्थसंकल्प १९९८-९९ तरतूदी मधून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र.९६/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर मुकूंदवाडी येथे शहबाद फरशी बसविण्याच्या कामासाठी रक्कम रु.१५,४९,१८४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९७/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.आमखास मैदान येथे मागावर्गीय विद्यार्थ्यासाठी वस्तीगृहात बांधवयाचा पहिला टप्पा पुर्ण झालेला असून दुसऱ्या टप्प्यामध्ये इमारतीचा मुख्य दर्शनी भागाचे काम ज्यामध्ये तळमजल्यावर खोदकाम करुन एकूण आठ खोल्या, प्रवेश हॉल, कॅरोडोअर, तसेच पाहिल्या मजल्यावर देखिल अशा प्रकारची बांधकामाची तरतूद ठेवण्यात आलेली आहे. तसेच रस्ता, रिटेनींग वॉल व संरक्षित भिंत इत्यादी कामे हाती घ्यावयाची आहेत. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रुपये २९,८०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.१९.०८.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त कामासाठीचा निधी रक्कम रुपये २१,७५,७८०/- हा ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षाअंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २९,८०,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.महादेव सुर्यवंशी :** सदर प्रस्तावात खोदकाम करुन आठ खोल्या, तसेच त्या ठिकाणी वॉल कपांऊड इ.कामाची तरतूद दाखवलेली आहे. २ वर्षापुर्वी ९६ ला याच ठरावा बरोबर एक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र बांधण्याबाबतचा ठराव झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर च्या बाजुला ही वास्तु बांधण्यात यावी असे ठरले होते. यानंतर स.सदस्य श्री.गौतम खरात यांनी सांगितले की, या जागेवर हॉस्टेल साठा प्रोसीजर चालू आहे. त्यानंतर हॉस्टेलची प्रोसीजर सुरु झाली. हॉस्टेल साठीचा ठराव व अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र चा प्रस्ताव एकत्रित ठेवण्यात आला होता. परंतू त्या ठिकाणी प्रशासनाने अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र बांधण्याबाबतचा कुठलाही विचार केलेला नाही. एकत्रित प्रस्ताव हा मंजूर झालेला होता. हॉस्टेलचे पहिल्या टपऱ्यांचे बांधकाम करुन दुसऱ्यांदा हा परत आठ खोल्याचे खोदकामासाठी प्रस्ताव मंजूरीसाठी कसा ठेवण्यात आला. याकडे प्रशासनाचे लक्ष द्यावे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र बांधण्याबाबतची प्रशासनाने अंमलबजावणी का केली नाही. पाहिल्या प्रथम जो ठराव पास झालेला होता. त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

दुसरा मुद्दा असा की, वास्तु बनविण्याच्या अगोदर हॉस्टेल कसे बांधण्यात आले व पुन्हा खोदकाम करुन आठ खोल्या बांधण्याची प्रस्ताव सभागृहासमोर ठेवता हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही. प्रशासनाने या ठिकाणी पाहणी करुन हा प्रस्ताव तो पर्यंत स्थगित ठेवावा.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** १९९६ साली सदर प्रस्ताव मंजूर होता व एक काम सुरु होते व दुसरे त्यातील काम राहून जाते. यात प्रशासनाची चुक आहे. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र का बांधण्यात आले नाही. याची माहिती द्यावी.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिचर्स सेंटर धरतीवर अण्णाभाऊ साठे रिसर्च सेंटर व्हावे.

**श्री.जयवंत ओक :** याच प्रस्तावाबरोबर दोन वर्षापुर्वी अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र बांधण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर झाला परंतू त्याची अंमलबजावणी का करण्यात आली नाही. माझे असे मत आहे. अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र या वस्तीगृहाच्या बाजुला बांधण्याची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी.

**श्री.गौतम लांडगे :** ज्या वेळेस अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र असे नांव द्यावे असा ठराव मंजूर झालेला होता. तेव्हा आम्ही त्यास विरोध केलेला नाही.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** नाव देण्याचा ठराव झालेला नाही.

**श्री.गौतम खरात :** हा प्रस्ताव जेव्हा सुरुवातीस ठेवण्यात आला होता तो डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरच्या लगत मागासवर्गीयांसाठी वस्तीगृह बांधण्यात यावे. असा ठराव १९९० ला मंजूर करण्यांत आला. त्यानंतर हर्सुल जेलच्या पाठीमागे हे वस्तीगृह बांधण्यात आले. त्या वस्तीगृहाचे रुपांतर नंतर महापालिकेच्या प्रशासनाने महापालिकेची शाळा म्हणून केले ते लक्षात आल्या नंतर प्रशासनाला विनंती केली. यानंतर पुन्हा वस्तीगृहासाठी ८२ लाखाचा प्रस्ताव ठेवण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या बाजुला वस्तीगृह आमखास (शिवाजी) मैदान येथे बांधण्याचे प्रशासनाने ठरवले त्यानुसार या वस्तीगृहाचे काम सुरु झालेले आहे. पहिल्या टप्प्यात २० लाखांचे काम झालेले आहे. दुसऱ्या टप्प्यात २० लाखाचे व या तिसऱ्या टप्प्यात कामासाठी हा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. ज्या वेळेस पहिल्यांदा प्रस्ताव ठेवण्यात आला. त्यावेळेस स.सदस्य यांनी अशी मागणी केली की याच ठिकाणी अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र किंवा रिसर्च सेंटर व्हावयास पाहिजे त्यावेळी या कामाचे इस्टिमेट तयार झालेले होते. त्यावेळी मी स.सदस्यांना असे सांगितले की, या ठिकाणी वस्तीगृहाच्या पाहिल्या टप्प्याचे काम पुर्ण होत आहे. त्यावेळी मी स.सदस्यांना असे सांगितले की, या ठिकाणी वस्तीगृहाच्या पहिल्या टप्प्याचे काम पुर्ण होत आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये जे काम करणार आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये जे काम करणार आहे. त्यास अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र असे नांव देण्यास माझी काहीही हरकत राहणार नाही.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** सभागृहात स.सदस्य हे दिशाभूल करीत आहे. ८२ लाखाचे इस्टिमेंट सभागृहात मंजूरीसाठी आलेच नाही. दुसरे असे की, ज्या वेळेस २० लाखांचा मंजूरीसाठी प्रस्ताव सभागृहात आला. त्यावेळेस ज्या मजल्याचे बांधकाम केले जाईल. त्यास अण्णाभाऊ संशोधन केंद्र असे नाव द्यावे अशा प्रकारचा ठराव होता.

**श्री.प्रकाश निकाळजे :** वस्तीगृहाच्या पहिल्या टप्प्याचे काम जवळ जवळ संपत आलेले आहे. व या प्रस्तावास मंजूरी देऊन त्याच बाजुना अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र करण्यास आमची काहीही हरकत राहणार नाही.

**श्री.गौतम लांडगे :** प्रशासनाने या विषयावर खुलासा करावा.

**श्री.जयवंत ओक :** वसतीगृहाचे पहिल्या टप्प्याचे काम पुर्ण झालेलेच आहे. या दुसऱ्या टप्प्याचे कामास मंजूरी द्यावी. या दुसऱ्या टप्प्यात होणाऱ्या बांधकाम मध्ये अण्णाभाऊ साठे वस्तु संग्रहालय असे नांव देण्यात येऊन त्यांचे वास्तु साहित्य त्या ठिकाणी ठेवण्यात यावे.

**श्रीमती अलका पाटील :** या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला.

**मा.आयुक्त :** आमखास (शिवाजी) मैदान येथे महापालिकेच्या वतीने तीन मोठे प्रोजेक्टचे काम करण्यात येत आहे. १) डॉ.बाबासाहेब रिसर्च सेंटर, २) मागासवर्गीयासाठी वसतीगृह व ३) उद्यान या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर चे काम जवळजवळ पुर्ण झालेले आहे. व मागावर्गीयासाठी जे वसतीगृह बांधणार आहोत. ते या रिसर्च सेंटर लगतच आहे. या वस्तीगृहाला एकूण ८० लाख रुपये खर्च येणार असून आतापर्यंत पहिल्या टप्प्याचे काम हे ३० लाखापर्यंत गेलेले आहे.

**श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :** मागासवर्गीसाठी वसतीगृह व अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र कुठे बांधावयाचे होते. त्या बाबतचा जो ठराव झाला तो कशा प्रकारचा होता याची माहिती पाहिजे आहे. अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र बाबतचा ठराव याच ठरावाबरोबर होता. तर त्यांची अंमलबजावणी का करण्यात आली नाही.

**मा.आयुक्त :** ठराव आला आहे. कोठे बांधावयाचे होते याबाबत मला अभ्यास करावा लागेल.

**शहर अभियंता :** १९९६ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर च्या बाजुला वसतीगृह व्हावे असा प्रस्ताव झालेला होता. त्या अगोदर हे मागासवर्गीयासाठी वसतीगृह हर्सुल जेलच्या पाठीमागे झालेले होते. परंतू त्या ठिकाणी सध्या महापालिकेची शाळा आहेत.

**श्री.व्ही.व्ही देशमुख :** अशा अर्धवट स्वरुपाचे माहिती नसलेले ठराव सभागृहात का मांडता. अशा प्रस्तावावर उगीचच चर्चा करण्याची गरज नाही. एकाच वार्डात संशोधन केंद्र का बांधतात.

**श्री.गौतम खरात :** स.सदस्य पक्षपातीपणाची भाषा बोलत आहे. शासनाची योजना आहे. महाराष्ट्र शासन मागासवर्गीयासाठी हा उपक्रम राबवित आहे. याची स.सदस्य यांना माहिती नाही काय?

(याच वेळी स.सदस्य श्री.गौतम खरात विषय पत्रिका फाडून टाकतात व माईप तोडून स.सदस्य श्री.व्ही.एस.देशमुख यांच्याकडे पाहुन मोठमोठ्याने बोलतात याचवेळी सभागृहात गोंधळ निर्माण होतो. व काहीही ऐकू येत नाही.) वेळ अंदाजे २.०० वाजता.

**मा.महापौर :** सभागृहातील आवाजाने १५ मिनीटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ अंदाजे २.१० वाजता, सभेला सुरुवात दु.२.५५ वाजता)

**श्री.गौतम खरात :** सभागृहात आताच जो अनुचित प्रकार घडला त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो यापुढे असा अनुचित प्रकार कधी होणार नाही. त्या बद्दल मी सभागृहात खबरदारी घेतो.

**मा.महापौर :** या विषयावर खुपच चर्चा झालेली आहे. यात दुरुस्ती करण्यात येते की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाचे वसतीगृह असे नांव देण्यात येत आहे. व या दुसऱ्या टप्प्याच्या बांधकामाचा प्रस्ताव लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र असे करण्यास मंजूरी करण्यांत येत आहे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व कामरेड नेते होते. त्यामुळे कामरेड हे नावापुढे लिहावे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** १४.०९.९६ रोजी डॉ.बाबासाहेब रिसर्च सेंटरच्या पश्चिमेकडील बाजूस अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र व्हावे असा प्रस्ताव टाकला होता. आणि त्याच दिवशी योगायोगाने प्रशासनाच्या माध्यमातून मागासवर्गीयासाठी २० लाखाच्या दुसऱ्या टप्प्याच्या वसतीगृह व्हावे या बाबतचा ही ठराव होता. हे दोन्ही ठराव एकाच वेळी असल्याने एकत्रित करुन मंजूर करण्यात आले होते. आणि त्या अनुषंगाने उशीरा का होईना प्रशासनाने तेथील पहिल्या टप्प्याचे काम पुर्ण केलेले आहे. व दुसऱ्या टप्प्याचे जे काम होणार आहे. त्यास सभागृहाने अण्णाभाऊ साठे रिसर्च सेंटर व वसतीगृह असे नाव देण्यास जी समत्ती दिली त्याबद्दल मी आभारी.............

**ठराव क्र. ९७/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमखास मैदान येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी बांधावयाच्या वसतीगृहाचे दुसऱ्या टप्प्यामध्ये इमारतीच्या दर्शनी भागाचे कामामध्ये तळ मजल्यासाठी खोदकाम करुन आठ खोल्या, प्रवेश हॉल कॅरीडोअर, रस्ता, रिटेनिंग वॉल, संरक्षित भिंत इत्यादी कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२९,८०,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते.

तसेच सदर प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आमखास मैदान येथे बांधावयाच्या वास्तुस लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र व विद्यार्थी वसतीगृह असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९८/४ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जिन्सी येथील पाण्याच्या टाकीस गयानटींग करणे आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये १,२७,८८,०००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या आर्थिक तरतूदीमधून करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु.१२,७८,८००/- चे मंजूरीस्तव सादर.

**ठराव क्र.९८/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी येथील पाण्याच्या टाकीस गनायटिंग करण्याच्या कामासाठी रक्कम रु.१२,७८,८०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९९/५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, कोतवालपूरा येथे साई शंकर बंगल्यापासून ते समर्थनगर नाला जंक्शन पर्यंत ८०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. पाईपची भुमीगत गटार बांधावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण

विभागाची दरसुची सन ९७-९८ नुसार रक्कम रु.१४,१८,०००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामे जलनि:सारण या लेखा शिर्षकाच्या तरतूदी मधून करण्यात येणार आहे.

तरी सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १४,१८,०००/- मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.रशिद खॉन (मामू) :** जी भुमिगत गटार बांधणार आहे. त्या गटारी मध्ये मेडीकल कॉलेज कडील तसेच पोलिस आयुक्तालयाकडील येणारे पाणी पुर्ण वाहून गेले पाहिजे. पावर हाऊसच्या बाजुच्या गल्लीने नेले. तर प्रश्न सुटेल-श्री साई शंकर या बंगल्याजवळ नेहमी पावसाचे पाणी साचते.

**मा.महापौर :** दुरुस्ती करुन, प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव क्र.९९/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोतवालपूरा येथे साईशंकर बंगल्यापासून ते समर्थनगर नाला जंक्शन पर्यंत ८०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामामध्ये सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मेडीकल कॉलेज गेटपासून व पोलिस आयुक्तालया समोरील वाहात येणारे पावसाचे पाणी पावर हाऊसच्या गल्लीने वाहून जाईल. अशी व्यवस्था करण्यासह या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये १४,१८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१००/६ :**

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेले वसतीगृह कार्यान्वित करणेसाठी नियमावली व कार्य व्यवस्थापन पध्दती मंजूरीस्तव सादर.

<u>वस्तीगृहासाठी नियमावली :</u>

१) वस्तीगृहाचे नांव : औरंगाबाद महानगरपालिकेचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर संचलित अण्णाभाऊ साठे विद्यार्थी वस्तीगृह असेल.

२) उद्दिष्टे : मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी औरंगाबाद शहरात त्यांची राहण्याची योग्य व्यवस्था करणे औरंगाबाद शहर हे शैक्षणिक दृष्ट्या प्रगत शहर असून या ठिकाणी विशेषत: मराठवाड्यातील विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. कमकुवत घटक कल्याण निधीचा वापर करुन आमखास (शिवाजी) मैदानाजवळ एक वस्तीगृह बांधण्यात आले आहे. बाहेर गावाहून येणाऱ्या आणि स्थानिक विद्यार्थ्यांना एक अथवा अर्धा टक्के गुण कमी पडल्यामुळे शासकीय वस्तीगृहात त्यांना प्रवेश नाकारण्यात येतो. पर्यायाने विद्यार्थ्यांना जादा व न परवडणारे भाडे देऊन खोल्या घेऊन शालेय/महाविद्यालयीन शिक्षण घ्यावे लागते या बाबींचा विचार करुन यादीप्रमाणे व जाती निहाय आरक्षण करुन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत यावा. या वसतीगृहात फक्त निवासाची सोय करण्यात आली आहे.

३) निवासी छात्र : शासनमान्य शैक्षणिक संस्थेमध्ये पुर्णकालीन शासकीय मान्यता प्राप्त पाठ्यक्रमाचे शिक्षण घेणारा अथवा प्रवेश घेतलेला मागासवर्गीय विद्यार्थ्यांस प्रवेश मागासवर्गीय विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यांत येईल. वसतीगृहाचे वर्ष :- १ जुन ते ३१ मे

४) प्रवेश : महाराष्ट्रातील १० वी उत्तीर्ण ते पदवी पर्यंतचे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत यावा.

५) प्रवेश पध्दती : महानगरपालिकेतर्फे अर्ज छापण्यात यावेत. वृत्तपत्रामधून जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत. अर्जासोबत छायाचित्र व आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती मागविण्यांत येतील.

१. ज्या वर्गात विद्यार्थी उत्तीर्ण झाला. असेल त्याचे गुणपत्रक.

२. प्रवेश घेऊ इच्छित असलेल्या शाळा/शैक्षणिक संस्थेचे नांव.

३. शाळा सोडल्याचा दाखला.

४. सक्षम अधिकाऱ्यांकडून घेतलेला जातीचा दाखला.

५. मागासवर्गीय म्हणजे अनु.जाती/अनु.जमाती/भ.जा.ज.वि.जाती/विशेष मागासवर्गीय व अपंगासाठी अंध -१%, मुकबधीर-१%, अस्थिव्यंग-१%, असे एकूण ३% आरक्षण असेल.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांस रु.१०/- च्या बॉंड पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

६) प्रवेशार्थी मेरीट प्रमाणे : घेण्यात येतील तथापि आपल्या अधिकारात निवड समिती गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास सक्षम असेल. खालील समिती वस्तीगृहाचे व्यवस्थापन व विद्यार्थी निवड करण्याची कामे करील.

१. अध्यक्ष : उपआयुक्त (प्र.), महानगरपालिका, औरंगाबाद.

२. शहर अभियंता : सदस्य

३. प्रकल्प संचालक : सदस्य,

४. मुख्य लेखा परिक्षक : सदस्य,

५. शिक्षणाधिकारी : सदस्य,

६. कामगार अधिकारी : सदस्य.

७) वस्तीगृहाचे व्यवस्थापन समिती /शासन निर्णय ३/विद्यार्थ्यांना प्रवेश देणे वा न देणे याबाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

प्रवेश / आरक्षण टक्केवारी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | अनु.जाती | ८०% | इयत्ता ११ वी | - | १० विद्यार्थी |
| २. | अनु.जमाती | १०% | इयत्ता १२ वी | - | १० विद्यार्थी |
| ३. | भ.वि.ज.ज. | ५% | प्रथम वर्ष | - | १० विद्यार्थी |
| ४. | विशेष मागासवर्ग | २% | द्वितीय वर्ष | - | १० विद्यार्थी |
| ५. | अपंग | ३% | तृतीय वर्ष | - | १० विद्यार्थी |

कोणत्याही विद्यार्थ्यास प्रवेश नाकारणे अथवा कोणत्याही क्षणी खोली सोडण्याचा आदेश उपआयुक्त व आयुक्त देऊ शकतील. प्रवेश प्राप्त विद्यार्थी इतरांशी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन, रॅगींग चोरी, मारहाण करणार नाही. सर्वाशी तसेच वरीष्ठ अधिकारी, कर्मचारी अथवा व्यवस्थापकांशी सौजन्याने वागणूक प्रवेशार्थीवर बंधनकारक असेल. कोणत्याही माहिला, मुलीस विद्यार्थ्यांच्या खोलीत प्रवेश देण्यांत येणार नाही. धुम्रपान नशा करणे, पान, तंबाखु, गुटखा खाने मनाई असेल. असे वर्तन करणाऱ्याचया प्रवेश रद्द करण्यांत येईल. सायं.१०.०० वाजता मुख्य प्रवेशद्वार बंद करणेत येईल. व्यवस्थापकाची पुर्ण परवानगी न घेता बाहेर गावी गेलेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश नाकारणे व्यवस्थापकाचा अधिकार असेल.

खोलीत कोणासही स्वंयपाक/नाश्ता/चहा तयार करता येणार नाही. तसेच पाण्यासाठी खाजगी हिटर लावता येणार नाही.

अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांस वस्तीगृहात पुन्हा प्रवेश मिळणार नाही. नौकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रवेश मिळणार नाही. पार्ट टाईम अभ्यासक्रम करणाऱ्यास प्रवेश देण्यात येणार नाही.

८) क्रिडा साहित्य : वसतीगृहात डबल बार सिंगलबार, व्हॉली बॉल, फुटबॉल, चेस रिंग, कॅरम इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यांत येईल.

९) वैद्यकीय सुविधा : वसतीगृहात प्रथमोपचार पेटी असेल तसेच सर्व विद्यार्थ्यांची तपासणी शासकीय वैद्यकीय रुग्णालयातून वर्षातून एकदा करण्यांत येईल.

१०) शुल्क : प्रवेश शुल्क रु.१०/- व दरवर्षी रु.१००/- (ना परतावा) प्रती विद्यार्थी असावे.

११) आवश्यक कर्मचारी वर्ग : खालील पदे निर्माण करणे योग्य.

| | | |
|---|---|---|
| १. व्यवस्थापक - (वर्ग-२) | - | एक पद |
| २. कार्यालय अधिक्षक | - | एक पद |
| ३. क.लिपीक | - | दोन पद |
| ४. शिपाई | - | तीन पद |
| ५. वाचमन | - | तीन पद |
| ६. सुरक्षा रक्षक | - | तीन पद |

**संवाद :**

**श्री.संजय जोशी :** या प्रस्तावाबाबत एक नियमावली तयार करण्यांत यावी.

**श्री.रशिद खॉन (मामू) :** व पुढच्या बैठकीत हा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**श्री.गौतम खरात :** सदर प्रस्ताव स्थगित ठेवून पुढच्या बैठकीत ठेवण्यात यावा.

**मा.महापौर :** पुढील सभेपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**ठराव क्र.१००/६ :**

सर्वानुमते असे ठरले की, सदरचा प्रस्ताव पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात आला.

**विषय क्र.१०१/७ :**

मा.आयुक्त यांचे मंजूरीनुसार प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका ८ डिसेंबर १९८२ रोजी अस्त्विात आली महानगरपालिकेच्या एकत्रित असा, कर्मचारी आकृती बंध तयार करण्यासाठी एक सदस्य समिती महानगरपालिकेने स्थापन केली होती. सदर समितीने आपला अहवाल तयार करुन प्रशासनास सादर केला होता. सदर अहवाल १९९८ मध्ये सर्व साधारण सभेकडे मंजूरीसाठी सादर करण्यांत आला. सदर अहवालाबाबत चर्चा होऊन त्यातील तीन पदे मंजूर करुन अन्य पदाबाबत फेर विचार करुन सुधारित करण्याबाबत निर्णय झाला. त्यानुसार आता सुधारित कर्मचारी आकृती बंध तयार करुन सादर करण्यासाठी मुख्य लेखापरिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची समिती नेमण्यांत आली.

सदर समितीने वेळोवेळी बैठका घेऊन कर्मचारी आकृती बंधबाबत सविस्तर चर्चा केली. तसेच शासनाने नेमलेल्या मा.झा समितीच्या शिफारशीचा विचार करुन सुधारित आकृती बंध अंतिमरित्या तयार करण्यांत आला. मा.झा समितीच्या शिफारशीनुसार आस्थापना खर्चाचे प्रमाण हे महसुली उत्पन्नाशी निगडीत न ठेवता एकूण खर्चापैकी ३५% खर्च हा आस्थापनेवर व्हावा. ही प्रमुख शिफारस आहे. सुधारित आकृतीबंधात या बाबीवर कटाक्षाने भर देण्यांत आला आहे.

महानगरपालिकेच्या आर्थिक स्त्रोत मजबुत करण्यासाठी करांच्या वसुलीसाठी व्यापक मोहिम राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक तेवढा कर्मचारी-वृंद असणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिकेच्या उत्पन्नातून खर्च होणारा प्रत्येक पैसा हा नागरिकांना द्यावयाच्या सोयी सुविधांनुसार योग्यरितीने खर्च व्हावा, यासाठी योजना राबविणाऱ्या विभागाकडे आवश्यक तितका कर्मचारी वर्ग असावा हे सुत्र समितीने विचारात घेतले आहे. ढोबळ मानाने सुधारित आकृती बंधाची रचना खालीलप्रमाणे आहे.

| **सध्या अस्तित्वात असलेली पदे** | **नवीन मंजूर करावयाची पदे** | | **एकूण पदे** | **वाढीव खर्च रु.७.७५ कोटी** |
|---|---|---|---|---|
| वर्ग-१ (विभाग प्रमुख) | १२ | - | १२ | |
| वर्ग-१ (दर्जाप्राप्त) | २१ | ४ | २५ | |
| वर्ग-२ | ३७ | ३० | ६७ | |
| वर्ग-३ | १४९६ | ५६३ | २०५९ | |
| वर्ग-४ | १६७९ | १२६२ | २९४१ | |
| **एकूण** | **३२४५** | **१८५९** | **५१०४** | |

सध्या अस्तित्वात असलेल्या आस्थापनेवरील वेतन व भत्ते यांचा एकूण खर्च रुपये २०.०० कोटी आहे. तसेच दैनंदिन वेतनावरील कर्मचाऱ्यांचा खर्च रु.७.७५/- कोटी इतका धरल्यास एकूण खर्च रु.२७.७५ कोटी इतका होईल. सन १९९८-९९ मध्ये एकूण वार्षिक उत्पन्न रु.९३.३५ कोटी इतके अपेक्षित असून खर्च रु.९२.२५ कोटी इतका होईल. नवीन आकृती बंध मंजूर केल्यामुळे आस्थापनेवर होणारा एकूण खर्च रु.२७.७५ कोटी हा सन १९९८-९९ च्या एकूण अंदाजित खर्चाच्या ३०.०८% इतका राहील. पाचवा वेतन आयोग लागू झाल्यास वेतनावरील खर्चात साधारणपणे १५% वाढ गृहीत धरल्यास एकूण अंदाजित पणे १५% वाढ गृहीत धरल्यास एकूण अंदाजित खर्चाच्या ३४.६०% इतका राहील. त्यामुळे हा खर्च मा.झा. समितीच्या शिफारशीनुसार एकूण खर्चाच्या ३५% या मर्यादेत राहतो.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** या विषयावर "विशेष सभा" घेण्यांत येईल.

**ठराव क्र.१०१/७ :**

सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्तावाबाबत विशेष बैठक घेण्यात यावी.

**विषय क्र.१०२/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत ॲलोपॅथीक, होमीपॅथीक, आयुर्वेद औषधोपचार पध्दतीने दवाखाने चालू आहे. येथे युनानी औषधोपचार पध्दतीतून रुग्ण चिकित्साची सुविधा उपलब्ध नाही, युनानी औषधोपचार पध्दत ही जुनी व प्रभावी असून या पध्दतीमुळे गंभीर स्वरुपाचे आजार देखील कायमस्वरुपी बरे होतात, त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेने युनानी औषधोपचार पध्दतीने नवीन युनानी दवाखाना सुरु करणे, युनानी दवाखाना यांचे आरोग्य केंद्र व उप-आरोग्य केंद्र सुरु करावे आणि जनतेला आरोग्य सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.
**सुचक :** श्रीमती आबेदा बेगम,
**अनुमोदक :** श्रीमती जाहेदा बेगम,
दि.२७.०८.९८

**ठराव क्र.१०२/१ :**
प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे युनानी औषधोपचार पध्दत ही जुनी व प्रभावी असल्यामुळे औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत युनानी औषधोपचार पध्दतीचे आरोग्य केंद्र व उपकेंद्र सुरु करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०३/२ :**
प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.१ भावसिंगपुरा येथे खालीलप्रमाणे विकासाची कामे करण्यात यावी.
१. भावसिंगपुरा गाव ते स्मशानभूमी पर्यंत विद्युत पोल टाकून लाईट लावणे.
२. भावसिंगपुरा स्मशानभूमिला तोरेचे कुंपन तुटल्यामुळे आता कुंपन भिंत बांधणे बाबत.
३. भावसिंगपुरा गाव येथे मोटे जलकुंभ बांधणे बाबत.
४. भावसिंगपुरा महानगरपालिकेच्या शाळेपासून भावसिंगपुरा गावांपर्यंत विद्युतपोल टाकून सोडियम व्हेपर बसविणे.
५. मिटमिटा ते अप्पावाडी पर्यंत खडी रस्ता तयार करणे.
**सुचक :** श्रीमती रुख्मीनीबाई लोखंडे
**अनुमोदक :** श्री.जयवंत ओक
**दि.**११.०९.९८

**ठराव क्र.१०३/२ :**
प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१ भावसिंगपुरा भागात खालीलप्रमाणे विकासाची कामे करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.
१. भावसिंगपुरा गाव ते स्मशानभूमी पर्यंत विद्युत पोल टाकून लाईट लावणे.
२. भावसिंगपुरा स्मशानभूमिला तोरेचे कुंपन तुटल्यामुळे आता कुंपन भिंत बांधणे बाबत.
३. भावसिंगपुरा गाव येथे मोटे जलकुंभ बांधणे बाबत.
४. भावसिंगपुरा महानगरपालिकेच्या शाळेपासून भावसिंगपुरा गावांपर्यंत विद्युतपोल टाकून सोडियम व्हेपर बसविणे.
५. मिटमिटा ते अप्पावाडी पर्यंत खडी रस्ता तयार करणे.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०४/३ :**
ज्या प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जि.प. तर्फे सुरक्षित बेरोजगार युवकांना काम मिळावे या उद्देशाने अभियंत्यांना पाच लाखापर्यंतचे काम विना निविदा देण्यांत येते. त्याचप्रमाणे महानगरपालिकेची कामे बेरोजगार अभियंत्यांना देण्याबाबतचा ठराव मंजूरीस्तव सादर.
**सुचक :** श्री.जयवंत (बंडू) ओक,

**अनुमोदक:** श्री.अविनाश कुमावत,
दि.१५.०९.९८

**ठराव क्र.१०४/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका तर्फे सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदेच्या धरतीवर सुशिक्षीत अभियंत्यांना पांच लाखापर्यंतची कामे विना निविदा देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०५/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद हे ऐतिहासिक शहर म्हणून प्रसिध्द असून या शहरात विविध चौकात राष्ट्रीयपुरुषांचे पुतळे बसविण्यात आलेले आहेत. परंतू जगप्रसिध्द महाराणा प्रताप यांचा पुतळा या शहरात नसल्यामुळे त्याची उणीव जाणवते.

तरी महाराणा प्रताप यांचा पुतळा मोंढा रोड सेव्हनहील आकाशवाणी चौक, मुकूंदवाडी एअरपोर्ट समोर (जालना रोड) यापैकी कोणत्याही एका ठिकाणी महापालिकेतर्फे उभारण्यात यावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** १. श्री.कंवरसिंग बैनोडे,
२. श्री.संजय केनेकर,

**अनुमोदक :** १. श्री.राजकुमार बचाटे
२. श्री.संजय जोशी

**ठराव क्र.१०५/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर म्हणून प्रसिध्द असल्यामुळे प्रस्तावित केलेल्या जागेपैकी एका ठिकाणी महानगरपालिकेतर्फे महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०६/५ :**

आकाशवाणी समोरील डॉ.गांधी, डॉ.बाहेती व डॉ.कोडलिगीकर यांचे हॉस्पीटल समोरुन जाणारा ३०" चा रोड १२४८९/२ या सि.स.नं. पर्यंत जाऊन बंद करण्यांत आला आहे. कैलास स्मशानभूमी ही हिंदुची मुख्य स्मशानभुमी विष्णुनगर, भानुदासनगर, उत्तमनगर व मा.स.स.श्री.प्रफुल्ल मालानी यांचे वार्डातील येणार निरनिराळे विभागातून प्रेत यात्रा अंत्यविधीसाठी निर्देशित रोडवरुन आणले जातात. शहरातील वाढत्या नागरी वस्तीचा विचार होता. सदर रोड बंद करुन ठेवण्यात आला आहे. (प्रारुप आराखड्यामध्ये) जर अशाप्रकारे दुर्लक्ष करुन प्रारुप आराखड्यास मंजूरी दिली गेली आहे. त्यामुळे या भागातील भविष्यात निर्माण होणाऱ्या अडचणींचा विचार करता ४ कि.मी. अंतर जाऊनच या स्मशानभूमीत प्रेत यात्रेसाठी यावे लागेल. या भागातील जनतेला मोंढा नाका, लक्ष्मणचावडी, कैलासनगर, अशा रोडवरुनच जाणे जरुरीचे राहील. अशी अडचण होऊ नये म्हणून जनहिताचा प्रश्न विचारात घेता स्मशानभूमी कंपाऊंड वॉलच्या लगत ३०" चा रोड मुख्य गेटपर्यंत मिळविण्यांत यावा यासाठी १२४८७ मधील व इतर सि.स.मधील आवश्यक जागा रोडसाठी खर्चासह भूसंपादित करावी लागणार आहे. यासाठी सभागृहाने मान्यता द्यावी.

**सुचक :** श्री.व्ही.व्ही.देशमुख

**अनुमोदक :** श्री.रविंद्र (राजू) इंगळे,
दि.१५.०९.९८

**ठराव क्र.१०६/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.गांधी, डॉ.बाहेती व डॉ.कोडलिगीरीकर यांच्या हॉस्पीटल समोरुन जाणारा ३० " फुटाचा रस्ता सि.टी.एस.नं. १२४८९/२ पर्यंत जाऊन विकास आराखड्यात बंद होत असल्याने विष्णुनगर, भानुदास नगर, इ.भागातून अंत्ययात्रा घेऊन जाणे सुलभ व्हावे. या करिता सदर रस्ता स्मशानभुमीच्या कम्पॉडवॉल ला लागून स्मशानभूमीच्या गेटपर्यंत ३०" तयार करण्यासाठी सि.टी.एस.नं.१२४८७ व इतर सी.टी.एस. मधील आवश्यक जागा भुसंपादन करण्यांस खर्चासह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०७/६ :**

कैलास स्मशानभुमीच्या उत्तरेला असलेली लहान जागा जी की, सि.स.नं.१२४८७ आहे. अशी जागा या लगत असलेले सात वॉर्डातील तरुणांना खेळण्यासाठी क्रिडा संकुल उभारणे कामी आजच्या स्थितीला उपलब्ध होऊ शकते. सदर जागा भूसंपादन करणे आवश्यक आहे.

तसेच मनपा ने सादर केलेल्या प्रारुप आराखड्यात आरक्षण क्र.२१४ कैलासनगर मधील दुमजली, तीन मजली इमारती बांधलेल्या आहे. त्या जागेवर दर्शविले आहे. तथापि हे आरक्षण प्ले ग्राऊंड म्हणून सहन असलेल्या जागेवर दर्शविणे जरुरीचे आहे. म्हणून आरक्षण २१४ संबंधी सभागृहाने विचार करुन फेरबद्दल करण्यासाठीचा प्रस्ताव स्वीकारावा व कैलास स्मशानभूमीच्या उत्तरेला असलेल्या १२४८७ सि.स.नं. या जागेवर सदर २१४ आरक्षण दर्शविण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. अशी विनंती आहे.

**सुचक :** श्री.व्ही.व्ही. देशमुख
**अनुमोदक :** श्री.रविंद्र (राजू) इंगळे,
दि.१५.०९.९८

**ठराव क्र.१०७/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रारुप विकास आराखड्यात आरक्षण क्र.२१४ खेळाचे मैदान मधुन आरक्षित केलेल्या जागेवर दुमजली/तिमजली इमारती उभारण्यात आल्यामुळे आरक्षणाचा उद्देश सफल होऊ शकत नाही. या करिता कैलासनगर स्मशानभुमीच्या उत्तरेला असलेल्या सि.टी.एस.नं.१२४८७ या सहन जागेवर या भागातील तरुणांना खेळाचे मैदान उपलब्ध करुन क्रिडा संकुल उभारण्याच्या कामी प्रारुप विकास आराखड्यात बदल करुन सी.टी.एस.नं.१२४८७ ची सहन जागेवर खेळाचे मैदानासाठी आरक्षणाबाबतची दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. विकास आराखड्यात करण्यांत आलेला बदलाबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०८/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे अधिपत्यात सध्या त्यांचेचे १० विभाग कार्यरत आहेत. ज्यामुळे नगरसेवकांची किंवा नागरिकांची कामे प्रलंबित

राहतात. किंवा कामेच होत नाहीत. कामाचा व्याप व अधिकार जास्त प्रदान करण्यांत आलेले आहे. असे निदर्शनास येते.

करिता त्यांचेकडील जास्तीचे अधिकार काढुन घेण्यात यावेत. व त्यांचे नंतरचे जे जेष्ठ डॉक्टर असतील त्यांना सदरील अधिकार प्रदान करण्यांत यावेत.

करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.हमीयोद्दीन ताबा,
**अनुमोदक :** श्री.अब्दुल रशिद अ.सत्तार,
सौ.रुख्मीनीबाई लोखंडे
दि.१६.०९.९८

**ठराव क्र.१०८/७ :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१०९/८ :**

औरंगाबाद मेडिकल कॉलेज व सार्वजनिक ओ.पी.डी.मध्ये गेल्या दोन तीन वर्षापासून कायमस्वरुपी पदावर डिन कार्यरत नाही. फक्त तात्पुरते स्वरुपात डिन आपले काम पहतात तसेच सदरील दवाखान्यात सार्वजनिक उपचारासाठी येणारे नागरिकांना बाहेरुन दवा व गोळ्या खरेदी करुन मागविण्यात येतात, ज्यामुळे सरकारी दवाखान्यापासुन नागरिकांना काहीच लाभ होत नाही. ज्यामुळे गोर-गरीब जनता दवा, गोळ्या, इंजेक्शन खरेदी करुन आणतात तसेच कायमस्वरुपी डिन कार्यरत नसल्यामुळे गरीब नागरिकांचे असे हाल होत आहे. करिता शासनाची या ठिकाणी आपले लक्ष घालुन त्वरीत कायमस्वरुपी डिन व दवाखान्यात गोळ्या, दवा, इंजेक्शन उपचारासाठी लागणारे सर्व साहित्यांची मोफत व्यवस्था करावी म्हणून मेडीकल कॉलेज व शासनास कळविणेत यावे.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.अब्दुल रशीद खॉन (मामू)
**अनुमोदक :** श्री.अफसर खॉन,
श्री.अविनाश कुमावत
दि.१५.०९.९८

**संवाद :**

**श्री.अब्दुल रशीद खॉन (मामू) :** या संबंधिताचे निवेदन शासनास व मा.आरोग्य मंत्री यांना पाठविण्यात यावे.

**ठराव क्र.१०९/८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मेडीकल कॉलेज व सार्वजनिक ओ.पी.डी. मध्ये गेल्या २/३ वर्षापासून कायमस्वरुपी अधिष्ठता नसल्यामुळे उपचारासाठी येणाऱ्या गोरगरीब नागरिकांचे हाल होतातच उपचारासाठी नागरिकांना औषधी, गोळ्या, इंजेक्शन इ.बाहेरुन खरेदी करुन आणावे लागतात. या सर्व बाबींचा विचार करता औरंगाबाद मेडीकल कॉलेज व सार्वजनिक ओ.पी.डी. करिता कायम स्वरुपी अधिष्ठाता व उपचारासाठी लागणारी औषधी, इंजेक्शन व गोळ्या व इतर साहित्य मोफत मिळण्याची व्यवस्था

शासनातर्फे करण्यास मेडिकल कॉलेज औरंगाबाद व शासनास या बाबत कळविण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.११०/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, रहेमानिया कॉलनी मधील मौलाना आझाद चौकाच्या मध्यभागी वर्तुळाकार सर्कल मध्ये उंच मिनार (टॉवर) बांधण्याच्या कामासाठी सदरील वार्डाच्या स.नगरसेविका श्रीमती फरहत बानो यांनी अर्ज देऊन विनंती केलेली आहे.

परंतू, ज्या ठिकाणी उंच मिनार (टॉवर) बांधावयाचे आहे तो रस्ता सिडकोच्या असून सदरच्या चौकाचा विकास सिडकोतर्फे करण्यांत आलेला आहे. त्यामुळे सिडको कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय महानगरपालिकेस तेथे कसलेही काम करता येत नाही.

तसेच स.नगरसेविका श्रीमती फरहत बानो यांनी सदरचा खर्च त्यांच्या सन १९९८-९९ च्या स्वेच्छा निधीतून करावा म्हणून संम्मती दिलेली आहे.

तरी सदरील चौकात उंच मिनार बांधणेसाठी प्रथम सिडको कार्यालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेऊन काम करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. त्याबाबत विचार विनिमय होणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

**ठराव क्र.११०/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रहेमानिया कॉलनी येथील मौलाना आझाद या चौकाचा विकास सिडको कार्यालयामार्फत करण्यांत आलेला असल्याने प्रथम सिडको कार्यालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेतल्यानंतर स.नगरसेविका श्रीमती फरहत बानो यांचे सन १९९८-९९ च्या स्वेच्छानिधीतून मौलाना आझाद चौक वाहतूक बेटात उंच मिनार (टॉवर) बांधणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१११/२ :**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमधील रहिवास क्षेत्रामध्ये पुर्वीच्या मेहेरनगर या मंजूर रेखाकंनास पोच रस्ता उपलब्ध होण्याच्या दृष्टीने व तेथील नागरिकांकडुन वारंवार होणाऱ्या तक्रारीचा विचार करुन त्यांत मेहेरनगर या करिता मंजूर रेखांकनातील भुखंड क्र.१ मधून पोच रस्ता उत्तरेकडील श्री.एम.ए.खान रेखाकनातील (स.नं.१८/२) अस्त्विातील डांबर रस्त्यापर्यंत देण्याचे प्रस्तावित केले आहे.

त्यासाठी वरील नमूद भुखंड क्र.१ चे भागास भुसंपादन करण्याची कार्यवाही मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ खाली मंजूर करुन नंतर जिल्हाधिकारी औरंगाबाद मार्फत भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम १७ खाली तातडीने (अर्जेन्सी क्लॉज) करण्याचा प्रस्ताव भूसंपादनाच्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

मान्यतेनंतर आवश्यक त्या कागदपत्रांसह भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे तातडीने कार्यवाही करण्यासाठी पाठविण्यांत येईल.

**टराव क्र.१११/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मेहेरनगर या मंजूर रेखांकनास श्री.एम.ए.खान रेखांकनातील (स.नं.१८/२) अस्तित्वातील डांबर रस्त्यापर्यंत पोच रस्ता उपलब्ध करुन देण्यासाठी "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ नुसार" नॉन डी.पी. रस्त्यासाठी मेहरनगर येथील भूखंड क्र.१ चा भाग भूसंपादन करुन भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम १७ अन्वये मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेमार्फत भूसंपादनाची तातडीने कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११२/३ :**

औरंगाबाद प्रारुप विकास योजनेनुसार डॉर्लिंग हॉटेल ते पन्नालालनगर १५ मीटर रस्ता नियोजित केला असून तो रस्ता विकसित करणे आवश्यक आहे.

हा रस्ता पुर्ण झाल्यावर शहरातून उस्मानपुऱ्याकडुन जातांना पन्नालालनगर, श्रेयनगर मधील जनतेस वापर करता येईल व उस्मानपुरा चौकात वाहनांची होणारी गर्दी व कोंडी कमी होईल.

ह्या दृष्टीने विचा करता विकास योजना प्रस्तावानुसार रुंदीकरण करणे आवश्यक असल्याने त्या संदर्भात सदर रस्ता विकसीत करणे करिता रस्ता रुंद करणाने बाधीत होणारी जागा संपादित करण्यासाठीचा भूसंपादनाकरिता लागणाऱ्या खर्चासह प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

**ठराव क्र.११२/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा चौकात वाहनाची होणारी कोंडी व गर्दी कमी करण्यासाठी औरंगाबाद शहर विकास प्रारुप आराखडा योजनेनुसार डॉर्लिंग हॉटेल ते पन्नालालनगर हा १५ मिटर नियोजित रस्ता विकसीत करणे करिता रुंदीकरणामध्ये बांधीत होणारी जागा संपादित करण्यासाठी भूसंपादनाकरिता येणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जग-गण-मन" या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दि.१७.१०.९८ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त शनिवार दिनांक १७ ऑक्टोंबर १९९८ रोजी सकाळी ११.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस मा.महापौर सौ.शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात" "वंदेमातरम्" या गीताने सुरुवात झाली. गणपुर्ती अभावी आजची सभा ००.३० मिनीटे तहकुब करण्यात येत असल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले. तहकूब करण्यात आलेल्या सभेस ठिक ११.४५ वा.पुन्हा सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.डॉ. कराड भागवत किशनराव | - | उप महापौर |
| २. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | स.सदस्य |
| ३. | स.स.श्री. अविनाश लक्ष्मणराव कुमावत | - | स.सदस्य |
| ४. | स.स.श्री. अफसर खाँ यासिन खाँ | - | स.सदस्य |
| ५. | स.स.श्रीमती लोखंडे रुख्मणबाई खंडेराव | - | स.सदस्य |
| ६. | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | - | स.सदस्य |
| ७. | स.स.सौ. साजेदा बेगम | - | स.सदस्य |
| ८. | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | - | स.सदस्य |
| ९. | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | - | स.सदस्य |
| १०. | स.स.सौ. उषाबाई दिलीप गायकवाड | - | स.सदस्य |
| ११. | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | - | स.सदस्य |
| १२. | स.स.श्री. लांडगे गौतम लिंबाजी | - | स.सदस्य |
| १३. | स.स.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | - | स.सदस्य |
| १४. | स.स.श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ | - | स.सदस्य |
| १५. | स.स.श्री. नरेंद्र यादवराव पाटील | - | स.सदस्य |
| १६. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | स.सदस्य |
| १७. | स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास | - | स.सदस्य |
| १८. | स.स.सौ. पद्मा बाबुराव शिंदे | - | स.सदस्य |
| १९. | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | - | स.सदस्य |
| २०. | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | - | स.सदस्य |
| २१. | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | - | स.सदस्य |
| २२. | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | - | स.सदस्य |
| २३. | स.स.सौ.फरहत बानो भ्र.मो.नवाज | - | स.सदस्य |
| २४. | स.स.श्री. फजलउल्ला खॅान अजमत उल्लाखान | - | स.सदस्य |
| २५. | स.स.श्री. अजीज खॉ गणी खाँ | - | स.सदस्य |
| २६. | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | - | स.सदस्य |
| २७. | स.स.श्री. महंमद मुस्ताक अहमद | - | स.सदस्य |
| २८. | स.स.श्री. मुजीब आलमशाह मीर आलमशाह | - | स.सदस्य |
| २९. | स.स.सौ. मोहसीना बिल्कीस विखारोद्दीन | - | स.सदस्य |
| ३०. | स.स.श्री. जावेद रज्जाक | - | स.सदस्य |
| ३१. | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | - | स.सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | - | स.सदस्य |
| ३३. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद | - | स.सदस्य |
| ३४. | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | - | स.सदस्य |
| ३५. | स.स.श्री. अ.अ.रऊफ म.अ.माबुद | - | स.सदस्य |
| ३६. | स.स.श्री. स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन | - | स.सदस्य |
| ३७. | स.स.श्री. खाखोरडीया धिरज शांतीलाल | - | स.सदस्य |
| ३८. | स.स.श्री. सय्यद अली मीरा सलामी | - | स.सदस्य |
| ३९. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सदस्य |
| ४०. | स.स.श्री.संजय किशनराव केनेकर | - | स.सदस्य |
| ४१. | स.स.सौ. लता दलाल श्रीनिवास | - | स.सदस्य |
| ४२. | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | - | स.सदस्य |
| ४३. | स.स.सौ. धांडे शकुंतला हरीदास | - | स.सदस्य |
| ४४. | स.स.श्री. अब्दुल रशिद खाँन (मामू) | - | स.सदस्य |
| ४५. | स.स.डॉ.कु.माया लिंबाजी लाडवाणी | - | स.सदस्य |
| ४६. | स.स.सौ. आव्हाड सविता धनंजय | - | स.सदस्य |
| ४७. | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | - | स.सदस्य |
| ४८. | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेद्रसिंग | - | स.सदस्य |
| ४९. | स.स.श्री.जैन विकास रतनलाल | - | स.सदस्य |
| ५०. | स.स.श्री. गंगाधर सुखदेव गाडे | - | स.सदस्य |
| ५१. | स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन | - | स.सदस्य |
| ५२. | स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | - | स.सदस्य |
| ५३. | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | - | स.सदस्य |
| ५४. | स.स.श्री. जोशी संजय रामदास | - | स.सदस्य |
| ५५. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सदस्य |
| ५६. | स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | - | स.सदस्य |
| ५७. | स.स.श्री. विठ्ठल किशन जाधव | - | स.सदस्य |
| ५८. | स.स.श्री. काळुसे मंदा धनंजय | - | स.सदस्य |
| ५९. | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | - | स.सदस्य |
| ६०. | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | - | स.सदस्य |
| ६१. | स.स.श्री. नवपुते कचरु चंद्रभान | - | स.सदस्य |

**संवाद :**

**श्री.अविनाश कुमावत :** शहरातील गुलमंडी प्रभागात येत असलेल्या गोकुळनाथ वस्तीतील इमारत कोसळून, त्यात श्रीमती मैनाबाई कुलकर्णी यांचे अपघाती निधन झ ाले. त्यांना सभागृहात ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करावी.

**श्री.जयवंत ओक :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :** मंजूर

स्व.श्रीमती मैनाबाई कुलकर्णी यांना सभागृहातर्फे ००.०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करावी.

**श्रीमती आबेदा बेगम, श्रीमती जाहेदा बेगम, सौ.मोहसिना बिल्कीस :** वॉर्डातील कोणत्याही विकास कामाबाबातची समस्या सुटत नाही. (याच वेळी स.सदस्या या हातात

एक फलक घेऊन उभे राहतात.) वार्डातील विद्युत पुरवठा बाबतची कोणतीही कामे होत नाही.

**साजेदा बेगम :** दररोज संपूर्ण प्रभागात अंधार झालेला दिसून येतो.

**श्री.अफसर खॉन :** आजची सर्वसाधारण सभा योग्य ती तारिख निश्चित करुन आयोजित केलेली नाही. दिवाळी लगेचच आलेली आहेत. आजची ही सभा २७ ऑक्टोंबरला आयोजित करावी. तसेच गोकुळनाथ मोहल्ल्यात इमारत पडुन काल जी दुर्घटना घडली त्यात श्रीमती कुलकर्णी यांचे निधन झाले. ती इमारत दुरुस्तीला होती याबाबत अधिकारी यांना कल्पना नाही काय? शहरातील अशा किती इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. प्रशासनाने या बाबत खुलासा करावा.

**श्री.गंगाधर गाडे :** अशा प्रकारच्या दुर्घटना घडतात त्यात जे मृत्यूमुखी पडतात त्यास जबाबदार कोण असणार या बाबतची नैतिक जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे. संबंधित अधिकारी यांनी अशा मोडकळीस येणाऱ्या इमारत मालकास रितसर नोटीसा दिलेल्या आहेत काय? या बाबतीत प्रशासनाने खुलासा करावा.

**श्री.जयवंत ओक :** काल शहरात जी दुघर्टना घडली त्या ठिकाणी मी स्वत: स.सदस्य श्री.गाडे, श्री.जैस्वाल, विरोधी पक्षे नेता श्री.अफसर खॉंन यांनी भेटी देऊन तेथील परिस्थिती पाहून याबाबत प्रशासनाकडे खुलासा मागविलेला आहे. शहरात..................

(याचवेळी सभागृहात आघाडीचे स.सदस्य व सत्ताधारी स.सदस्य मा.महापौर यांच्या आसनाजवळ जाऊन मोठमोठ्याने बोलतात. काहीही ऐकू येत नाही.)

**मा.महापौर :** स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. एका वेळी एकाच स.सदस्यांनी बोलावे.

**श्री.गौतम लांडगे :** मोडकळीस येणाऱ्या इमारती पडण्याच्या मार्गावर असतात. त्याबाबत संबंधित अधिकारी यांना माहिती नसते काय स.सदस्य श्री.गंगाधर गाडे यांनी प्रशासनाकडुन खुलासा व्हावा. अशी मागणी केलेली आहे.

(यावेळी पुन्हा आघाडीचे स.सदस्य व सत्ताधारी स.सदस्य मा.महापौर यांच्या आसनाजवळ जाऊन मोठमोठ्याने बोलतात. विरोधी आघाडीच्या काही स.सदस्यांनी आजची सभा तहकूब करावी व येत्या २७ ऑक्टोंबरला घेण्यात यावी असा आग्रह धरला. मोठमोठ्याने बोलवणे चालू होते. मा.महापौर यांनी ऐनवेळच्या तीन विषयास मंजूरी दिली.)

**मा.महापौर :** स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. सचिव यांनी प्रस्ताव वाचुन दाखववावा.

(नगरसचिव हे खालील प्रस्ताव सभागृहात वाचुन दाखवतात.)

**मा.महापौर :** नगरसचिवांनी वाचुन दाखवलेले ऐनवेळच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.११३/१ :**

औरंगाबाद महानगरपालिका प्रशासनातील मा.आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक श्री.खाजा मोईनोद्दीन, पशुधन विकास अधिकारी डॉ.रझवी, व सर्व्हेअर श्री.इ.व्ही. सोनवणे हे महाराष्ट्र शासनाच्या आस्थापनेवर काम करत होते. परंतू महानगरपालिकेत त्यांनी चांगल्या प्रकारे सेवा बजाविल्यामुळे त्यांना शासकीय आस्थापनेवरील त्यांची सेवा महानगरपालिका

आस्थापनेवर घेण्यात आली (मर्ज केले) त्या प्रमाणेच सध्याचे सहाय्यक संचालक,नगर रचना महानगरपालिका, औरंगाबाद श्री.विलास शं चौथाई हे नगररचना व मुल्य निर्धारण खात्याच्या आस्थापनेवर काम करत आहेत. तरी त्यांना पण वरील चार अधिकाऱ्याप्रमाणेच शासनाच्या नगर रचना खात्याच्या आस्थापनेवरुन महानगरपालिकेच्या आस्थापनेवर घेण्यात यावे. (मर्ज करावे) श्री.चौथाई सहाय्यक संचालक, नगर रचना महानगरपालिका, औरंगाबाद हे शासकीय आस्थापनेच्या पदावर काम करीत आहेत. तरी सदरील पद हे त्यांच्यासह महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग करण्यात यावे. सहाय्यक संचालक नगररचना हे पद महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग करुन घेणे व श्री.चौथाई यांना मर्ज करुन घेण्याची प्रशासकीय कार्यवाही आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी पुर्ण करावी.

**सुचक :** श्री.हमीद ताबा,
श्री.संजय जोशी,
**अनुमोदक :** श्रीमती मोहसीना बिल्कीस
श्री.अजीज खाँ,
श्री.नरसिंग ढगे,
श्री.भगवान घडामोडे.

**ठराव क्र.११३/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सहाय्यक संचालक या पदावर कार्यरत असलेले शासकीय आस्थापनेवरील विद्यमान सहाय्यक संचालक नगररचना श्री.व्ही.एस.चौथाई यांना शासनाच्या आस्थापनेवरुन औरंगाबाद महानगरपालिकाच्या आस्थापनेवर समाविष्ट करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११४/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी सेवा भरती नियमामध्ये उपआयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी मनपामध्ये येत असल्यास उपजिल्हाधिकारी संवर्गातून तो अधिकारी असावा अशी तरतूद आहे. तथापि बहुतांशी वेळा उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी उपलब्ध होत नाहीत. परिणामी बऱ्याच कालावधीपर्यंत महानगरपालिकेस प्रतिनियुक्तीने सक्षम अधिकारी मिळत नाही. करिता सेवा भरती नियमामध्ये उपआयुक्त पदास प्रतिनियुक्तीने अधिकारी असल्यास संवर्गातून अधिकारी असावा, अशी तरतूद करण्यात यावी. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**सुचक :** अविनाश कुमावत,
**अनुमोदक :** गौतम लांडगे.

**ठराव क्र.११४/२ :**

महानगरपालिका औरंगाबादचे सेवा भरती नियमातील तरतूदीनुसार उपआयुक्त पदाच्या नेमणुकीच्या पात्रतेमध्ये

"(क) : शासनाच्या महसुल विभागातील उपजिल्हाधिकारी पदाच्या संवर्गातील अनुभवी अधिकाऱ्यास प्रतिनियुक्तीवर घेऊन" अशी तरतूद आहे. त्याऐवजी -

"(क) : शासनाच्या महसुल विभागातील उपजिल्हाधिकारी संवर्गाचे अथवा इतर संवर्गातील समकक्ष (तत्सम) अनुभवी अधिकाऱ्यास "प्रतिनियुक्तीवर घेऊन"

अशी तरतूद करण्यास सर्वानुमते या ठरावाद्वारे मान्यता देण्यांत येते. सदरचा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११५/३ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, शासन निर्णय क्रमांक जीईएन/१०९०७/प्र.क्र.-२६७/९७, नवी-२४, मंत्रालय, मुंबई, दि.१४ जुलै १९९८ प्रमाणे राज्यातील महानगरपालिका कर्मचारी यांना बोनस वाटप करणे बाबत काही मार्ग दर्शक तत्वे दिली आहेत.

१. ज्यात प्रामुख्याने बोनसची मर्यादा रु.२५००/- पर्यंत कोणीही कायदेशीर देणी तहकुब न करता शासन निर्णय वित्त विभाग क्र.बोनस/१९९७/९२/सेवा-९, दि.१५.१०.९७ अन्वये पालन करणे बंधनकारक आहे. ज्या महानगरपालिकांना व त्यांच्या उपक्रमांना बोनस अधिनियम १९६५ च्या तरतूदीनुसार लागू आहे. अशा उपक्रमांनी या कायद्यानुसार देय असलेल्या प्रमाणे कर्मचाऱ्यांना बोनस मंजूर करावा.

२. शासन निर्णय क्र.बोनस/२२९८/१४, सेवा-९, दि.२९ सप्टेंबर १९९८ प्रमाणे
अ) जा.क्र./मनपा/मआ/स्वीस/९८/४९५, दि.१३.१०.९८ प्रमाणे वरील क्रमांक १ प्रमायो मार्गदर्शक तत्वाचा विचार करुन मनपा कर्मचाऱ्यांना सन १९९७-९८ करीता ३० दिवसाचा बोनस देण्याची प्रशासनाची तयार होती. तथापि, कर्मचारी संघटना यांनी सदर बाब फेटाळून निदर्शने व काम बंदची हाक दिलेली होती. त्याकरिता त्याच सोबत वाटाघाटी करुन खालील निर्णय घेण्यात आले.

३. दि.१४.१०.९८ रोजी मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली दुपारी २.०० वाजता बैठक होऊन त्यात खालीलनुसार निर्णय घेण्यात आले.
१) बोनस ३० दिवसाचे ऐवजी ३६ दिवसांचा मंजूर करण्यांत आला ज्यांत वाढीव ६ दिवसांचा बोनस शासनाचे मंजूरी करता पाठविण्यांत येईल, दोन महिन्यात शासनाची मंजूरी प्राप्त न झाल्यास कर्मचारी यांचे मासिक पगारातून कपात करण्यात येईल या अटीवर संघटना पदाधिकारी/मनपा पदाधिकारी व आयुक्त यांची सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.
२) दैनिक वेतन कर्मचारी, ठराविक वेतनावरील कर्मचारी, बालवाडी शिक्षीका यांना दिवाळी भेट म्हणून ९००/- रु.प्रत्येकी देण्याचे मान्य करण्यात आले. तथापि, ३१ ऑक्टोंबर ९७ रोजी दैनिक वेतन कर्मचारी सेवेत होते व त्याची १८० दिवस सेवा झाली आहे. अशा कर्मचाऱ्यांना ही भेट देण्यात येईल.
३) दैनिक वेतनावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना पगार दिवाळीपुर्वी देण्यात यावा.
४) ३६ दिवसांचा बोनस मनपा कर्मचाऱ्यांना देण्याकरिता ९० लक्ष रुपये खर्च अपेक्षित आहे.
५) दैनिक वेतन/ठराविक वेतन/बालवाडी शिक्षीका यांना दिवाळी भेट प्रत्येकी रुपये ९००/- प्रमाणे देणेस्तव रु.९० लक्ष खर्च अपेक्षित आहे. अंदाजपत्रकामध्ये या बाबी करिता रु.९९ लक्षाची आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे.
करिता प्रस्तावित नुसार मान्यतेस्व प्रस्ताव विचारार्थ सादर

**ठराव क्र.११५/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय क्र.जीईएन-१०९७/प्र.क्र.२६७/९७, नवी-२४, मंत्रालय मुंबई दि.१४.०६.९८ च्या मार्गदर्शक तत्वाआधारे औरंगाबाद महानगरपालिकाच्या कर्मचाऱ्यांना ३० दिवसांचा बोनस देतांना कर्मचारी संघटने बरोबर झालेल्या वाटाघाटी अन्वये

अ.क्र.१ ते ५ अटीनुसार ३६ दिवसांचा बोनस कर्मचाऱ्यांना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

१. बोनस ३० दिवसाचे ऐवजी ३६ दिवसांचा मंजूर करण्यांत आला ज्यांत वाढीव ६ दिवसांचा बोनस शासनाचे मंजूरी करता पाठविण्यांत येईल, दोन महिन्यात शासनाची मंजूरी प्राप्त न झाल्यास कर्मचारी यांचे मासिक पगारातून कपात करण्यात येईल या अटीवर संघटना पदाधिकारी/मनपा पदाधिकारी व आयुक्त यांची सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

२) दैनिक वेतन कर्मचारी, ठराविक वेतनावरील कर्मचारी, बालवाडी शिक्षीका यांना दिवाळी भेट म्हणून ९००/- रु.प्रत्येकी देण्याचे मान्य करण्यात आले. तथापि, ३१ ऑक्टोंबर ९७ रोजी दैनिक वेतन कर्मचारी सेवेत होते व त्याची १८० दिवस सेवा झाली आहे. अशा कर्मचाऱ्यांना ही भेट देण्यात येईल.

३) दैनिक वेतनावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना पगार दिवाळीपुर्वी देण्यात यावा.

४) ३६ दिवसांचा बोनस मनपा कर्मचाऱ्यांना देण्याकरिता ९० लक्ष रुपये खर्च अपेक्षित आहे.

५) दैनिक वेतन/ठराविक वेतन/बालवाडी शिक्षीका यांना दिवाळी भेट प्रत्येकी रुपये ९००/- प्रमाणे देणेस्तव रु.९० लक्ष खर्च अपेक्षित आहे. अंदाजपत्रकामध्ये या बाबी करिता रु.९९ लक्षाची आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे.

सदर प्रस्तावास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.महापौर :** आजची सभा तहकूब करुन २७ ऑक्टोंबर ९८ रोजी आयोजित करण्यात येईल.

यांनतर "जग,गण,मन" या राष्ट्रगीताने आजची सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दि.२७.१०.९८ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दि.१७.१०.९८ रोजी गणपुर्ती अभावी तहकुब करण्यांत आलेली सर्वसाधारण सभा मंगळवार दि.२७ ऑक्टोंबर ९८ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.महापौर सौ.शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात "वंदेमातरम्" या गीताने सुरुवात झाली. गणपुर्ती अभावी आजची सभा ००.३० मिनीटे तहकुब करण्यांत येत असल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले. तहकुब करण्यांत आलेल्या सभेस ठीक ११.४५ वाजता पुन्हा सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | सभासद |
| २. | स.स.सौ. लोखंडे रुख्मणबाई खंडेराव | - | सभासद |
| ३. | स.स.श्री. म.सलीम म.हनिफ | - | सभासद |
| ४. | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | - | सभासद |
| ५. | स.स.श्री. ॲड.गणेश किशनराव वानखेडे | - | सभासद |
| ६. | स.स.सौ. उषाबाई दिलीप गायकवाड | - | सभासद |
| ७. | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | - | सभासद |
| ८. | स.स.श्री. गौतम लिंबाजी लांडगे | - | सभासद |
| ९. | स.स.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | - | सभासद |
| १०. | स.स.श्री. नरेंद्र यादवराव पाटील | - | सभासद |
| ११. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | सभासद |
| १२. | स.स.श्री. सुदाम रामदास सोनवणे | - | सभासद |
| १३. | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | - | सभासद |
| १४. | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ | - | सभासद |
| १५. | स.स.सौ. फरहद बानो भ्र.मो.नवाज | - | सभासद |
| १६. | स.स.श्री. फजलउल्लाखॉन उजमतउल्लाखॉन | - | सभासद |
| १७. | स.स.श्री. अजीज खॉन गणी खॉन | - | सभासद |
| १८. | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | - | सभासद |
| १९. | स.स.श्रीमती नुरजहॉं बेगम अ.रहेमान | - | सभासद |
| २०. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | सभासद |
| २१. | स.स.श्री. हाजी मोहसिन अहेमद, हाजी बशिर अहेमद | - | सभासद |
| २२. | स.स.सौ. मोहसीना बिल्कीस विखरोद्दीन | - | सभासद |
| २३. | स.स.श्री. अ.जावेद रज्जाक | - | सभासद |
| २४. | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | - | सभासद |
| २५. | स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | - | सभासद |
| २६. | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | - | सभासद |
| २७. | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | - | सभासद |
| २८. | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा फसीयोद्दीन | - | सभासद |
| २९. | स.स.श्री. म.अ.रऊफ म.अ.माबुद | - | सभासद |
| ३०. | स.स.श्री. स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | सभासद |
| ३१. | स.स.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | - | सभासद |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | सभासद |
| ३३. | स.स.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | - | सभासद |
| ३४. | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | - | सभासद |
| ३५. | स.स.श्रीमती अल्का रमेश पाटील | - | सभासद |
| ३६. | स.स.सौ. धांडे शकुंतला हरीदास | - | सभासद |
| ३७. | स.स.श्री. अब्दुल रशीद खॉन (मामू) | - | सभासद |
| ३८. | स.स.कु. माया लिंबाजी लाडवाणी | - | सभासद |
| ३९. | स.स.सौ. आव्हाड सविता संजय | - | सभासद |
| ४०. | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | - | सभासद |
| ४१. | स.स.श्री. अब्दुल रशिद अ.सत्तार | - | सभासद |
| ४२. | स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | - | सभासद |
| ४३. | स.स.सौ. जोत्सना हिवराळे | - | सभासद |
| ४४. | स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | - | सभासद |
| ४५. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | सभासद |
| ४६. | स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | - | सभासद |
| ४७. | स.स.श्री. विठ्ठल किसन जाधव | - | सभासद |
| ४८. | स.स.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | - | सभासद |
| ५०. | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | - | सभासद |

स.विद्यमान नगरसेवक श्री. महंमद मुश्ताक यांच्या पत्नी पै.आसेना बेगम तसेच नगरसेवक श्री.जावेद रज्जाक यांचे व्याही पै.पाशाबाई ढाबेवाले यांच्या दु:खद निधन निमित्त ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करावी.

**सुचक :** श्री.अ.रशिद खॉन (मामू)

**अनुमोदक :** श्री.हमीदोद्दीन ताबा.

**संवाद :**

**मा.महापौर :** आजची सभा सभागृहातील प्रत्यक्ष गणपुर्वी अभावी तहकूब करण्यांत येत असून ५ नोव्हेंबर ९८ रोजी आयोजित करण्यांत येईल.

**श्री.हमीद ताबा :** दोन वेळेस सभा तहकूब करण्यांत येऊन तिसऱ्यांदा घेण्यात येईल. याबाबत काही नियमावली आहे काय?

**मा.महापौर :** नगरसचिव यांनी या बाबत खुलासा करावा.

**नगरसचिव :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि प्रकरण-२ चे सभा कामकाज नियमावली नियम क्र.१ (फ) ला अधिन राहून सभा घेता येते.

(नियम वाचुन दाखविण्यांत आला.)

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.रशिद खॉन (मामू) :** आजच्या सभेत असलेले ऐनवेळचे विषय पुढील बैठकीत मंजूर करण्यांत यावे.

**मा.महापौर :** चर्चेनुसार मंजूरी देण्यांत येईल. व सभागृहातील प्रत्यक्ष गणपुर्ती अभावी आजची सभा तहकूब करण्यांत येते. तहकूब केलेली सभा दि.५ नोव्हेंबरला घेण्यांत येईल.

याच बरोबर "जन-गण-मन" या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दि.०५.११.९८ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दि.२७.१०.९८ रोजी तहकुब करण्यांत आलेली सभा गुरुवार दि.०५ नोव्हेंबर ९८ रोजी सकाळी ११.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मा.महापौर सौ.शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात "वंदेमातरम्" या गीताने सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.डॉ. श्री.कराड भागवत किसनराव | - | मा.उपमहापौर |
| २. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | सभासद |
| ३. | स.स.श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत | - | सभासद |
| ४. | स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन | - | सभासद |
| ५. | स.स.सौ. लोखंडे रुख्मणबाई खंडेराव | - | सभासद |
| ६. | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | - | सभासद |
| ७. | स.स.श्री. म.सलीम म.हनिफ | - | सभासद |
| ८. | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | - | सभासद |
| ९. | स.स.सौ. रजनी रमेश जोशी | - | सभासद |
| १०. | स.स.सौ. उषाबाई दिलीप गायकवाड | - | सभासद |
| ११. | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | - | सभासद |
| १२. | स.स.श्री. गौतम लिंबाजी लांडगे | - | सभासद |
| १३. | स.स.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | - | सभासद |
| १४. | स.स.श्री. नरेंद्र यादवराव पाटील | - | सभासद |
| १५. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | सभासद |
| १६. | स.स.श्री. सुदाम रामदास सोनवणे | - | सभासद |
| १७. | स.स.सौ. पदमा बाबुराव शिंदे | - | सभासद |
| १८. | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | - | सभासद |
| १९. | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | - | सभासद |
| २०. | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ | - | सभासद |
| २१. | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | - | सभासद |
| २२. | स.स.सौ. फरहद बानो भ्र.मो.नवाज | - | सभासद |
| २३. | स.स.श्री. फजलउल्लाखॉन उजमतउल्लाखॉन | - | सभासद |
| २४. | स.स.श्री. अजीज खॉन गणी खॉन | - | सभासद |
| २५. | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | - | सभासद |
| २६. | स.स.श्रीमती नुरजहॉं बेगम अ.रहेमान | - | सभासद |
| २७. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | सभासद |
| २८. | स.स.श्री. हाजी मोहसिन अहेमद, हाजी बशिर अहेमद | - | सभासद |
| २९. | स.स.श्री. मुजीब आलमशाह मीर आलमशाह | - | सभासद |
| ३०. | स.स.सौ. मोहसीना बिल्कीस विखरोद्दीन | - | सभासद |
| ३१. | स.स.श्री. अ.जावेद रज्जाक | - | सभासद |
| ३२. | स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | - | सभासद |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३. | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | - | सभासद |
| ३४. | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | - | सभासद |
| ३५. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | - | सभासद |
| ३६. | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा फसीयोद्दीन | - | सभासद |
| ३७. | स.स.श्री. म.अ.रऊफ म.अ.माबुद | - | सभासद |
| ३८. | स.स.श्री. स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | सभासद |
| ३९. | स.स.श्री. ॲड गणेश वानखेडे | - | सभासद |
| ४०. | स.स.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | - | सभासद |
| ४१. | स.स.श्री. सय्यद अली मिरा सलामी | - | सभासद |
| ४२. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | सभासद |
| ४३. | स.स.श्री. संजय कि. केनेकर | - | सभासद |
| ४४. | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | - | सभासद |
| ४५. | स.स.श्रीमती अल्का रमेश पाटील | - | सभासद |
| ४६. | स.स.सौ. धांडे शकुंतला हरीदास | - | सभासद |
| ४७. | स.स.श्री. अब्दुल रशीद खॉन (मामू) | - | सभासद |
| ४८. | स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह | - | सभासद |
| ४९. | स.स.सौ. आव्हाड सविता संजय | - | सभासद |
| ५०. | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | - | सभासद |
| ५१. | स.स.श्री. अब्दुल रशिद अ.सत्तार | - | सभासद |
| ५२. | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | - | सभासद |
| ५३. | स.स.श्री. विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | - | सभासद |
| ५४. | स.स.श्री. गजानन बारवाल | - | सभासद |
| ५५. | स.स.श्री. मनमोहनसिंग क.ओबेरॉय | - | सभासद |
| ५६. | स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | - | सभासद |
| ५७. | स.स.श्री. संजय रामदास जोशी | - | सभासद |
| ५८. | स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | - | सभासद |
| ५९. | स.स.सौ. जोत्सना हिवराळे | - | सभासद |
| ६०. | स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | - | सभासद |
| ६१. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | सभासद |
| ६२. | स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | - | सभासद |
| ६३. | स.स.सौ. काळुसे मंदा धनंजय | - | सभासद |
| ६४. | स.स.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | - | सभासद |
| ६५. | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | - | सभासद |
| ६६. | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | - | सभासद |

**संवाद :**

**श्री.रशिद खॉन (मामू) :** दि.१७.१०.९८ च्या सर्वसाधारण सभेत कोणते प्रस्ताव मंजूर करण्यांत आले. त्याची माहिती द्यावी.

**मा.महापौर :** सदर सभेत ऐनवेळचे १) श्री.चौथाई यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर घेण्याबाबतचा, २) उपआयुक्त (म.) यांना उपजिल्हाधिकारी संवर्गात बाबतचा दर्जा देणे. ३) महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना ३६ दिवसांचा बोनस देण्याबाबत प्रस्तावास मंजूरी देण्यात आलेली आहे.

**श्री. रशिद खॉन (मामू) :** सचिव यांनी माहिती द्यावी. नगर सचिव यांनी सभागृहात ऐनवेळचे मंजूर केलेले विषय वाचून दाखवलेले होते. तशी स.सदस्यांनी कॅसेट पडताळणी करावी.

**नगरसचिव :** सभागृहात मा.महापौर यांनी सुचना केल्याप्रमाणे सदर प्रस्ताव वाचुन दाखवल्यानंतर मंजूर करण्यांत आलेले आहे.

**श्री.रशिद खॉन (मामू) :** नगरसचिव यांनी सदर प्रस्ताव सभागृहात वाचुन दाखवलेले नाही. सभागृहात मोठमोठ्याने बोलणे चालु असतांना व त्यास सभागृहाची मंजूरी नसतांना प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले आहेत. सदर सभेस श्री.चौथाई यांना आस्थापनेवर घेण्याबाबतचा व उपआयुक्त (म.) यांना उपजिल्हाधिकारी या संवर्गात दर्जा देण्याबाबतचा प्रस्तावास मंजूरी मिळालेली नाही. फक्त महानगरपालिकातील कर्मचाऱ्यांबाबतचा जो बोनसचा प्रस्ताव होतो त्यास मंजूरी दिलेली आहे. ज्या दोन प्रस्तावास मंजूरी देऊन शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यांत आलेले आहे. त्यात सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. सदर प्रस्तावास स्विकृती न देता शासनाकडे कसे पाठवले.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** १७.१०.९८ च्या सर्वसाधारण सभेस मा.महापौर यांनी नगरसचिव यांना सदर प्रस्ताव वाचून दाखविण्याबाबत सुचना केल्यानंतर नगर सचिव यांनी प्रस्ताव वाचुन दाखविले व सभागृहाने मंजूरी दिलेली आहे. विनाकारण त्या विषयावर चर्चा करु नये. प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे. तसे वर्तमान पत्रातही छापून आलेले आहे.

**श्री.नरेंद्र पाटील :** सभागृहात यापुर्वीही असे बरेचशे ऐनवेळी प्रस्ताव येऊन मंजूरी दिलेली आहे. स.सदस्यांना या बाबतीत काही पुर्व माहिती नसते. त्यामुळे स.सदस्य श्री.रशिद खॉन (मामू) यांनी सुचित केल्याप्रमाणे ज्या दोन प्रस्तावास मंजूरी देण्यात आलेली आहे. ती योग्य नाही.

**श्री.अविनाश कुमावत :** मागील बैठकीत झालेल्या विषयावर चर्चा करु नये. विषय क्र.१ वर चर्चा करावी.

**श्री.नरेंद्र पाटील :** गेल्या दोन महिन्यापुर्वी महापालिका प्रशासनाकडून/नगरसेवक/नगरसेविका कक्ष व पत्रकार कक्ष कार्यालयीन कामासाठी ताब्यात घेतलेले आहे. सध्या त्या ठिकाणी महानगरपालिकेतील अधिकारी वर्ग कार्यालयीन कामे करतात. स.सदस्यांना बाहेर कुठे तरी बसावे लागते. या महानगरपालिकामध्ये स.सदस्यांचे अस्तित्व कोठे आहे. असे प्रशासनाला विचारण्याची वेळ आलेली आहे. स.सदस्यांना बसण्यासाठी कक्ष देण्यांबाबत मा.आयुक्तांनाही सुचित केलेले होते. परंतू तशी कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे मला मानसिक त्रास झालेला आहे. एक वेळेला मा.स्थायी समितीची सभा चालू असतांना मला पत्रकार कक्षात पत्रकार परिषद घ्यावी लागली. त्यावेळेस मला स्थायी समितीचे सभापती यांनी आपण पत्रकार कक्षात असे बसलात. कृपया आपण बाहेर जावे असे बोलून अपमानित केले व मी तसाच बाहेर आलो होतो. तरी प्रशासनाने स.सदस्य/सदस्या यांना बसविण्यासाठी कक्ष उपलब्ध करुन देण्याबाबतचे आदेश मा.महापौरांनी द्यावे व तशी व्यवस्था लवकरच होईल, याची कार्यवाही करावी.

**श्री.जयवंत ओक :** स.सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी जो प्रश्न उपस्थित केला. तो बरोबर असून स.सदस्यांना महापालिकेत आल्यानंतर बसण्यासाठी कक्ष पाहिजे यास मी सहमत आहे. स.सदस्यांच्या कक्षात महानगरपालिका प्रशासनाचे काही

कार्यालये झालेली आहे. मागे एक महिन्यापुर्वी सर्व्हे केलेला होता. त्यात अति.शहर अभियंता यांनी स.सदस्यांना बसण्यासाठी तात्काळ कक्ष उपलब्ध करुन द्यावा. असे ठरले होते. स.सदस्य यांनी स्थायी समितीचे चेअरमन यांनी मला अपमानित केले असे म्हणणे चुकीचे आहे. स्थायी समितीची सभा चालू असतांना मागे श्री.रशिद खॉन (मामू) व श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी माझी परवानगी मागितली होती. परंतू, श्री.नरेंद्र पाटील यांनी सभा चालु असतांना पत्रकार कक्षातत येऊन पत्रकार परिषद घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी स.सदस्य यांना आपण सभागृहात येण्याची परवानगी घेतलेली नाही. कृपया आपण सभागृहाबाहेर जावे. अशी विनंती केली. यात उपमानित केले असा त्यांचा अर्थ होत नाही. मा.महापौर यांनी संबंधित अधिकारी यांना तात्काळ स.सदस्य यांना कक्ष उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्याचे आदेश द्यावे.

**श्री.नरेंद्र पाटील :** स.सदस्य श्री.जयवंत ओक यांनी माझ्या विनंतीला जो दुजोरा दिला त्याबद्दल मी धन्यवाद मानतो.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** गेल्या दि.२७.१०.९८ च्या बैठकीत एक निवेदन दिलेले होते. त्याची प्रत मा.आयुक्त, उपआयुक्त, अतिक्रमण हटाव पथक यांना हे निविदन दिलेले होते. नारेगांव येथे १२ वर्षापासून जे रस्त्यावर नसुन स्वतःच्या जागेत एन.ए.ले.आऊटच्या आत एका व्यक्तीने तीन दुकाने केलेली आहे. त्यावेळेस महानगरपालिकाही अस्तित्वात नव्हती. गेल्या ८ वर्षापासून महानगरपालिकेने त्या व्यक्तीला टॅक्स पण लावलेला आहे. केवळ ९० फुटाचा रोड आहे. असे म्हणून ते केलेले बांधकाम तोडण्यात आले आहे. खरोखरच ते बांधकाम तोंडणे आवश्यक होते का? ज्यावेळेस महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिलेली आहे. त्यावेळेस गोडाऊन बांधकाम परवानगी दिली होती. महानगरपालिका अस्तित्वात येण्यापुर्वी त्या व्यक्तीने एन.ए.ले.आऊटच्या बाजुला असलेल्या नाल्यामध्ये स्वतःचा खर्चाने ९०० एम.एम.पाईप टाकून त्या ठिकाणी जागा केलेली होती. त्यांच्याच बाजुला हे गोडाऊन होते. जर महापालिकेला ९० फुटाचा रोडच पाहिजे असेल तर रोडवर येणारे सर्व अतिक्रमण असलेले महानगरपालिकेने पाडणे आवश्यक होते. परंतू हेतूपुरस्पर एखाद्या व्यक्तीनेचे सांगण्यावरुन, अमिष दाखवून महानगरपालिकेची परवानगी असतांना असे बांधकाम पाडणे कुणाच्या सांगण्यावरुन तोडावयाचे का? नारेगांव हा रस्ता जळगांवचा जो रस्ता आहे त्याप्रमाणे अस्तित्वात आहे. त्याच रस्त्यावर एक अभ्यासिका केंद्र अस्तित्वात आहे. या अभ्यासिका केंद्रांच्या उद्घाटनला अधिकारी सुध्दा आले होते. त्यालगत असणाऱ्या उद्यान समोर एक दुकान धारक मटन विक्रीचा व्यवसाय करतो. सदर दुकान धारकाकडे महानगरपालिकेची परवानगी नसतांना महानगरपालिकेच्या जागेवर रजिष्ट्री करुन घेतलेले दाखवुन मटन विक्री करतो. याकडे अधिकारी यांची डोळेझाक होते आहे. सदर रजिष्ट्री केलेली बरोबर आहे काय? महानगरपालिकेने संबंधित व्यक्तीला महानगरपालिकेच्या जागेवर मटन दुकानासाठी परवानगी दिली आहे. याची शहानिशा करावी. एकीकडे १२ वर्षाचे अतिक्रमणे पाडतात व एकीकडे महानगरपालिकेच्या हद्दीत असणाऱ्या जागेवर परवानगी देता हे कसे काय? याच लगत उद्यानाच्या बाजुला काही अनाधिकृत घरे आहेत. त्या घराचे बांधकाम

महानगरपालिकेच्या ड्रेनेज लाईनच्या वर झालेली आहेत. जे बांधकाम परवानगीने केलेले होते. ते पाडण्यांत येऊन जे नुकसान झालेले आहे. ते नुकसान अधिकारी यांचेकडुन भरपाई म्हणून वसुल करावे. या बाबत त्या व्यक्तीने ४ लाख रुपये नुकसान भरपाई मागविलेली आहे. ती देण्यांत यावी.

**श्री.अविनाश कुमावत :** स.सदस्य यांनी जी सुचना मांडली त्यास मी सहमत असून या ९० फुटाच्या रस्त्यावर आणखी काही अतिक्रमणे झालेली असेल ती तात्काळ पाडण्यात यावी.

**मा.महापौर :** अतिक्रमण हटाव मोहीम महापालिकेने सुरु केलेली आहे. एकीकडे बांधकाम परवानगी देऊन बांधकाम होत असेल व दुसरीकडे परवानगी असलेले बांधकाम तोडण्यात येत असेल तर प्रशासनाने संबंधित अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी.

**श्री.रशिद खॉन (मामू) :** टपरी कमिटीचा अहवाल अद्याप पर्यंत सभागृहात सादर केलेला नाही. खुलासा करावा.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उपआयुक्त (म) :** सर्वसाधारण सभेच्या निर्णयाप्रमाणे टपरी समिती संदर्भात एक पदाधिकारी यांची समिती व एक प्रशासकीय समिती गठण केली होती. त्यास प्रशासकीय समितीची एक बैठक झालेली आहे. दिनांक ०६.११.९८ पर्यंत सदर अहवाल सादर करण्यास मा.महापौर यांनी सुचित केले आहे. पदाधिकारी समितीकडे अहवाल देतांना बैठकीमध्ये चर्चा करुन तो सादर करण्यांत येईल.

**श्री.हमीयोद्दीन ताबा :** टपरी कमेटी गठीत करुन ४ ते ५ महिने झाले ८ दिवसात अहवाल देणार आहे, असे आश्वासन दिले होते. १२ जून नुसार अहवाल सभागृहात का सादर करण्यांत आला नाही, याची माहिती द्यावी.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी पुन्हा सविस्तर खुलासा करावा.

**उपआयुक्त (म) :** १२ जुनच्या निर्णयानुसार जुलै मध्ये सदर प्रस्तावास कन्स्टफॉरमेशन करण्यात आला. सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन त्यात काही सुधारणा करुन जो अहवाल तयार केला. त्यात टपरी धारकांची एक यादीच तयार केलेली आहे. त्यांचेकडुन पुन्हा अर्ज मागविलेले आहे. १९९५-९६ पुर्वीच्या ज्या टपऱ्या आहेत. त्यांना कायम करावयाचे असून त्यात १३७० टपऱ्यात समावेश होत आहे. परंतू, ज्या टपऱ्या ५-६ वर्षापासून बसलेल्या आहेत. जे की, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्या संदर्भात समिती निर्णय घेणार आहे. व दि.०६.११.९८ च्या नुसार अहवाल पदाधिकाऱ्यांच्या समितीकडे सादर करणार आहे.

**श्री.अफसर खॉन :** शहरातील एकूण टपऱ्या १३७० असून नंतरच्या ज्या टपऱ्या बसलेल्या आहेत. त्या बाबत प्रशासनाकडे योग्य ती माहिती आहे का? सदर टपऱ्या का उठविण्यांत आलेल्या आहेत. याची माहिती द्यावी.

**उपआयुक्त (म) :** टपरी समितीच्या अहवालात ज्यांची नावे नाहीत. ज्या अस्तित्वात नाहीत. ज्या स.सभासदांच्या शिफारशीनुसार ज्यांना टपऱ्या दिलेल्या आहेत. त्याची यादी तयार करुन त्यात ज्यांची नावे नाहीत. त्यांच्या टपऱ्या उठविण्यांत आलेल्या आहे.

**श्री.अफसर खॉन :** १३७० टपऱ्या व्यतिरिक्त व नावे नसलेल्या अशा किती टपऱ्या आहेत. प्रशासनाकडे १३७० टपऱ्यांची यादी आहेत का? माझ्याकडे १४७० टपऱ्यांची

यादी आहेत. ज्यात १०० टपऱ्या तफावत येत आहे. त्या का काढण्यांत आल्या नाहीत. चुकीची माहिती प्रशासनाकडे असनू १०० टपऱ्या का उठविण्यांत आल्या नाहीत. शहाबाजार येथील टपऱ्या का काढण्यात आल्या याची माहिती द्यावी.

**उपआयुक्त (म) :** हा ऐनवेळचा विषय असल्यामुळे या बाबत सविस्तर माहिती घेऊन खुलासा करण्यांत येईल.

**मा.महापौर :** हा ऐनवेळचा विषय आहे. टपरी संदर्भात उद्या माझ्या दालनात याबाबत बैठक आयोजित केलेली आहे. त्यात चर्चेनुसार निर्णय घेण्यात येईल.

**श्री.नरेंद्र पाटील :** ३ वर्षाचा कालावधी निघुन गेलेला आहे. कोणतेही काम व्यवस्थित होत नाही. व कार्यवाही होत नाही. आमचा कालावधी संपल्यानंतर कार्यवाही करावयाची आहे काय?

**श्री.अ.जावेद रज्जाक :** १५ दिवसांत ज्या टपऱ्या देणार होते त्या देण्यांत याव्या असे आमचे म्हणणे आहे.

**श्री.हमीद ताबा, श्रीमती मोहसीना बिल्कीस :** माझ्या वार्डात ८ ते १० टपऱ्या उचलण्यात आलेल्या आहेत. ज्या टपऱ्या उठविण्यांत आलेल्या आहेत. त्या गरीब लोकांच्या आहेत. ज्या काढण्यांत आलेल्या आहेत. त्या पुन्हा बसविण्यास मी सांगणार आहे. १० ते १२ वर्षापासून ज्या जुन्या टपऱ्या बऱ्याच दिवसापासून पडून होत्या त्या टपऱ्या आहे त्याच अवस्थेत आहे. त्यापैकी फक्त ३-४ टपऱ्या उचलण्यात आलेल्या आहेत. जुन्या पासून असलेल्या टपऱ्या का काढण्यांत आल्या नाही.

**मा.महापौर :** टपरी समितीची संदर्भात उद्या बैठक आहे. त्यात हा विषय घेण्यांत येईल. ज्या ज्या स.सदस्यांच्या टपरी बाबत अडी अडचणी असतील. त्यांनी लेटरहेड वर तसे लेखी देऊन उद्याच्या होणाऱ्या बैठकीत अधिकारी यांना त्या संदर्भात माहिती द्यावी. म्हणजे टपरीचा प्रश्न सोडविण्यास मदत होईल.

**श्री.जावेद रज्जाक :** मागील बैठकीत पाणीपट्टीवर चर्चा होणार होती. परंतू ती झाली नाही. त्याचप्रमाणे टपरी बाबत होऊ शकते. माझे असे म्हणणे असे की, स.सदस्यांना सभागृहात बोलावून घ्यावे. व टपरी बाबत चर्चा करुन निर्णय घ्यावा.

**सौ.पदमा शिंदे :** माझ्या वार्डात शॉपिंग सेंटर बांधावयाचे आहे. संबंधित अधिकारी हयांना प्रत्यक्ष भेटून व लेखी पत्र देऊनही कार्यवाही होत नाही. शॉपींग सेंटरसाठी अनामत रक्कमेची मागणी केली जात आहे. अनामत रक्कम न घेता टपऱ्या बसवल्या येतील. तसे करावयाचे असल्यास एका दिवसात टपरी मार्केट बसविले जाईल. शॉपिंग सेंटर बांधण्यासाठी ३ १/२ वर्षापासून अंदाजपत्रक तयार करण्यांत बाबतची कार्यवाही चालू आहे.

**मा.महापौर :** कोणत्या कारणामुळे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले नाही. याची संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** सिडको भागात जे ओपन स्पेस आहेत. ते महानगरपालिकेने म्हाडा कडून ताब्यात घेतलेले आहे. त्या खुल्या जागेवर दुकाने करता येणार नाही. तसा नियम आहे. तरीसुध्दा मा.आयुक्तांनी या बाबतीत लक्ष देऊन कमीत कमी १०% दुकाने त्या जागेवर होतील अशी कार्यवाही करावी. अशा सुचना दिल्या आहेत. त्या ठिकाणी व्यावसायिकांना दुकाने चालतील किंवा नाही याबाबत वर्तमानपत्रात जाहीरात देवून पाहावे लागेल.

**सौ.पदमा शिंदे :** पुढच्या महिन्यात अंदाजपत्रक तयार करण्यात आले तर ठिक आहे. नसता मी स्वत:हून टपऱ्या बसविणार आहे.

**मा.महापौर :** मा.आयुक्तांनी याबाबत लवकर लवकर कार्यवाही करावी.

**श्री.गौतम खरात :** चालू आर्थिक वर्षाचे ६ महिने संपलेले आहेत. या वर्षाचे दिवाळी गेली, दसरा गेला महानगरपालिकेने जे या वर्षाचे बजेट ठेवलेले होते. त्यात जकात बाबत गेल्या दोन महिन्यांत ७० लाखाची घट झालेली आहे. या दोन महिन्याच्या कालावधीत दसरा, दिवाळी या सणानिमित्त बराचसा माल या शहरात येतो. संबंधित अधिकारी सांगतात की, बऱ्याच कंपन्या बंद आहे. परंतू २५% कंपन्या बंद असतील. शहरात येणाऱ्या मालाचे जकात कमी वसुल झाली याचे कारण काय, ७० लाख रुपयाची घट कशी आली. व यास कोण दोषी असेल तर त्यांच्यावर कार्यवाही करावी. तसेच पाणीपट्टी रु.३.५० कोटी वसुल व्हावयास पाहिजे. ती रु.१.५० कोटी वसुल झालेली आहे. मालमत्ता कराची ही १५% च्या वर वसुली झालेली नाही. त्यास जबाबदार कोण खऱ्या अर्थाने महानगरपालिकेचे उत्पन्न जकात करातून मिळते. त्याची घट होत असेल तर विकासाची कामे कशी होणार. नागरिकांची व स.सदस्यांची विकास करण्याबाबत तक्रारी असतात. यावर चर्चा झाली पाहिजे. शहराचा विकास करण्यासाठी कितीदा शासनाच्या अनुदानाची वाट पहात बसावी. नेहमी अनुदान मागण्याची प्रक्रिया या महापालिकेची चालू आहे. महापालिकाने स्वत:च्या उत्पन्नात शहरातील विकासाची कामे करावयास पाहिजे. स्वावलंबी व्हावयास पाहिजे.

**श्री.संजय जोशी :** योग्य जकात होणे अत्यंत गरजेचे आहे. शहरातील कोणतीही विकास कामे करण्याबाबत लवकर कार्यवाही होत नाही. बजेट नाही असे नेहमी अधिकारी सांगतात. अर्थसंकल्पात जी रक्कम वसुली होण्याबाबत ठरविली जाते. ती जमा व्हावयास पाहिजे. दिवाळीच्या सणानिमित्ताने शहरात ५० ते ६० लक्ष रुपये चे कपडे आयात झालेले आहेत. त्याचबरोबर सुकामेवा, शोभेच्या वस्तु यांचे सेल लागलेले आहे. लाखो रुपयांच्या वस्तु शहरात येऊनही जकात त्या प्रमाणात वसुल व्हावयास पाहिजे होती. ती झाली नाही. जकात विभागाला अत्याधुनिक वाहने दिली गेली आहेत. वायरलेस सेट देण्यांत आलेले आहेत. हे कशासाठी असे असतांना जकात कमी कशी येते. नेहमी शासनाकडे अनुदानाची मागणी करावी लागते.

**श्री. सुदाम सोनवणे :** जकात वसुली ७० लक्ष रुपयांनी कमी झाली यास जबाबदार कोण? दिवाळी सारख्या सणाच्या निमित्ताने शहरात ४ चाकी वाहने, २ चाकी वाहने आयात झालेली आहे. यातून शहरातील नागरिकांना ४ चाकी वाहने २०० च्यावर खरेदी करण्यांत आलेली आहेत. तर दोन चाकी वाहने ३५० खरेदी करण्यांतत आलेली आहेत. तसेच ३ कोटी फटाके या वर्षी शहरात आलेले आहेत. प्रत्येक वाहनावर ४% जकात धरल्यास जकात वसुलीत वाढ व्हावयास पाहिजे होती ती का झाली नाही. पुणे, नागपूर येथे अधिकृत विक्रेत्यांकडून प्रत्येक वाहनावर जकात ही ५०० रुपये आकरला जातो. आपल्या महानगरपालिकेत तसा ठराव मंजूर करावा. त्यात प्रत्येक वाहनाचा जकात कर हा १०००/- रु. ठेवावा. या माझ्या सुचनांवर प्रशासनाने व सभागृहाने विचार करावा जेणेकरुन महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. काही अधिकृत विक्रेत्याने वाहने सारख्या औद्योगिक भागात शोरुम ओपन

करुन (गोडावून) त्यात वाहने ठेवलेली आहे. त्यांना प्रशासनाने पत्राने कळवावे की, खेड्यात जरी वाहने विक्री केली. तरी त्यावर महापालिका जकता लावावी. त्यामुळे उत्पन्नात वाढ होईल.

**श्री.अविनाश कुमावत :** स.सदस्यांचे सुचनेप्रमाणे खेड्यात जरी वाहने विक्री केली तरी जकात लावावा. त्यात अडचण येईल कारण महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागात वाहने विक्री करण्यांत येणाऱ्या वाहनांवर जकात लावू नये असे कायद्यात आहे. शहरात जी वाहने विना जकातीची आलेली आहेत. त्याच्याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

**श्री.मुजीब आलमशाह :** जकात वसुली जास्त होण्यासाठी जकात विभागातील आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यांत आलेल्या होत्या. ६ ते ८ महिन्यानंतर पुन्हा त्याच कर्मचाऱ्यांना जकात विभागात पाठविण्यांत आले. त्यामुळे जकातीचे उत्पन्नात घट झाली आहे. जी वसुली व्हावयास पाहिजे ती होत नाही. सदर कर्मचाऱ्यांच्या बदल्या पुन्हा जकात विभागातच का करण्यांत आल्या, याचा खुलासा व्हावा.

**श्री.रशिद खॉन (मामू) :** पहिले कार्यरत असलेले कर्मचाऱ्यांच्या बदल्या करुन पुन्हा त्याच कर्मचाऱ्यांना त्या विभागात देण्यांत आले. १५ दिवसांपुर्वी १% ने एका मारुती कराची जकात आकारण्यात आली. सदर व्यक्ती आर.टी.ओ. ऑफिसमध्ये कार्यरत असून पदाधिकाऱ्यांची गाडी होती.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मा.उपआयुक्त (म) :** एप्रिल ते ऑक्टोंबर पर्यंत मागील वर्षीची वसुली २२ कोटी ६ लक्ष १७ हजार ८२ इतकी होती. या वर्षी एप्रिल ते ऑक्टोंबर रु.२३,२१,०१,४९४/- इतकी झाली. म्हणजेच मागील वर्षापेक्षा यावर्षी एप्रिल ते ऑक्टोंबर या कालावधीमध्ये रु.१,१४,८४,४१२/- इतकी जास्त सवुली झालेली आहे. ऑक्टोंबर या महिन्यात सर्वच महानरपालिका मध्ये जकात वसुली कमी प्रमाणात झालेली आहे. कोल्हापूर ८ लक्ष कमी, नाशिक ३ कोटी ३५ लाख कमी, पिंपरी चिंचवड ३ लाखाची वाढ आहे. सोलापूर ८ लाख घट आहे. कल्याण महानगरपालिका ५० लाखाची घट, नागपूरची १ कोटी २१ लाखाची घट आहे. नवी मुंबईची ७२ लाखाची घट, यात पिंपरी चिंचवड, ठाणे महानगरपालिका सोडल्यास इतर सर्व महानगरपालिकांमध्ये ऑक्टोंबर महिन्यात जकात वसुली कमी झालेली आहे. त्याचा विचार केल्यास या वर्षी ८ ते १० दिवस सुट्ट्या आलेल्या होत्या. त्यामुळे बऱ्याचशा कंपन्या बंद होत्या. औद्योगिक क्षेत्रात चौकशी केली असता काही कंपनी मालकांनी सांगितले की, आर्थिक मंदीची लाट असल्यामुळे कच्चा माल जास्त प्रमाणात येत नाही. चौकशी केली असता गरवारे मध्ये १३%, लुपीनची ११%, ग्रामचिची ३७%, गरतन इंडिस्ट्रीज ६९%, हिंदुस्थान लिव्हरची ३८%, बॉम्बे फोर्जींग ३४%, मेल्ट्रॉनची ११%, आर.एस.ची ३३% नी घट झालेली आहे. गाड्याचे जे आवक चे प्रमाण होते. त्यात मागच्या वर्षी ४२३५ वाहने आली होती. यावर्षी ३३०७ वाहने आली. म्हणजेच ९२८ वाहने कमी आलेली आहे. व मध्यवर्ती गोदाममध्ये १५०३ वाहने मागच्या वर्षी आलेली होती. ऑक्टोंबर मध्ये या वर्षी या महिन्यामध्ये १३२७ वाहने आली. म्हणजे १७६ वाहने कमी आलेली आहे. मध्यवर्ती नाक्यामध्ये ऑक्टोंबर ५७३८ वाहने आली म्हणजे १,१०४ वाहने कमी, या कारणामुळे व तसेच यावर्षी ४६३४ वाहने आलेली

आहे. १० ते ११ ऑक्टोंबरला अतिवृष्टीमुळेही जकात कमी आलेली आहे. सिमेंट व लोखंडाचे भाव कमी झालेले असल्याने सध्या असलेल्या किमतीप्रमाणे जकात वसुल करावी लागते. याच बरोबर एस.टी.बोर्डाने ज्या चेसीस आणलेल्या होत्या. त्यामुळे जकात जास्त येत असे. परंतू यावर्षी एस.टी.बोर्डाने एकही चेसीस हा आणल्यामुळे वसुली कमी झाली आहे. यात फक्त फटाक्याचे जकात मिळालेली आहे.

**श्री.नरेंद्र पाटील :** उपआयुक्त यांनी जो खुलासा केला त्यात मी एका मताशी सहमत आहे. की आर्थिक मंदी ही संगळीकडेच चालु आहे. आर्थिक मंदीचा जो फरक आहे. तो दोन महिन्यामध्ये भरुन निघु शकतो. दिवाळीच्या ८ दिवस सुट्टया होत्या. त्यामुळे औद्योगिक क्षेत्र बंद होते असे कधी होऊ शकत नाही. कंपनी मालक हे किती सुट्टया आल्यास जे उत्पादन काढायचे ते सुट्टीच्या अगोदरच निघालेले असते. त्यामुळे माल कमी येतो हे म्हणणे चुकीचे आहे. शहरातील कुणीही नागरिक रोजच्या वस्तुचा उपभोग घेतोच. त्यामुळे माल कमी येणे हे शक्य नाही. महाराष्ट्रमध्ये औरंगाबाद हे एकच शहर आहे की, एक एक महिन्यामध्ये भयंकर अशी वाढ दिसून येते. महापालिका आर्थिक बजेटमध्ये दरवर्षी १०% नी जकातीमध्ये वाढ होईल. या दृष्टीकोनातून बजेट ठेवतो.

(यावर काही स.सदस्य मोठमोठ्याने बोलतात. तेव्हा श्री. नरेंद्र पाटील यांनी सांगितले की, मला बोलू द्यावे. जकात हा महापालिकांचा कणा आहे. जकात वसुली झाली नाहीत तर सरकारकडे भिक मागावी लागते. ती मिळत नाही.)

(यावर सत्ताधारी पक्षाने स.सदस्य यांनी जे शब्द वापरले ते त्यांनी मागे घ्यावे. मोठमोठ्याने बोलणे चालु होते.)

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी विषयाला धरुन चर्चा करावी. स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

(परत सत्ताधारी स.सदस्य यांनी श्री.नरेंद्र पाटील यांनी सरकार बद्दल अपशब्द बोलल्या बद्दल माफी मागावी. असा मा.महापौर यांचेकडे आग्रह धरला नाही तर आजच्या सभेचा आम्ही निषेघ करतो.)

**मा.महापौर :** श्री.नरेंद्र पाटील यांनी माफी मागावी. सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे नसता सभासदत्व रद्द करण्यांत येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** स.सदस्य यांनी जकात वसुलीबाबत चर्चा चालु असतांना विनाकारण अपशब्द बोलून अडथळा निर्माण केलेला आहे. यामागे काही राजकीय कारण असू शकते.

**श्री.जावेद रज्जाक :** स.सदस्य काय बोलले ते कळालेलेच नाही.

**श्री.नरेंद्र पाटील :** महानगरपालिकेला कोणतेही उत्पन्न हे कमी कमी प्रमाणात होत असेल तर शासनाकडे किती वेळेस अनुदान मागण्याची वेळ या महानगरपालिकेला पडणार आहे. असे माझे म्हणणे होते. त्याबद्दल कुण्या स.सदस्यांना गैरसमज झाला असेल तर मी माझे शब्द मागे घेतो.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** विषय क्र.१ वर चर्चा करावी.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी जकातीवर पुन्हा एकदा खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** जकातीच्या संदर्भात ९९ केसेस, जकात रकमाच्या फरका संदर्भात एकूण २८ केसेस चालू आहे. अशा केसेस करुन त्यांच्याकडून एकूण ७,२१,२०७/- रु. वसुलची दंडात्मक कार्यवाही केलेली आहे. तसेच नोव्हेंबर महिन्यात देखील ४ ते ५ ठिकाणी धाडी टाकून ६५ हजार रुपयाची वसुली केलेली आहे. आणखी अशा २३ ते २५ केसेस हाती आलेल्या आहे. अशा लोकंवर शेड्युल बी प्रमाणे नोटीस देवून कार्यवाही चालु आहे. जकात विभागामार्फत मागे वाळूज मार्गे किंवा मुंबई-नाशिक मार्गे औरंगाबाद ला येणाऱ्या गाड्याची तपासणी चालू होती. परंतू, मुंबई नाका, नगरनाका, तसेच जालना नाका, या नाक्यावर येणाऱ्या गाड्या (स्पीड) वेगाने येतात व एकदम त्या थांबवू शकत नाही. त्यामुळे गाडीमध्ये कोणता माल आहे. याची तपासणी होत नाही. तर या सभागृहात जकात विभागातर्फे शहराच्या प्रत्येक नाक्यावर स्पीड ब्रेकर बसविण्याबाबतचा ठराव ठेवण्यात येणार आहे. त्यास सभागृहानेही मंजूरी द्यावी.

**सौ.लता दलाल :** स.सदस्यांनी जो खुलासा मागविला आहे. तो असा की गेल्या दोन महिन्याच्या व दिवाळीच्या कालावधीत

**श्री.गिरजाराम हाळनोर :** जकातीचे उत्पन्न का कमी आले याची माहिती द्यावी. इतर गोष्टीवर अधिकारी यांनी भाष्य करु नये.

**श्री.रशिद खान (मामू) :** चिकलठाणा येथील एका फॅक्टरींचा ९० हजाराचा माल पकडण्यांत आला होता. त्या कंपनी मालकावर दंडात्मक कार्यवाही का करण्यांत आली नाही. ट्रान्स्फर मदत का घेतले. याची माहिती द्यावी. दोन चाकी वाहनांचा टॅक्स कमी का घेण्यांत आला. याची माहिती द्यावी. विनाकारण वेगळ्या प्रकारचा खुलासा करु नये.

**श्री.स.स.एकबालोद्दीन :** अधिकारीही राजकारण करतात. ग्रुपीझम झाले आहे. चुकीची माहिती सभागृहात देतात.

**उपआयुक्त (म) :** स.सदस्यांच्या सुचनेप्रमाणे फटाक्या बाबतची वसुली ९७-९८ मध्ये ३ लक्ष ९३ हजार होती. या वर्षीचे ५ लक्ष ६ हजाराची जकात आलेली आहे. भुसार माल, सुकामेवा, तसेच कपडा यामधुन ४०% रक्कम मिळते. औद्योगिक क्षेत्राला लागणारा माल या पासुन ६०% वसुली होते. औद्योगिक क्षेत्रात येणारा माल व गाड्यांची आवक कमी झालेली आहे. तसेच गरवारे सारख्या मोठमोठ्या कंपन्यांचा माल येण्याची आवक कमी झालेली आहे. गरवारे मध्ये सध्या १०० मॅट्रीक टन माल येतो. याच कंपनीमध्ये पहिला नोव्हेंबर १ तारखेपर्यंत ११ लाख ७३ हजाराची वसुली झालेली आहे. गेल्यावर्षी २ ते ३ सुट्टया आलेल्या होत्या. यावर्षी जवळजवळ १९ ते २६ तारखेपर्यंत लगत सुट्टया आलेल्या आहे. जी आवक येणारी होती. ती सुट्टया असल्यामुळे दिवाळीपुर्वी येऊ शकली नाही. यावर्षी दिवाळीच्या कालावधीत १३ लक्ष रुपयाची वसुली झालेली आहे. जकात विभागाचे वसुली करण्याबाबतची जी कार्यवाही आहे. ती योग्य आहे. तसेच जकात विभागात कर्मचारी वर्ग कमी असल्यामुळे आकृतीबंधमध्ये त्याचा समावेश केलेला आहेच. पण वेळेनुसार जेव्हाही वसुली व्हावयास पाहिजे ती होत नाही. सध्या या विभागात सहाय्यक जकात अधिक्षकाची ३ पदे रिकामी आहे. जोपर्यंत नवीन कर्मचारी वर्ग देणार नाही. तोपर्यंत जकातीत वाढ होणे शक्य नाही. मुंबईहून येणारा माल नाशिक व औरंगाबाद या दोन शहरात सारख्या प्रमाणात येतो. नाशिक

महानगरपालिकेची ३ लक्ष ३५ हजाराची घट आलेली आहे. नवी मुंबई महापालिकेची ७० लक्ष रुपयाची घट आली ती बरोबर आहे का?

**श्री.गिरजाराम हाळनोर :** इतर महापालिकेची जी घट झालेली आहे. त्यांचे बजेट किती व काय आहे. याची माहिती आपल्या प्रशासनाकडे आहे काय?

**श्री.जयवंत ओक :** प्रशासनावर व पदाधिकाऱ्यावर आरोप केले जातात. संबंधित अधिकारी यांनी योग्य खुलासा करावा.

**श्री.गौतम खरात :** मागील वर्षी ३.९३ कोटीची वसुली झालेली होती. यावर्षी ३.०५ कोटी म्हणजेच ८८ लक्ष रुपयाची घट दिसून येते. दरवर्षीच्या बजेटमध्ये १५% नी जकात उत्पन्नात उत्पन्न वाढवयास पाहिजे. असा विचार केला असता एकूण १.४५ कोटी रुपये ची कमी वसुली आतापर्यंत झालेली आहे. ती वाढविण्याकरिता प्रशासनाने उपाययोजना करावी.

**उपआयुक्त (म.) :** यावर्षी ८८ लक्ष कमी वसुली झालेली आहे. ही वस्तुस्थिती आहे.

**श्री.गौतम खरात :** प्रशासन ८८ लक्ष रु.ची घट आली. अशी कबुली देतात. बजेट करतांना १५% उत्पन्नात वाढ होईल असे सांगतात. सभागृहात व्यवस्थीत उत्तरे देण्यास टाळाटाळ करतात. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे.

**श्रीमती नुरजहाँ बेगम :** शहरामध्ये काही माल जकात न देता येतो. मोठमोठे यापारी जकात चुकवून शहरात माल घेऊन येतात. यामागे अधिकारी व कर्मचारी यांचा हात आहे. जकात विभागातून ज्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या होत्या. तेच कर्मचारी परत त्या विभागात दिसत आहे. काही व्यापारी जकात चुकवून माल शहरात घेऊन येतात. जकात विभागामधील अधिकारी यांना योग्य प्रशासन चालविता येत नाही. त्यांच्या बदल्या कराव्या.

**श्री.मुजीब आलमशाह :** ज्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्याच कर्मचाऱ्यांना परत त्याच विभागात नेमणूकी कशा देण्यात आल्या याची माहिती द्यावी.

**उपआयुक्त (म.) :** सभापती यांचे म्हणण्यानुसार गेल्या वर्षी व चालु वर्षात किती वसुली झाली याचा तपशिल असा की, गेल्या वर्षी ९७-९८ मध्ये २२ कोटी १७ हजार ८२ रुपये व यावर्षी एप्रिल ते ऑक्टोंबर २३,२१,०१,४९४ म्हणजेच १,१४,८४,४१४ इतकी जास्त वसुली झालेली आहे. एकूण ५.२७% नी वाढ झालेली आहे.

**श्री.संजय जोशी :** स.सदस्य यांचे सुचनेप्रमाणे ७० लाखाची घट आलेली आहे का?

**उपआयुक्त (म) :** औरंगाबाद महानगरपालिकेच नव्हे तर इतरही महानगरपालिकेत या वर्षीच्या जकात उत्पन्नात घट आलेली आहे.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** इतर महानगरपालिकेची माहिती देण्याची आवश्यकता नाही. औरंगाबाद महानगरपालिकेचे जकात वसुलीची घट का आली याची माहिती द्यावी.

**सौ.लता दलाल :** स.सदस्यांच्या भावना लक्षात घता संबंधित अधिकारी हे योग्य खुलासा करत नाही. स.सदस्यांच्या म्हणणे असे की, औरंगाबाद महानगरपालिकेचे जकात उत्पन्नात या वर्षी घट का आली. बजेट ठेवतांना नेहमी १५ टक्क्यांनी वाढ होईल अशी अपेक्षा असते. उलट घट होते हे दुर्देव. तसेच जकात विभागात पहिल्यांदा जो कर्मचारी वर्ग कार्यरत होता. त्यांच्या बदल्या करण्यांत आल्या होत्या. परत त्यांना त्या विभागात का घेण्यात आले. याचाही खुलासा व्हावा. कुणाच्या लेखी तक्रारीनुसार कुणाच्या दबावाखाली

त्यांच्या बदल्या करण्यांत आलेल्या आहेत का? यास कोण जबाबदार, कोण भ्रष्टाचारी याची माहिती द्यावी.

**मा.महापौर :** मा.आयुक्त खुलासा करतील.

(याचवेळी सभागृहात आघाडीचे स.सदस्य व सत्ताधारी स.सदस्य यांनी संबंधित अधिकारी यांना खुलासा करण्याबाबत आग्रह धरतात, त्यांना जकाती बाबतचा जाब विचारावा.)

**श्री.जयवंत ओक :** जकात वसुली होण्याबाबत सभागृहात नेहमी चर्चा होते. आस्थापना-१, आस्थापना-२ व आस्थापना जकात या विभागात असलेले सर्व अधिकारी हे एकमेकांना मिळालेले आहे. ८ वर्षापासून हे बदल्यांचे राजकारण चालते. काही कर्मचारी तर २०-२० वर्षापासून जकात विभागातच कार्यरत आहे. स.सदस्यांना प्रश्न असा की, जकात कमी का येते. या सभागृहात पदाधिकारी, प्रशासनावर स.सदस्यांनी आरोप केलेला आहे. संबंधित अधिकारी यांनी योगय उत्तरे द्यावे. प्राव्हेट पार्टीला जकात दिला पाहिजे. नगरसेवकांचे अधिकारी यांच्याशी हात मिळवणी आहे का? यात जो कुणी दोषी असेल त्यांच्यावर कार्यवाही करावी. जोपर्यंत कार्यवाही होत नाही. तोपर्यंत जे ४८ कोटीचे बजेट ठेवलेले आहे. त्यानुसार वसुली होणार नाही. तो पर्यंत जे ४८ कोटीचे बजेट ठेवलेले आहे. त्यानुसार वसुली होणार नाही. आस्थापना-१, आस्थापना-२ या विभागातून नेहमी बदल्या होत असतात. बदनाम पदाधिकारी होतात. प्रायव्हेट पार्टीला जकात देता येतो का याबाबत आयुक्तांनी खुलासा करावा.

**श्री.व्ही.व्ही देशमुख :** स.सदस्य श्री.गौतम खरात यांनी जो जकाती बाबतचा प्रश्न मांडला. त्यांचे सविस्तर उत्र दिलेले नाही. जकात वसुली बाबत नेहमी सभागृहात चर्चा करावी लागते. ४ वर्षापासून व या कालावधीत जकांतवर वारंवार सुचना मांडाव्या लागतात. परंतू स.सदस्य हे जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी भांडतात. याची जाणीव कुणी ठेवत नाही. पदाधिकारी, स.सदस्य यांच्यापेक्षा जास्त अधिकारीच राजकारण करु लागले आहेत. असे दिसून येते. जकात विभागात दोन दोन अधिकारी आहेत. प्रत्येकांना गाड्या दिलेल्या आहेत. पुराव्यासह सादर करु इच्छितो की, बदल्या बाबत संचिका आयुक्तांकडे गेल्यावर आयुक्त यांनी त्या ठिकाणी अधिकारी नको आहे. असे शेरे मारल्यानंतरही त्या ठिकाणी अधिकारी पाठविले जातात. आयुक्तांचे आदेश पाळले जात नाही. यामुळे प्रशासन पदाधिकारी, स.सदस्य तसेच संपुर्ण महानगरपालिकेची बदनामी होत आहेत.

**श्री.जयवंत ओक :** काही अधिकारी यांच्याकडे दोन-दोन पदे दिलेली आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या का मात अडचण येते. याचा विचार प्रशासनानेच करावा.

**श्री.प्रकाश निकाळजे :** जकात कमी झाली याचे कारण हे वर्ष मंदीचे आहे असे संबंधित यांनी खुलासा करतांना सांगितले हे चुकीचे आहे. शहरात दिवाळी निमित्त बऱ्याच खेळणी वस्तु, कपडे, सुकामेवा, फटाके आलेले आहेत. त्याची जकात योग्य घेतली जात नाही. तसेच फटाकेच्या दुकानधारकांना जे लायसन्स देण्याच्या दृष्टीकोनातून जी वसुली केली जाते ती झालेली नाही. लायसन्स देण्यात आलेले आहे. अर्थसंकल्पात दरवर्षी १५% नी वाढ व्हावी. असे धारणा असते. परंतू उलट जकात वसुलीत घट होते. याचा अर्थ

प्रशासनाचा संबंधित जकात विभागात असणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर अंकुश नाही. असा होतो. जवळजवळ १.४५ कोटी रुपये चा तोटा झालेला आहे. जकात वसुलीची वाढ कशी होईल याकडे लक्ष द्यावे. विनाकारण आरोप प्रत्यारोप सभागृहात एकमेकांवर करु नये.

**मा.महापौर :** ७० लक्ष जकात कमी का आली यावर संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी. ज्यांच्या बदल्या करण्यांत आलेल्या आहेत. त्यांनाच त्या जागेवर पुन्हा का पाठविण्यात आलेले आहे. याची माहिती द्यावी. तसेच वरीष्ठ कर्मचारी व शैक्षणिक पात्रतेनुसार ज्ञानी असणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच या विभागात काम द्यावे, याचाही सविस्तर माहिती द्यावी.

**उपआयुक्त (म.) :** ९७-९८ मध्ये २२ कोटी ७ लक्ष जकात जवळजवळ झालेली आहे. गेल्या वर्षी दिवाळीच्या कालावधीमध्ये ३५९० वाहने आली होती. यावर्षी ३६३७ वाहने आलेली आहे. औद्योगिक क्षेत्रात येणरा माल कमी प्रमाणात आलेला आहे. त्यामुळे नवीन येणारी वाहने व त्यापासून मिळणारे जकात उत्पन्न हे कमी झालेले आहे. तसा विचार केल्यास एप्रिल ते ऑक्टोंबर पर्यंत ५% जकात वसुली ही जास्त झालेली आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात ज्यांना ५ वर्ष जकात विभागात झालेले आहेत. त्यांच्या बदल्या करण्यांत आलेल्या आहेत. जकात विभागातले ३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यांत आलेल्या होत्या. परंतू त्यांच्या जागी येणाऱ्या तीन कर्मचारी यांना अद्यापही संबंधित विभागातून कार्यमुक्त केलेले नाही. त्यामुळे जोपर्यंत बदलून येणारा कर्मचारी येत नाही. तोपर्यंत जकात विभागतले कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करता येत नाही. कारण सदर कर्मचाऱ्यांकडे जकात रकमेचा हिशोब असतो.

**श्री.अविनाश कुमावत, श्री.रशीद खान (मामू) :** ज्या कर्मचाऱ्यांना जकात विभागात कार्यरत होण्याबाबतचे आदेश देऊनही कार्यरत झाले नाही. त्यांच्यावर कार्यवाही का केली नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार जे कर्मचारी यांना २९.०६.९८ रोजी पुर्णतः ५ वर्षे ते कार्यरत असलेल्या, विभागात झाले अशा कर्मचाऱ्यांच्या एकूण १९१ बदल्या करण्यांत आलेल्या आहेत. त्यापैकी जकात विभागात १७ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. त्यातील १४ कर्मचारी जकात विभागात हजर झालेले आहे. ३ कर्मचारी हजर झालेले नाहीत. जे तीन कर्मचारी हजर झालेले नाहीत. त्यांच्यावर प्रशासनाने त्याचे त्या त्या महिन्याचे पगार बंद केलेले आहेत. प्रशासकीय कार्यवाही चालु आहे.

**श्री.हमीयोद्दीन ताबा, श्री.प्रकाश निकाळजे, श्रीमती नुरजहॉं बेगम :** सभागृहात अधिकारी दिशाभूल करीत आहे. प्रशासनाने संबंधित कर्मचारी यांचे आदेश ६ महिन्यापुर्वी काढले. सभागृहात विचारणा केल्यानंतर आज अधिकारी उत्तरे देतात. ज्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. त्यातील तीन कर्मचारी कार्यमुक्त झालेले नाही. याचा अर्थ प्रशासनाचा कर्मचाऱ्यांवर अंकुश नाही. तसेच कुणीही कर्मचारी असो त्यांच्यावर प्रशासनाचा दबाव असला पाहिजे.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** जकातीची एकूण ७० लक्ष रुपयाची घट का आली. दुसरा मुद्या असा की, नवीन जो अर्थसंकल्प ठेवणार आहे. त्याबाबतची उपाययोजना काय आहे. याचीही माहिती द्यावी.

**मा.आयुक्त :** सभागृहाने असे मत व्यक्त केले की, ऐन दिवाळीच्या वेळेस, व ज्या कालावधीमध्ये जकात वसुल व्हावयास पाहिजे. त्या वेळेत ८८ लक्ष रु.ची घट

का आली. यास जबाबदार कोण, आस्थापना-१ व जकात आस्थापना यांचे लागेबांधे आहे काय, कर्मचारी योग्य प्रकारे जकात आकारणी करत नाही, जास्तीच्या काही मालाची जकात न घेता सोडतात, दंड आकारणी योग्य करत नाही, प्रशासनाने जे लक्ष द्यावयास पाहिजे ते दिले जात नाही, असे अनेक प्रश्न जकात वसुल न होण्याबाबत सभागृहाने उपस्थित केलेले आहे. स.सदस्य श्रीमती नुरजहाँ बेगम, व अल्का पाटील यांनी जकात विभागामध्ये भ्रष्टाचार आहे. अशी शंका उपस्थित केली आहे. जकात वसुली व्हावयास पाहिजे असे सभागृहाचे मत आहे. व प्रशासनाचे सुध्दा आहे. कारण शहराची विकास कामे ही जकातीच्या उत्पन्नाच्या आधारावर होत असते हे आपणाला माहित आहेच यात शंका नाही. दरवर्षी वाढ व्हावी व झालीच पाहिजे असे आपण अपेक्षित धरतोच, जकात अधिक्षक म्हणून एक जबाबदार अधिकारी श्री. वाहुळ यांची त्या ठिकाणी निवड केलेली आहे, परंतू संबंधित अधिकारी यांना अडचण निर्माण करणाऱ्या शक्ती असतील. त्यांचा बिमोड केला जाईल. तो कुणीही असो जकात उत्पन्नाचे या वर्षीच्या बजेटमध्ये ४८ कोटी रुपयाची तरतूद आहे. यापैकी ६ महिन्यामध्ये २३ कोटी रुपये वसुल झालेली आहे. ती योग्य प्रमाणात झालेली आहे. असे मी मुद्दामहून येथे सांगू इच्छितो. दिवाळी असतांना जकात कमी का आली. असे स.सदरस्य यांचे म्हणणे आहे. परंतू या दिवाळीच्या वेळेस शहरात येणारे फटाके, कपडा, सुकामेवा, मिठाई इतर काही वस्तु यांच्या पोटी येणारी जकात ३०.०३ कोटी गेल्या वर्षापेक्षा ऑक्टोंबर पर्यंत आलेली आहे. ८० लक्ष रु.ची घट का आली यास स.सदस्य श्री.नरेंद्र पाटील जरी सहमत नसेल तरी जकात वसुली कमी होण्याबाबत कुणी अडचण निर्माण करत असेल. त्याचे आत्मपरिक्षण करुन कार्यवाही करण्यांत येईल. ३.०३ कोटी पैकी औद्योगिक क्षेत्रात येणाऱ्या मालाचे किती आलेले आहेत. याची सविस्तर माहिती येत्या ७ तारखेच्या बैठकीत प्रशासन देऊ शकेल. गेल्यावर्षी पेक्षा ११७६ वाहने कमी आलेली आहे. १० टनाचा माल जरी धरल्यास ११ हजार टनाचा माल शहरात कमी आलेला आहे. त्यामुळे जकात वसुली कमी होऊन शकते. इतर महापालिकेमध्येही जकातीत घट आलेली आहे. विचारणा केल्यास १३%, ९%, १०% नी घट आलेली आहे. कल्याण महानगरपालिकेमध्ये तर एस.आर.पी.ची. मदत घेऊन जकात वसुल केली जाते. सभागृहात ज्या भावना व्यक्त रुन जो प्रश्न उपस्थित केला तो योग्य असून त्या बाबतीत प्रशासन वेळीच दखल घेईल यात शंका नाही. सभागृहाने वाटल्यास एक सल्लागार समिती नेमावी. त्यानुसार प्रशासन काम करेल. बदल्याच्या बाबतीत ज्यांना ५ ते ४,३ वर्ष झालेले आहेत. त्यांच्या त्या त्या जास्त कालावधीनुसार मे महिन्यात करण्यात आलेल्या आहेत. जर आर्थिक उत्पन्न मिळण्याच्या इरादयाने कुणी प्रशासनातील अधिकाऱ्यांवर अडथळे आणत असेल तर प्रशासन त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करील व यात कर्मचारी दोषी असेल तर त्यांच्यावरही कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.मुजीब आलमशाह :** कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्यानंतरही किती कर्मचारी परत त्याच विभागात आलेले आहेत. तेच ते कर्मचारी का परत आले याची माहिती द्यावी.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** पाहिले कार्यरत कर्मचारी त्या विभागात परत आलेले आहेत. त्यामुळे जकातीचे उत्पन्न ७० लक्ष रु.नी कमी आले असा माझा आरोप आहे.

**श्री.रशिद खॉन (मामू) :** बदल्या केल्या नंतर ६ महिन्यानंतर पुन्हा त्याच कर्मचाऱ्यांना जकात विभागात पुन्हा का घेण्यात आले. सदर कर्मचारी कुण्या अधिकाऱ्यांचे राजकीय नेत्याचे, महापौरांचे संबंधित होते का?

**श्री.गौतम खरात :** प्रशासनाने जो खुलासा केलेला आहे. त्याची फक्त जागतिक मंदीमुळे १३% कमी जकात आली. यास सभागृह सहमत आहे. परंतू इतर महापालिकेमध्येही जकात कमी आलेली आहे. हे चुकीचे आहे. औरंगाबाद महानगरपालिकेची जकात ऑक्टोंबर महिन्यात कमी का आलेली आहे. याचा खुलासा करावा.

**श्री.अविनाश कुमावत :** येत्या ७ तारखेला जी बैठक होणार आहे. त्याच सभेच्या विषय पत्रिकेतील शेवटचा विषयानंतर या आजच्या जकात वसुली बाबत सविस्तर खुलासा प्रशासनाने करावा. आता विषय क्र.१ वर चर्चा करावी.

**श्री.गौतम खरात :** औरंगाबाद शहराच्या हद्दीतील औद्योगिक क्षेत्रात जे ट्रान्सपोर्ट आहेत. जी गोडाऊन शहराच्या बाहेरील पण, हे सर्व तपासणी करुन त्यांचे अकाऊन्टस तपासणी करुन, त्यासाठी एक समिती गठीत केली पाहिजे. त्या समितीमध्ये जकात विभागातल्या व्यतिरिक्त अधिकारी त्या समितीमध्ये समावेश केलेले असावे. तशी समिती गठण करुन जी कुणी अधिकारी यानंतर दोषी ठरेल त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही या सभागृहाने यानंतर घ्यावी.

**मा.महापौर :** येत्या ७ तारखेला जकात वसुलीची घट का झाली याबाबतची सविस्तर माहिती प्रशासना देतील तसेच ज्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या त्या मागची नेमकी भुमिका काय याबद्दलही संपूर्ण माहिती त्याच सभेत देण्यांत येईल.

(आजची सभा थोडा वेळ अल्पोहरासाठी तहकूब करण्यात येत आहे. (वेळ १.१० वाजता) (सभेला सुरुवात १.४५ वा.)

**श्री.जावेद रज्जाक :** अधिकारी वर्ग सभागृहात नाही. त्यातल्या त्या त मा.आयुक्त ही नाही. अधिकारी वर्ग जो पर्यंत येत नाही. तोपर्यंत सभेला सुरुवात करु नये.

**मा.महापौर :** स.अधिकारी यांनी आपआपल्या जागेवर बसावे. सभेला सुरुवात होत आहे. (याच वेळी मा.आयुक्त व संबंधित सर्व अधिकारी सभागृहात येऊन बसतात.)

**सौ.मोहसिना बिल्कीस :** प्रशासनाकडे विकास कामासाठी पत्र दिल्यानंतर वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे ते पत्र जाण्यास वेळ तर लागतोच परंतू वरीष्ठ अधिकारी त्यावर असा शेरा मारतात की, चर्चा करावी. चर्चा करणे कुण्या अधिकाऱ्याचे काम आहे. चर्चा केल्यानंतर तसेच पत्र दिल्यानंतर ते पत्रातील दिलेल्या विषयांच्या अनुषंगाने किती दिवसात निकाली लागावे, याचाही खुलासा करावा. संबंधित विभागाकडे एका ग्रंथालयाच्या बाजुला जुनी पाईप काढून नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याबाबत चाऊस कॉलनीमध्ये एका जागेवर स्लॅबचे अपुर्ण राहिलेले काम, चेलीपुरा मस्जिदजवळ ढापे टाकण्यासंदर्भात असे तीन पत्रे दिलेली आहे. परंतू काहीही कार्यवाही होत नाही. संबंधित अधिकाऱ्यांना टेलिफोन वरुन बोलावे लागते. विनंती करावी लागते की, साहेब आमचे काम करावे संचिका कुठपर्यंत आलेली आहे. हे प्रशासनातील अधिकाऱ्यांचे धोरण योग्य नाही. शहाबाजार येथे शाळेचे काम पुर्ण व्हावे यासाठी एका वर्षापासून कार्यवाही चालू आहे. त्या ठिकाणी एकच होती की, एका भिंतीवर एम.एस.ई.बी. तारलाईन येत असल्याने ते काम करता येत नाही. असे

अधिकारी यांचे म्हणणे होते. संबंधित विभागाशी संपर्क साधून तेथील भिंतीवरील तारही काढण्यात आलेली आहे. तरीही शाळेचे काम सुरु झालेले नाही. तसेच महापालिकेच्या अंतर्गत असलेल्या सर्व शाळांतील मुलांना गणेवश वाटप करण्यात आले. त्यात गणवेश तयार करतांना शिलाई व्यवस्थित केलेली नाही. कॉलर बरोबर नाही. टचबटण निघालेले असे आढळून आलेले आहे. मागे शहरात सुरत पॅटर्न स्किम सुरुवात करण्यात आलेली होती. ज्या वेळेस स्कीमला सुरुवात झाली. त्यावेळेसच माझ्या वार्डातील दररोज दोन ट्रक कचरा उचलत होते. परंतू सध्या वॉर्डात बऱ्याच ठिकाणी कचराकुंड्या गच्च भरलेल्या दिसून येतात. ४ दिवसांत १ वेळेला गाडी कचरा नेण्यासाठी येते. संबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क साधता अधिकारी उत्तरे देतात की, गाड्याच नाही. एक गाडी कुठे-कुठे जाणार. अधिकारी अशा प्रकारची उत्तरे देणे योग्य नाही. तसेच वरील जे मुद्दयांवर चर्चा केलेली आहे. त्यांचा संपूर्ण खुलासा व्हावयास पाहिजे.

**मा.महापौर :** स.सदस्य श्रीमती बिल्कीस यांनी जे जे प्रश्न सभागृहात उपस्थित केलेले आहेत. त्या सर्व प्रश्नांची तातडीने प्रशासनाने कार्यवाही करुन प्रश्न ताबडतोब सोडवावे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** तीन वर्षापुर्वी ज्या अनधिकृत वसाहती झालेल्या आहेत. त्या ठिकाणी २५% लोक वर्गणी करुन तसेच ७५% महापालिकेचे खर्च करुन तेथील नागरिकांना ड्रेनेज, पाणी पुरवठा इ.सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. असे सभागृहाने मंजूर केलेले आहे. गेल्या १ वर्षापासून झोन क्र.७ मधील पुंडलिकनगर, राजीवगांधीनगर, जाधववाडी, जयभवानीनगर, सुरेवाडी, अंबिकानगर, चिकलठाणा इ. ठिकाणी च्या प्रभागात नागरिकांना सुविधा उपलब्ध करुनच देण्याबाबत प्रशासनाकडे पत्र देऊन संचिका सादर झालेली आहे. परंतू संबंधित अधिकारी यांनी १००% लोकवर्गणी भरल्याशिवाय नागरी सुविधा देता येणार नाही. असा शेरा मारला. मला असे म्हणावयाचे की, सभागृहाने तशी संमती दिल्यानंतरही अधिकारी यांनी महापालिकेच्या नियमात काही बदल झालेले आहेत काय? याचा खुलासा करावा.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**सहा.संचालक नगररचना :** सदर वसाहतीमध्ये कायम सुविधा देण्याची जरी संमत केले असेल तरी असा ही प्रस्ताव ठेवण्यात आला होता की, जे नागरिक बेटरमेंट चार्सेस भरत नाही, लॅण्ड डेव्हलमेंट फिस देत नाही, ज्या जास्तीत जास्त मोठी वस्ती असेल तेथील नागरिकांकडुन बेटरमेंट ७० रु. लॅण्ड डेव्हलपमेंट चार्जेस २० रुपये आकारावे. बाकीचे इतर चार्जेस १३५ रु. चौ.मी. बांधकामाबद्दलचे घ्यावे असे ठरले होते. माझ्या माहितीप्रमाणे अशा प्रकारची संचिका माझ्याकडे आलेली होती.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** संबंधित अधिकारी यांनी योग्य खुलासा केलेला नाही.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** सभागृहाने २५% लोकवर्गणी करुन बाकीची रक्कम महापालिकेने द्यावी व नागरी सुविधा देण्यात याव्या. असे ठराव मंजूर झालेले आहे. असे असतांना अधिकारी हे सभागृहात बेटरमेंट चार्जेस भरण्याबाबत ठराव मंजूर केलेला आहे. असे म्हणतात. नियमाचे पालन करत नाही. कार्यवाही करावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** स.सदस्यांना अंधारात ठेवून अधिकारी मनमानी पणाने कार्यभार हाताळत आहे. दीड वर्षापुर्वी एक संचिका परत आलेली आहे. अशा अनेक

संचिका अंबिकानगर, राजीवगांधीनगर, इ. संचिका किंवा स्वेच्छानिधीतून कामे होण्याबाबतच्या संचिका लेखा विभागातून शेरा मारल्यानंतर नगर रचना विभागात जातात कशा, कोणत्या नियमाने, नियम बदलेले आहेत काय सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर कोणताही बदल होऊन नये. लोकांडून २५% लोकवर्गणी जमा करण्यास आम्हाला ६-६ महिने लागले. प्रशासन वेगळाच निर्णय घेणार हे योग्य नाही.

**मा.महापौर :** सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार जे की, २५% लोकवर्गणी करुन नागरी सुविधा पुरविण्याबाबत महापालिका प्रशासनाने ज्या ही संचिका थकीत असतील. त्या सर्व संचिकाचा पाठपुरावा करुन सदर वसाहतील नागरी सुविधा व इतर विकास कामे होतील. याकडे प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी. व विषय क्र.१ वर चर्चा करावी.

**श्रीमती फरहत बानो :** माझ्या वार्डात रहीम कॉलनी मध्ये महापालिकेची ड्रेनेज लाईन अद्याप नाहीत. सिडको येथे मिनार (टावर) होण्याबाबत सभागृहाने मंजूरी दिलेली आहे. अद्याप संचिका कुठे आहे माहिती नाही. खुलासा करावा.

**मा.महापौर :** स.सदस्या श्रीमती फरहत बानो यांच्या वार्डातील गरीब नागरिकांची वस्ती असेल तर त्याही ठिकाणी २५% लोकवर्गणी भरुन नागरी सुविधा पुरविल्या जातात.

**श्रीमती फरहत बानो :** राममंदिर ते मौलाना आझाद चौका पर्यंतचे रस्त्याने कामाबाबत सभागृहात चर्चा झालेली होती. त्यानंतर मा.आयुक्त यांनी आश्वासन दिले की, त्या ठिकाणचा सर्व्हे करावा लागेल. मा.गिते साहेब आले काय झाले माहिती नाही. सदर रस्ता वरुन रात्री बेरात्री नागरिकांना जावे लागते. तो व्यवस्थित होणे गरजेचे आहे. तसेच ५ महिन्यापुर्वी रस्त्याच्या कडेला नाली होण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. त्याबाबतची कार्यवाही पुर्ण झालेली नाही.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** सदर रस्त्याच्या बाजुला गटार नाली करण्याच्या कामासाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांना तेथील नागरिकांनी काम करु दिले नाही. त्या जागेचा मोबदला देण्यात यावे, असे त्यांचे म्हणणे आहे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** आता पर्यंत किती वेळा त्या ठिकाणी जाऊन किती वेळ काम केलेले आहे. याची माहिती द्यावी.

**श्री.मुजीब आलमशाह :** स.नगरसेवक यांना सदर काम करावयाचे याबाबत माहिती दिलेली होती का? ज्या नागरिकांनी काम करण्यास अडथळे आणले आहेत त्यांची नावे संबंधित अधिकारी सांगू शकतात काय? सभागृहाची दिशाभूल संबंधित अधिकारी करत आहे. भूसंपादन केलेले आहेत. लोकांनी पैसे दिलेले आहेत. कुणीही अडथळा निर्माण केलेला नाही. अधिकारी हे मुद्दामहून तेथील काम करण्यास उशीर करत आहे.

**मा.महापौर :** स.सदस्या यांनी जो रस्त्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला त्या बाबत तात्काळ कार्यवाही करावी.

**अति.शहर अभियंता :** सदर प्रभागात एम.एस.ई.बी.चे पोल आहेत. अर्ध्या जागेवर पोलवर लाईन तारा पुर्ण केलेल्या आहेत. रस्त्याच्या मध्ये सदर पोल येत असून काम करण्यास अडचण येत आहे. जेवढे काम करता येईल ते तात्काळ करण्यात

येईल. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे कार्यकारी अभियंता यांचेशी या संदर्भात मी बोललो आहे.

**श्रीमती फरहत बानो :** मिनार बाबत काय झाले खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** सिडकोची एन.ओ.सी. घ्यावी लागेल.

**श्री.अफसर खॉन :** सिडको मध्ये का करता, महापालिकेच्या हद्दीत करण्यात यावा. सर्कल करावे. ५६ भोग समोर जसे केले त्याप्रमाणे करण्यात यावे.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करुन, सदर रस्त्याचे व (टावर) मिनारचे काम लवकरात लवकर होईल. याकडे लक्ष द्यावे.

**श्री.बन्सी गांगवे :** माझ्या वार्डातील संजयनगर, मुकूंदवाडी येथील विकास कामाबाबत पत्र देऊनही, काही कार्यवाही होत नाही. बजेट नाही असे नेहमी सभागृहात सांगितले जाते. मुकूंदवाडी येथे एका ड्रेनेजचे घाण पाणी एक व्यक्तीच्या घरामध्ये जाते अशी परिस्थीती आहे. तरी अधिकारी कार्यवाही करत नाही.

**मा.महापौर:** संबंधित अधिकारी यांनी मुकूंदवाडी येथील ड्रेनेज लाईन बाबत कार्यवाही करावी.

**विषय क्र.११६/१ :**

दि.१९.०९.९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा.महापौर :** मंजूर.

**ठराव क्र.११६/१ :**

दि.१९.०९.९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.११७/२ :**

सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद मंजूर विकास योजने नुसार ५० फुट रुंद रस्ता चेलीपुरा ते रोशनगेट या रस्त्याने बाधित होणाऱ्या न.भू.क्र.१०२९२ च्या मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिलेली आहे. सदर मिळकतीचे एकूण क्षेत्र २९०.०० चौ.मी. आहे. पैकी १७३.०६ चौ.मी क्षेत्र (अंदाजे) वरील रस्त्याने बांधित आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना असल्याने सहा महिन्यात भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. सहा महिन्यात कार्यवाही झाली नाही. तर सदर मिळकत आरक्षणातून वगळली जाते.

करिता रस्त्याने बाधित क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादन करण्यास आणि सदर प्रकरणात होणाऱ्या भूसंपादन खर्चास मंजूरी देणे योग्य. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.अफसर खॉन :** अशाच प्रकारचा प्रस्ताव मागील बैठकीत आलेला होता. संबंधित मिळकत धारकांना प्रशासनाने पैसे दिले. परंतू जागा ताब्यात घेतलेली नाही, याचा खुलासा करावा.

**मा.महापौर :** विषय क्र.२ वर संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**सहा.संचालक, नगररचना :** सदर रस्त्याच्या संदर्भात २ वर्षापुर्वी खाजगी वाटाघाटीने संपादन झालेल्या आहेत. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये नोटीस दिलेली आहे. सदर नोटीस नुसार १० वर्षाच्या आत या जमीन (जागा) जर ताब्यात घेतल्या नसेल तर भूसंपादनासाठी मा.जिल्हाधिकारी यांना ६ महिन्यांच्या आत प्रस्ताव पाठवावा लागते.

**श्री.अफसर खॉन :** ज्यांना पैसे दिलेले आहेत. त्यांची जागा ताब्यात का घेतलेली नाही. याचा खुलासा व्हावा.

**श्री.जावेद रज्जाक :** संबंधित मिळकत धारकांना अद्याप पर्यंत पैसे मिळालेले नाही. ज्या नागरिकांकडून रस्ता संपादित करण्यासाठी जागा घेतल्या ते नागरिक दोन वर्षापासून संबंधित विभागाकडे पैशासाठी जातात. या संदर्भात किती लोकांनी तक्रारी केलेल्या आहेत. किती लोकांनी न्यायालयातून स्थगिती आणलेली आहे. किती लोकांना पैसे दिले व कितींना पैसे दिले नाही. याची संपूर्ण माहिती द्यावी. सदर रस्त्यांचे कामही कधी होणार याचा खुलासा करावा.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** सदर नोटीसचे पालन केले नाही. तर आरक्षणातून वगळेल पण प्रस्तावात जागा संपादनासाठी किती खर्च लागेल वगैरे काहीही उल्लेख नाही.

**श्री.मुजीब आलमशाह :** चेलीपुरा ते रोषनगेट या रस्त्याच्या बाजुला असलेली जागा बाधीत करण्याचा प्रस्ताव ५ व ६ वर्षापुर्वी मंजूर झालेला आहे. पुन्हा प्रस्ताव सभागृहात येतो. कसा याचा खुलासा व्हावा. सदर प्रस्ताव १९९० मध्ये पास झालेला आहे. त्याबाबतची प्रत सभागृहात दाखवू शकतो.

**सहा.संचालक, नगररचना, श्री.अफसर खॉन, श्री.हमीदोद्दीन ताबा :** माझ्या माहितीप्रमाणे हा अशा प्रकारचा प्रस्ताव आलेला नाही. प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. ज्यांना पैसे दिलेले आहेत. त्याबाबत चौकशी करावी. पैसे घेऊनही काही लोकांनी परत त्या रस्त्याच्या जागेवर येऊन अतिक्रमण केले आहे.

**मा.महापौर :** सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. तसेच ज्या मिळकत धारकांनी जागा संपादन करण्याबाबत आवश्यक ती रक्कम महानगरपालिका तर्फे आवश्यक ती रक्कम घेतली आहे. आणि त्यानंतर ही संपादित केलेल्या जागेच्या रस्त्याच्या जागेवर जर अतिक्रमण झाले असेल तर अशा सर्व प्रकरणात चौकशी करण्यांत यावी.

**ठराव क्र.११७/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता चेलीपुरा ते रोषनगेट या रस्त्याने बाधीत होणारी मिळकत नगर भूमापन क्र.१०२९२ च्या मिळकत धारकांने मा.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिलेली असल्याने सदर मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी १७३.०६ चौ.मी. क्षेत्र रस्त्याने बाधीत होत असल्याने भूसंपादन करण्यास आणि सदर प्रकरणात होणाऱ्या भूसंपादन खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११८/३ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा सुतगिरणी मागे काबरानगर येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. व १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये १९,१८,४००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे दरसुची सन १९९७-९८ प्रमाणे करण्यात आले आहे. सदरील योजनेस रक्कम रुपये ९.५० लाख म्हाडा कडून अनुदान प्राप्त आहे. उर्वरीत खर्च भांडवली कामे जलनि:सारण या आर्थिक शिर्षका अंतर्गत केला जाईल.

सदरील कामाला मा.आयुक्त साहेबांनी दिनांक २१.०९.९८ ला मंजूरी दिलेली आहे. तरी रक्कम रुपये १९,१८,४००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेस्तव सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** स्विकृतीसह मंजूर.

**ठराव क्र.११८/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा सुतगिरणी मागील काब्रानगर येथे १५०/२५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये १९,१८,४००/- च्या अंदाजपत्रकास स्विकृतीसह सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९/४ :**

सहाय्यक संचालक, नगर रचना, यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.जसवंतपुरा १०/पै. ची जमिन जी औरंगाबाद शहराकरिता १९७५ साली मंजूर झालेल्या विकास योजना मधील आरक्षण क्र.२०५ ने बाधित (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) होत आहे. ती जमिन १९८५ साली खाजगी वाटाघाटीने संपादित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेने केलेली आहे.

जमिनीच्या क्षेत्र एकका मधील संदिग्धत्वे संदर्भात जमिन मालकाने प्रकरण न्यायप्रविष्ट करुन न्यायालयाचा मार्फत महानगरपालिकेस प्रत्यक्ष जागेवर विकास कामे करण्यास मनाई केली होती. सदरील न्यायालयीन प्रकरणी दि.दा.क्र.७१४/८९ मध्ये न्यायालयाने महानगरपालिका विरुध्द निर्णय दिल्याने त्यावर महानगरपालिकेने वरीष्ठ न्यायालयात अपिल केलेले आहे. सदर अपिलाचे अंतिम निर्णयास लागणारा कालावधी, अंतिम निर्णयाबाबत अनिश्चितता इ.चा एकत्रित विचार करता विकास कामे करण्यासाठी तसेच जनतेस सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता जागा उपलब्ध व्हावी, तसेच हया देण्याकरिता जागा उपलब्ध व्हावी, तसेच हया जमिनीतून जाणाऱ्या नाला ट्रेनिंगचे काम जे न्यायालयाचे मनाई हुकूमामुळे सध्या बंद आहे ते सुरु करता यावे. असा विकासात्मक दृष्टीकोन समोर ठेवून न्यायालयीन वाद समोपचाराने मिटवावा. यासाठी महानगरपालिकेने संबंधित जमिन मालकाने महानगरपालिकेस सादर केलेला तडजोड प्रस्तावाचा विचार करुन व त्यानुषंगाने वाटाघाटी करुन खालीलप्रमाणे दोहो बाजूस मान्य असा तडजोड प्रस्ताव तयार केला.

१. संबंधित जमिन मालक महापालिकेस तीन एकर क्षेत्राची जमिन रितसर नोंदणीकृत दस्तऐवजाने हस्तांतरीत करुन देतील.
२. नाला ट्रेनिंगचे बाधित क्षेत्र व पाण्याचे टाकीस/महानगरपालिकेचे जागेस उपलब्ध होणारा पोच रस्ता/प्रारुप विकास योजनेनुसार १२.०० मी.रुंद रस्त्याने बाधित होणारे क्षेत्रासाठी संबंधितास मोबदला न देता त्याऐवजी संबंधित महानगरपालिकेस देणार

असलेल्या तीन एकर क्षेत्रापैकी १६ गुंठे (१६०० चौ.मी.) क्षेत्र कमी करुन उर्वरीत क्षेत्र महानगरपालिकेस देतील. हया बाधीत क्षेत्रासाठी महानगरपालिका संबंधितास कसलाही रोख स्वरुपातील मोबदला देणार नाही.

३. जमिनीचे क्षेत्र व नाला ट्रेनिंग यानुषंगाने न्यायप्रविष्ट असलेली प्रकरणे, दावे संबंधित स्वत:हून स्वखर्चाने काढुन घेतील.

४. नाला ट्रेनिंगचे थांबविलेले काम पुन्हा सुरु करण्यास त्वरीत अनुमती देतील.

हया तडजोड प्रस्तावास सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यास गेल्या १३ वर्षापासून प्रलंबित प्रकरणी प्रत्यक्ष जागेचा ताबा घेवून महानगरपालिकेस विकास कामी जमिन विकसीत करता येईल.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर रितसर करारनामा व हक्क सोड प्रमाणपत्र करुन संबंधिताकडून वर नमूद केल्याप्रमाणे तीन एकर क्षेत्रापैकी १६ गुंठे क्षेत्र वजा करता २ एकर २४ गुंठे जमिन नोंदणीकृत दस्तऐवजाने महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेण्यात येईल.

सदरील प्रस्ताव पाहता महानगरपलिकेने १९८५ साली वरील सर्व्हे नं.मधील २ हेक्टर २५ आर.एवढे क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादित केले होते. त्यापैकी आता तडजोड प्रस्तावानुसार आरक्षणातील २ एकर २४ गुंठे क्षेत्र महानगरपालिकेकडे ठेवून उर्वरीत क्षेत्र मुळ जमिन मालक नंतर कोणत्याही संदर्भाने या जमिनीबाबत तक्रार कणार नाहीत व न्यायालयात जाणार नाहीत या अटीवर मुळ मालकासाठी सोडण्यात येईल व त्यानुसार ७/१२ मध्ये नोंद घेता येईल.

**संवाद :**

**श्री.अविनाश कुमावत :** सदर जागे संदर्भात न्यायालयात प्रकरण चालु आहे. प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**श्री.मुजीब आलमशहा :** प्रशासनाने ७५ साली सदर प्रस्तावास दर्शविलेल्या जागेची मंजूरी घेतलेली आहे. ८५ साली तार कंपाऊंडही ५० हजार रुपये खर्च करुन बांधलेले आहे. त्याच वेळी संबंधितांना पैसेही दिलेले आहे. न्यायालयात प्रकरण गेल्यावर प्रशासनामार्फत असलेले वकील यांना योग्य ती कार्यवाही करता आलेली नाही. त्यामुळे निकाल विरोधात गेलेला आहे. प्रस्ताव स्थगित करावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** प्रस्तावात दोन ठिकाणी जागा संपादित करण्याचे दाखवलेले आहे. नेमकी किती जागा घेणार खुलासा करावा.

**श्री.मुजीब आलमशाह :** किती एकर जमिन घेतलेली आहे व किती पैसे दिलेले आहे.

**सहा.संचालक, नगररचना :** एकूण ५ एकर ३५ गुंठे जागा १९८५ साली घेतलेली होती. तार फेसिंग करण्या संदर्भात जी संचिका होती. संबंधित नागरिकांनी न्यायालयातून स्थगिती आणलेली होती. त्यामुळे तार फेसिंग करता आलेले नाही.

**श्री.मुजीब आलमशहा :** संबंधित अधिकारी दिशाभूल करत आहे. एकूण जागा ही ३ हेक्टर असून कोर्टाच्या स्थगिती आदेशामुळे तसेच तार फेसिंग करण्यात आले नाही. न्यायालयाचा तसा आदेश आहे काय?

**श्री.गिरजाराम हाळनोर, सौ.लता दलाल :** प्रस्ताव रद्द करण्यात यावा. चौकशी करावी. अशा प्रकारचे प्रस्ताव प्रशासनामार्फत येतात कसे?

**श्री.अजिज खाँ गणी खाँ :** न्यायालयाकडून तीन निकाल योग्य लागलेले आहे. जागा त्यांचे ताब्यात आहेत. संबंधित अधिकारी यांच्याकडे पुर्ण माहिती नाही. प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**मा.महापौर :** सदरचा प्रस्ताव न्यायालयीन प्रकरण असल्याने रद्द करण्यात येतो.

**ठराव क्र.११९/४ :**

सर्वानुमते असे ठरले की, सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**विषय क्र.१२०/५ :**

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद मनपातर्फे बांधण्यात आलेले वसतीगृह कार्यान्वित करणेसाठी नियमावली व कार्य व्यवस्थापन पध्दती मंजूरीस्तव सादर.

**वसतीगृहासाठी नियमावली**

१. वसतीगृहाचे नांव : औरंगाबाद महानगरपालिकेचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र व विद्यार्थी वसतीगृह असे असेल.

२. उदिष्टे : मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी औरंगाबाद शहरात त्यांची राहण्याची योग्य व्यवस्था करणे. औरंगाबाद शहर शैक्षणिक दृष्ट्या प्रगत शहर असून या ठिकाणी विशेषतः मराठवाड्यातील विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. कमकुवत घटक कल्याण निधीचा वापर करुन आमखास (शिवाजी मैदान) जवळ एक वसतीगृह बांधण्यात आले आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या आणि स्थानिक विद्यार्थ्यांना एक अथवा अर्धा टक्के गुण कमी पडल्यामुळे शासकीय वसतीगृहात त्यांना प्रवेश नाकारण्यांत येतो. पर्यायाने विद्यार्थ्यांना जावा व न परवडणारे भाडे देऊन खोल्या घेऊन शालेय/महाविद्यालयीन शिक्षण घ्यावे लागते. या बाबींचा विचार करुन यादी प्रमाणे व जातीनिहाय आरक्षण करुन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत यावा. या वसतीगृहात फक्त निवासाची सोय करण्यांत आली आहे.

३. निवासी छात्र : शासनमान्य शैक्षणिक संस्थेमध्ये पुर्ण कालीन शासकीय मान्यताप्राप्त पाठ्यक्रमाचे शिक्षण घेणारा अथवा प्रवेश घेतलेला मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येईल.

४. प्रवेश : महाराष्ट्रातील १० वी उत्तीर्ण ते पदवी पर्यंतचे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत यावा.

५. प्रवेश पध्दती : महानगरपालिकेतर्फे अर्ज छापण्यात यावेत. वृतपत्रामधून जाहीरात देऊन अर्ज मागविण्यांत यावेत. अर्जासोबत छायाचित्र आवश्यक कागदपत्रांच्या सत्यप्रती मागविण्यांत येतील.

१) ज्या वर्गात विद्यार्थी उत्तीर्ण झाला असेल त्याचे गुणपत्रक.

२) प्रवेश घेऊ इच्छित असलेल्या शाळा/शैक्षणिक संस्थेचे नांव.

३) शाळा सोडल्याचा दाखला.

४) सक्षम अधिकाऱ्यांकडून घेतलेला जातीचा दाखला.

५) मागासवर्गीय म्हणजे अनु.जाती/अनु.जमाती/भ.जा.ज.वि जाती/विशेष मागासवर्गीय व अपंगासाठी अंध १%, मुकबधीर १%, अस्थिव्यंग १% असे एकूण ३% आरक्षण असेल.

निवड झालेल्या विद्यार्थ्यास रु.१०/- च्या बॉंड पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

६. प्रवेशार्थी मेरीट प्रमाणे घेण्यांत येतील तथापि, आपल्या अधिकारात निवड समिती गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांस सक्षम असेल. खालील समिती वसतीगृहाचे व्यवस्थापन व विद्यार्थी निवड करण्याचे कामे करील.

१) अध्यक्ष : उपआयुक्त (प्र.), महानगरपालिका, औरंगाबाद.
२) शहर अभियंता : सदस्य
३) प्रकल्प संचालक : सदस्य
४) मुख्य लेखापरिक्षक : सदस्य
५) शिक्षण अधिकारी : सदस्य
६) कामगार अधिकारी : सदस्य

७. वसतीगृहाचे व्यवस्थापन समिती/शासन निर्णय ३ विद्यार्थ्यांना प्रवेश देणे वा न देणे या बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

| प्रवेश आरक्षण टक्केवारी | | | वर्गनिहाय आरक्षण | |
|---|---|---|---|---|
| १. | अनु.जाती | ८०% इयत्ता ११ वी | - | १० विद्यार्थी |
| २. | अनु.जमाती | १०% इयत्ता १२ वी | - | १० विद्यार्थी |
| ३. | भ.वि.ज.ज. | ५% प्रथम वर्ष | - | १० विद्यार्थी |
| ४. | विशेष मागासवर्ग | २% द्वितीय वर्ष | - | १० विद्यार्थी |
| ५. | अपंग | ३% तृतीय वर्ष | - | १० विद्यार्थी |

कोणत्याही विद्यार्थ्यास प्रवेश नाकारणे अथवा कोणत्याही क्षणी खोली सोडण्याचा आदेश उपआयुक्त व आयुक्त देऊ शकतील. प्रवेश प्राप्त विद्यार्थी, इतरांशी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन, रॅगिंग, चोरी, मारहाण करणार नाही. सर्वांशी तसेच वरीष्ठ अधिकारी, कर्मचारी अथवा व्यवस्थापकांशी सौजन्याने वागणूक प्रवेशार्थीवर बंधनकारक असेल. कोणत्याही महिला, मुलीस विद्यार्थ्यांच्या खोलीत प्रवेश देण्यात येणार नाही. धुम्रपान नशा करणे, पान, तंबाखु, गुटखा खाणे मनाई असेल. असे वर्तन करणाऱ्यास प्रवेश रद्द करण्यात येईल. सायं. १० वाजता मुख्य प्रवेशद्वारे बंद करणेत येईल. व्यवस्थापकाशी पुर्व परवानगी न घेता बाहेरगावी गेलेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश नाकारणे व्यवस्थापकांचा अधिकार असेल. खोलीत कोणासही स्वयंपाक/नाश्ता चहा तयार करता येणार नाही. तसेच पाण्यासाठी खाजगी हिटर लावता येणार नाही. अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास वसतीगृहात पुन्हा प्रवेश मिळणार नाही. नौकरी करणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेश मिळणार नाही. पार्टटाईम अभ्यासक्रम करणाऱ्यास प्रवेश देता येणार नाही.

८. क्रिडा साहित्य : वसतीगृहात डबल बार, सिंगलबार, व्हॉलीबॉल, फुटबॉल, चेस, रिंग, कॅरम इ. साहित्य उपलब्ध करुन देण्यांत येईल.

९. वैद्यकीय सुविधा : वसतीगृहात प्रथमोपचारपेटी असेल तसेच सर्व विद्यार्थ्यांची शासकीय वैद्यकीय रुग्णालयातून वर्षातून एकदा करण्यात येईल.

१०. शुल्क : प्रवेश शुल्क रु.१०/- व दरवर्षी रु.१००/- (ना परतावा) प्रती विद्यार्थी असावे.

११. आवश्यक कर्मचारी वर्ग : खालील पदे निर्माण करणे योग्य.

१) व्यवस्थापक (वर्ग-२) - एक पद
२) कार्यालय अधिक्षक - एक पद
३) क.लिपीक - दोन पद
४) शिपाई - तीन पद

| | | |
|---|---|---|
| ५) वॉचमन | - | तीन पद |
| ६) सुरक्षा रक्षक | - | तीन पद |

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर :** प्रस्तावात दर्शविलेले कर्मचारी वर्ग जास्तीचा वाटतो तो कमी करण्यात यावा. व प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी.

**श्री.रशिद खॉन (मामू) :** माझ्या मते प्रस्तावात जी वर्गवारी दर्शवलेली आहे. तीत फेरबद्दल करुन

| | | |
|---|---|---|
| अनु.जाती | - | ६०% |
| अनु.जमाती | - | १०% |
| भ.जि.ज.ज. | - | १०% |
| विशेष मागासवर्ग | - | ०२% |
| इतर मागसवर्ग | - | १५% |
| अपंग | - | ०३% |

अशी वर्गवारी ठेवावी.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** सभागृहात येण्यापुर्वी वर्गवारी ही योग्य त्या टक्केवारीमध्ये द्यावयास पाहिजे होती.

**मा.महापौर :** मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त :** मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधलेले आहे. या वसतीगृहात एकूण ५० विद्यार्थ्यांना राहण्याची सोय होईल. अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्याची टक्केवारी काय असावी. याची माहिती सभागृहासमोर आलेली आहे. शासनाने जे टक्केवारी व निकश घालुन दिलेले आहे. त्याप्रमाणे प्रस्तावात नमूद केलेले आहे. हे वसतीगृह सध्यातरी महापालिकेच्या स्वत: बळावर सुरु करत आहोत. की भविष्यात शासनाने या वसतीगृहाला अनुदान द्यावे. शासनाकडून जे अनुदान द्यावयाचे त्यानुसार ही टक्केवारी शासनाने अमलात आणुन दिलेली आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे अनु.जाती साठी ८०%, अनु.जमाती १०%, भ.ज.ज.साठी ५%, विशेष मागासवर्ग साठी २%, अपंगासाठी ३% असा शासनाचा तपशील आहे. परंतू स.सदस्य यात बदल असा करु इच्छितात की, अनु.जाती ८०%, ऐवजी ६०%, अनु.जमाती १०% ऐवजी १०%, भ.जि.ज.ज. ५% ऐवजी १०%, विशेष मागासवर्गासाठी २%, अपंगासाठी ३%, इतर मागासवर्गीयासाठी १५% ठेवावे. असे सभागृहाने मत व्यक्त केले. याची चर्चा करावी. निर्णय घ्यावा.

**श्री.रशिद खॉन (मामू) :** सेवा निवृत्तीचे वय ६० वर्ष असावे. असा शासनाने निर्णय घेतलेला आहे. परंतू त्यास मंजूरी घेण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून सभागृहात प्रस्ताव आला असता सभागृहाने ५८ वर्ष असावे असा निर्णय घेतला आहे. यात कसा बदल करण्यात आला.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** सभागृहाने वर्गवारी बदलण्याचे मत दर्शविले आहे. शकते काय? इतर मागासवर्गीयांसाठी १५%, वर्गवारी ठेवावयाच अेल तर यात १५% पैकी ५% सर्वसाधारण वर्गवारीसाठी ठेवण्यात यावी.

**श्री.गौतम खरात :** शासनाच्या नियमाप्रमाणे जी वर्गवारी प्रस्तावात दाखवलेली आहे. परंतू सभागृह बदल करु इच्छित असेल तर, त्यात अनु.जाती ६०%, अनु.जमातीसाठी १०%, भ.जि.ज.ज. ५% ऐवजी १०%, विशेष मागासवर्ग २%, अपंगासाठी ३%, इतर मागासवर्गीय वर्गवारी मध्ये जे येतात व ज्यांनी मंडळ आयोग यांच्या माध्यमातून ज्यांना ज्यांना सवलती मिळालेल्या आहेत. त्याचा या वर्गवारीमध्ये समावेश करु नये.

**श्री.भगवान घडामोडे :** स.सदस्य श्री.गौतम खरात यांनी मोठेपणा दाखविला त्यांचे अभिनंदन.....

**श्री.गिरजाराम हाळनोर :** सभागृहात स.सदस्य जी वर्गवारमध्ये दुरुस्ती करु इच्छितात. ती योग्य असून मंजूरी देण्यात यावी. तसेच यांच प्रस्तावात कर्मचारी वर्ग च्या बाबतीत १) व्यवस्थापक (वर्ग-२)-एक पद, २) कार्यालय अधिक्षक ऐवजी वरीष्ठ लिपीक हे पद असावे, ३) कनिष्ठ लिपीक-२, ४) शिपाई -३ ऐवजी १ घ्यावा. ५) वॉचमन आणि सुरक्षा रक्ष ३-३ पदे दर्शविलेली आहेत. त्याऐवजी वॉचमन आणि सुरक्षा रक्षक ३ पदे असावी. असा बदल करण्यांत यावा.

**मा.महापौर :** सदर प्रस्तावामध्ये सभागृहाने सुचित केल्यानुसार विद्यार्थीसाठी प्रवेश वर्गवारी खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अनु.जाती | ८० ऐवजी | ६०% |
| २. | अनु.जमाती | | १०% |
| ३. | भ.जि.ज.ज. | ५ ऐवजी | १०% |
| ४. | विशेष मागासवर्ग | | ०२% |
| ५. | इतर मागासवर्गीय साठी | | १५% |
| ६. | अपंग | | ०३% |

अशी वर्गवारी करण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्तावामध्ये कर्मचारी वर्ग जो दर्शविलेला आहे. त्यात खालीलप्रमाणे बदल करण्यांत येत आहे.

१) व्यवस्थापक (वर्ग-२) - एक पद, २) कार्यालय अधिक्षक चे पद रद्द करण्यात येत आहे. ३) कनिष्ठ लिपीक - १ पद, ४) शिपाई - १ पद, ५) वॉचमन/सुरक्षा रक्षक-३ पदे अशी दुरुस्ती करण्यांत येते. तसेच सदर वसतीगृहात डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र संचलित ऐवजी लोक शाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र असे या वसतीगृहास नाव देण्यांत यावे, अशी दुरुस्ती करुन हा प्रस्ताव मजूर करण्यांत येतो.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** सदर वसतीगृहासाठी लागणारा खर्च, आर्थिक बजेट किती, या प्रस्तावा संदर्भाने आर्थिक बाजुची माहिती द्यावयास पाहिजे. याचा खुलासा करावा.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** वसतीगृहासाठी सध्या महापालिका फंडातून खर्च करण्यात येणार आहे. शासनाकडून अुनदान आल्यानंतर होणाऱ्या खर्चाची भरपाई करण्यांत येईल.

**मा.महापौर :** मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र. १२०/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकातर्फे आमखास मैदान येथे बांधण्यात आलेल्या विद्यार्थी वसतीगृहासाठी खालीलप्रमाणे नियमावली व कार्य व्यवस्थापन पध्दतीस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१. वसतीगृहाचे नांव : औरंगाबाद महानगरपालिकेचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र व विद्यार्थी वसतीगृह असे असेल.

२. उदिष्टे : मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी औरंगाबाद शहरात त्यांची राहण्याची योग्य व्यवस्था करणे. औरंगाबाद शहर शैक्षणिक दृष्ट्या प्रगत शहर असून या ठिकाणी विशेषतः मराठवाड्यातील विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. कमकुवत घटक कल्याण निधीचा वापर करुन आमखास (शिवाजी मैदान) जवळ एक वसतीगृह बांधण्यात आले आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या आणि स्थानिक विद्यार्थ्यांना एक अथवा अर्धा टक्के गुण कमी पडल्यामुळे शासकीय वसतीगृहात त्यांना प्रवेश नाकारण्यांत येतो. पर्यायाने विद्यार्थ्यांना जावा व न परवडणारे भाडे देऊन खोल्या घेऊन शालेय/महाविद्यालयीन शिक्षण घ्यावे लागते. या बाबींचा विचार करुन यादी प्रमाणे व जातीनिहाय आरक्षण करुन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत यावा. या वसतीगृहात फक्त निवासाची सोय करण्यांत आली आहे.

३. निवासी छात्र : शासनमान्य शैक्षणिक संस्थेमध्ये पुर्ण कालीन शासकीय मान्यताप्राप्त पाठ्यक्रमाचे शिक्षण घेणारा अथवा प्रवेश घेतलेला मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येईल. वस्तीगृहाचे वर्ष : १ जून ते ३१ मे.

४. प्रवेश : महाराष्ट्रातील १० वी उत्तीर्ण ते पदवी पर्यंतचे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत यावा.

५. प्रवेश पध्दती : महानगरपालिकेतर्फे प्रवेश अर्ज छापण्यात यावेत. वृतपत्रामधून जाहीरात देऊन अर्ज मागविण्यांत यावेत. अर्जासोबत छायाचित्र आवश्यक कागदपत्रांच्या सत्यप्रती मागविण्यांत येतील.

१) ज्या वर्गात विद्यार्थी उत्तीर्ण झाला असेल त्याचे गुणपत्रक.
२) प्रवेश घेऊ इच्छित असलेल्या शाळा/शैक्षणिक संस्थेचे नांव.
३) शाळा सोडल्याचा दाखला.
४) सक्षम अधिकाऱ्यांकडून घेतलेला जातीचा दाखला.
५) मागासवर्गीय म्हणजे अनु.जाती/अनु.जमाती/भ.जा.ज.वि जाती/विशेष मागासवर्गीय व अपंगासाठी अंध १%, मुकबधीर १%, अस्थिव्यंग १% असे एकूण ३% आरक्षण असेल.

निवड झालेल्या विद्यार्थ्यास रु.१०/- च्या बॉंड पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

६. प्रवेशार्थी मेरीट प्रमाणे घेण्यांत येतील तथापि, आपल्या अधिकारात निवड समिती गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांस सक्षम असेल. खालील समिती वसतीगृहाचे व्यवस्थापन व विद्यार्थी निवड करण्याचे कामे करील.

१) अध्यक्ष : उपआयुक्त (प्र.), महानगरपालिका, औरंगाबाद.
२) शहर अभियंता : सदस्य
३) प्रकल्प संचालक : सदस्य
४) मुख्य लेखापरिक्षक : सदस्य
५) शिक्षण अधिकारी : सदस्य
६) कामगार अधिकारी : सदस्य

७. वसतीगृहाचे व्यवस्थापन समिती/शासन निर्णय ३ विद्यार्थ्यांना प्रवेश देणे वा न देणे या बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

| प्रवेश आरक्षण टक्केवारी | | |
|---|---|---|
| १. | अनु.जाती | ६०% |
| २. | अनु.जमाती | १०% |
| ३. | भ.वि.ज.ज. | १०% |
| ४. | विशेष मागासवर्ग | २% |
| ५. | इतर मागासवर्ग | १५% |
| ६. | अपंग | ३% |

| वर्गनिहाय आरक्षण | |
|---|---|
| इयत्ता ११ वी | १० विद्यार्थी |
| इयत्ता १२ वी | १० विद्यार्थी |
| प्रथम वर्ष | १० विद्यार्थी |
| द्वितीय वर्ष | १० विद्यार्थी |
| तृतीय वर्ष | १० विद्यार्थी |

कोणत्याही विद्यार्थ्यास प्रवेश नाकारणे अथवा कोणत्याही क्षणी खोली सोडण्याचा आदेश उपआयुक्त व आयुक्त देऊ शकतील. प्रवेश प्राप्त विद्यार्थी, इतरांशी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन, रॅगिंग, चोरी, मारहाण करणार नाही. सर्वाशी तसेच वरीष्ठ अधिकारी, कर्मचारी अथवा व्यवस्थापकांशी सौजन्याने वागणूक प्रवेशार्थीवर बंधनकारक असेल. कोणत्याही महिला, मुलीस विद्यार्थ्यांच्या खोलीत प्रवेश देण्यात येणार नाही. धुम्रपान नशा करणे, पान, तंबाखु, गुटखा खाणे मनाई असेल. असे वर्तन करणाऱ्यास प्रवेश रद्द करण्यात येईल. सायं. १० वाजता मुख्य प्रवेशद्वारे बंद करणेत येईल. व्यवस्थापकाशी पुर्व परवानगी न घेता बाहेरगावी गेलेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश नाकारणे व्यवस्थापकांचा अधिकार असेल. खोलीत कोणासही स्वयंपाक/नाश्ता चहा तयार करता येणार नाही. तसेच पाण्यासाठी खाजगी हिटर लावता येणार नाही.

८. क्रिडा साहित्य : वसतीगृहात डबल बार, सिंगलबार, व्हालीबॉल, फुटबॉल, चेस, रिंग, कॅरम इ. साहित्य उपलब्ध करुन देण्यांत येईल.

९. वैद्यकीय सुविधा : वसतीगृहात प्रथमोपचारपेटी असेल तसेच सर्व विद्यार्थ्यांची शासकीय वैद्यकीय रुग्णालयातून वर्षातून एकदा करण्यात येईल.

१०. शुल्क : प्रवेश शुल्क रु.१०/- व दरवर्षी रु.१००/- (ना परतावा) प्रती विद्यार्थी असावे.

११. आवश्यक कर्मचारी वर्ग : खालील पदे निर्माण करणे योग्य.

| | | |
|---|---|---|
| १) व्यवस्थापक (वर्ग-२) | - | एक पद |
| २) क.लिपीक | - | एक पद |
| ३) शिपाई | - | एक पद |
| ४) वॉचमन/ सुरक्षा रक्षक | - | तीन पद |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, हर्सुल ते जमनज्योती या रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु.१०,६२,६००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नवीन डांबरीकरण" या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. तसेच सदरील काम प्रत्यक्ष हस्तांतरणानंतर करण्यात येईल. या अटीवर अंदाजपत्रक रक्कम रुपये १०,६२,६००/- ला मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** सदर प्रस्तावात दर्शविलेल्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी जिल्हा परिषदेकडून ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले आहेत. हा प्रस्ताव मंजूर करुन याच सभेस स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र.१२१/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल ते जमनज्योती या रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरीकरणेच्या कामासाठी रु.१०,६२,६००/- च्या अंदाजपत्रकास स्विकृतीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१/अ-७ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, राष्ट्रीय गलिच्छवस्ती सुधारणा कार्यक्रमाची अंमलबजावणी महानगरपालिका हद्दीत सुरु करण्यासाठी शासनाच्या दि.०५.०६.९८ च्या शासन निर्णयान्वये सुचना दिलेल्या आहेत. या कार्यक्रमाअंतर्गत पहिल्या टप्प्याचा अंमलबजावणी संबंधित महानगरपालिकांनी तात्काळ सुरु करावयाची असून दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्याच्या अंमलबजावणी बाबत शासनाकडून स्वतंत्र रित्या कळविण्यांत येणार असल्याचे दि.१६.०७.९८ च्या शासन पत्रान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. कार्यक्रम अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे सुचना दिल्या आहेत.

१. या कार्यक्रमा अंतर्गत कामाचे प्रस्ताव शेजार समित्या/समाज विकास संघटना मार्फत तयार करुन आराखड्यासह प्रशासकीय मंजूरीसाठी जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडे सादर करावेत.

२. या कार्यक्रमासाठी सन ९८-९९ वित्तीय वर्षाकरिता लागणाऱ्या निधीची मागणी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडे सादर करण्यांत यावेत. ही मागणी सादर करतांना या योजने अंतर्गत अर्थ सहाय्याच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित महानगरपालिकांनी सादर करावयाची आहे.

३. ज्या महानगरपालिका क्षेत्रात सध्या झोपडपट्टी सुधारणा कायदा लागू आहे. व ज्यांचा पाहिल्या टप्प्यातील ५० शहरात समावेश नाही अशा मनपा क्षेत्रात सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अंतर्गत रोजगार समित्या समाज विकास संघटना अशी समाज संरचना निर्माण झाल्या बरोबर ही योजना लागू करण्याबाबतचे प्रस्तावा तात्काळ शासनास सादर करावेत. जेणेकरुन ही योजना संबंधित महानगरपालिका क्षेत्रात तात्काळ सुरु करता येईल.

४. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी संबंधित महानगरपालिकांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा) कायदा १९७१ हा आपल्या महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू करण्याबाबतचे प्रस्ताव तात्काळ शासनास सादर करावेत. प्रस्ताव सादर करतांना संबंधित महानगरपालिका क्षेत्रात दि.०१.०१.९५ पुर्वीच्या बसलेल्या व ज्यांची नावे १९९५ च्या मतदार यादीत समाविष्ट आहेत. अशा सर्व झोपडपट्टांची संख्या झोपडपट्टी क्षेत्रांचे नांव, कोणत्या जागेवर बसलेल्या आहेत त्यांचा तपशिल व त्यातील लोकसंख्या इ. तपशिल देऊन आपल्या अभिप्रायासह सविस्तर प्रस्ताव सादर करावेत.

५. झोपडपट्टी क्षेत्र नसल्यास तसे स्पष्ट कळविण्यांत यावे.

६. ज्या महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रात सध्या महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा कायदा १९७१ लागू आहे. तसेच हा कार्यक्रम राबविण्यांत येत आहे. अशा सर्व महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रातील दि.०१.०१.९५ पुर्वी वसलेल्या व सन १९९५ च्या मतदार यादीत नांवे असलेल्या झोपडपट्टी वासीयांना या योजने अंतर्गत सुविधा लाभ द्यावयाचा असल्यामुळे वरील मुद्दा क्र.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यांत यावेत.

७. या योजनेच्या तिसऱ्या टप्प्यांची अंमलबजावणीमध्ये नागरी गरीबांसाठी आवश्यकतेप्रमाणे नवीन घर बांधणी व निवारा सुधार च्या घटकांचा समावेश असून या बाबतची योजना शासन स्तरावर ठरविण्यात यावयाचा आहे. त्यासाठी महानगरपालिका कडून काही मार्गदर्शक सुचना/प्रस्ताव अडचणी शासनास स्वतंत्ररित्या कळविण्यांत याव्यात असे शासनास अभिप्रेत आहे. सदरील सुचना किंवा अभिप्राय योजना ठरवितांना विचारात घेता येईल, शासनाच्या सुचना विचारात घेऊन सदरील योजना राबविण्याबाबत कार्यवाही करावी असे शासनाचे आदेश आहेत. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर यांच्या सुचनेनुसार नगरसचिव यांनी प्रस्ताव वाचुन दाखविला.

**संवाद :**

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**श्री.भगवान घडामोडे, श्री.संजय जोशी :** शासनाकडून कर्ज घेऊन अशा योजना राबविणे योग्य नाही. यामुळे महापालिकेवर आर्थिक बोजा होईल. पाहिली जी योजना राबविण्यात येत आहे. त्यात समावेश करण्यात यावा. कर्ज घेऊन महापालिका प्रशासनाला जवळजवळ १५% व्याज मोजावे लागेल. व कालांतराने रक्कम वाढत जाईल.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**प्रकल्प संचालक :** १९७१ च्या कायद्यानुसार महानगरपालिकेतर्फे एस.आय.पी. स्लम इन्क्युपमेंट ही योजना राबविण्यात येत होती. या योजने अंतर्गत झोपडपट्टी वासियांना ज्या महत्वाच्या पाच मुलभूत सुविधा त्यात १) गटार, २)पाणी, ३) वीज, ४) रस्ते, ५) सार्वजनिक स्वच्छालय या मुलभूत सुविधा शासनाच्या वतीने म्हाडामार्फत पुरविल्या जात होत्या. परंतू शासनाच्या निर्णयानुसार १९८५ नंतर व १९९५ च्या पुर्वी अस्तित्वात आलेल्या ज्या वसाहती आहेत व ज्यांची नावे १९९५ मतदार यादीत आहे. अशांच लोकांना सुविधा देण्याचा विचार आहे. शासनाकडून ७०%, कर्ज ३०% अनुदान मागवावे लागणार आहे. नियमित हप्ते शासनाकडे न दिल्यास १३% ने रक्कम द्यावी लागणार

आहे. जर १० महिन्याच्या आत कर्ज परत शासनाकडे अदा न केल्यास १५.७५% प्रमाणे रक्कम द्यावी लागेल. १९८५ पुर्वी विनामूल्य सेवा पुरविल्या जात होत्या. परंतू १९९५ ला ज्या गलिच्छ वस्त्या आहेत. त्यांना शासनाकडून कर्ज घेऊन सुविधा पुरवाव्या लागतील. या बाबत सभागृहाने निर्णय द्यावा.

**श्री.संजय जोशी :** महापालिकेला वीज बिलापोटी विद्युत मंडळाची रक्कम मोठ्या प्रमाणात देणे आहे. सदर योजना राबविल्यास व्याज वाढेल व बँकही ९३% ठराविक काळात नाही. तर १५% नी रक्कम घेणार आहे. या प्रस्तावास मंजूरी देऊ नये. रद्द करण्यात यावा.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** सदर प्रस्ताव रद्द करु नये. गरीब लोकांची पण या योजना राबविण्यता याव्या, अशी मागणी आहे. अधिकृत वस्त्या किती, त्यातील लोकसंख्या किती, त्यासाठी खर्च किती, अनुदान किती येणार याची सविस्तर माहिती द्यावयास पाहिजे. शासनाकडून अनुदान कमी आल्यास लोकवर्गणी करुन अशा योजना राबवाव्यात. महापालिकेला जास्तीत जास्त कर्जाचा आर्थिक बोज पडणार नाही. या दृष्टीने, महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये अशा योजना राबविण्यासाठी ५% खर्च ठेवलेला असतो तो ७% पर्यंत ठेवण्यात यावा. प्रस्ताव रद्द न करता स्थगित ठेवून पुर्ण माहितीस्ह पुढच्या बैठकीत ठेवण्यात यावा.

**श्री.जयवंत ओक :** ०१.०१.९५ च्या धरतीवर (नंतरच्या) ज्या वसाहती झालेल्या आहेत त्या वसाहतींना ही योजना झोपडपट्टी वसाहतीसाठी लागू आहे की, स्लम भागामध्ये येणाऱ्या अनाधिकृत वसाहतीमध्ये लागू आहे का? याचा खुलासा करावा. स.सदस्य श्री. ओबेरॉय यांनी सांगितल्याप्रमाणे यात दुरुस्ती करुन पुढच्या बैठकीत हा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**सौ.लता दलाल :** माझ्या चार सुचना आहेत त्या या प्रमाणे....................

१) ०१.०१.९५ पुर्वीच्याच झोपडपट्टी वासियांना यांचा लाभ होणार आहे काय?

२) ०१.०१.९५ नंतरच्या ज्या वसाहती झालेल्या त्या वसाहतीतील नागरिकांना यांचा लाभ होणार की नाही? नसेल तर का?

३) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये जे नागरिक येतात. ते अनाधिकृत वस्त्या करुन राहतात त्यांना या योजनेचा लाभ होणार आहे का?

४) अशा प्रकारची योजना राबवितांना महापालिकेवर आर्थिक बोजा किती येणार इ.प्रश्नांचा खुलासा करावा.

**प्रकल्प संचालक :** आतापर्यंत स्लम इन्क्रयुमेंट नियमानुसार १९८५ पुर्वी अस्तित्वात आलेल्या वसाहतींना ज्या घोषित झोपडपट्टी होत्या. त्यांना महापालिकेमार्फत मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने ठरविले होते. परंतू सन १९८५-९५ या काळात ज्या वसाहती झालेल्या आहेत. त्यात किती घोषित व किती अनाधिकृत वसाहती आहेत. की ज्या नियमाने घोषित करता येईल, असा शासनाने खुलासा विचारलेला आहे. त्यासाठी प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर घोषित वसाहती संदर्भात माहिती देतांना शासनाकडे असे कळवावे लागेल की, किती वसाहती शासकीय जमिनीवर आहे, किती खाजगी जमिनीवर आहे. व या वसाहतींना महापालिका मुलभूत सुविधा पुरवित आहे काय?

**श्री.काशिनाथ कोकाटे :** १९९५ पर्यंत ज्या झोपडपट्टी आहेत. त्या अनाधिकृत असो किंवा अधिकृत असो त्या अधिकृत समजाव्या असे शासनाचे १९९५ चे आदेश आहेत. शासनाचे जर पुन्हा तसे आदेश निघालेले असतील तर शासन आणि राज्य गट यांच्यामध्ये दुमत आहे काय?

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी परत खुलासा करावा.

**प्रकल्प संचालक :** शासनाच्या धोरणानुसार १९७१ च्या कायद्यानुसार १९७१ मध्ये मतदार यादीत ज्यांची नांवे आहेत. अशांनाच मुलभूत सुविधा पुरविल्या जात होत्या. परत शासननिर्णय १९७६ ज्या जनगणना यादीमध्ये किंवा शासनाच्या वतीने झोपडपट्टीची जनगणना झालेली होती. अशा वसाहतीतील ज्यांची नावे आहेत. त्या वसाहतीमध्ये शासनाच्या वतीने म्हाडाच्या मार्फत महानगरपालिका मुलभूत सुविधा पुरविल्या जात होत्या. तिसरा शासन निर्णय असा की, १९८५ च्या मतदार यादीत ज्यांची नावे आहेत. अशाच वसाहतीतील नागरिकांना महापालिकेने मुलभूत सुविधा पुरवाव्यात. परंतू दर १० वर्षाला जणगणना होत असते. यात बदल एवढाच की ७०% खर्च महापालिकेने करावा व ३०% शासनाकडुन अनुदान स्वरुपात महापालिकेने घ्यावे व ही योजना राबवावी. अशा शासनाचा जी.आर. आहेत.. त्यास मान्यता द्यावयाची की नाही यावर निर्णय व्हावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** मुंबई येथे १९९५ च्या शासन निर्णयानुसार अशा योजना राबविल्या जातात. आणि औरंगाबाद साठी वेगळे नियम का?

**उप.महापौर :** शासनाकडुन अनुदान घेऊन या योजना राबवत आहात तर यात दोन्ही स्कीम लागू करु शकत नाही काय? १) सध्या अनुदान घेतो ती एक, २) जेथे घोषित स्लम आहे ते व जे अघोषित झोपडपट्ट्या आहेत. त्यांचा समावेश करता येईल का?

**श्री.काशिनाथ कोकाटे :** १९९५ च्या नंतर ज्या वसाहती झालेल्या आहेत. त्याचा सर्व्हे करण्यात येऊन यात समावेश करण्यात यावा. तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**मा.महापौर :** सदर प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात येतो.

**ठराव क्र.१२१/अ-७ :**

सर्वानुमते असे ठरले की, सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात येतो.

## <u>पुरवणी विषय</u>

**विषय क्र.१२२/१ :**

मंजूर विकास योजनेमध्ये महात्मा फुले चौक ते दिवाण देवडी या ५० फुट विकास योजना रस्त्यामध्ये गुलमंडी चौकात दोन रस्त्यांच्या जंक्शनला श्री.तनवाणी यांच्या मालकीची जागा नगर भूमापन क्रमांक बाधीत होते. तरी सदरील जागा रस्ता रुंदीकरणासाठी तात्काळ खाजगी वाटाघाटीने किंवा रितसर भूसंपादनाने ताब्यात घ्यावी. म्हणजे चौकातील रहदारीचा अडथळा दुर होईल. भूसंपादन करण्यासाठी व पुढील वैधानिक कार्यवाही प्रशासनाकडून करण्यासाठी मान्यता व्हावी. प्रस्ताव सादर.

**सुचक :** श्री.प्रदिपकुमार जैस्वाल,
**अनुमोदक :** श्री.नरसिंग ढगे,
दि.१५.०९.९८

**ठराव क्र. १२२/१ :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नसल्याने सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१२३/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकातील शिक्षण विभागामार्फत सध्या मराठी व उर्दू माध्यमाचे व दिशाभाषिक असे एकूण ८० शाळा आहेत. सदरील शाळेत सुमारे ३५,०००/- हजार विद्यार्थी शिकवण घेत आहे. सध्या सदरील विभागात एकच शिक्षणाधिकारीचे पद आहे. एवढा मोठा कार्यालयासाठी महानगरपालिका तर्फे उर्दू माध्यमासाठी एक शिक्षणाधिकारीची पद निर्माण करण्यात यावे. ज्यामुळे उर्दू व मराठी दोन्ही माध्यमातील विद्यार्थ्यांना व शाळांना व कार्यालयीन कामकाजात शिस्त लावण्यांत सोयीस्कर होईल व महानगरपालिकातील शाळेत विद्यार्थ्यांचा शिकवण्याचा दर्जा वाढतील. यामुळे नागरिकांच्या व निवडून आलेल्या प्रतिनिधींचा दररोज येणाऱ्या तक्रारी ही दूर होईल. प्रस्ताव मान्यता व मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.अफसर खॉन,

**अनुमोदक :** श्रीमती मोहसिना बिल्कीस,

श्री.स.अ.एकबालोद्दीन,

स.अ.कुतोबुद्दीन

दि.१८.०९.९८

**संवाद :**

**मा.महापौर :** आकृती बंधामध्ये सदर पद समाविष्ट केलेले असल्याने प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र.१२३/२ :**

प्रशासनातर्फे महानगरपालिका कर्मचारी आकृतीबंध बाबतचा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आलेला आहे. त्या प्रस्तावात सदर प्रकरणी विचार करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१२४/३ :**

प्रस्तावात सादर करण्यात येतो की, मोहल्ला शांतीपुरा येथे आर्थिक दृष्ट्या कमकुवत लोक राहतात त्या भागात महानगरपालिकेची शाळा नाही. तरी गरीब जनतेला शिक्षणाचा फायदा व्हावा म्हणून शांतीपुरा येथे प्राथमिक शाळा सुरु करण्यात यावी. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** सौ.शकुंतला धांडे,

श्रीमती अलका पाटील

**अनुमोदक :** श्रीमती मोहसीना बिल्कीस,

श्री.अभिमन्यु भालेराव.

दि.०६.१०.९८

**संवाद :**

**श्री.अविनाश कुमावत :** अशा पध्दतीने शाळा देता येईल काय खुलासा करावा.
**मा.महापौर :** मा.आयुक्तांनी खुलासा करावा.
**मा.आयुक्त :** या बाबत सविस्तर माहिती घ्यावी लागेल.
**मा.महापौर :** तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र.१२४/३ :**
सर्वानुमते असे ठरले की, सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्र.१२५/४ :**
प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, लॉयन्स क्लब या सेवाभावी संस्थेमार्फत उस्मानपुरा भागात बाल सदन नावाचे अनाथ मुलांसाठी वसतीगृह चालविण्यात येते. लॉयन्स क्लब कडून वसतीगृहात राहणाऱ्या मुलांकडुन कोणत्याही प्रकारचे शुल्क घेण्यात येत नाही. मानवतावादी दृष्टीकोनातून या क्लब मार्फत विविध जाती धर्माचे मुलांना वसतीगृहात सर्व सोयी सुविधा पुरविण्यात येतात. जसे जेवण, कपडे, शैक्षणिक साहित्य इ. विनामुल्य पुरविण्यात येते. महानगरपालिकेमार्फत वसतीगृहाचे इमारतीवर मालमत्ता कर आकारण्यात येते. तसेच पाणीपट्टी सुध्दा वसुल करण्यात येते. लॉयन्स क्लब या सेवाभावी संस्थेचा उद्देश विचारात घेता वसतीगृहाचे इमारतीस आकारलेला मालमत्ता कर पुर्णतः माफ करणे. तोच पाणीपट्टी सुध्दा माफ करणे बाबत प्रस्ताव मूंजरीस्तव विचारार्थ सादर.
**सुचक :** श्री.आविनाश कुमावत,
श्री.प्रदिपकुमार जैस्वाल,
**अनुमोदक :** श्री.गिरजाराम हाळनोर,
श्री.कचरु नवपुते,
श्री.भागवत कराड.
दि.१४.१०.९८

**संवाद :**
**श्री.हमीउद्दीन ताबा :** नियमाप्रमाणे मालमत्ता कर, पाणीपट्टी माफ करता येते काय खुलासा करावा.
**श्री.गजानन बारवाल :** या अगोदर मालमत्ता कर, विद्युत कर, माफ केलेले आहेत.
**श्री.गिरजाराम हाळनोर :** प्रस्तावास मंजूरी देऊन शासनाकडे पाठवण्यात यावा.

(याच वेळी सभागृहात स.सदस्य मा.महापौर यांचया आसनाजवळ जाऊन मोठमोठ्याने बोलतात काही ही ऐकू येत नाही.)
**मा.महापौर :** सदर प्रस्तावा बाबत सविस्तर माहिती घेऊन मा.आयुक्त यांनी पुढच्या बैठकीत प्रस्ताव ठेवण्याची कार्यवाही करावी.

**ठराव क्र.१२५/४ :**
सर्वानुमते असे ठरले की, सदरचा प्रस्ताव दुरुस्तीसह पुढच्या बैठकीत ठेवण्यात यावा.

**विषय क्र.१२६/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रहेमानिया कॉलनी अंतर्गत किराडपुरा प्रा.शाळा क्र.१ च्या पाठीमागे हबीब कॉलनीत व फत्तेसिंगपुरा पाण्याच्या टाकीजवळ चारशे घराची वस्ती आहे. सर्वच नागरिक रोज मजूरी करुन पोट भरणारे असून सदर वस्तीत ड्रेनेज लाईन नसल्यामुळे औरंगाबाद शहराच्या मध्यभागी राहणारे हे नागरिक हलाखीचे जिवन जगत आहेत. प्रत्येक नागरिकांच्या घराच्या चौकटी समोरुन ड्रेनेज चे घाण पाणी वाहत असून भयंकर रोगांचा प्रसार होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. सर्व घरांना कर आकारण्यात आला आहे. परंतू वनफोर्थ बेटरमेन भरण्याचे कारण दाखवुन महानगरपालिका ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी नकार देत आहे. अशा गरीब वस्तीत मानवी दृष्टीकोन समोर ठेऊन महानगरपालिकाने त्वरीत ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी. जेणेकरुन भविष्यात भयंकर रोगाचा अनर्थ टाळता येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.
**सुचक :** श्रीमती फरहत बानो महंमद नवाज,
**अनुमोदक :** श्री.रशिद खान (मामू)
श्री.स.अ.एकबालोद्दीन मुजाहेद.
दि.१४.१०.९८

**संवाद :**
**मा.महापौर :** सुचक सभागृहात उपस्थित नसल्यामुळे तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र.१२६/५ :**
सर्वानुमते असे ठरले की, सुचक उपस्थित नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र.१२७/१ :**
सहाय्यक संचालक, नगर रचना प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेचे शहरातून वाहनाच्या प्रमुख नाल्यापैकी औरंगपुरा, भागातील महानगरपालिकेने विकसीत केलेल्या नाथ सुपर मार्केटच्या पश्चिमेस असलेली नाला जमीन श्री.शिवाई सेवा ट्रस्ट मुंबई या संस्थेस संस्थेंच्या कार्यालय व इतर धर्मादायक उपक्रमाकरिता दिर्घमुदतीवर भाडे पट्ट्याने देण्यांचा प्रस्ताव दि.३१.०५.९७ च्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.३१/२९ ने मान्यता दिलेली आहे.

प्रचलित धोरणानुसार नाला जमिनीचे प्रकरण शासनास सादर केले असता त्या संदर्भात मंत्रालयात संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करता त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार मंजूर व प्रारुप विकास योजना मध्ये आरक्षित असून समुचीत प्राधिकरण (Acquiring body) म्हणून महापालिका आहे, त्या ऐवजी सदर आरक्षण "श्री.शिवाई सेवा ट्रस्ट मुंबई" असे दाखवून समुचित प्राधिकरण म्हणुन श्री.शिवाई सेवा ट्रस्ट असा निर्देश व्हावा. यासाठी किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करणे आवश्यक आहे. नाला जमीन सदरहू संस्थेस ३० वर्षाकरिता भाडेपट्ट्यावर देण्यांबाबत महापालिकेने मंजूर केलेला ठराव व शासनास सादर केलेले प्रकरण पाहता वर नमूद केल्याप्रमाणे विकास योजनात किरकोळ फेरबद्दल करण्याचा प्रस्ताव यापुर्वीचे जागा

देण्याबाबतचे ठराव क्र.३१/२९ दि.३१.०५.९७ चे अटी व शर्तीस पात्र राहून मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेची पुढील कार्यवाही करुन प्रस्ताव शासनास सादर करण्यांत येईल. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाची पुढील कार्यवाही अंतर्गत शासनाची अंतिम मंजूरी घेण्याकरिता ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीस अनुसरुन प्रस्तावित फेरबदलास अंतिम स्वरुप देण्यासाठी जनतेकडून सुचना/हरकती मागविण्याचे व सुचना/हरकतीचा विचार करुन फेरबदलाचे स्वरुपास अंतिम स्वरुप देवून प्रस्ताव शासनाचे मंजूरी करिता राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी आवश्यक ते पत्रव्यवहार करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यांत यावे.

**संवाद :**

**मा.महापौर :** सदर प्रस्तावास स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

**ठराव क्र.१२७/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातून वाहणाऱ्या प्रमुख नाल्यापैकी औरंगपुरा भागातील नाथ सुपर मार्केटच्या पश्चिमेस असलेली नाला जमीन सर्वसाधारण सभा ठराव क्र.३१/२९ दि.३१.०५.९७ अन्वये "श्री.शिवाई सेवा ट्रस्ट मुंबई" यांना दिर्घ मुदतीवर भाडेपट्ट्याने देण्यांस मंजूरी मिळाली आहे. प्रारुप विकास योजनेत प्रस्तावित जागा आरक्षणात असून त्यास समुचित प्राधिकरण महानगरपालिका, औरंगाबाद आहे. त्यामुळे सदर आरक्षण "श्री.शिवाई सेवा ट्रस्ट मुंबई" असे दाखवून समुचित प्राधिकरण म्हणून श्री. शिवाई सेवा ट्रस्ट असा फेरबदल प्रारुप विकास योजनेत करण्यासाठी व वरील ठरावातील अटी व शर्तीस अधिन राहून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २७ अन्वये गौण फेरबदल करण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच वरील अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये आवश्यक ती कार्यवाही करणेस जसे जनतेकडून सुचना/हरकती मागविने त्यास अंतिम स्वरुप देऊन प्रस्ताव राज्य शासनाच्या मंजूरीसाठी पाठविणे इ. पत्र व्यवहार करण्याचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यांस ही सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२८/२ :**

उपआयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सादर केला की, समाज मानसात नैतिक व अध्यात्मिक मुल्ये रुजवावीत तसेच शहराची वाढती शैक्षणिक सामाजिक गरज लक्षात घेऊन विविध क्षेत्रात असामान्य कार्य करणाऱ्या औरंगाबाद शहरातील सेवानिवृत्त नागरिकांनी प्रगतीशिल जेष्ठ नागरिक सेवाभावी संस्था सिडको या संस्थेची स्थापना केली आहे.

या सेवाभावी संस्थेमार्फत विद्यासेवा, आरोग्य सेवा, उद्यान सेवा, टपाल सेवा, पशुसेवा आदी क्षेत्रात सामाजिक गरजांची पुर्ती करणेचे कार्य केले जाते. विद्यासेवा या प्रकल्पा अंतर्गत महानगरपालिकेस त्यांचेकडुन सहकार्य मिळत असते. ही संस्था नोंदणी अधिनियम १८६० नोंदणी क्रमांक एम.ए.एच.जी.डी./१४४/-९१/औरंगाबाद सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम १९५० नोंदणी क्रमांक एफ-२०८६/९२ औरंगाबाद या क्रमांकाने पंजीकृत करण्यांत आलेली आहे. या प्रकल्पा अंतर्गत "गीताभवन" या बहुविध उपयुक्त उभारणीचा प्रकल्प संस्थेने हाती घेतला असून त्यासाठी सिडको एन-५ परिसरात ५०० स्केअर मीटर जमिन संपादित केलेली आहे. वास्तु उभारणीचा खर्च लक्षात घेता व

महानगरपालिकेत या संस्थेकडुन मिळणारे सहकार्य भविष्यातील अडचणीवर मात करण्यासाठी लागणारे जबाबदार व्यक्तींच्या अनुभवाचे मार्गदर्शन या मौलिक बाबी लक्षात घेता या प्रकल्प उभारणीसाठी महानगरपालिकेचे वतीने रु.२,००,०००/- (रु.दोन लाख) आर्थिक मदत करणेबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र.१२८/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील सेवानिवृत्त नागरिकांनी स्थापना केलेल्या प्रगतशील, जेष्ठ नागरिक सेवाभावी संस्था, सिडको या संस्थेमार्फत विद्या सेवा, आरोग्य सेवा, उद्यान सेवा, टपाल सेवा, पशुसेवा, आदीक्षेत्रात सामाजिक क्षेत्रात गरजांची पुर्ती करणेचे कार्य केले. जात असल्याने सिडको एन-५ येथे उभारण्यात येणाऱ्या "गीताभवन" या वास्तुचे उभारणीसाठी औरंगाबाद महानगरपालिका तर्फे २,००,०००/- आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२९/३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, गोल व आयताकृती एस.एफ.आर.सी. ढाप्याचा (कव्हर्सची) खरेदी करणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ३३,९३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्याचे दर हे "डी" फॉर्मनुसार मागविण्यांत येतील.

शहरात विविध ठिकाणी नवीन जलनि:सारण वाहिनी टाकणे, तसेच देखभाल व दुरुस्ती, नाल्यावर चौकोणी ढापे टाकणे इत्यादीचे अंदाजपत्रक मंजूर आहेत. त्या अंदाजपत्रकात याचा समावेश आहे. या सर्व कामासाठी एकत्रित खरेदी करावयाची आहे.

तरी एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कम रु.३३,९३,०००/-यास मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र.१२९/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विविध ठिकाणी जलनि:सारण वाहिनी टाकणे, देखभाल व दुरुस्तीची कामे व नाल्यावर ढापे टाकणे ई कामासाठी आवश्यक असलेले गोल व आयताकृती एस.एफ.आर.सी.ढापे खरेदी करण्याकरिता रक्कम रु.३३,९३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३०/४ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील ड्रेनेज चोकअप काढण्यासाठी सन १९९३ मध्ये एक जेटींग मशिन खरेदी करण्यांत आले आहे. सध्या हे मशिन प्रत्येक झोनमध्ये आठवड्यातून एक दिवस या प्रमाणे काम करत आहे. इतर दिवशी लाईन चोकअप झाल्यास चोकअप काढण्यास अडचण निर्माण होते. तसेच दिवसेंदिवस शहराची वाढ होत आहे व मशिन जुनी होत आहे. त्यामुळे एकाच मशिनद्वारे शहरातील ड्रेनेज लाईनचे चोकअप काढण्याचे काम होत नाही. करिता एक नवीन टाटा - ९०९ वर बसविण्यांत येणारी व ३००० मीटर क्षमतेचा जेंटींग मशिन खरेदी करणे योग्य होईल.

जेटींग मशीन बसविण्यासाठी लागणाऱ्या टाटा-९०९/३६ केबीन चेसीज (पी.टी.ओ.सह) करिता टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सतिष मोटार्स, लि.औरंगाबाद यांचे

शासकीय दराप्रमाणे रुपये ४,६८,१२६.०० खर्च येतो. हे दर जकात दर वगळून असून वाहनाचा ताबा घेतांना जी किंमत असेल त्या प्रमाणे रक्कम अदा करावी लागेल.

चेसीजवर बसविण्यांत येणाऱ्या जेटींग मशिन युनीट करिता शासकीय दर निश्चित केलेले नाही. उपलब्ध झालेले दर यापुर्वी खरेदी केलेल्या मशिनच्या दराच्या संदर्भ घेता, युनिट करीता अंदाजे रुपये १३.०० लाख खर्च येईल, संपूर्ण जेटींग मशिन करिता खालीलप्रमाणे खर्च येतो.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | टाटा-९०९/३६ केबीन चेसीजवर पी.टी.ओ.सह | - | रुपये ४,६८,१२६.०० |
| २. | चेसीजवर बसविण्यांत येणारे जेटींग मशिन युनीट | - | रुपये १३,००,०००.०० |
| | | | **एकूण रु. १७,६८,१२६.००** |
| | | | **म्हणजे रु. १७,७५,०००.००** |

वरीलप्रमाणे नवीन जेटींग मशीन खरेदी करण्यासाठी रु.१७,७५,०००.०० खर्च येतो. हा खर्च पाणी पुरवठा मशिनरी दुरुस्ती लेखाशिर्षातील ९०.०० लाखाच्या तरतूदीतून करण्यांत येईल. तरी जेटींग मशीन खरेदीसाठी रु.१७,७५,०००.०० च्या अंदाजपत्रकास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव क्र.१३०/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिवसेंदिवस शहराची होत असलेली वाढ आणि शहरातील ड्रेनेज चोकअप काढण्यासाठी एकच जेंटींग मशीन यामुळे शहरातील ड्रेनेज चोकअप काढण्याचे काम होत नसल्याने टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सतीश मोटार्स लि.यांचेकडून एक नवीन टाटा-९०९/३६ केबीन चेसीन आणि या चेसीसवर आणि त्यावर बसविण्यात येणारे मशीन युनिट (रु.४,६८,१२६+१३,००,०००/-) करीता एकूण रक्कम रु.१७,७५,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळेचे विषय</u>

**विषय क्र.१३१/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्डाचे रहिवाशी सौ.गोराबाई किशनलाल उंटवाल या महिलेस कॅन्सर झाला आहे. त्यांना उपचारासाठी ७००० (सात हजार) रुपये खर्च आहे. सदरील महिलेच्या घरची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. तरी त्यांना उपचारासाठी सदरील रक्कम सर्वसाधारण ठरावात ऐनवेळच्या ठरावात मंजूर करुन उपकृत करावे.

**सुचक :** श्री.गजाननजी बारवाल.
**अनुमोदक :** सौ.निर्मला कांबळे.
दि.१७.१०.९८

**ठराव क्र.१३१/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.६० च्या रहिवाशी सौ.गोराबाई किशनलाल उंटवाल यांच्या कॅन्सर वरील उपचारासाठी स.नगरसेविका सौ.निर्मला कांबळे यांच्या स्वेच्छा

निधीतून रु.७०००/- आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३२/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.कटकट गेट येथील महानगरपालिका तर्फे नुकताच चालु झालेला दवाखाना चे नांव (खॉजा गरीब नवाज, महानगरपालिका आरोग्य केंद्र) म्हणून नांव देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरी साठी सादर.

**सुचक :**

१. श्री.अब्दुल रशिद खॉन (मामू)
२. श्री.स.अ.इकबालोद्दीन,
३. श्री.नरेंद्र पाटील,
४. श्री.प्रदिप जैस्वाल,
५. श्री.बंडु ओक.

**अनुमोदक :**

१. श्री.अफसर खॉन,
२. श्री.अजीज खॉन,
३. श्रीमती आबेदा बेगम,
४. श्रीमती जाहेदा बेगम,
५. श्री.मोहसीन अहमद.

दि.२७.१०.९८

**ठराव क्र.१३२/२ :**

औरंगाबाद महानगरपालिका तर्फे नुकतेच चालू झालेल्या आरोग्य केंद्रास "खाजा गरीब नवाज महानगरपालिका आरोग्य केंद्र" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३३/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, बायजीपुरा मोतीवाला नगर भागात श्रीमठ कबिरपंथ, नवाबपुरा, औरंगाबाद येथील दिवंगत महंम यांचे समाधीस्थान आहे. सदरील समाधीस्थान फार वर्षा पुर्वीचे आहे. त्या ठिकाणी मठाचे महंत जे दिवंगत झाले. त्यांचा अत्यं संस्कार करण्यात येतो. सदर ठिकाणी असलेल्या ज्या समाधी आहेत. त्या मोडकळीस आलेल्या आहेत. समाधी स्थानावर आजही पुरातन शिलालेख कबिर मंदिर समाधीस्थान असा उल्लेख असलेला शिलालेख अस्तित्वात आहे. या बाबी विचारात घेता सदर जागा कबिर पंथी समाजास स्मशान भुमीसाठी आरक्षित ठेवणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर. व सदरील जागा कबीरपंथ श्रीमठ यांना देण्यात यावी.

**सुचक :** श्री.प्रफुल्ल मालानी,

**अनुमोदक :** श्री.अविनाश कुमावत,

दि.०३.११.९८.

**ठराव क्र.१३३/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बायजीपुरा मोतीवालानगर येथे असलेल्या श्रीमठ कबीरपंथी मठ असून या मठामध्ये कबीर मंदिर समाधीस्थान असा पुरातन शिलालेख

अस्तित्वात असून या ठिकाणी मठाचे दिवंगत महत समाधीस्थान आहे. या बाबींचा समाजास स्मशान भुमीसाठी आरक्षित ठेवण्यास व सदरील जागा कबीरपंथ श्रीमठ यांना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३४/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, लोकमत भवनाच्या पाठीमागील रस्ता सेवनहील ते पाण्याची टाकी या रस्त्यात स्व.जवाहरलालजी दर्डा मार्ग असे नांव देणे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** १. श्री.डॉ.भागवत कराड,
२. श्री.प्रफुल्ल मालानी,

**अनुमोदक :** १. श्री.अविनाश कुमावत,
२. श्री.अफसर खान,
३. श्री.राजकुमार बचाटे

दि.३१.१०.९८

**ठराव क्र.१३४/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सेवन हील ते पाण्याची टाकी या लोकमत भवन मागील रस्त्यास स्व.जवाहरलालजी दर्डा मार्ग असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर "जन-गण-मन" या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.